| ८२. | जैस्वाल (वकील), श्री. आशिष नंदकिशोर (रामटेक) | १२ | ०२ | ८२.७१% |
| ८३. | जैस्वाल, श्री. प्रदिप शिवनारायण (औरंगाबाद मध्य) | ११ | ०३ | ७८.५७% |
| ८४. | जोरगेवार, श्री. किशोर गजानन (चंद्रपूर) | १३ | ०१ | ९२.८५% |
| ८५. | जवळगावकर पाटील, श्री. माधवराव निवृत्तीराव (हदगाव) | १२ | ०२ | ८५.७१% |
| ८६. | कदम, श्री. राम (घाटकोपर पश्चिम) | १२ | २ | ८५.७१% |
| ८७. | कदम, श्री. योगेशदादा रामदास (दापोली) | १३ | ०१ | ९२.८५% |
| ८८. | काळे, श्री. आशुतोष अशोकराव (कोपरगाव) | १२ | ०२ | ८५.७१% |
| ८९. | कल्याणकर, श्री. बालाजी देविदासराव (नांदेड उत्तर) | १३ | ०१ | ९२.८५% |
| ९०. | कल्याणशेट्टी, श्री. सचिन पंचप्पा (अक्कलकोट) | १४ | ० | १००% |
| ९१. | कांबळे, श्री. रणजित प्रतापराव (देवळी) | ११ | ०३ | ७८.५७% |
| ९२. | कांबळे, श्री. सुनिल ज्ञानदेव (पुणे छावणी) | ०३ | ११ | २१.४२% |
| ९३. | कानडे, श्री. लहू नाथा (श्रीरामपूर) | १४ | ० | १००% |
| ९४. | कांदे, श्री. सुहास (आण्णा) द्वारकानाथ (नांदगाव) | ०९ | ०५ | ६४.२८% |
| ९५. | कारेमोरे, श्री. राजू माणिकराव (तुमसर) | १३ | ०१ | ९२.८५% |
| ९६. | कथोरे, श्री. किसन शंकर (मुरबाड) | १४ | ० | १००% |
| ९७. | केचे, श्री. दादाराव यादवरावजी (आर्वी) | १४ | ० | १००% |
| ९८. | केळकर, श्री. संजय मुकुंद (ठाणे) | १४ | ० | १००% |
| ९९. | केराम, श्री. भिमराव रामजी (किनवट) | ०८ | ०६ | ५७.१४% |
| १००. | केसरकर, श्री. दिपक वसंतराव (सावंतवाडी) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १०१. | खाडे, डॉ. सुरेश (भाऊ) दगडू (मिरज) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १०२. | खोडके, श्रीमती सुलभा संजय (अमरावती) | १४ | ० | १००% |
| १०३. | खोपडे, श्री. कृष्णा पंचम (नागपूर पूर्व) | १० | ०४ | ७१.४२% |
| १०४. | खोसकर, श्री. हिरामण भिका (इगतपूरी) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १०५. | किणीकर, डॉ. बालाजी प्रल्हाद (अंबरनाथ) | ११ | ०३ | ७८.५७% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १०६. | कोकाटे, ॲड. माणिकराव शिवाजीराव (सिन्नर) | १४ | ० | १००% |
| १०७. | कोळंबकर, श्री. कालीदास निळकंठ (वडाळा) | १४ | ० | १००% |
| १०८. | कोरे (सावकर), श्री. विनय विलासराव (शाहूवाडी) | १० | ०४ | ७१.४२% |
| १०९. | कोरगांवकर, श्री. रमेश गजानन (भांडुप पश्चिम) | १४ | ० | १००% |
| ११०. | कोरोटे, श्री. सहसराम मारोती (आमगाव) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १११. | कोटेचा, श्री. मिहीर चंद्रकांत (मुलुंड) | १४ | ० | १००% |
| ११२. | क्षिरसागर, श्री. संदिप रविंद्र (बीड) | ११ | ०३ | ७८.५७% |
| ११३. | कुचे, श्री. नारायण तिलकचंद (बदनापूर) | ११ | ०३ | ७८.५७% |
| ११४. | कुडाळकर, श्री. मंगेश (कुर्ला) | १४ | ० | १००% |
| ११५. | कुल, ॲड. राहुल सुभाषराव (दौंड) | १४ | ० | १००% |
| ११६. | कुंभारे, श्री. विकास शंकरराव (नागपूर मध्य) | ७ | ७ | ५०% |
| ११७. | कुणावार, श्री. समीर त्र्यंबकराव (हिंगणघाट) | १३ | ०१ | ९२.८५% |
| ११८. | कुटे, डॉ. संजय श्रीराम (जळगाव जामोद) | १२ | ०२ | ८५.७१% |
| ११९. | लहामटे, डॉ. किरण यमाजी (अकोले) | १४ | ० | १००% |
| १२०. | लांडे, श्री. दिलीप भाऊसाहेब (चांदीवली) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १२१. | लांडगे, श्री. महेश (दादा) किसन (भोसरी) | ०५ | ०९ | ३५.७१% |
| १२२. | लंके, श्री. निलेश ज्ञानदेव (पारनेर) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १२३. | लटके, श्री. रमेश (अंधेरी पूर्व) | १४ | ० | १००% |
| १२४. | लव्हेकर, डॉ. भारती (वर्सोवा) | १४ | ० | १००% |
| १२५. | लोढा, श्री. मंगल प्रभात (मलबार हिल) | १४ | ० | १००% |
| १२६. | महाजन, श्री. गिरीष दत्तात्रय (जामनेर) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १२७. | महाले, श्रीमती श्वेता विद्याधर (चिखली) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १२८. | मलिक, श्री. लखन सहदेव (वाशिम) | ०६ | ०८ | ४२.८५% |
| १२९. | माने, श्री. यशवंत विठ्ठल (मोहोळ) | १४ | ० | १००% |
| १३०. | मते, श्री. मोहन गोपाळराव (नागपूर दक्षिण) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १३१. | मेघे, श्री. समीर दत्तात्रय (हिंगणा) | ०९ | ०५ | ६४.२८% |
| १३२. | म्हात्रे, श्रीमती मंदा विजय (बेलापूर) | १० | ०४ | ७१.४२% |
| १३३. | मिसाळ, श्रीमती माधुरी सतिश (पर्वती) | ०८ | ०६ | ५७.१४% |
| १३४. | मोहिते, श्री. दिलीप दत्तात्रय (खेड आळंदी) | १२ | ०२ | ८५.७१% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १३५. | मोरे, श्री. शांताराम तुकाराम (भिवंडी ग्रामीण) | १४ | ० | १००% |
| १३६. | खलिक, श्री. मोहम्मद इस्माईल अब्दुल (मालेगाव मध्य) | १० | ०४ | ७१.४२% |
| १३७. | मुंदडा, श्रीमती नमिता अक्षय (कैज) | ०९ | ०५ | ६४.२८% |
| १३८. | मुनगंटीवार, श्री. सुधीर सच्चिदानंद (बल्लारपूर) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १३९. | मुटकुळे, श्री. तान्हाजी सखारामजी (हिंगोली) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १४०. | नाईक, श्री. गणेश (ऐरोली) | १४ | ० | १००% |
| १४१. | नाईक, श्री. इंद्रनिल मनोहर (पुसद) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १४२. | नाईक, श्री. मानसिंग फत्तेसिंगराव (शिराळा) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १४३. | नाईक, श्री. शिरीषकुमार सुरुपसिंग (नवापूर) | १४ | ० | १००% |
| १४४. | नाईक, श्री. वैभव विजय (कुडाळ) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १४५. | नार्वेकर, ॲड. राहूल सुरेश (कुलाबा) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १४६. | नवघरे, श्री. चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत (बसमत) | १४ | ० | १००% |
| १४७. | निकम, श्री. शेखर गोविंदराव (चिपळूण) | १० | ०४ | ७१.४२% |
| १४८. | निकोले, श्री. विनोद भिवा (डहाणू) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १४९. | निलंगेकर-पाटील, श्री. संभाजी दिलीपराव (निलंगा) | १० | ०४ | ७१.४२% |
| १५०. | पाचपुते, श्री. बबनराव भिकाजी (श्रीगोंदा) | ०९ | ०५ | ६४.२८% |
| १५१. | पाडवी, श्री. राजेश उदेसिंग (शहादा) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १५२. | पारवे, श्री. राजु देवनाथ (उमरेड) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १५३. | पटेल, श्री. अमीन (मुंबादेवी) | १४ | ० | १००% |
| १५४. | पटेल, श्री. राजकुमार दयाराम (मेळघाट) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १५५. | पाटील, श्री. अनिल भाईदास (अमळनेर) | १४ | ० | १००% |
| १५६. | पाटील, श्री. बाबासाहेब मोहनराव (अहमदपूर) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १५७. | पाटील, श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू (कोथरुड) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १५८. | पाटील, श्री. चंद्रकांत निंबा (मुक्ताईनगर) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १५९. | पाटील, श्री. चिमणराव रुपचंद (एरंडोल) | १० | ०४ | ७१.४२% |
| १६०. | पाटील, श्री. किशोर आप्पा (पाचोरा) | १४ | ० | १००% |
| १६१. | पाटील, श्री. कुणालबाबा रोहिदास (धुळे ग्रामीण) | १४ | ० | १००% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १६२. | पाटील (सडोलीकर), श्री. पी.एन. (करवीर) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १६३. | पाटील, श्री. प्रमोद (राजु) रतन (कल्याण ग्रामीण) | ०९ | ०५ | ६४.२८% |
| १६४. | पाटील, डॉ. राहुल वेदप्रकाश (परभणी) | ७ | ७ | ५०% |
| १६५. | पाटील, श्री. राजेश नरसिंगराव (चंदगड) | १४ | ० | १००% |
| १६६. | पाटील, श्री. राजेश रघुनाथ (बोईसर) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १६७. | पाटील, श्री. राणाजगजितसिंह पद्मसिंह (तुळजापूर) | १४ | ० | १००% |
| १६८. | पाटील, श्री. रविशेठ (पेण) | १४ | ० | १००% |
| १६९. | पाटील, श्री. ऋतुराज संजय (कोल्हापूर दक्षिण) | १२ | २ | ८५.७१% |
| १७०. | पाटील, ॲड. शहाजीबापू राजाराम (सांगोले) | १० | ०४ | ७१.४२% |
| १७१. | पाटील, श्रीमती सुमनताई आर.आर. (आबा) (तासगाव-कवठे महांकाळ) | १४ | ० | १००% |
| १७२. | पाटणी, श्री. राजेंद्र सुखानंद (करंजा) | १४ | ० | १००% |
| १७३. | पवार, श्री. अभिमन्यु दत्तात्रय (औसा) | १४ | ० | १००% |
| १७४. | पवार, श्री. अशोक रावसाहेब (शिरुर) | १४ | ० | १००% |
| १७५. | पवार, श्री. लक्ष्मण माधवराव (गेवराई) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १७६. | पवार, श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) (कलवण) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १७७. | पवार, श्री. राजेश (नायगांव) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १७८. | पवार, श्री. रोहित (कर्जत जामखेड) | १४ | ० | १००% |
| १७९. | पावरा, श्री. काशिराम वेचान (शिरपूर) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १८०. | फरांदे, श्रीमती देवयानी सुहास (नाशिक मध्य) | १४ | ० | १००% |
| १८१. | फातर्पेकर, श्री. प्रकाश वैकुंठ (चेंबूर) | १४ | ० | १००% |
| १८२. | पिंपळे, श्री. हरीष मारोतीआप्पा (मूर्तिजापूर) | १० | ०४ | ७१.४२% |
| १८३. | पोतनीस, श्री. संजय गोविंद (कलिना) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १८४. | प्रभू, श्री. सुनील (दिंडोशी) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १८५. | रहांगडाले, श्री. विजय भरतलाल (तिरोरा) | १४ | ० | १००% |
| १८६. | राजाळे, श्रीमती मोनिका राजीव (शेवगाव) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १८७. | राजपुत, श्री. उदयसिंग सरदारसिंग (कन्नड) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १८८. | राणा, श्री. रवि (बडनेरा) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १८९. | राणे, श्री. नितेश नारायण (कणकवली) | १४ | ० | १००% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १९०. | राणे, श्री. सुनील दत्तात्रय (बोरिवली) | १४ | ० | १००% |
| १९१. | राठोड, श्री. तुषार गोविंद (मुखेड) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १९२. | राऊत, श्री. राजेंद्र विठ्ठल (बार्शी) | ०४ | १० | २८.५७% |
| १९३. | राऊत, श्री. सुनिल राजाराम (विक्रोळी) | १४ | ० | १००% |
| १९४. | रावल, श्री. जयकुमार जितेंद्रसिंह (सिंदखेडा) | ११ | ०३ | ७८.५७% |
| १९५. | रायमुलकर, श्री. संजय भास्कर (मेहकर) | ०९ | ०५ | ६४.२८% |
| १९६. | सागर, श्री. योगेश (चारकोप) | १२ | ०२ | ८५.७१% |
| १९७. | साळवी, श्री. राजन प्रभाकर (राजापूर) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १९८. | सरनाईक, श्री. प्रताप बाबुराव (ओवळा-माजीवडा) | १३ | ०१ | ९२.८५% |
| १९९. | सरवणकर, श्री. सदा (माहिम) | ११ | ०३ | ७८.५७% |
| २००. | ससाने, श्री. नामदेव जयराम (उमरखेड) | ७ | ७ | ५०% |
| २०१. | साटम, श्री. अमीत भास्कर (अंधेरी पश्चिम) | १२ | ०२ | ८५.७१% |
| २०२. | सातपुते, श्री. राम विठ्ठल (माळशिरस) | ०६ | ०८ | ४२.८५% |
| २०३. | सावे, श्री. अतुल मोरेश्वर (औरंगाबाद पूर्व) | ०८ | ०६ | ५७.१४% |
| २०४. | सावंत, श्री. तानाजी जयवंत (पारंदा) | ०४ | १० | २८.५७% |
| २०५. | सावंत, श्री. विक्रमसिंह बाळासाहेब (जत) | १४ | ० | १००% |
| २०६. | सावरकर, श्री. रणधीर प्रल्हादराव (अकोला पूर्व) | १४ | ० | १००% |
| २०७. | सावरकर, श्री. टेकचंद श्रावण (कामठी) | १२ | ०२ | ८५.७१% |
| २०८. | सावकारे, श्री. संजय वामन (भुसावळ) | १४ | ० | १००% |
| २०९. | सेल्वन, कॅप्टन आर तामिल (सायन कोळीवाडा) | १२ | ०२ | ८५.७१% |
| २१०. | शाह, श्री. फारुक अन्वर (धुळे शहर) | ०६ | ०८ | ४२.८५% |
| २११. | शाह, श्री. पराग (घाटकोपर पूर्व) | १२ | ०२ | ८५.७१% |
| २१२. | शेख, श्री. रईस कासम (भिवंडी पूर्व) | १४ | ० | १००% |
| २१३. | शर्मा, श्री. गोवर्धन मांगीलाल ऊर्फ लालाजी (अकोला पश्चिम) | ०९ | ०५ | ६४.२८% |
| २१४. | शेलार, ॲड. आशिष बाबाजी (वांद्रे पश्चिम) | १४ | ० | १००% |
| २१५. | शेळके, श्री. सुनिल शंकरराव (मावळ) | १४ | ० | १००% |
| २१६. | शिंदे, श्री. बबनराव विठ्ठलराव (माढा) | १४ | ० | १००% |
| २१७. | शिंदे, श्री. महेश संभाजीराजे (कोरेगाव) | १४ | ० | १००% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २१८. | शिंदे, श्रीमती प्रणिती सुशीलकुमार (सोलापूर शहर मध्य) | १२ | ०२ | ८५.७१% |
| २१९. | शिंदे, श्री. संजयमामा विठ्ठलराव (करमाळा) | १३ | ०१ | ९२.८५% |
| २२०. | शिंदे, श्री. श्यामसुंदर (लोहा) | १३ | ०१ | ९२.८५% |
| २२१. | शिरोळे, श्री. सिद्धार्थ अनिल (शिवाजीनगर) | १४ | ० | १००% |
| २२२. | शिरसाट, श्री. संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम) | १२ | ०२ | ८५.७१% |
| २२३. | सिद्दिकी, श्री. झीशान बाबा (वांद्रे पूर्व) | १३ | ०१ | ९२.८५% |
| २२४. | सोळंके, श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव) | १४ | ० | १००% |
| २२५. | सोनवणे, श्रीमती लताबाई चंद्रकांत (चोपडा) | ८ | ६ | ५७.१४% |
| २२६. | सुर्वे, श्री. प्रकाश राजाराम (मागाठाणे) | १२ | ०२ | ८५.७१% |
| २२७. | तापकीर, श्री. भिमराव (अण्णा) धोंडीबा (खडकवासला) | १२ | ०२ | ८५.७१% |
| २२८. | ठाकरे, श्री. विकास पांडुरंग (नागपूर पश्चिम) | १४ | ० | १००% |
| २२९. | ठाकूर, श्री. हितेंद्र विष्णु (वसई) | ०४ | १० | २८.५७% |
| २३०. | ठाकूर, श्री. क्षितीज हितेंद्र (नालासोपारा) | ७ | ७ | ५०% |
| २३१. | ठाकूर, श्री. प्रशांत रामशेठ (पनवेल) | १३ | ०१ | ९२.८५% |
| २३२. | ठाकूर, श्रीमती विद्या जयप्रकाश (गोरेगाव) | १४ | ० | १००% |
| २३३. | थोपटे, श्री. संग्राम अनंतराव (भोर) | १४ | ० | १००% |
| २३४. | थोरवे, श्री. महेंद्र सदाशिव (कर्जत) | १३ | ०१ | ९२.८५% |
| २३५. | टिळक, श्रीमती मुक्ता शैलेश (कसबा पेठ) | ० | ० | ० |
| २३६. | टिंगरे, श्री. सुनिल विजय (वडगाव शेरी) | १४ | ० | १००% |
| २३७. | तुपे, श्री. चेतन विठ्ठल (हडपसर) | ०९ | ०५ | ६४.२८% |
| २३८. | वनगा, श्री. श्रीनिवास चिंतामण (पालघर) | १४ | ० | १००% |
| २३९. | विखे-पाटील, श्री. राधाकृष्ण एकनाथराव (शिर्डी) | ०८ | ०६ | ५७.१४% |
| २४०. | वायकर, श्री. रविंद्र दत्ताराम (जोगेश्वरी पूर्व) | १४ | ० | १००% |
| २४१. | वानखडे, श्री. बळवंत बसवंत (दर्यापूर) | १४ | ० | १००% |
| २४२. | वरपुडकर, श्री. सुरेश अंबादासराव (पाथरी) | १३ | ०१ | ९२.८५% |
| २४३. | उईके, श्री. अशोक रामाजी (राळेगांव) | १४ | ० | १००% |
| २४४. | यादव (लोणीकर), श्री. बबनराव दत्तात्रय (परतूर) | १३ | ०१ | ९२.८५% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २४५. | येरावार, श्री. मदन मधुकर (यवतमाळ) | ०४ | १० | २८.५७% |
| २४६. | झनक, श्री. अमित सुभाषराव (रिसोड) | १४ | ० | १००% |
| २४७. | झिरवाळ, श्री. नरहरी सिताराम (दिंडोरी) | १४ | ० | १००% |

## विवरण क्रमांक ७

## महाराष्ट्र विधानसभेच्या फेब्रुवारी-मार्च, २०२० मध्ये झालेल्या द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील कामकाजाचा संक्षिप्त अहवाल

### सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११-०० वाजता माननीय अध्यक्ष श्री. नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाला.

१. मुख्यमंत्री यांनी श्री. विजय वडेट्टीवार, बहुजन कल्याण, खाण जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री यांचा सभागृहाला परिचय करून दिला.

२. (१) उप मुख्यमंत्र्यांनी, (क) सन २०२० चा अध्यादेश क्रमांक ५—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२० तसेच (ख) सन २०२० चा अध्यादेश क्रमांक ६—महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २०२० सभागृहासमोर ठेवले.

(२) नगरविकास मंत्र्यांनी, (क) सन २०२० ता अध्यादेश क्रमांक १—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२० व (ख) सन २०२० चा अध्यादेश क्रमांक ४-महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२० सभागृहासमोर ठेवले.

(३) पणन मंत्र्यांनी, (क) सन २०२० चा अध्यादेश क्रमांक २—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२० तसेच (ख) सन २०२० चा अध्यादेश क्रमांक ३—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२० सभागृहासमोर ठेवले.

३. उपमुख्यमंत्र्यांनी, सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर केल्या.

या मागण्यांवरील चर्चा व मतदान दिनांक २८ फेब्रुवारी व २ मार्च, २०२० रोजी होईल. दिनांक २८ फेब्रुवारी व २ मार्च, २०२० रोजी चर्चा व मतदानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमात घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना अनुक्रमे दिनांक २६ व २७ फेब्रुवारी, २०२० रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

४. उप मुख्यमंत्र्यांनी, सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सभागृहास सादर केल्या.

सन २०१४-२०१५, सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सभागृहास सादर झालेल्या आहेत. या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान मंगळवार, दिनांक ३ मार्च, २०२० रोजी होईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

५. सचिव (कार्यभार) यांनी विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेली ६ वि.स. विधेयके व विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशीशिवाय परत केलेली ८ वि.स. विधेयके यांची नावे सभागृहास वाचून दाखविली.

६. माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८ (१) अन्वये खालील सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित केले—

(१) श्री. चिमणराव पाटील, वि.स.स.

(२) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

(३) श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स.

(४) श्री. संग्राम थोपटे, वि.स.स.

(५) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

७. माननीय मुख्यमंत्र्यांनी, सर्वश्री पुष्पसेन भिवाजी सावंत व किसनराव बबनराव राऊत, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

खालील सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या—

(१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते

(२) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

नगरविकास मंत्री, महसूल मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

माननीय अध्यक्षांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची बैठक उद्या मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी ११-०० वाजता पुनः भरेल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२०**

१. माननीय तालिका सभाध्यक्षांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला.

विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी, "शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी केलेली घोषणा, " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त " इये मराठीचिये नगरी " या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची घोषणा माननीय अध्यक्षांनी केली.

प्रश्नोत्तरे— (पुढे सुरू)

(अ) (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

सभागृहात गोंधळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ३७ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ५२ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ५२ मिनिटांनी पुन्हा स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सदुसष्ट प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

**२. कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे—**

मृद व जलसंधारण राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सामान्य प्रशासन विभागाचे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रम व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) व कार्यक्रमांतर्गत मंजूर नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवला.

**लक्षवेधी सूचना—**

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**३. शासकीय विधेयके—**

**(अ) पुरःस्थापनार्थ—**

(१) उपमुख्यमंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्र. १—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) सहकार व पणन मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्र. २—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) सहकार व पणन मंत्र्यांनी सन २०२० चे वि.स.वि. क्र. ३—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(४) नगर विकास मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्र. ४—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(५) नगर विकास मंत्र्यांनी सन २०२० चे वि.स.वि. क्र. ५–महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(६) ग्राम विकास मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्र. ७—महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(ब) पुरःस्थापनार्थ विचार, खंडशः विचार व संमत करणे—**

(१) ग्राम विकास मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ७—महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात)

**बुधवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२०**

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, " शासनाच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा गौरव प्रस्ताव मांडण्यात यावा. " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

**१.** (१) सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** उप मुख्यमंत्र्यांनी, श्री. नामदेवराव शंकरराव भोईटे, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

खालील सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

(१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते

(२) श्री. बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री

(३) श्री. गुलाबराव पाटील, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

(४) श्री. प्रकाश आबिटकर

(५) श्री. विनय कोरे

माननीय अध्यक्षांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**३.** वस्त्रोद्योग राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवले.

**४.** माननीय अध्यक्षांनी महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८ (१) अन्वये सभाध्यक्ष तालिकेवर श्री. अनिल भाईदास पाटील यांची दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी नामनियुक्ती केली होती त्याऐवजी सभाध्यक्ष तालिकेवर श्री. धर्मरावबाबा आत्राम यांची सभाध्यक्ष तालिकेवर नामनियुक्ती करण्यात येत आहे असे सांगितले.

**५.** सहकार व पणन मंत्र्यांनी, " महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना—२०१९ " बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**६.** श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, " चिमूर येथील निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना अमानवी पद्धतीने शिक्षा देण्यात येणे. " इ.बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत सूचनेतील विषय स्थगन

प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी सूचनेस अनुमती नाकारली.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, " माथाडी कामगारांचा त्यांच्या विविध मागण्यांसाठी संप सुरू असून नवी मुंबई येथील सर्वात मोठी बाजारपेठ आज बंद असणे व याबाबत बैठक घेण्याची आवश्यकता. " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

याबाबत नोंद घेतली असल्याचे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, " विधानसभा सभागृहाच्या लॉबीमध्ये प्रचंड गर्दी होणे तसेच विधान भवनातील प्रवेश पासावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स., यांनी, " पिंपरी–चिंचवड येथे एका भोंदू बाबाने ४ ते ५ महिलांवर लैंगिक अत्याचार करणे तसेच महिलांवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण पाहता दिशा कायदा ताबडतोब करण्याची आवश्यकता. " इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना मांडली.

गृह विभागाने याबाबत नोंद घ्यावी व तातडीने कार्यवाही करावी असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, " शासनाच्यावतीने स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा गौरव प्रस्ताव मांडण्यात यावा. " इ. बाबत मुद्दा पुन्हा उपस्थित केला व आपले मत व्यक्त केले.

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी, " सभागृहात भाषण करताना वक्रोक्तीपूर्ण शब्दप्रयोग टाळण्यात यावे. " असे सांगितले.

परिवहन राज्यमंत्री यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी देखील याबाबत आपले मत व्यक्त केले.

**७.** (१) श्री. अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, सर्वश्री. प्रशांत ठाकूर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. राहूल नार्वेकर, सर्वश्री. श्रीनिवास वनगा, अशोक पवार, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मंदा म्हात्रे, सर्वश्री. राम कदम, कालीदास कोळंबकर, मिहीर कोटेचा, दिपक चव्हाण, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षीरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील,

चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापुरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री. अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. वैभव नाईक, महेंद्र थोरवे, विनोद निकोले, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, राजेश पाटील, कुणाल पाटील, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, हिरामण खोसकर, धिरज देशमुख, विकास ठाकरे, विक्रमसिंह सावंत, मोहनराव हंबर्डे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. राजू पारवे, बळवंत वानखडे, लहू कानडे, संजय जगताप, ऋतुराज पाटील, अमिन झनके, सुभाष धाटे, रावसाहेब अंतापूरकर, मंगेश कुडाळकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. लक्ष्मण जगताप, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री. समीर कुणावार, संतोष दानवे, सुनिल प्रभू, ज्ञानराज चौगुले, सदा सरवणकर, डॉ. बालाजी किणीकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुरेश वरपुडकर, चंद्रकांत जाधव, राजू आवळे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. गणपत गायकवाड, कुमार आयलानी, विश्वनाथ भोईर, मोहन मते, रणधीर सावरकर, शांताराम मोरे, संजय पोतनीस, महेंद्र दळवी, भरतशेठ गोगावले, राजन साळवी, प्रकाश फातर्पेकर, चंद्रकांत पाटील, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. किशोर पाटील, बंटी भांगडिया, डॉ. देवराव होळी, सर्वश्री. कृष्णा गजबे, किशोर जोरगेवार, समिर मेघे, विजय रहांगडाले, दिलीप लांडे, सुनिल राऊत, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री. प्रमोद पाटील, संजय गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री. मंगलप्रभात लोढा, टेकचंद सावरकर, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, अनिल बाबर, महेश लांडगे, डॉ. भारती लव्हेकर, श्री. योगेश सागर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना :—

श्री. सुनिल प्रभू वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहमंत्र्यांचे लक्ष वेधले :-

" राज्यात गेल्या सहा वर्षांत बलात्कार, विनयभंग, हुंडाबळी व लैंगिक छळासंबंधी १ लाख ७ हजार ४४८ गंभीर गुन्हे दाखल असणे, प्रत्यक्षात त्याचे प्रमाण दीडपड अधिक असण्याची शक्यता पोलीस अधिकारी व्यक्त करीत असणे, मौजे हिंगणघाट (जि. वर्धा) येथे एका शिक्षिकेवर एकतर्फी प्रेमातून पेट्रोल टाकून तिला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची घडलेली घटना, तसेच अंधारी (ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद) गावात घरात घुसून एका ५० वर्षीय महिलेवर पेट्रोल टाकून तिला जाळण्याचा प्रयत्न केल्याची माहे फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली घटना, या दोन्ही घटना गंभीर असून यात हिंगणघाट हल्ल्यात पीडित युवती ४० टक्के भाजलेली असणे, तरुणीची प्रकृती गंभीर असताना तिच्यावर नागपूर मधील ऑरेंज सिटी रुग्णालयात उपचारादरम्यान दिनांक १० फेब्रुवारी २०२० रोजी तसेच सिल्लोड येथील महिला ९५ टक्के भाजली असून तिचाही उपचारादरम्यान झालेला मृत्यू, दिनांक ६ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्या सुमारास दुंदरे (ता. पनवेल, जि. रायगड) गावात एका ५५ वर्षीय महिलेला जाळून मारण्याचा केलेला प्रयत्न, त्यानंतर त्या महिलेस फासावर लटकवून तिची केलेली निर्घृण

हत्या, दिनांक ९ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास मौ. सोनवडे (ता. शिराळा, जि. सांगली) येथील एका विधवा महिलेवर मौ. बिळाशी (ता. शिराळा) या गावाच्या एका नराधमाने तेथील आरळा ते सोनवडे दरम्यान असलेल्या वारणा कालवा परिसरातील देवझाडी शेतालगतच्या निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर बलात्कार केल्याचे आढळून येणे, लासलगाव (ता. निफाड, जि. नाशिक) येथील एस.टी. बस स्थानक परिसरात एका ३२ वर्षीय विधवा तरुणीस दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास चार ते पाच तरुणांनी पेट्रोल ओतून पेटवून देण्याचा घडलेला प्रकार, धानला (ता. मौदा) येथील गावातील युवती अश्वीनी भाऊराव ठोंबरे हीचा संशयास्पद मृत्यू होणे, हत्या करून तिचा मृतदेह गुंजेपार, जि. भंडारा या गावाच्या हद्दीत आढळून येणे, सावनेर (जि. नागपूर) येथे एका दारुड्याने नशेत महिला डॉक्टरवर ॲसीड हल्ला केल्याने डॉक्टरसह एक महिला रुग्ण व शालेय विद्यार्थीनी गंभीर जखमी झाल्याचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली घटना, परिसरातील नागरिकांनी हा प्रकार लक्षात येताच हल्लेखोरांला पकडून पोलिसांच्या हवाली करणे, लोखंडवाला कॉम्प्लेक्स कांदिवली (मुंबई) येथील उच्चभ्रू वसाहतीत वास्तव्यास असणाऱ्या श्रीमती कविता शेट्टी व तिच्या पतीला प्रॉपर्टीसाठी जिवे मारण्याचा कुटुंबियांकडून गेल्या ३ वर्षांपासून होत असलेला प्रयत्न, यापूर्वी श्रीमती कविता शेट्टी यांच्या घरावर व ऑफिसवर गुंडांमार्फत झालेले हल्ले, त्यानुषंगाने श्रीमती कविता शेट्टी यांनी वेळोवेळी समता नगर पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार करूनही त्याकडे पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत श्रीमती कविता शेट्टी यांनी राज्याचे मा. गृहमंत्री, गृहराज्यमंत्री, पालकमंत्री, मुंबई उपनगर तसेच मुंबई पोलीस आयुक्त यांना देखील निवेदनाद्वारे माहे फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात केलेली विनंती, या प्रकरणी होत असलेल्या दिरंगाईमुळे अजून एका निष्पाप व उच्चशिक्षित महिलेचा बळी जाण्याची निर्माण झालेली शक्यता. याप्रकरणी श्रीमती कविता शेट्टी यांनी लेखी तक्रार देवूनही कोणतीच कारवाई न करणाऱ्या दोषी असलेल्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, मिरारोड (जि. ठाणे) येथील महिलेवर बलात्काराचा गुन्हा मागे घेण्यासाठी ज्वलनशील द्रव्य अंगावर टाकण्याची उघडकीस आलेली घटना, राज्यात " मनोधैर्य " योजनेच्या माध्यमातून पोस्को, बलात्कार, हल्ला आदी गुन्ह्यांमधील पीडितांना शासकीय मदत मिळण्याची तरतूद असणे, परंतु ज्वलनशील द्रव्य (रॉकेल, पेट्रोल, डिझेल) टाकून जीवंत जाळण्याचा प्रयत्न केल्यास पीडितांना सदर योजनेतून शासकीय मदत मिळण्याची तरतूद त्याचा समावेश " मनोधैर्य " योजनेत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री, महिला व बालविकास, यांना वारंवार निवेदन देऊनही त्याकडे प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष, आरोपींना २१ दिवसांत कठोर शिक्षा देण्याचा आंध्र प्रदेशातील " दिशा " कायद्यासारखा कायदा राज्यात लागू करणे, तसेच प्रत्येक जिल्ह्यात महिला अत्याचारांच्या सुनावणीसाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

गृह मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेतील उर्वरित लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत असल्याचे तसेच माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चा उद्या घेण्यात येणार असल्याचे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

**८. (अ) पुरःस्थापनार्थ :—**

वित्त व नियोजन मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ६–अन्न सुरक्षा आणि मानके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, “ शिदोरी या मासिकामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी अवमानकारक मजकूर छापण्यात आल्यामुळे सदर मासिकावर बंदी घालण्यात यावी. ” इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :—**

(१) (क) सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२० नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) वित्त व नियोजन मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १–महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) (सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

(ग) उपरोक्त विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुधीर मुनगंटीवार, वि. स. स. यांचा प्रस्ताव माडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) (क) सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक–२ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२० नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) सहकार व पणन मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा क्रमांक २–महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

(ग) उपरोक्त विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) (क) सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२० नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) सहकार व पणन मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

(ग) उपरोक्त विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(४) (क) सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस यांचा सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२० नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) संसदीय कार्य मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

(ग) उपरोक्त विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(५) (क) सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२० नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) संसदीय कार्य मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५–महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

(ग) उपरोक्त विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

## गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२०

ॲड. आशिष शेलार वि.स.स. यांनी, "मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास सन्माननीय सदस्यांना उपस्थित राहता यावे या कारणासाठी आता सभागृहाची बैठक स्थगित केली जाणार असून सभागृहाची बैठक ज्यावेळी सुरू होईल, त्यावेळी प्रश्नोत्तराचा तास घेणार किंवा कसे याबाबत माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाला माहिती द्यावी," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी, मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा दिल्या तसेच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाग घेता यावा याकरिता सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १५ मिनिटांपर्यंत स्थगित करीत असल्याचे सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून १ मिनिटांनी दुपारी २ वाजून १५ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक माननीय अध्यक्ष श्री. नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २ वाजून १६ मिनिटांनी सुरू झाली.

माननीय अध्यक्षांनी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**१.** (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पंचेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये विधि व न्याय विभागाचे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील कार्यक्रमांतर्गत विकास मंडळनिहाय नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(२) जलसंपदा मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये जलसंपदा विभागाचे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील कार्यक्रम व अनिवार्य वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

**३.** (१) श्री. चंद्रकांत पाटील व इतर वि.स.स. यांनी, " महाराष्ट्र अधिनियम क्र.६२/२०१८ नुसार मराठा उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती मिळणे " इ. बाबत दिलेल्या सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाचा होत नाही असे सांगून माननीय अध्यक्षांनी सदरहू सूचनेस दालनात अनुमती नाकारली.

(२) श्री. अभिमन्यु पवार व इतर वि.स.स. यांनी, " महाराष्ट्रातील शहीद जवानांच्या परिवारास अनुदानाच्या माध्यमातून मदत करणे " इ. बाबत दिलेल्या सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाचा होत नाही असे सांगून माननीय अध्यक्षांनी सदरहू सूचनेस दालनात अनुमती नाकारली.

(३) श्रीमती श्वेता महाले वि.स.स. यांनी, " राज्यासाठी उपयुक्त ठरलेली '१०८' क्रमांकाची रुग्णवाहिका सेवा विविध कारणांनी ' बाधित ' झाली असणे " इ. बाबत दिलेल्या सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाचा होत नाही असे सांगून माननीय अध्यक्षांनी सदरहू सूचनेस दालनात अनुमती नाकारली.

श्री. चंद्रकांत पाटील व इतर वि.स.स. यांनी, " महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२/२०१८ नुसार मराठा उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती मिळणे " इ. बाबत दिलेल्या सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

शासनाने याबाबत दखल घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, " श्री. अभिमन्यू पवार व इतर वि.स.स. यांनी, " महाराष्ट्रातील शहीद जवानांच्या परिवारास अनुदानाच्या माध्यमातून मदत करणे " इ. बाबत दिलेल्या सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

शासनाने याबाबत दखल घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली.

**४. (२) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे :—**

मराठी भाषा मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५—महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन विधेयक, २०२० मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रस्तावावरील चर्चेत श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी भाग घेतला.

मराठी भाषा मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**५. मराठी भाषा मंत्र्यांनी पुढील ठराव मांडला :—**

"मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे" याबाबत राज्य शासनाकडून सन २०१३ पासून केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. मराठी भाषा ही अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण

करीत असल्याने, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा केंद्र शासनास करीत आहे.

ठराव प्रस्तुत झाला.

उपरोक्त ठरावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला–

(१) श्री. छगन भुजबळ (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री)

(२) ॲड. आशिष शेलार (३) श्री. पृथ्वीराज चव्हाण

(४) ॲड. राहूल नार्वेकर (५) श्री. रविंद्र वायकर

(६) श्री. किशोर जोरगेवार (७) श्रीमती यामिनी जाधव

(८) श्री. राम सातपुते (९) श्री. रमेश कोरेगावकर

मराठी भाषा मंत्र्यांनी ठरावावरील चर्चेस उत्तर दिले.

ठराव मतास टाकून संमत झाला.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२० रोजी घेण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजाबाबतची घोषणा केली.

श्री. राजेश पवार वि.स.स. यांनी, ‘‘राज्यातील महिला सुरक्षित राहण्यासाठी राज्यभर आंदोलन चालू असताना नायगांव येथे सकाळी १०-३० ते ११-०० दरम्यान उमरी तालुक्यातील शिरूर या गावातील ८५ वर्षाच्या वृद्ध महिलेचा गळा दाबून खून करण्यात येणे ’’ इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

या प्रकरणी शासनाने दखल घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**६.** श्री. सुनिल प्रभू वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले :—

‘‘ माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य महामहिम राज्यपाल महोदयांचे मनःपूर्वक आभार मानतो. ’’

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला :—

(१) श्री. सुरेश वरपुडकर (२) श्री. हरिभाऊ बागडे

(३) श्री. अबू आजमी (४) डॉ. किरण लहामटे

(५) श्री. अतुल भातखळकर (६) श्री. झिशान सिद्दीकी

मुख्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

ग्रामविकास मंत्र्यांनी, ‘‘ स्मार्ट ग्राम योजनेच्या नावात बदल करणे ’’ इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२०**

१. (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकाहत्तर प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) पशुसंवर्धन राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

३. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि.क्रमांक ८—महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी, ‘सन २०२१ च्या सार्वत्रिक जनगणनेमध्ये मागास प्रवर्गातील लोकसंख्येची जातीनिहाय जनगणना करण्याची शिफारस करण्यासंबंधीचा ठराव दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी मुंबई येथे अधिवेशनामध्ये मांडण्यात आल्यानंतर सदरील ठरावावर पुढील कोणती कार्यावही करण्यात आली याबाबतची माहिती देण्यात यावी’ असा कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले :—

माननीय अध्यक्षांनी याबाबत माहितीपर निवेदन केले व सन २०२१ च्या सार्वत्रिक जनगणनेमध्ये मागास प्रवर्गातील लोकसंख्येची जातीनिहाय जनगणना करण्यात येणार नाही असे केंद्राने राज्य विधानमंडळाला कळविले असल्याचे सभागृहास सांगितले.

यासंदर्भात खालील सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडले

(१) श्री. छगन भुजबळ (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री)

(२) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता

(३) डॉ. जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण मंत्री

(४) श्री. विजय वडेट्टीवार (इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री)

(५) ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.

(६) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.

(७) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

(८) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

(९) श्री.विनोद अग्रवाल, वि.स.स.

(१०) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(११) श्री. सुनील प्रभू, वि.स.स.

विद्यमान अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर शेवटच्या आठवड्यात सरकारी व विरोधी पक्षातील नेत्यांचा समावेश असलेले शिष्टमंडळ माननीय पंतप्रधान व माननीय केंद्रीय गृह मंत्र्यांची भेट घेऊन यासंदर्भातील आपली भूमिका त्यांच्यापुढे मांडेल, असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी, 'शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीसाठी नवीन आजारांचा केलेला समावेश' इ. बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

एखाद्या सदस्याला एखाद्या मुद्यावर सभागृहात बोलावयाचे असल्यास त्या सदस्याने त्या विषयावरील लेखी पत्र माझ्या कार्यालयात सकाळी साडेदहा पर्यंत सादर करावे . अन्यथा त्या सदस्याला मुद्दा मांडण्याची परवानगी देण्यात येणार नाही याची सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. रवींद्र वायकर, वि.स.स. यांनी, 'जोगेश्वरी पूर्व येथे सकाळी सहा वाजता एका इमारतीचा स्लॅब कोसळणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत निवेदन करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी यावेळी दिले.

(२) श्री. विनोद अग्रवाल, वि.स.स. यांनी, 'गेल्या दोन दिवसांपासून गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गारपीट व अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत निवेदन करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी यावेळी दिले.

(३) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांनी, 'बीड, पाथर्डी व नगर जिल्ह्याच्या सीमेवर श्रीसंत भगवान गडावरील संग्रहालयातून रायफल व तलवारीची चोरी होणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

संबंधित विभागाने याची नोंद घ्यावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी यावेळी दिले.

(४) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी, "राज्य शासनाच्या 'सारथी' प्रकल्पांतर्गत काम करणाऱ्या ३९५ लोकांचे मानधन मागील ३ महिन्यांपासून देण्यात न येणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. यांनी, 'अमरावती जिल्ह्यात एका महाविद्यालयात मुलींना प्रेमविवाह न करण्याची शपथ घ्यावयास लावणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची नोंद घ्यावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(६) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी, 'नवी मुंबईमध्ये महानगरपालिकेच्या शाळेत एका संगणक शिक्षकाने १४ मुलींवर लैंगिक अत्याचार करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी, 'विदर्भासह महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यामध्ये गेल्या वर्षापासून काल दुपारी बारा वाजेपर्यंत १ ते १५ वर्षांपर्यंतच्या आणि १५ ते ३५ वर्षांपर्यंतच्या ९२६ मुली बेपत्ता होणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स. यांनी, 'गडचिरोली, गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील ट्रायबल सेंटर व फेडरेशन सेंटर हे धान खरेदी सेंटर पूर्ण बंद पडलेले असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी, 'मानखुर्द-शिवाजीनगर मतदारसंघात कंपन्यांच्या वाढत्या प्रदूषणामुळे क्षयरोगग्रस्त व कर्करोगग्रस्त रुग्णांची संख्या वाढणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**औचित्याचे मुद्दे :—**

(१) श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. यांनी, 'चाकण औद्योगिक वसाहतीमधील अनेक कंपन्यांसमोर मागील १५ दिवसांपासून कामगार उपोषणासाठी बसलेले असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. सुनील राणे, वि.स.स. यांनी, 'गिरणी कामगारांना ९.५० लाख रुपयांऐवजी १८ लाख रुपयांना घरे उपलब्ध करून देण्याबाबत काल राज्य शासनाने निर्णय घेतल्यामुळे कामगारांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने याची नोंद घ्यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(३) श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स.यांनी, 'परभणी जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कापूस खरेदी सुरू असून तेथील मार्केटींग फेडरेशनने ग्रेडरची संख्या वाढविण्याची गरज असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४) श्री. राजेश पाटील, वि.स.स.यांनी, 'कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यांना जोडणाऱ्या मिरवेल-पारघर-मोर्वे मार्गावर मागील ३ दिवसांपासून लोक उपोषणाला बसणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, 'वांद्रे पश्चिम भागातील बॅण्डस्टॅण्ड येथील सन १९४० पासून अस्तित्वात असलेल्या पोर्तुगीजकालीन किल्ल्याचा विकास व सौंदर्गीकरण करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळालेला प्रस्ताव अद्याप प्रलंबित असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने याची नोंद घ्यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(६) श्रीमती प्रतिभा धानोरकर,वि.स.स. यांनी, 'चंद्रपूर जिल्ह्यात आशिया खंडातील सर्वाधिक मोठे औष्णिक विद्युत केंद्र असून त्यातून निर्माण होणारा धूर व प्रदूषणामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, 'औसा या मतदारसंघात विशेषतः गाय, बैल व दुभत्या म्हशी या जनावरांच्या चोरीचे प्रमाण वाढणे.' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने याची नोंद घ्यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

४. (१) महसूल व वन विभाग

(२) नगर विकास विभाग

(३) सार्वजनिक बांधकाम विभाग

आता (१) महसूल व वन विभाग, (२) नगर विकास विभाग आणि (३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्या म्हणजे महसूल व वन विभागाच्या मागण्या क्रमांक सी-५, सी-६, सी-७, तसेच नगर विकास विभागाच्या मागण्या क्रमांक एफ-२, एफ-५, एफ-७, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या क्रमांक एच-३, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९ चर्चेला घेण्यात येतील, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती माननीय अध्यक्षांनी विशद केली व विभागाच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे गृहित धरून चर्चेला आता सुरूवात होईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

वरील विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला,–

(१) श्री. नितेश राणे
(२) श्री. भास्कर जाधव
(३) श्री. चंद्रकांत पाटील
(४) श्री. आशुतोष काळे
(५) श्री. मंगलप्रभात लोढा
(६) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(७) श्री. अबू आजमी
(८) श्रीमती नमिता मुंदडा
(९) श्री. ज्ञानराज चौगुले
(१०) श्री. दादाराव केचे
(११) श्रीमती सरोज अहिरे
(१२) श्रीमती मंदा म्हात्रे

| | |
|---|---|
| (१३) श्री. हिरामण खोसकर | (१४) श्री. सुनिल राणे |
| (१५) श्री. किशोर जोरगेवार | (१६) श्रीमती मोनिका राजळे |
| (१७) श्री. रमेश कोरगावकर | (१८) श्री. आकाश फुंडकर |
| (१९) श्री. इंद्रनील नाईक | (२०) श्री. राम सातपुते |
| (२१) श्रीमती सुलभा खोडके | (२२) ॲड. पराग अळवणी |
| (२३) श्री. दिलीप लांडे | (२४) श्री. संजय सावकारे |
| (२५) श्री. दिलीप मोहिते-पाटील | (२६) ॲड. राहुल कुल |
| (२७) श्री. लहू कानडे | (२८) श्री. संजय केळकर |
| (२९) श्रीमती यामिनी जाधव | (३०) श्री. अतुल भातखळकर |
| (३१) डॉ. किरण लहामटे | (३२) डॉ. भारती लव्हेकर |
| (३३) श्री. अनिल पाटील | (३४) कॅप्टन आर. तमिल सेल्वन |
| (३५) श्री. रईस शेख | (३६) श्री. रविंद्र पाटील |
| (३७) श्री. प्रकाश फातर्पेकर | (३८) ॲड. आशिष शेलार |
| (३९) श्री. सुनील भुसारा | (४०) श्री. राजेश पवार |
| (४१) श्री. योगेश कदम | (४२) श्री. प्रताप अडसड |
| (४३) श्री. संजय गायकवाड | (४४) श्री. अभिमन्यू पवार |
| (४५) श्री. बालाजी कल्याणकर | (४६) श्री. विश्वनाथ भोईर |

नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री, महसूल मंत्री, वने राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

माननीय अध्यक्षांनी, (१) महसूल व वन विभाग, (२) नगरविकास विभाग आणि (३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्या म्हणजे महसूल व वन विभागाच्या मागण्या क्रमांक सी-५, सी-६, सी-७, तसेच नगरविकास विभागाच्या मागण्या क्रमांक एफ-२, एफ-५, एफ-७, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या क्रमांक एच-३, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

माननीय गृह मंत्र्यांनी, ‘सिव्हील लाईन पोलीस स्टेशन, अकोला येथील आयओ श्री. भानुप्रताप मडावी यांच्याविरुद्ध एका महिलेने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेली कारवाई’ इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**पाच : सर्वश्री सुनिल प्रभू, अमीन पटेल, रविंद्र वायकर, दिपक चव्हाण, झिशान सिद्दीकी, अजय चौधरी, सदा सरवणकर, प्रकाश फातर्फेकर, सुनिल भुसारा, मंगेश कुडाळकर, रमेश लटके, प्रकाश सुर्वे, सुनिल राऊत, संजय पोतनीस, रमेश कोरगावकर, सौ. यामिनी यशवंत जाधव, श्री. दिलीप लांडे यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव—**

**सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले—**

मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील (एसआरए) घरांच्या क्षेत्रफळाची मर्यादा २६९ चौ.फुटाऐवजी ३०० चौ.फूट वाढविण्याबाबत शासनाने घेतलेला निर्णय व एसआरए अंतर्गत करावयाची कार्यवाही, मुंबई शहरात उंच परिसरात असणाऱ्या वसाहतींवर दरडी कोसळून जीवित व वित्त हानी होऊ नये याकरिता संरक्षक भिंती बांधण्याबाबत येणाऱ्या काळात शासन घेत असलेला निर्णय, मुंबईतील शिवडी, नायगाव, वरळी येथील बीडीडी चाळीचा पुनर्विकास करणे, पंतप्रधान अनुदान प्रकल्पातील इमारतींसाठी सामूहिक विकास प्रकल्प राबविण्याबाबत, उपकर प्राप्त इमारतीच्या दुरुस्तीसाठी ३००० रुपये प्रति चौ.मी. ची मर्यादा तत्काळ रुपये ५००० पर्यंत वाढविण्याबाबत निर्णय घेऊन अंमलबजावणी करणे, मुंबईत रेंगाळलेल्या एसआरए योजनांना गती देण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच मुंबईत आर्थिक मंदिमुळे इमारतीच्या बांधकामास होत असलेला विलंब त्यामुळे ग्राहकांना घराचा ताबा मिळण्यास होत असलेली दिरंगाई, तसेच परवडणारी घरे जास्त उपलब्ध होण्यासाठी शासन यथायोग्य निर्णय घेणे, मुंबईतील वरळी, माहिम भागातील पोलीस वसाहतीचा पुनर्विकास, मुंबईतील परळ येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे निवासस्थान असलेल्या वसाहतीचा पुनर्विकास करण्याचा घेतलेला निर्णय, मुंबई शहरात चालू असलेल्या भुयारी मेट्रो रेल्वेच्या मार्गावरील दुतर्फा असणाऱ्या इमारतींना तडे जाणे, अशा इमारतींच्या पुनर्विकासासाठी धोरण निश्चित करणे, मुंबईतील जुन्या व म्हाडा इमारतीच्या गच्चीवर पावसाळ्यात होणाऱ्या पाण्याची गळती थांबविण्यासाठी इमारतीवर शेड बांधण्याची परवानगी देण्याबाबत डीसीआर मध्ये बदल करण्याची उचित कार्यवाही करणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. अमित साटम

(२) श्री. अमिन पटेल

(३) श्री. रविंद्र वायकर (भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

**सोमवार, दिनांक २ मार्च २०२०**

श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांनी, **'**राज्यात विशेषतः विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, सोलापूर, नगर, सातारा, हिंगोली, सांगली, अकोला, बुलढाणा, वाशिम, जळगाव आणि औरंगाबाद येथे अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले असणे**'** इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात शासनाने आज दुपारपर्यंत तातडीने सविस्तर निवेदन करावे असे माननीय अध्यक्षांनी निर्देश दिले.

**१.** (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सहा प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठ्ठावन्न प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) राजशिष्टाचार राज्यमंत्र्यांनी, श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर यांचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील अनुपाल अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) ऊर्जा राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

माननीय अध्यक्षांनी, सन २०१९ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आलेल्या ८३ औचित्याच्या मुद्यांची उत्तरे संबंधित विभागांकडे, प्रशासनाकडे प्रलंबित असून ती किती दिवसांमध्ये निकाली काढली जातील हे मुख्य सचिवांनी सांगावे असा आदेश दिला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, **'**महाराष्ट्र लोकसेवा आयोग पूर्व परीक्षा २०२० मध्ये पोलीस उपनिरीक्षकाच्या ६५० पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये व्हीजेएनटी प्रवर्गावर मोठा अन्याय होत असणे**'** इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित करणे.

याबाबत शासनाने दखल घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात रोस्टर तपासूनच निर्णय घेऊ. त्यामुळे कोणत्याही प्रवर्गावर अन्याय होणार नाही असे गृह मंत्र्यांनी सांगितले.

**३.** (१) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्यांचे लक्ष वेधले–

**'**कामथे (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत गोवंशांची अत्यंत निर्दयपणे हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक १६ जानेवारी २०२० रोजी निदर्शनास येणे, घटनास्थळी

ठिकठिकाणी रक्ताचा सडा आणि हत्या केलेल्या गोवंशांचे अवशेष दिसून येणे तसेच याच ठिकाणी एक बैल मृतावस्थेत आढळणे, ही घटना ताजी असतानाच अवघ्या चार दिवसांत गुहागर-विजापूर या राष्ट्रीय महामार्गालगत पिंपळी (ता. चिपळून, जि. रत्नागिरी) येथे अशाच प्रकारे गोवंशांची हत्या करण्यात आल्याचे दिनांक २१ जानेवारी २०२० रोजी उघडकीस आल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, गतवर्षी प्रजासत्ताक दिनी म्हणजेच दिनांक २६ जानेवारी, २०१९ रोजी लोटे (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथे अशाच प्रकारे अत्यंत क्रूरपणे मोठ्या प्रमाणात गोवंशांची हत्या करण्यात आल्याचे उघडकीस येणे, असे असतानाही त्यानंतर गेल्या वर्षभरात गोवंशांची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याच्या घटना वारंवार उघडकीस येऊनही त्यांच्यावर स्थानिक पोलिसांकडून कडक कारवाई न होणे, कारवाई होत नसल्याने गोवंशांची रोजरोस वाहतूक होत असल्याचे निदर्शनास येणे, लोटे (ता. खेड. जि. रत्नागिरी) येथील गतवर्षीच्या घटनेतील मुख्य सुत्रधारांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, या तपासाकडे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह तपास अधिकाऱ्यांनी केलेले दुर्लक्ष, त्यामुळे पोलिसांच्या तपासाबाबत संशयाचे वातावरण असताना यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनाच्या आधी काही दिवस पुन्हा गोवंश हत्येच्या घटना घडल्यानंतरही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने न घेणे, कामथे येथील घटना उघडकीस आल्यानंतर २४ तास उलटले तरी एकही वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी न येणे, त्यामुळे तपासाला गती न मिळणे, यावरून हे निर्दयी कृत्य करणाऱ्यांना पोलिसच पाठीशी घालत असल्याची जनतेमध्ये निर्माण झालेली भावना, यामुळे नागरिकांच्या बैठका, आंदोलनाचे इशारे आणि त्यातून निर्माण झालेले तणावाचे वातावरण, गतवर्षी लोटे येथे घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती व हिंसाचार होऊ नये म्हणून पोलिसांनी दोन संशयितांना अटक करून त्यास एक महिना उलटूनही या घटनेतील मुख्य सुत्रधार असलेले गुन्हेगार मोकाट असणे, अशा प्रकारची गोवंश हत्येची कृत्ये करणारी आंतरराज्य टोळी असल्याचे निष्पन्न झाले असतानाही या गुन्ह्याच्या तपासात चालढकल होत असल्याची निर्माण झालेली भावना, या गंभीर प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.

गृह राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री नितीन पवार, संजय पोतनीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री लक्ष्मण जगताप, सुनिल प्रभू, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, शांताराम मोरे, सदा सरवणकर, रईस शेख, महेंद्र दळवी, भरतशेठ गोगावले, राजन साळवी, अबू आजमी, प्रकाश फातर्फेकर, चंद्रकांत पाटील, ॲड. राहूल कूल, सर्वश्री किशोर पाटील, बंटी भांगजीया, डॉ. देवराव होळी, सर्वश्री किशोर जोरगेवार, विनोद अग्रवाल, संतोष दानवे, दिलीप लांडे, सुनिल राऊत, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री वैभव नाईक, महेंद्र थोरवे, ज्ञानराज चौगुले, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री विश्वनाथ भोईर,

संजय गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री अनिल बाबर, महेश लांडगे, मोहन मते, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

श्री. संजय पोतनीस, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"चीनमध्ये थैमान घातलेल्या कोरोना व्हायरसने महाराष्ट्रात देखील घातलेले थैमान या कोरोना व्हायरसचे तीन रुग्ण पालघर, नागपूर व केरळमध्ये नुकतेच माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या सुमारास आढळून येणे, उक्त तीनही रुग्ण हे पालघर जिल्ह्यातील वसई, विरार या भागातील असून तर एक रुग्ण नागपूर येथे आढळून येणे, जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार कोरोना व्हायरसवर नियंत्रण मिळवण्यासाठी अजून कित्येक महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता, तसेच अँटी कोरोना लस पुढील दोन वर्षांपर्यंत बनने शक्य नसल्याचे मत व्यक्त करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष उक्त कोरोना व्हायरसवर आळा बसण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर ठोस उपाययोजना आखण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री अतुल भातखळकर, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, श्री. जयकुमार रावल, ॲड. पराग अळवणी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. अमिन पटेल, सुभाष धोटे, पृथ्वीराज चव्हाण, विकास ठाकरे, राजू पारवे, हिरामण खोसकर, अमित झनक, मोहनराव हंबर्डे, रावसाहेब अंतापूरकर, सुरेश वरपुडकर, बळवंत वानखेडे, राम सातपुते, राजेश पाडवी, सचिन कल्याणशेट्टी, अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले—

"राज्यात सध्या २० टक्के अनुदान घेत असलेल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना प्रचलित नियमानुसार १०० टक्के वेतन अनुदान मिळावे या व अन्य प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीतर्फे कोल्हापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित शाळा बंद ठेवण्याचा घेण्यात आलेला निर्णय, तसेच इयत्ता १०वी आणि १२वी च्या बोर्ड परीक्षांवर सर्व प्रकारचा बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेत शिक्षण उपसंचालक कार्यालयाबाहेर धरणे धरण्यात येणे, गेली २० वर्षे करत असलेल्या कामाचा प्रचलित नियमानुसार पगार मिळावा म्हणून राज्यातील हजारो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वी १६० हून अधिक आंदोलने केलेली असणे, कर्मचाऱ्यांना आर्थिक विवंचनेतून

आपला जीव गमवावा लागणे, तसेच आजमितीस पूर्ण पगार हाती न घेताच अनेक शिक्षकांना सेवानिवृत्त व्हावे लागत असणे, शासनाकडून कायम विनाअनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रचलित नियमानुसार १०० टक्के अनुदान देण्यास शासनाकडून झालेल्या दिरंगाईच्या विरोधात वारंवार आंदोलने करूनही शासन कोणतीही कार्यवाही करीत नसल्यामुळे आगामी १०वी आणि १२वी बोर्ड परीक्षांवर बहिष्कार टाकण्याचा दिलेला इशारा, याची शासनाने दखल न घेतल्यास दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० पासून उग्र आंदोलन करण्याचाही दिलेला इशारा, विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रचलित नियमानुसार १०० टक्के अनुदान व सेवा संरक्षण देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया.'

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**४.** आता ग्रामविकास विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग आणि सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एल-२, एल-३, एल-४, एम-२, एम-३, एम-४, व्ही-२ चर्चेला घेण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

माननीय अध्यक्षांनी अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व या मागण्यांवर कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे गृहीत धरून आता चर्चेला प्रारंभ होईल असे सांगितले.

पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. सुभाष देशमुख (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड. आशिष शेलार, अभिमन्यू पवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी, 'राज्यात पडलेला अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान' या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेस अनुलक्षून माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी निवेदन केले.

सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. योगेशदादा कदम (२) श्रीमती श्वेता महाले

(३) श्री. अनिल पाटील (४) श्री. राम सातपुते

(५) श्रीमती प्रणिती शिंदे (६) श्री. अबू आजमी

(७) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे (८) श्री. वैभव नाईक
(९) श्री. चंद्रकांत नवघरे (१०) श्री. सिद्धार्थ शिरोळे
(११) श्री. अमित झनक (१२) श्री. रवि राणा
(१३) श्री. ज्ञानराज चौगुले (१४) श्री. संजय सावकारे
(१५) डॉ. किरण लहामटे (१६) डॉ. देवराव होळी
(१७) श्री. विक्रमसिंह सावंत (१८) श्री. भिमराव केराम
(१९) श्री. रमेश बोरनारे (२०) श्री. दादाराव केचे
(२१) श्री. इंद्रनील नाईक (२२) श्री. प्रताप अडसड
(२३) श्री. पी.एन.पाटील (सडोलीकर) (२४) श्रीमती सीमा हिरे
(२५) श्री. रमेश कोरगावकर (२६) श्री. सुनिल राणे
(२७) श्रीमती सरोज अहिरे (२८) श्री. अभिमन्यू पवार
(२९) श्री. बळवंत वानखेडे (३०) श्री. किशोर जोरगेवार
(३१) श्री. राजेश पवार (३२) श्री. किशोर पाटील
(३३) श्री. मिहिर कोटेचा (३४) श्री. सुभाष धोटे
(३५) ॲड. आशिष शेलार (३६) श्री. राजू पारवे
(३७) श्रीमती मंजुळा गावीत (३८) श्री. प्रशांत बंब
(३९) श्री. हिरामण खोसकर (४०) श्री. धीरज देशमुख
(४१) श्री. उदयसिंह राजपूत (४२) श्री. रईस शेख

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री, ग्राम विकास मंत्री, सहकार व पणन मंत्री, वस्त्रोद्योग मंत्र्यांनी आपापल्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

आता ग्रामविकास विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग आणि सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एल-२, एल-३, एल-४, एम-२, एम-३, एम-४, व्ही-२ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या

चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक

(१) सामान्य प्रशासन विभाग — ए-४, ए-८

(२) गृह विभाग - बी-१, बी-३, बी-१०

(३) कृषी , पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग - डी-३, डी-४, डी-६, डी-९

(४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग— ई-२, ई-३

(५) जलसंपदा विभाग—आय-५

(६) विधी व न्याय विभाग— जे-१

(७) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग— के-६, के-७, के-९, के-११

(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग— एन-३, एन-४

(९) नियोजन विभाग — ओ-४

(१०) सार्वजनिक आरोग्य विभाग — आर-१

(११) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग – एस-१

(१२) आदिवासी विकास विभाग – टी-५

(१३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग – डब्ल्यू-२, डब्ल्यू-३, डब्ल्यू-४

(१४) महिला व बाल विकास विभाग – एक्स-१, एक्स-२

(१५) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग – वाय-२, वाय-६

(१६) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग — झेडए-२

(१७) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग – झेडडी-२, झेडडी-४

(१८) इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग—झेडजी-२, झेडजी-३

(१९) मृद व जलसंधारण विभाग — झेडएच-३

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, **'धुळे जिल्ह्यातील साक्री येथील शासकीय आदिवासी वसतीगृहातील अल्पवयीन मुलीची शासकीय रुग्णालयात प्रसुती होणे'** इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदर विषय गंभीर असल्याने शासनाने दखल घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**५. विचार खंडशः विचार व संमत करणे :**

(१) (क) अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ६—अन्न व सुरक्षा व मानके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. देवेंद्र फडणीस, विरोधी पक्ष नेते (२) ॲड. आशिष शेलार
(३) श्री. योगेश सागर (४) श्री. रोहित पवार
(५) श्री. प्रताप अडसड (६) श्री. राहूल नार्वेकर

विधेयकावरील चर्चेस अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधिचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक संमत झाले.

**६. सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, डॉ. संजय कुटे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. रणधीर सावरकर, जयकुमार रावल, संभाजी पाटील-निलंगेकर, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री राजेंद्र पाटणी, गणेश नाईक, संतोष दानवे, राधाकृष्ण विखे-पाटील, हरिभाऊ बागडे, गिरीष महाजन, बबनराव पाचपुते, प्रशांत बंब, हरिष पिंपळे, जयकुमार गोरे, नारायण कुचे, समीर कुणावार, डॉ. पंकज भोयर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री. अभिमन्यू पवार, प्रतापराव अडसड, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सचिन कल्याणशेट्टी, अतुल सावे, श्रीमती मेघना बोर्डीकर, सर्वश्री तानाजी मुटकुळे, प्रकाश भारसाकळे, सर्वश्रीमती माधुरी मिसाळ, नमिता मुंदडा, डॉ. भारती लव्हेकर, श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९३ अन्वये खालील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

"महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होण्याच्या दरम्यान विद्यमान मुख्यमंत्री यांनी तसेच काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या घटक पक्षांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अवकाळी पाऊसग्रस्तांना मदतीचे आश्वासन देणे, सदर आश्वासनामध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी २५००० रुपये व बागायती पिकांसाठी हेक्टरी ५०००० रुपये मदत देऊ असे वचन देणे, सरकार स्थापन होण्याच्या अगोदर शेतकऱ्यांची सरसकट संपूर्ण कर्जमाफी करून ७/१२ कोरा करू असे आश्वासन दिलेले असताना २ लाखांवरील कर्ज घेतलेले शेतकरी तसेच मध्यम व दीर्घ मुदत कर्ज घेतलेले शेतकरी महात्मा

फुले कर्जमुक्ती योजनेमध्ये अपात्र असणे, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मतदानाचा अधिकार हिरावून घेतल्याने शेतकऱ्यांवर अन्याय झाला असणे, किमान समान कार्यक्रमामध्ये शेतमालाला चांगला भाव देऊ असे आश्वासन दिलेले असताना प्रत्यक्ष हमीभावाने तूर, कापूस व इतर खरेदी करताना अनेक जाचक अटी टाकणे, अवकाळी पाऊसग्रस्त शेतकऱ्यांना दिलेला शब्द न पाळणे, संपूर्ण सरसकट कर्जमाफीची घोषणा ही केवळ कागदावरच असणे, असे असताना शेतकऱ्यांचा कृषी उत्पन्न बाजार समितीतील मतदानाचा अधिकार देखील हिवून घेण्यात आल्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यवधी शेतकऱ्यांमध्ये तीव्र स्वरूपाचा असंतोष पसरलेला असणे, महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होण्याच्या अगोदर जाहीर केलेल्या किमान समान कार्यक्रमामध्ये महिलांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल असे आश्वासन देण्यात येणे, सदर आश्वासन देऊन देखील महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्याबरोबर चांद्यापासून बांद्यापर्यंत दररोज महिला अत्याचारांच्या घटना घडणे, या घटनांमध्ये चार वर्षांच्या चिमुरडीपासून साठ वर्षांच्या स्त्रीचा समावेष असणे, सरकारी कर्मचारी, विद्यार्थीनी, विवाहित महिला, विधवा महिला तसेच सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या अभिनेत्रीचाही समावेश असणे, ह्रदय पिळवटून टाकणाऱ्या हिंगणघाट, सिल्लोड, मीरा रोड, सोलापूर, गडचिरोली, नागपूर येथील घटनांमुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडालेला असल्याचे निदर्शनास येणे, पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामकाजात अवाजवी राजकीय हस्तक्षेप झाल्याने पोलीस दलाचे खच्चीकरण होऊन त्यांचे कायदा व सुव्यवस्थेच्या मूळ कामाकडे दुर्लक्ष होणे, पोलीस दलाचे खच्चीकरण झाल्याने महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये कोणतीही घट न होता अत्याचाराचे सत्र सातत्याने सुरूच असणे, परिणामी महाराष्ट्रातील कोट्यवधी महिलांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. संग्राम थोपटे
(२) श्री. नितेश राणे
(३) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(४) श्री. रणधीर सावरकर
(५) श्री. रोहित पवार
(६) श्री. राम सातपुते
(७) श्री. बाबासाहेब पाटील
(८) श्री. अभिमन्यू पवार
(९) श्री. चंद्रकांत जाधव
(१०) श्रीमती श्वेता महाले
(११) श्री. अमित झनक
(१२) श्री. देवेंद्र भुयार
(१३) श्री. बळवंत वानखेडे
(१४) श्री. सचिन कल्याणशेट्टी
(१५) श्री. विनोद अग्रवाल
(१६) श्री. आकाश फुंडकर
(१७) श्री. प्रताप अडसड (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**मंगळवार, दिनांक ३ मार्च २०२०**

**श्री. सुनिल प्रभू व इतर वि.स.स. यांनी 'मुंबईतील इमारतींच्या पुनर्विकासासाठी धोरण निश्चित करणे' इ. बाबत म.वि.स. नियम २९३ अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.**

उपरोक्त चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला–

(१) ॲड. पराग अळवणी
(२) श्री. झिशान सिद्दीकी
(३) श्री. अजय चौधरी
(४) श्री. ॲड. आशिष शेलार
(५) श्री. मंगेश कुडाळकर
(६) श्री. योगेश सागर
(७) श्रीमती यामिनी जाधव (भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

**सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५५ मिनिटांनी सकाळी ११-०० वाजेपर्यंत स्थगित झाली.**

**सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११-०० वाजता माननीय अध्यक्ष श्री. नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.**

**१.** (१) सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठ्ठावन्न प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) उद्योग राज्यमंत्र्यांनी (क) कोकण विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा ४८ वा वार्षिक अहवाल आणि (ख) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा ४८ वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) ऊर्जा राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) सहकार मंत्र्यांनी, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा १९ वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी विधानसभेच्या सन २०१९ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक १६ डिसेंबर २०१९ ते दिनांक २१ डिसेंबर, २०१९ या कालावधीत माननीय मंत्री/माननीय राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ०२ आश्वासनांची यादी तसेच सन २०१९ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ६१ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**३.** उपमुख्यमंत्र्यांनी तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक १५—महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२० मांडले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या

राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली असल्याचे सांगितले.

उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी उक्त विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी, म.वि.स. नियम २६४(५) अन्वये विनियोजन विधेयकाच्या संदर्भात सूचना मांडल्या.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**४.** सन २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७ या वर्षाच्या अनुदानाकरिता अतिरिक्त खर्चाच्या मागण्या दिनांक २४ फेब्रुवारी २०२० रोजी सभागृहास सादर करण्यात आल्या आहेत, संसदीय प्रथेनुसार या मागण्यांवर चर्चा केली जात नाही. या मागण्यांचा तपशील कामकाजपत्रिकेसोबत जोडण्यात आला आहे. असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सन २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७ या वर्षाच्या अनुदानाकरिता अतिरिक्त खर्चाच्या मागण्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकून संमत झाल्या.

**५.** (१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी, 'अहमदनगर जिल्ह्यात दिनांक २४ फेब्रुवारी २०२०' रोजी एका महिलेचे तिच्या पतीसह अपहरण करून विवस्त्रावस्थेत पोलिसांसह ६ जणांनी मारहाण करणे इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असून सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तथापि विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी, असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

याविषयासंदर्भात माझ्या दालनात बैठक लावावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी **'**सन्माननीय मंत्रीमहोदयांच्या विशेष कार्य अधिकाऱ्यांना विद्यापीठाच्या कुलगुरुंना लेखाजोखा विचारण्याचा अधिकार नसतानाही पत्राद्वारे विशेष कार्य अधिकाऱ्यांनी तो विचारणे**'** इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असून सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही, तथापि विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने या प्रकरणाची दखल घ्यावी, असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

**६.** (१) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, 'चीनमध्ये कोरोना विषाणूंमुळे अनेक लोकांचा बळी गेलेला असताना आपल्या राज्यामध्ये कोरोना विषाणूसंदर्भात व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून कोंबड्यांना कोरोनाची लागण झाल्याची अफवा पसरवली जाणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, 'राज्य शासनाने गेल्या सरकारच्या कार्यकाळात अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मंजूर केलेल्या विकासकामांना स्थगिती देण्यात येणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स. यांनी, 'अंबरनाथ व कल्याण तालुक्यातील उसाटणे, पागड्याचा पाडा, हेदुसन, नारेन, पाली, चिरड, बुद्रुल, करवले, ओसरी, कुंभार्ली, शिरढोण व लगतच्या गावातील शेतकऱ्यांकडून जमीन विकत घेऊन बांधकाम व्यावसायिकांनी त्यांची फसवणूक करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४) श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांनी, 'चंद्रपूर जिल्ह्यातील अनुकंपा तत्त्वावरील नोकरीसाठी अर्ज केलेल्या २६५ उमेदवारांच्या अनुकंपाधारक कुटुंबाना बिकट आर्थिक परिस्थितीचा सामना करावा लागणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५) श्री. चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी, 'उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम तालुक्यातील मात्रेवाडी येथील श्री. हनुमंत त्र्यंबक पवार यांनी खाजगी सावकाराच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करणे,' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) श्री. चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी, 'मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष डॉ. भागवत कराड यांच्या शासकीय वाहनावर व निवासस्थानावर शुक्रवारी हल्ला होणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, 'लातूर व उस्मानाबाद येथील ७० ते ८० भूकंपग्रस्त गावांना भोगवट्यातील घरांसोबतच नमुना ८(अ) चे प्रमाणपत्र न देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(८) श्री. राजू आवळे, वि.स.स. यांनी, 'कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर-सांगली महामार्गावर सन २०१९ या वर्षात तब्बल ३५ नागरीकांना रस्ते अपघातात जीव गमवावा लागणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(९) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी, 'मतदारसंघात मागील दहा वर्षांपासून उपसा सिंचनाची कामे प्रलंबित असणे व धरणांकरिताच्या भूसंपादनामुळे १९८० सालात भूमिहीन झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी पुन्हा त्यांच्या नावे करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१०) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी 'दिल्लीतील निर्भया प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सार्वजनिक प्रवासी वाहनांमध्ये व्हिटीएस, सीसीटीव्ही कॅमेरे व पॅनिक बटण बसविण्यासंदर्भातील केंद्र सरकारच्या निर्णयाची राज्यातही अंमलबजावणी करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(११) श्री. सुनिल राणे, वि.स.स. यांनी, 'मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावरील १०० वर्षांहून जुन्या असलेल्या व लीज संपून सुमारे १२ ते १५ वर्षे झालेल्या एकूण २५२ मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी तातडीने करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१२) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी, 'मुंबईतील विशेषतः देवनार-मानखुर्द-शिवाजीनगर येथील कंपन्या व क्षेपणभूमी यामुळे निर्माण झालेले प्रदूषण' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१३) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी, 'मुंबईत विशेषतः मानखुर्द-शिवाजीनगर परिसरात अंमली पदार्थांचा व्यापार वाढत असून याविरोधात शासनाने उचित पावले उचलणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१४) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी, 'राज्यातील ८१ अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा बंद करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतल्याची चर्चा असल्याने पालक, विद्यार्थी व शिक्षकांमध्ये घबराट निर्माण होणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१५) श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी, 'भिवंडी शहरातील वाढती लोकसंख्या पाहता नव्या शहराच्या विकास प्रकल्पात स्मशानभूमी व दफनभूमी बांधण्यास प्राधान्य देणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१६) श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. यांनी, 'राज्यातील ओबीसा प्रवर्गातील लोकांना घरकुल मिळण्यासाठी राज्य शासनाकडून पर्यायी व्यवस्था नसणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१७) श्री. चिमणराव पाटील, वि.स.स. यांनी, 'राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन २००५ पासून लागू केलेली अंशदान निवृत्तिवेतन योजना बंद करून जुनी निवृत्तिवेतन योजना लागू करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१८) श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी 'मीरा-भाईंदर शहरात राज्य शासनाच्या परवानगीशिवाय विविध ठिकाणी राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारणाऱ्यांवर कडक कारवाई करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१९) श्री. अमित झनक, वि.स.स. यांनी, 'वाशिम जिल्ह्यातील धरणांचे हक्काचे पाणी वाशिम व रिसोड तालुक्यासाठी वापरण्याकरिता तेथील जल आराखड्यात दुरुस्ती करण्याबाबत शासनाने आदेश देणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२०) ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांनी, 'शेतमालाचे बाजारभाव ठरविण्यासाठी आणि त्यामध्ये हस्तक्षेप करण्यासाठी व त्याबाबत धोरण आखण्यासाठी शेतमालाचे स्वतंत्र मंत्रालय उभारण्याकरिता राज्य शासनाने कारवाई करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२१) श्री. देवेंद्र भुयार, वि.स.स. यांनी, ‘विदर्भामध्ये जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेऊन भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी शासनाने योग्य ती तरतूद करणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२२) श्री. मोहन मते, वि.स.स. यांनी, ‘महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेलेल हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती ही राज्यभरात तिथीनुसार साजरी करण्यात येणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२३) श्री. दादाराव केचे, वि.स.स. यांनी, ‘वर्धा जिल्ह्यातील आवी मतदारसंघातील मौजा बोरीवारा आदिवासी बहुल गावाचे पुनर्वसन करणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२४) श्री. मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी, ‘मुलुंडमधील आर मॉलमध्ये २२ वर्षीय मुलाची बोटे सरकत्या जिन्यात अडकून कापली गेल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील सर्व मॉलमधील लिफ्ट व एस्केलेटरची देखभाल व दुरुस्ती वेळोवेळी करणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२५) श्री. बालाजी कल्याणकर, वि.स.स. यांनी ‘नांदेड उत्तर येथील २५ गावांमधील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा प्रश्न सोडविणे,’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२६) श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी ‘मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या घटनेमध्ये ऐतिहासिक शौर्य गाजविणाऱ्या १४ पोलीस अधिकारी व अंमलदारांची कर्तव्यनिष्ठा विचारात घेऊन राज्य शासनाने त्यांना किमान एक टप्पा पदोन्नती देऊन शासनाने त्यांच्या शौर्याचा सन्मान करणे इ.’ बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२७) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी ‘दक्षिण मुंबईतील परळ विभागातील जगप्रसिद्ध हाफकीन महामंडळाच्या आवारातील कर्मचाऱ्यांच्या वसाहतमधील जुन्या इमारती, रस्ते, जलवाहिन्या व मलनिःस्सारण वाहिन्यांची दुरुस्ती करणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२८) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे, वि.स.स. यांनी, ‘जिंतूर नगरपालिका हद्दीतील काही घरांचे अनधिकृतपणे झालेले नामांतर व ग्रीन झोनमधील अवैध प्लॉटिंग याबाबत शासनाने कारवाई करणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२९) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी, ‘चंद्रपूर शहरात किल्ल्याच्या तटबंदीच्या १०० मीटरपर्यंत बांधकाम न करण्याबाबत पुरातत्त्व विभागाने घातलेली अट रद्द करणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३०) श्री. राजू पारवे, वि.स.स. यांनी, ‘उमरेड मतदारसंघातील जिल्हा परिषदेची शाळा जीर्ण स्वरूपात असून तिथे मुलांना शिक्षणाची सोय लवकरात लवकर उपलब्ध करू देण्यात यावी,’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३१) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, ‘मुंबई शहरातील महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये

शवागारांमध्ये मागील ५ वर्षांपासून ठेवलेल्या बेवारस शवांची कालमर्यादा निश्चित करून विल्हेवाट लावणे इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३२) श्री. किसन कथोरे, वि.स.स. यांनी, 'ठाणे जिल्ह्याची विभागणी करून कल्याण जिल्ह्याची निर्मिती करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३३) श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी 'नागपूर शहरातील क्रीडांगणांवरील अतिक्रमणे हटविणे,' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३४) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्रात बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ची कडक अंमलबजावणी करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३५) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, 'राज्यभरात बकऱ्यांच्या चामड्याकरिता प्रोसेसिंग हाऊस तयार करणयाबाबत खाटीक समाजाने केलेली मागणी' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३६) श्रीमती प्रणिती शिंदे, वि.स.स. यांनी, 'सोलापूरसह राज्यभरातील अपात्र ठरविल्या गेलेल्या युवक होमगार्डस्ना पुन्हा सेवेत समाविष्ट करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३७) श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी, 'मुंबईतील नूरबाग ते माझगाव तसेच मुंबादेवी ते भायखळा येथील रेल्वे व महानगरपालिकेलने तोडलेल्या पुलांची त्वरित पुनर्बांधणी करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३८) श्री. मोहन चंद्रिकापुरे, वि.स.स. यांनी, 'राज्य शासनाने सन २०१६-२०१७ या वर्षाकरिता उच्च व तंत्रशिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय व विमुक्त भटक्या जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना फ्री-शीप मंजूर करून न्याय देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३९) श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांनी, 'धामणगाव रेल्वे मतदारसंघातील पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात न वळवता ते थेट त्यांच्या बचत खात्यामध्ये जमा करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४०) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, 'हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची पहिली राजधानी असलेल्या राजगड किल्ल्याच्या संवर्धनाकरिता राज्य शासनाने स्वतंत्र अशा राजगड विकास समितीची स्थापना करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४१) श्री. पी.एन.पाटील, वि.स.स. यांनी, 'करवीर मतदारसंघातील निगे गाव व बासणी गाव येथील तरुणांच्या ग्रामीण भागातील खेळाला चालना देण्याकरिता शासनाने मंजूर केलेली दोन क्रीडांगणे लवकरात लवकर पूर्ण करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४२) श्री. राजेश पवार, वि.स.स. यांनी, 'राज्यभरातील शेतकऱ्यांना महावितरणकडून पुरविल्या जाणाऱ्या वीजपुरवठा सेवेत त्वरित सुधारणा करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४३) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी, 'मुंबईतील कुर्ला भागातील बैल बाजार, म्हाडा कॉलनी, बेस्ट वसाहत, पोलीस वसाहत, मिलिंद नगर, साकी नाका कॉलनी, कोहिनूर सिटी येथील पोलिसांच्या वसाहतीतील मोडकळीस आलेल्या घरांची तातडीने देखभाल व दुरुस्ती करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स. यांनी, 'कोरोना व्हायरसमुळे देशातील शेतमालाचे भाव पडल्याच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यात शासनाने शेतकऱ्यांचा शेतमाल तातडीने खरेदी करून तो विभागाच्या यंत्रणाकडून मोजणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४५) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी, 'जत तालुक्यातील भीषण पाणीटंचाईची समस्या सोडविण्याकरिता कर्नाटक राज्यातील भोगलेश्वर योजनेतून दुष्काळग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी कर्नाटक राज्याशी सामंजस्य करार करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४६) श्री. इंद्रनील नाईक, वि.स.स यांनी, 'यवतमाळ जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती अनुदानित मागासवर्गीय वसतिगृह कर्मचाऱ्यांचे सन २०१८-२०१९ पासूनचे प्रलंबित मानधन व पोषण अनुदान' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४७) श्री. महेश लांडगे, वि.स.स. 'पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत सदनिकांचा सन २०२० पर्यंतचा शास्ति कर शासनाने सरसकट पूर्णपणे माफ करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४८) श्री. रमेश बोरनारे, वि.स.स. यांनी 'मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाच्या कामामुळे खराब झालेल्या रस्त्याची माफ केलेल्या रकमेतून दुरुस्ती करणे तसेच समृद्धी महामार्गाचे खोलीकरणामध्ये घेण्यात आलेल्या पाझर तलावांचे सर्वेक्षण करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४९) श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी 'सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संचयनी सेव्हींग ॲण्ड इन्व्हेस्टमेंट या कंपनीने कणकवली व सावंतवाडी येथील गोरगरीब व अज्ञानी ठेवीदारांची फसवणूक करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी उपस्थित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने माननीय गृहमंत्र्यांनी, अहमदनगर येथील घटनेमध्ये फिर्यादींच्या कुटुंबातील नातेवाईक असल्यामुळे या संपूर्ण घटनेची चौकशी एका वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्याकडून लवकरात लवकर करण्यात येईल आणि चौकशीचा अहवाल एका महिन्याच्या आत सादर करण्यात येईल. असे सभागृहाला सांगितले.

(५०) कॅप्टन आर. तामिल सेल्वन, वि.स.स. यांनी 'सायन कोळीवाडा येथील प्रतीक्षा नगर परिसरातील मोनोरेल खालील एमएमआरडीए आणि बीएमसी संबंधीत रस्त्यांची कामे त्वरित गुणवत्तापूर्णतेने पूर्ण करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५१) श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स. यांनी, 'महाराष्ट्र बियाणे महामंडळाने परभणी, लातूर जिल्ह्यात तसेच मराठवाड्यात बोगस बियाण्यांचे वाटप केल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५२) श्रीमती गीता जैन, वि.स.स. यांनी, 'मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जमिनीच्या विकास आराखड्यात आरक्षित असलेला डी.पी. रोड, मैदाने, उद्याने इ. साठी महानगरपालिकेकडून जागा नोंदणीकृत करारानुसार हस्तांतरण करूनही अद्याप महानगरपालिकेला प्रत्यक्ष ताबा दिलेला नसणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५३) श्री. सुनील शेळके, वि.स.स. यांनी, 'मावळ मतदारसंघात रस्ते बांधणी, दुरुस्ती व देखभालीसंदर्भातील निविदांमध्ये दुरुस्ती करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५४) डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांनी, 'गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील सुरजागड येथील बंद पडलेल्या लोह प्रकल्पामुळे हजारे स्थानिक लोकांवर उपासमारीची वेळ येणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५५) श्री. विनोद अग्रवाल, वि.स.स. यांनी, 'भंडारा, गोंदिया व बालाघाट जिल्ह्यात वास्तव्यास असलेल्या बिंजवार म्हणजेच इंजवार जमातीच्या लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी त्यांना न्याय देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५६) श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. यांनी, 'अमरावती ते नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील नांदगावपेठ या टोलनाक्यावरील बेकायदेशीर टोलवसुलीमुळे अनेक नागरिकांमध्ये असंतोष पसरणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५७) श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी, 'अमरावतील जिल्ह्यातील १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका कोणत्याही देखभाल व दुरुस्तीशिवाय चालविली जात असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

यासंदर्भात सर्वंकष माहिती घेऊन सभागृहात उद्या निवेदन सादर करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(५८) श्री. कैलाश पाटील (घाडगे), वि.स.स. यांनी 'शासनातर्फे बेघरांसाठी शहरी व ग्रामीण भागात घरकुल योजना राबविताना संबंधित रकमेतील तफावत दूर करून ग्रामीण भागातील जनतेवरील अन्याय दूर करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

**७.** (१) सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री, अमीन पटेल, कुणाल पाटील वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्याचे लक्ष वेधले.

"तत्कालीन शासनाने आचारसंहिता लागू होण्यापूर्वी वॉश कोलची निविदा काढणे. ही निविदा महाजेनको स्वतः काढू शकत असतानाही : एमएसएमसीच्या माध्यमातून काढण्यात येणे, एमएसएमसीनी सदर निवेदेचे अनुमानित दर रुपये ११४ प्रति मेट्रिक टन याप्रमाणे ठेवणे, ज्या निविदा आल्या त्यांचे सरासरी दर रुपये प्रति मेट्रिक टन असतानाही मात्र काम देताना निविदा रुपये ३०० प्रति मेट्रिक देणे, ज्याच्यामुळे सरासरी रुपये ५ हजार कोटींचा अतिरिक्त भार राज्यातील जनतेवर पडणार असणे, तसेच हे काम देताना राज्यातील ज्या वॉशरी कंपन्या मागील ८ वर्षांपासून काम नसल्यामुळे बंद आहेत. त्यांना काम न देता सदरील काम राज्याबाहेरील कंपन्यांना देणे, त्यामुळे स्थानिक ५ हजार कुटुंबांवर उपासमारीची वेळ येणे, तसेच सदर निविदा ५ वर्षे मुदत व ५ वर्षे मुदत वाढ अशी १० वर्षांसाठी काढण्यात येणे, यामुळे अतिरिक्त आर्थिक भार राज्यातील जनतेवर पडणार असतानाही शासन याप्रकरणी माहिती घेऊन या गैरव्यवहाराची चौकशीसाठी करीत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण त्यामुळे शासनाने सदर, प्रकरणाची चौकशी करून कामाला स्थगिती देण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उद्योगमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, ज्ञानराज चौगुले, श्रीमती नमिता मुंदडा, डॉ. राहुल पाटील, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

'सन १९८८ पासून वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी उर्वरित महाराष्ट्र मराठवाडा विदर्भ अशा विभागनिहाय पद्धतीने ज्या विभागातील विद्यार्थी असेल त्या विभागातील महाविद्यालयामध्ये ७० टक्के कोटा व उर्वरित २ विभागांतील महाविद्यालयामध्ये ३० टक्के कोटा गुणवत्तेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविली जाते, आज देखील वरीलप्रमाणे ७० टक्के व याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया पद्धत राबवली जात आहे. उपरोक्त पद्धतीनुसार फक्त महाराष्ट्र राज्यातच अशा स्वरूपाची प्रवेश प्रक्रिया राबवली जात असणे, भारतातील इतर राज्यामध्ये संपूर्ण प्रवेश क्षमतेच्या १०० टक्के प्रवेश प्रक्रिया राबवली जाणे उर्वरित महाराष्ट्र शासकीय महाविद्यालय संख्या १५ प्रवेश क्षमता २५३० व खाजगी महाविद्यालय १३ प्रवेश क्षमता १६२० व मराठवाडा विभागात शासकीय महाविद्यालय संख्या ४ प्रवेश क्षमता ६०० व खाजगी महाविद्यालय संख्या २ प्रवेश क्षमता. २५० विदर्भ विभागात शासकीय महाविद्यालय ६ प्रवेश क्षमता ११५० व खाजगी महाविद्यालय २ प्रवेश क्षमता २५० अशी असणे त्यामुळे मराठवाडा विभागातील शासकीय व खाजगी महाविद्यालय संख्या एकूण ६ प्रवेश क्षमता ६५० इतकी कमी असल्याने या विभागातील नीट परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना उर्वरित २ विभागात उच्च गुण प्राप्त होऊन देखील प्रवेशापासून वंचित राहणे

मराठवाडा विभागीतल विद्यार्थी मराठवाडा विभागातच शिक्षण घेत असल्याने त्यांना अन्य दोन विभागात फक्त ३० टक्के कोट्यातून प्रवेश दिला जात असल्याने गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांवर होत असलेला अन्याय, त्यामुळे ही ७०/३० विभागवार प्रवेश प्रक्रिया कोटा रद्द करावा अशी विद्यार्थी, पालक व स्थानिक लोकप्रतिनिधीची नेहमीच होत असलेली मागणी, मा. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींनी सन २००६ साली ही आरक्षण प्रक्रिया असंविधानिक असल्याचा निर्वाळा दिलेला असणे, त्यामुळे कुठलाही कायदा नसताना हे अन्यायकारक आरक्षण लागू करता येत नाही असे औरंगाबाद खंडपीठाच्या न्यायमूर्तींनी दाखल असलेल्या याचिकेवर ३ मे २०१७ रोजी आदेश दिलेला असल्याने हे असंविधानिक आरक्षण रद्द करण्यात यावे, याबाबत शासनाने तात्काळ निर्णय घेऊन वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी इच्छुक असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांना न्याय देण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ''

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) सर्वश्री. वैभव नाईक, महेंद्र थोरवे, मंगेश कुडाळकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री विश्वनाथ भोईर, संजय गायकवाड, सुनिल प्रभू, संतोष बांगर, अजय चौधरी, किशोर जोरगेवार, शांताराम मोरे, राजु आवळे, राम सातपुते, राहुल कुल, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.**

**श्री. वैभव नाईक वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधले :—**

''मराठा व कुणबी समाजाला आरक्षण देण्याचा तसेच या समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्याकरिता राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या '' सारथी '' १ महामंडळाने मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे दिनांक फेब्रुवारी रोजी उघडकीस येणे २०२० '' या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीने अहवाल सादर केल्यानंतर संस्थेचे संचालक यांनी गरज नसताना मोठ्या प्रमाणात गाड्यांची खरेदी करणे, मानधनावर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात भरती करणे, संस्थेच्या अध्यक्षांनी दिलेला राजीनामा सरकारकडे न पाठविता संचालकांनी उक्त राजीनामा स्वत:कडेच ठेवणे, ३८१ कामगार कोणतेही काम नसताना त्यांना फुकट वेतन देण्यात येणे, कार्यालय दुरुस्तीवर १ कोटी रुपये खर्च करण्यात येणे, २४ लाख रुपयांची पुस्तके खरेदी करण्यात येणे, युपीएससी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी क्लास घेणे कोटी ८ मुलांसाठी २२६ या लाख रुपये खर्च करण्यात येणे इत्यादी ७० बाबी अहवालात उघडकीस येऊनही अद्याप संचालकांवर कोणतीच कारवाई न झाल्याने जनमाणसात निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यात कोट्यवधी रुपयाचा आर्थिक व्यवहार झाला असल्याने शासनाने विनाविलंब चौकशी करून दोषींविरुद्ध करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. ''

बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक ७ वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४ पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिक सभाध्यक्षांनी सांगितले.

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि.क्रमांक ८—महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधिचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. सुनील प्रभू व इतर वि.स.स. यांनी, " मुंबईतील इमारतींच्या पुनर्विकासासाठी धोरण निश्चित करणे " इ. बाबत म.वि.स.नियम २९३ अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुररू झाली.

उपरोक्त चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(७) श्रीमती यामिनी जाधव
(८) श्री. अतुल भातखळकर
(९) श्री. सुनील राणे
(१०) श्री. प्रकाश फातर्पेकर
(११) श्री. कालिदास कोळंबकर
(१२) श्री.रमेश कोरगावकर
(१३) कॅप्टन आर.तामिल सेल्वन
(१४) श्री. मिहिर कोटेचा

गृहनिर्माण मंत्री, गृह मंत्री, सहकार व पणन मंत्री, कृषी मंत्री यांनी उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेस उत्तर दिले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी उत्तरादाखल भाषण केले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

८. सर्वश्री शेखर निकम, भास्कर जाधव, अमीन पटेल, सुनील भुसार, सुनील प्रभू, कुणाल पाटील, दौलत दरोडा, राजन साळवी, अनिल पाटील, बाबासाहेब पाटील, रविंद्र वायकर, दीपक चव्हाण, योगेश कदम, झिशान सिद्धीकी, सरोज अहिरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. अशोक पवार, श्री भरतशेठ गोगावले, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापुरे, वैभव नाईक, सुनिल शेळके, दीपक केसरकर, अतुल बेनके, संजय पोतनीस, सुनील टिंगरे, मंगेश कुडाळकर, सुभाष धोटे, अजय चौधरी, प्रकाश फातर्फेकर, प्रकाश सुर्वे, रमेश कोरगांवकर, सुनिल राऊत, रमेश लटके, सदा सरवणकर, सौ. यामिनी यशवंत जाधव,

सर्वश्री दिलीप लांडे, अमित झनक, संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :
श्री. शेखर निकम, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले—

" कोकणाला ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभलेला असून व पर्यटनांची मोठी संधी उपलब्ध असतानासुद्धा हा भाग दुर्लक्षित असणे, वाशिष्ठी नदीवर कोळकेवाडी धरणावर कोयना विद्युत प्रकल्प-४ ची निर्मिती केलेली असून या ठिकाणी वर्षभर वीजनिर्मिती सुरू असल्याने वाशिष्ठी नदी बारमाही पूर्ण क्षमतेने वाहत असणे, कोकणामध्ये पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे नदीचे पाणी बाजारपेठेत शिरुन कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्यामुळे वाशिष्ठ नदीवर संवर्धन प्रकल्प राबविण्याची होत असलेली मागणी, किनारपट्टीवर मत्स्यव्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असून डिझेलवर सबसीडी, मच्छीमारांना जाळी व अन्य सोयी उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता, पर्सनेटची जाळी टाकून या राज्यातील पारंपरिक मच्छीमारांना व्यवसायापासून वंचित ठेवण्याचे सुरू असलेले प्रयत्न, वैधानिक विकास मंडळामार्फत कोकणाला अत्यंत अल्प प्रमाणात निधी उपलब्ध होणे, कोकणाला स्वतंत्र संवैधानिक विकास मंडळ द्यावे असा दोन्ही सभागृहात एकमताने निर्णय होऊन सुद्धा त्यावर अद्याप कारवाई न होणे, रस्ते, आरोग्य, तांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण या विभागात मोठा अनुशेष असणे, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना बंद होणार असल्यामुळे त्याऐवजी 'जलजीवन मिशन' ही नवीन योजना राबविण्यात येत असणे, परंतु पूर्वी असलेल्या राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत मंजूर होणाऱ्या नळपाणी योजनांच्या निकषामध्ये कमी लोकसंख्येमुळे व कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे काही योजना बसत नसणे, तरी नवीन येणाऱ्या जलजीवन मिशन या योजनेमध्ये कमी लोकसंख्या असणाऱ्या भागात सुद्धा नळपाणी पाणीपुरवठा योजना राबविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची आवश्यकता. कोकणातील भविष्यकालीन योजना शासनाकडे प्रलंबित असणे त्यांना त्वरीत मंजुरी देवून कोकणात मोठ्या धरणांना मजुरी देण्यापेक्षा लघुपाटबंधारे योजना व पाझर तलावांना मंजुरी दिल्यास याचा फायदा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होत असल्याने याचा शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता, मुंबईपासून गोव्यापर्यंत सागरी महामार्ग तयार करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय, या प्रकल्पाला अद्याप निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे या प्रकल्पावरील पूल, रस्ते यांची कामे अर्धवट अवस्थेत असणे, कोकणामध्ये एकही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणे, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात येणे, परंतु पर्यटनास आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा होऊ शकल्या नसल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यासह कोकणात व इतर जिल्ह्यात भारत दूरसंचार निगम व भ्रमणध्वनीला नेटवर्क उपलब्ध होत नसणे त्यामुळे तेथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी येथील विमानतळाचे काम पूर्ण होऊनही अद्याप विमानसेवा सुरू न होणे, रत्नागिरी येथील विमानतळाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता. कोकणातील मुख्य पीक असलेले भात, काजू, आंबा, फणस, नारळ, सुपारी इत्यादी पिके अवकाळी पावसामुळे नष्ट होत असल्यामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची आवश्यकता असणे, तसेच कोकणामध्ये फळ पिकांसाठी फळ प्रक्रिया उद्योगांना

चालना देण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता, कोकणपट्टीकडे राज्याला आर्थिक बळ देण्याची क्षमता असताना अपुऱ्या निधीमुळे आणि उत्तम नियोजनाअभावी हा भाग जाणूनबुजून दुर्लक्षित ठेवण्यात येत असल्याची भावना कोकणातील जनतेच्या मनात वाढीस लागणे, कोकणातील छोटे-मोठे कारखाने, निरनिराळ्या औद्योगिक वसाहती बंद पडल्यामुळे बेकारीचा प्रश्नही मोठ्या प्रमाणावर निर्माण होणे, कोकणाच्या विकासासाठी व उन्नतीसाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता व यावर शासनाने केलेली उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ''

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

| | |
|---|---|
| (१) श्री. बबनराव पाचपुते | (२) श्री. भास्कर जाधव |
| (३) श्री. संजय केळकर | (४) श्री. रविंद्र वायकर |
| (५) श्री. जयकुमार रावल | (६) श्री. दीपक केसरकर |

(चर्चा अपूर्ण)

**बुधवार, दिनांक ४ मार्च २०२०**

१. (१) सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

माननीय अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे घोषणा केली :—

'' महाराष्ट्र विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसेभेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेल्या '' अर्थसंकल्प-सोप्या भाषेत '' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र विधिमंडळ व राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा यांचे संयुक्त विद्यमाने आज बुधवार, दिनांक ४ मार्च २०२० रोजी सायंकाळी ०५-३० ते ०७-०० या वेळेत मध्यवर्ती सभागृह, चौथा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

सदर पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र विधिमंडळाचे माननीय पीठासीन अधिकारी, राज्याचे माननीय मुख्यमंत्री माननीय उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र विधानपरिषदेचे माननीय विरोधी पक्ष नेते तसेच अन्य मान्यवरांच्या सन्मान्य उपस्थितीत करण्यात येणार आहे.

यासंबंधीचे निमंत्रण पत्र सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांचेसाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणाद्वारे वितरित करण्यात आले आहे. तरी सन्माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे.

**२.** (१) उप मुख्यमंत्र्यांनी, (क) भारताचे नियंत्रक महालेखापरीक्षक याचा सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचा महसुली क्षेत्रावरील अहवाल आणि (ख) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या वर्षाचा " सार्वजनिक उपक्रम " अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) उद्योग राज्यमंत्र्यांनी (क) विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षांचा अनुक्रमे सेहेचाळीसावा आणि सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि (ख) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०१७-२०१८ या वर्षाचे अधिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

(३) पशुसंवर्धन मंत्र्यांनी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी, " कल्याणकारी संस्था व वसतिगृहे योजनेंतर्गत शासन अनुदानित संस्था व वसतिगृहे यांना करण्यात येणारा अन्नधान्य पुरवठा." इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**३. पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :—**

(१) वित्त आणि नियोजन मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १६–महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक, २०२० पुरःस्थापित केले व सदर विधेयक भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) वित्त व नियोजन मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १७—महाराष्ट्र विनियोजन (द्वितीय अधिक खर्च) विधेयक, २०२० पुरःस्थापित केले व सदर विधेयक भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशा विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) वित्त व नियोजन मंत्र्यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १८—महाराष्ट्र विनियोजन (तृतीय अधिक खर्च) विधेयक, २०२० पुर:स्थापित केले व सदर विधेयक भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशा विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**४.** आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले तथापि, श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, " उलवे (जि. रायगड) येथे दिनांक २ मार्च २०२० रोजी महिलेचे अपहरण करून गोळी झाडून करण्यात आलेली हत्या." इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी सूचनेस अनुमती नाकारली तथापि, याबाबत त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे सांगितले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी सदर सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

प्रा. देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी, "दिनांक २५ फेब्रुवारी रोजी नाशिक येथील श्री. विजय विरारी या सोन्याच्या व्यापाऱ्याची संशयास्पदरित्या झालेली हत्या." इ.बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत सूचनेतीला विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणारा नाही. तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी सूचनेस अनुमती नाकारली तथापि, याबाबत त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे सांगितले.

प्रा. देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी सदर सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

याबाबत शासनाने वस्तुस्थितीदर्शक निवेदन करावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस आणि ॲड. आशिष शेलार, श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, " महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षा केंद्रावरील इयत्ता दहावीचा पेपर फुटणे. " इ.बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसणार नाही. तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेता शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन माननीय अध्यक्षांनी सूचनेस अनुमती नाकारली तथापि, याबाबत त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे सांगितले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी सदर सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

याबाबत शासनाने निवेदन करावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, " चिमूर येथील निवासी शाळेतील विद्यार्थिनींना अमानवी पद्धतीने शिक्षा देण्यात येणे. " इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सुचनेला अनुलक्षून माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, " व्यवसायाने अभिनेत्री असलेल्या महिलेने लावणीचे नृत्य शूटिंग करीत असताना सहकलाकारासोबत काढलेला फोटो फेसबुक अकाऊंटवर पोस्ट केल्यानंतर सदर फोटोवर अनोळखी व्यक्तीने अश्लील शेरेबाजी करणे. " इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेला अनुलक्षून माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार गृह ग्रामीण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

शालेय शिक्षण मंत्र्यांनी, " इयत्ता दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटणे. " इ. बाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यासंदर्भात खुलासा केला.

गृह मंत्र्यांनी, " इयत्ता दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटणे. " इ. बाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यासंदर्भात खुलासा केला.

**५. पुरःस्थापनार्थ :—**

**सहकारमंत्र्यांनी,** सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १९–महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**६.** (१) श्री. हिरामण खोसकर वि.स.स. यांनी, " मतदारसंघातून जाणाऱ्या २६ कि. मी. समृद्धी महामार्ग जात असून या समृद्धी महामार्गाच्या गौण खनिज उत्खननाच्या माध्यमातून मिळणाऱ्या रॉयल्टीच्या रकमेतून महामार्गाच्या दोन्ही बाजूस असणाऱ्या १९ गावांच्या रस्त्यांची दुरुस्ती करणे तसेच त्र्यंबकेश्वर येथे यात्रोत्सवाच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांसाठी शौचालयाची व्यवस्था करणे. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. राजू आवळे, वि.स.स. यांनी, " कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील महापूरामुळे नुकसानग्रस्त झालेल्या गरीब जनतेसाठी नुकसान भरपाईचे निकष बदलण्याची आवश्यकता. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. अतुल बेनके, वि.स.स. यांनी, " डोंबिवली येथे युवा आशापुरा मित्र मंडळाने आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धेमध्ये मराठी भाषिक स्पर्धकांना सहभागी होण्यास प्रतिबंध करणे. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांनी, " दिनांक २९ फेब्रुवारी २०२० व १ मार्च, २०२० या दोन दिवसांच्या कालावधीत बीड जिल्ह्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची आवश्यकता. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी, " महाराष्ट्रात विशेष करून मुंबई शहरात अंमली पदार्थाच्या सेवनाच्या वाढत्या घटना. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(६) श्रीमती भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, " शिक्षण सेवकांचे तुटपुंजे मानधन तसेच शिक्षण सेवक ही पद्धत बंद करून शिक्षकांची नियमित नियुक्ती करणे. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय अध्यक्षांनी, औचित्याच्या मद्याच्या पद्धतीमध्ये बदल करण्यात येत असून यापुढे सन्माननीय सदस्यांनी आपापले औचित्याचे मुद्दे विधान भवनात ठेवण्यात येणाऱ्या बॉक्समध्ये सकाळी ९-३० पर्यंत टाकायचे आहेत. प्राप्त झालेल्या औचित्याच्या मुद्यांचे बॅलेट काढण्यात येईल व त्यानुसार सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाईल. एका दिवशी २०-२५ औचित्याचे मुद्दे घेतले जातील. बॅलेट निघाल्यानंतर कोणाचा औचित्याचा मुद्दा कोणत्या क्रमांकावर आहे व तो कोणत्या विषयावर आहे त्यासंदर्भात तळमजल्यावर तक्ता लावण्यात येईल असे सांगितले.

गृह मंत्र्यांनी, " २६ /११ च्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेले पोलीस अधिकारी व पोलीस शिपाई यांना एक टप्प्याने पदोन्नती देणे. " इ. बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(७) श्री. सुनील राणे, वि.स.स. यांनी, " बोरीवली येथील महानगरपालिकेची 'भगवती' व 'शताब्दी' रुग्णालयांमधील सर्व वैद्यकीय उपकरणे बंद असून याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी, " ग्रामीण भागातील जनतेच्या हिताशी निगडित मूलभूत सुविधा असलेल्या २५१५, १२३८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास व इतर सर्व योजनांची कामे विभागांनी थांबविली असून यावरील स्थगिती उठविण्याची आवश्यकता. " इ.बाबतत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांनी, " चंद्रपूर जिल्ह्यातील कुसंबी येथील आदिवासी कुटुंबीयांची जमीन माणिकगड सिमेंट कंपनीच्या प्रकल्पासाठी हस्तांतरित करण्यात आल्यानंतर यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न न सोडविल्यामुळे या आदिवासी जनतेमध्ये पसरलेली अस्वस्थता" इ. बाबत ऑचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. देवेंद्र भुयार, वि.स.स. यांनी, " अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी भागातील आदिवासी बहुल क्षेत्रातील रस्त्यांची व नाल्यांची कामे होण्यासाठी निधी वाढविण्याची तसेच आदिवासी बांधवांसाठी खावटी योजना नव्याने सुरू करण्याची आवश्यकता. " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी, " यवतमाळ जिल्ह्यात एसएससीच्या परीक्षेमध्ये अनेक ठिकाणी विद्यार्थी कॉपी करीत असल्याचे आढळून आल्यामुळे मेहनती विद्यार्थ्यांमध्ये पसरलेली अस्वस्थता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी, " पुणे जिल्ह्यातील कोथरुड येथे सुतारधारा परिसरामध्ये गुंडांकडून दहशत पसरविण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर वाहनांची तोडफोड करण्यात येणे . " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्रीमती प्रतिभा धानोररकर, वि.स.स. यांनी. " राज्यात अनेक वाहनधारकांकडून शासनाचा कर न भरल्यामुळे त्या दंडापोटी आकारण्यात येणाऱ्या व्याजदरावर सूट मिळून देखील कराची मूळ रक्कम भरत नसल्यामुळे सदर कर निधी स्वरुपात जमा होण्याच्या दृष्टीने अभय योजना लागू करणे. " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स. यांनी, " रमाई आवास योजनेंतर्गत ७/१२ उताऱ्याची अट असल्यामुळे खाजगी जागेवरील झोपडपट्टीधारकांना या योजनेचा लाभ होत नसल्यामुळे सदर अट शिथिल करण्याची आवश्यकता," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी, " मुंबई शहर आणि उपनगरातील प्रकल्पबाधित व्यक्तींना माहूल येथे स्थलांतरित केल्यामुळे तेथील प्रदूषित वातावरणाने होणारा त्रास तसेच त्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन होण्याची आवश्यकता " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री. राजेश पवार, वि.स.स. यांनी, " रेती माफियांना मदत करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी, " मुंबई शहरात पावसाळ्यात दरड कोसळून झोपडपट्टीवासीयांच्या जीवितहानी होण्याच्या घटना घडत असल्यामुळे अशा ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याची आवश्यकता. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, " चारकोप येथील मालवणी शासकीय रुग्णालयाचे विस्तारीकरण होण्याची आवश्यकता. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. विनोद अग्रवाल, वि.स.स. यांनी, " शासनाच्या घरबांधणी योजनांच्या माध्यमातून दारिद्र्यरेषेखालील लोकांना १८ हजार रुपयांचे सहाय्य मिळत असून गोंदिया जिल्ह्यातील अनेक लाभार्थी या आर्थिक सहाय्यापासून वंचित असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, " महाराष्ट्र राज्य वाहतूक नियमानुसार खाजगी बस वाहतुकीमध्ये ३० सीटर आणि १२ मीटर लांबीच्या बसेसला परवानगी देण्यात येणे परंतु ज्या वाहनधारकांकडे अखिल भारतीय परवाना आहे नियमानुसार परवानगी असून देखील महाराष्ट्र राज्याच्या नवीन परिपत्रकामुळे बसमध्ये ३० पेक्षा जास्त शायिका आढळल्यास कारवाई करण्यात येत असल्यामुळे याबाबत धोरण निश्चित करण्याची आवश्यकता. " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी, "अमरावती जिल्ह्यातील बडनेरा येथील संत गाडगे महाराज यांच्या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधीअभावी रखडलेली कामे तातडीने सुरू करण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री. इंद्रनील नाईक, वि.स.स. यांनी, " जवळा येथे अलग जलशुद्धीकरण केंद्र उभारणे तसेच सध्याच्या पाणीपुरवठा पंपाच्या दुरुस्तीची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२३) श्री. प्रदिप जैसवाल. वि.स.स. यांनी, " संभाजीनगर शहरातील घाटी रुग्णालयात अपुऱ्या वैद्यकीय सुविधांमुळे रुग्ण तसेच त्यांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२४) श्रीमती गीता जैन, वि.स.स. यांनी, " मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील होर्डिंगच्या निविदा प्रक्रियेमध्ये ठेकेदार आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांमधील संगनमतामुळे महसुलाचे होणारे नुकसान तसेच अनधिकृत होर्डिंगवर कारवाई होण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) ॲड. पराग अळवणी. वि.स.स. यांनी, " मुंबईतील विलेपार्ले परिसरात अंमली पदार्थांच्या विक्रीची घटना दिवसेंदिवस वाढत असणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२६) श्री. श्रीनिवास वनगा, वि.स.स. यांनी, " नियोजित वाढवण बंदरामुळे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणारे मच्छीमार, छोटे उद्योजक आणि अनेक बागायतदार यांचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने केंद्र शासनाने वाढवण बंदराबाबत पुर्नविचार करण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२७) श्रीमती लताबाई सोनावणे, वि.स.स. यांनी, " चोपडा, जि. जळगाव येथील आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी प्रलंबित गणवेश भत्ता व निर्वाह भत्ता या व इतर मागण्यांसाठी दिनांक २५ फेब्रुवारी २०२० रोजी धनवाडी रोडवरील वसतिगृहात अन्नत्याग आंदोलन सुरू करणे, तरी याप्रकरणी तातडीने चौकशी करण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी, " पुणे शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता पाणीसाठ्याची क्षमता वाढविण्याची आवश्यकता. इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) श्री. उदयसिंग राजपूत, वि.स.स. यांनी, " कन्नड विभागातील राष्ट्रीय महामार्ग २४ आणि इतर जिल्हा मार्गांची कामे वन विभागाच्या परवानगीअभावी प्रलंबित असणे तसेच या कामांसाठी डी.एफ.ओ. यांच्यामार्फत परवानगी देण्याच्या यापूर्वीचा शासन निर्णय कायम ठेवण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३०) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स. यांनी, " बीड जिल्ह्यामध्ये विमा कंपनीने कोणत्याही प्रकारचा सर्व्हे न करता शेतकऱ्यांना अतिशय कमी विमा मंजूर करणे तसेच अतिवृष्टी झाल्याची बाब देखील विमा कंपनीने गृहीत धरली नसल्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर झालेला अन्याय." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३१) श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांनी, " शेतकऱ्यांना वेळेवर ट्रान्सफॉर्मर न मिळणे तसेच वीज कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे ग्राहकांना पाठविण्यात आलेल्या वीज देयकांच्या बाबतीत अनियमितता आढळून येणे." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३२) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांनी, " बसस्थानकाचा प्रश्न मार्गी लागून नागरिकांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने बदनापूर येथे तातडीने बसस्थानक बांधण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३३) श्री. राजेश पाटील, वि.स.स. यांनी, " चंदगड येथील हलकर्णी औद्योगिक क्षेत्रात ट्रॉमा केअर युनिटची स्थापना करण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३४) ॲड. राहुल नार्वेकर, वि.स.स. यांनी, " देवगड नारिंग्रे येथील राजेश श्रीधर गावकर या व्यक्तीचा पोलीस कोठडीत मृत्यू होणे तसेच राज्यात पोलीस कोठडीतील हिंसाचाराच्या वाढत्या घटना लक्षात घेता सर्व कारागृहांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३५) श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. यांनी, " अमरावती येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची आवश्यकता." इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३६) श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी, " नगरविकास विभागातर्फे बांधकामात नवीन युनिफाईड डीसीआरची अंमलबजावणी करण्याची अधिसूचना निर्गमित करण्यात आली असून त्यामुळे लहान विकासकावर अन्याय होणार असून सदर अटीमधून मुंबई विभागाव्यतिरिक्त इतर भाग वगळण्यात यावा." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३७) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी " मुंबई शहर आणि उपनगरातील रेल्वे स्थानकांना जोडून असलेल्या स्कायवॉकची दुरवस्था तसेच दहिसर येथील स्कायवॉकची दुरवस्था लक्षात घेऊन सदर स्कायवॉक निष्कासित करण्याची आवश्यकता ." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३८) श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी, " भिवंडी महानगरपालिकेचे अधिकारी व टॉरंट पॉवर कंपनी यांच्या संगनमताने अनियमितता आढळून येत असल्यामळे सदर कंपनी व अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची आवश्यकता. " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३९) श्री. संजय पोतनीस, वि.स.स. यांनी, " विमानतळ प्राधिकरणाच्या अंतर्गत फनेल झोनच्या लगत असलेल्या इमारतींचा विकास एव्हीएशन विभागाने इमारतींच्या उंचीवर निर्बंध घातल्याने रखडणे त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून ठोस धोरण आखण्याची नितांत आवश्यकता. " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

**७.** (१) श्री. अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स यांची लक्षवेधी सूचना :—

श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :–

"राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची प्रतीक्षा असणे, प्रशासकीय पातळीवरील विलंबामुळे त्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागणार असल्याचे चित्र नुकतेच निदर्शनास येणे, ऑनलाईन प्रकियेतील गोंधळामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरता आले नसणे, त्यामुळे इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले असणे, परंतु अद्यापपर्यंत इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा न होणे, त्यामुळे इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिक्षणच घेऊ नये अशी परिस्थिती निर्माण होणे, शिष्यवृत्ती वाटपात उशीर होत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रक्रियेमध्ये सुधारणा करून शिष्यवृत्ती व फ्रीशीप वेळेत मिळणेसाठी उपाययोजना करून कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.**

**काही प्रश्नोत्तरे झाली.**

(२) श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. मिहीर कोटेचा, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना :–

श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधले. :–

" राष्ट्रीय पातळीवरील शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये अव्वल क्रमांक मिळविण्याच्या इर्ष्येपोटी वजन कमी करण्याच्या आयुर्वेदिक गोळ्यांची मात्रा घेतल्यानंतर ठाणे येथील २२ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला असणे, याप्रकरणी नौपाडा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असणे, दिनांक ३० जानेवारी २०२० रोजी मुंब्रा येथील २३ वर्षीय शरीरसौष्ठवपटू याचे स्टिरॉइड्सच्या अतिसेवनामुळे मृत्यू झाला असणे, ॲनाबॉलिक, स्टिरॉईड्सचा गैरवापर गंभीर होवू शकत असणे, यामुळे मूत्रपिंडाचे विकार, उच्च रक्तदाब, वाढलेले हृदय, रक्तातील कोलेस्टॉलमध्ये बदल या सर्वांचा धोका वाढत असणे, राज्यात हजारो तरूण तरुणी शरीर बनविण्यासाठी किंवा वजन कमी करण्यासाठी पूरक आहार घेत असणे, यासारख्या इतर औषधांवर बंदी

असूनही ऑनलाईन मार्केटमध्ये सर्रास अशा वस्तूंची होत असलेली विक्री, तरूण पिढी लवकरात लवकर शरीर कमावण्यासाठी स्टिरॉईड्सचा मोठ्या प्रमाणात वापर करीत असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊन काहींचा मृत्यू होत असल्यामुळे स्टिरॉईड्सवर पूर्णपणे बंदी घालण्याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया.''

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक (३) पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी घोषित केले.

(४) ॲड. अशोक पवार, सर्वश्री दीपक चव्हाण, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. संग्राम जगताप, यशवंत माने, सुनील शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षीरसागर, मकरंद जाधव-पाटील, नीलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापुरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना :—

ॲड. अशोक पवार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"मुंबई शहर व त्यालगतच्या परिसरातील रुग्णांच्या विविध प्रकारच्या आजारांचे निदान करण्यासाठी रक्तातील सीबीसी तपासणी करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयासाठी जपानमधील परदेशी कंपनीकडून सन २००३ व २००९ मध्ये दोन मशीन्स खरेदी करण्यात येणे, तथापि गेल्या पाच वर्षांपासून या मशीन्स बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सध्या चालू असलेल्या तिसऱ्या मशीनवर एका महिन्याभरात सुमारे एक ते दीड लाख सीबीसी चाचण्या घेण्यात येणे, परंतु या मशीनवर घेतलेल्या चाचण्यांचे निष्कर्ष अनेकदा चुकीचे निघत असल्यामुळे रुग्णांना चाचण्या बाहेरून करून घ्या असा सल्ला तेथील डॉक्टरांकडून देण्यात येत असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, तसेच माहे नोव्हेंबर २००९ मध्ये खरेदी करण्यात आलेली नवीन मशीन अद्यापही कार्यान्वित करण्यात न येणे, परिणामी या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करून रुग्णांना रुग्णसेवा तातडीने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रीया.''

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८. सर्वश्री. शेखर निकम, भास्कर जाधव, अमिन पटेल, सुनिल भुसारा, सुनिल प्रभू, कुणाल पाटील, दौलत दरोडा, राजन साळवी, अनिल पाटील, बाबासाहेब पाटील, रविंद्र वायकर, दीपक चव्हाण, योगेश कदम, झिशान सिद्दिकी, सर्वश्रीमती सरोज अहिरे, सुलभा खोडके, ॲड. अशोक पवार, श्री. भरतशेठ गोगावले, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापुरे, वैभव नाईक, सुनील शेळके, दीपक केसरकर, अतुल बेनके, संजय पोतनीस, सुनिल टिंगरे, मंगेश कुडाळकर, सुभाष धोटे, अजय चौधरी, प्रकाश फातर्फेकर, प्रकाश सुर्वे, रमेश कोरगावकर, सुनिल राऊत, रमेश लटके, सदा सरवणकर, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री दिलीप लांडे, अमित झनक, संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)

" कोकणाला ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभलेला असून व पर्यटनाची मोठी संधी उपलब्ध असतानासुद्धा हा भाग दुर्लक्षित असणे, वशिष्ठी नदीवर कोळकेवाडी धरणावर कोयना विद्युत प्रकल्प-४ ती निर्मिती केलेली असून या ठिकाणी वर्षभर वीजनिर्मिती सुरू असल्याने वशिष्ठी नदी बारमाही पूर्ण क्षमतेने वाहत असणे, कोकणामध्ये पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे नदीचे पाणी बाजारपेठेत शिरुन कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्यामुळे वशिष्ठी नदीवर संवर्धन प्रकल्प राबविण्याची होत असलेली मागणी, किनारपट्टीवर मत्स्यव्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असून डिझेलवर सबसीडी, मच्छीमारांना जाळी व अन्य सोयी उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता, पर्सनेटची जाळी टाकून या राज्यातील पारंपारिक मच्छीमारांना व्यवसायापासून वंचित ठेवण्याचे सुरू असलेले प्रयत्न, वैधानिक विकास मंडळामार्फत कोकणाला अत्यंत अल्प प्रमाणात निधी उपलब्ध होणे, कोकणाला स्वतंत्र संवैधानिक विकास मंडळ द्यावे असा दोन्ही सभागृहात एकमातने निर्णय होऊन सुद्धा त्यावर अद्याप कारवाई न होणे, रस्ते, आरोग्य तांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण या विभागात मोठा अनुशेष असणे, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना बंद होणार असल्यामुळे त्याऐवजी 'जलजीवन मिशन' ही नवीन योजना राबविण्यात येत असणे, परंतु पूर्वी असलेल्या राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत मंजूर होणाऱ्या नळपाणी योजनांच्या निकषांमध्ये कमी लोकसंख्येमुळे व कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे काही योजना बसत नसणे, तरी नवीन येणाऱ्या 'जलजीवन मिशन' या योजनेमध्ये कमी लोकसंख्या असणाऱ्या भागात सुद्धा नळपाणी, पाणीपुरवठा योजना राबविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, कोकणातील भविष्यकालीन योजना शासनाकडे प्रलंबित असणे, त्यांना त्वरित मंजुरी देऊन कोकणात मोठ्या धरणांना मंजुरी देण्यापेक्षा लघुपाटबंधारे योजना व पाझर तलावांना मंजुरी दिल्यास याचा फायदा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होत असल्याने याचा शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता, मुंबईपासून गोव्यापर्यंत सागरी महामार्ग तयार करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय, या प्रकल्पाला अद्याप निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे या प्रकल्पावरील पूल, रस्ते यांची कामे अर्धवट अवस्थेत असणे, कोकणामध्ये एकही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणे, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात येणे, परंतु पर्यटनास आवश्यक पायाभूत सोयी-

सुविधा होऊ शकल्या नसल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह कोकणात व इतर जिल्ह्यात भारत दूरसंचार निगम व भ्रमणध्वनीला नेटवर्क उपलब्ध होत नसणे त्यामुळे तेथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमी असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी येथील विमानतळाचे काम पूर्ण होऊनही अद्याप विमानसेवा सुरू न होणे, रत्नागिरी येथील विमानतळाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता, कोकणातील मुख्य पीक असलेले भात, काजू, आंबा, फणस, नारळ, सुपारी इत्यादी पिके अवकाळी पावसामुळे नष्ट होत असल्यामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता असणे, तसेच कोकणामध्ये फळ पिकांसाठी फळ प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता, कोकणपट्टीकडे राज्याला आर्थिक बळ देण्याची क्षमता असताना अपुऱ्या निधीमुळे आणि उत्तम नियोजनाअभावी हा भाग जाणूनबुजून दुर्लक्षित ठेवण्यात येत असल्याची भावना कोकणातील जनतेच्या मनात वाढीस लागणे, कोकणातील छोटे-मोठे कारखाने, निरनिराळ्या औद्योगिक वसाहती बंद पडल्यामुळे बेकारीचा प्रश्नही मोठ्या प्रमाणावर निर्माण होणे, कोकणाच्या विकासासाठी व उन्नतीसाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| (१) श्री. नितेश राणे | (२) श्रीमती यामिनी जाधव |
| (३) ॲड. आशिष शेलार | (४) श्री. राजन साळवी |
| (५) श्रीमती मनिषा चौधरी | (६) श्री. वैभव नाईक |
| (७) श्री. सुनील राणे | (८) श्री. भरतशेठ गोगावले |
| (९) श्री. रमेश कोरगावकर | (१०) ॲड. राहुल नार्वेकर |
| (११) श्री. मंगेश कुडाळकर | |

(चर्चा अपूर्ण)

**१.** (अ) (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अडतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

"वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्यातर्फे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व देशाचे माजी केंद्रीय मंत्री थोर नेते शंकरराव चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे

थोर नेते सहकार महर्षि यशवंतराव मोहिते, लोकनेते श्री. राजाराम बापू पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. रफीक झकेरिया यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पाजंली अर्पण करून त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे संस्मरण करणारे व्याख्यान बुधवार, दिनांक ११ मार्च २०२० रोजी सायंकाळी ४-०० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका सन्माननीय सदस्यांना टपालाद्वारे वितरित करण्यात आली आहे" अशी घोषणा माननीय अध्यक्षांनी केली.

**२.** (१) उप मुख्यमंत्री, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१९-२०२० हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवले.

(२) उद्योग मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास महामंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(३) गृहनिर्माण मंत्र्यांनी (अ) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल,

(ब) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई प्राधिकरणाचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

(४) गृहनिर्माण मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये गृहनिर्माण विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(५) उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्र्यांनी, (अ) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल,

(ब) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरीक्षण अहवाल,

(क) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचे लेखा परीक्षण अहवाल तसेच,

(ड) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(६) सहकार व पणन मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सहकार व पणन विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

**३.** आज सभागृहात ज्या सन्माननीय सदस्यांनी स्थगन प्रस्तावाच्या सूचना दिल्या आहेत, त्यांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी, "राज्यामध्ये मुलींची मोठ्या प्रमाणात होत असलेली रॅगिंग," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

या प्रकरणी शासनाने निवेदन करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी, "राज्यामध्ये सौर ऊर्जेसाठी अनुदान न मिळणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

सर्वश्री नितेश राणे, राधाकृष्ण विखे-पाटील, देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्षनेते), ॲड. आशिष शेलार, रविंद्र वायकर, सुरेश प्रभु, रवी राणा, राम कदम, प्रताप सरनाईक, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी "राज्यात कोरोना व्हायरसचा होत असलेला प्रसार," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

सध्या कोरोना विषाणूचा मुद्दा लोकांच्या काळजीचा बनला आहे. सन्माननीय सदस्यांनीदेखील त्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. यासंदर्भात शासनाच्या वतीने घेण्यात येत असलेल्या खबरदारीच्या उपाययोजनांची माहिती जनतेसमोर यावी यासाठी या विषयावर चर्चा घडवून आणली, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मा. मुख्यमंत्र्यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली.

श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, "पोलीस अत्याचाराला कंटाळून महिलेने केलेली आत्महत्या," इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेला अनुलक्षून माननीय मध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "राज्यातील सुमारे ३५ लक्ष ७२ हजार निराधार, विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटित महिलांना संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचा लाभ न मिळणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत खुलासा केला.

**४.** सर्वश्री शेखर निकम, भास्कर जाधव, अमिन पटेल, सुनील भुसारा, सुनिल प्रभू, कुणाल पाटील, दौलत दरोडा, राजन साळवी, अनिल पाटील, बाबासाहेब पाटील, रविंद्र वायकर, दिपक चव्हाण, योगेश कदम, झिशान सिद्दिकी, सर्वश्रीमती सरोज अहिरे, सुलभा खोडके, ॲड. अशोक पवार, श्री. भरतशेठ गोगावले, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापुरे, वैभव नाईक, सुनील शेळके, दीपक केसरकर, अतुल बेनके, संजय पोतनीस, सुनिल टिंगरे, मंगेश कुडाळकर, सुभाष धोटे, अजय चौधरी, प्रकाश फातर्फेकर, प्रकाश सुर्वे, रमेश कोरगावकर, सुनिल राऊत, रमेश लटके, सदा सरवणकर, सौ. यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री दिलीप लांडे, अमित झनक, संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये पुढील प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू) (उत्तर पुढे सुरू)

" कोकणातील पर्यटन उद्योगाला चालना देऊन कोकणाच्या विकासासाठी व उन्नतीसाठी उपाययोजना करणे," इ. बाबत.

प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले (भाषण पुढे सुरू)

सभागृहाने प्रस्तावावर चर्चा केली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले

**५. पुरःस्थापनार्थ विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

(क) सहकार व पणन मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक १९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :–

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडला :—

"सन २०२० ची विधानसभा विधेयक क्रमांक १९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२० विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या ३६० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे," असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रस्ताव मंजूर झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) ॲड. राहुल नार्वेकर
(२) ॲड. राहुल कुल
(३) श्री. हरिभाऊ बागडे
(४) श्री. रणधीर सावरकर
(५) श्री. प्रताप अडसड
(६) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेता
(७) श्री. चंद्रकांत पाटील
(८) श्री. नितेश राणे

सहकार व पणनमंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले व सदर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रस्ताव मागे घ्यावा, अशी विनंती केली.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले व काही क्षणांकरिता सभात्याग केला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

माननीय अध्यक्षांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

" महिला सक्षमीकरण हा एक आत्यंतिक महत्त्वाचा मुद्दा असणे, महिला सक्षमीकरण, पोषण, आरोग्य, संरक्षण, महिला व अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराला प्रतिबंध करणे, सायबर गुन्हे इत्यादी महिलांशी संबंधित विषयाबाबत न्याय देण्यासाठी शासन कटीबद्ध असणे, शासकीय स्तरावर यासाठी सातत्याने प्रयत्न होत असले तरीही जेव्हा हिंगणघाटसारखी घटना महाराष्ट्रासारख्या पुरोगामी म्हणवून घेणाऱ्या राज्यात घडते तेव्हा या सर्व ध्येय धोरणांचा पुन्हा एकदा विचार होण्याची आवश्यकता. केवळ आर्थिक तरतुदी व नवनवीन योजना यामुळे महिलांचा विकास साध्य होणार नसणे, तर महिला विकासासाठी पोषक सांस्कृतिक वातावरण तयार होणे अत्यंत महत्त्वाचे असणे, महिलांबाबत शाश्वत विकासासाठी सर्वच क्षेत्रात प्रयत्न होणे तसेच, महिला, धोरण, महिला सक्षमीकरण, मुख्यतः होणारे बालविवाह व यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांचे पुनर्वसन करणे याबाबत शासनस्तरावर होणारे प्रयत्न, संयुक्त राष्ट्रसंघाने २०१५ मध्ये शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे दिली, या १७ उद्दिष्टांमधील पाचव्या क्रमांकाचे उद्दिष्ट लिंग समानता साध्य करण्याचे व सर्व महिला व मुलींना सक्षम करण्याचे असणे, या उद्दिष्टामुळे महिला व मुलींचे सक्षमीकरण व विकासासाठीच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले असणे, शहरी व ग्रामीण भागातील महिलांना व्यावसायिक व रोजगारक्षम प्रशिक्षण देणे, राजकीय, आर्थिक आणि सार्वजनिक निर्णय प्रक्रियेत अध्यक्ष महिलांना सहभाग वाढविणे, आर्थिक सक्षमता व समानता निर्माण करणे इ. महत्त्वाच्या क्षेत्रामध्ये शासन महिलांना वारंवार प्रोत्साहन देत असणे, नेतृत्व संधीत समानता यासाठी विशेष प्रयत्नांची तसेच महिलांच्या सहभागासाठी मोकळे आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता. आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती यामधील महिला यांच्यावर होणारे अत्याचार व त्यासाठी आवश्यक उपाययोजना त्यातील दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी निर्भया फंड व निधीची आवश्यकता याबाबत सामाजिक संघटनांच्या सहभागाने उपाययोजना करण्याचे चिंतन, महिलांना शिक्षण, आरोग्य, रोजगार, राजकारण आणि निर्णय प्रक्रियेत समान संधी याबाबत शाश्वत आर्थिक, सामाजिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करणे."

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(१) श्रीमती यामिनी जाधव
(२) डॉ. भारती लव्हेकर
(३) श्रीमती सुमनताई पाटील
(४) प्रा. देवयानी फरांदे
(५) श्रीमती सुलभा खोडके
(६) श्रीमती लता सोनवणे
(७) श्रीमती मनिषा चौधरी
(८) श्री. आदित्य ठाकरे, पर्यटन मंत्री
(९) श्रीमती सरोज अहिरे
(१०) श्रीमती विद्या ठाकूर
(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(१२) श्रीमती मंजुळा गावित
(१३) श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे
(१४) श्री. मनोहर चंद्रिकापुरे
(१५) श्रीमती मंदा म्हात्रे
(१६) श्री. रईस शेख
(१७) श्री. रोहित पवार
(१८) श्रीमती अदिती तटकरे, मंत्री
(१९) श्रीमती मोनिका राजळे
(२०) श्री. झिशान सिद्दीकी
(२१) श्रीमती गीता जैन
(२२) श्रीमती श्वेता महाले
(२३) श्री. लहू कानडे
(२४) श्री. सुनील शेळके

कृषी मंत्र्यांनी, "राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांना व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करणे" इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

'राज्यातील महिलांचे सक्षमीकरण करणे', इ. बाबत माननीय अध्यक्षांचा प्रस्ताव

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(२५) श्रीमती सीमा हिरे (भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या पाच लक्षवेधी सूचनांपैकी क्रमांक २, ४ व ५ यांवर चर्चा होईल. उर्वरित लक्षवेधी सूचना पुढील आठवड्यात चर्चेला घेण्यात येतील, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

'राज्यातील महिलांचे सक्षमीकरण करणे', इ. बाबत माननीय अध्यक्षांचा प्रस्ताव.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(२५) श्रीमती सीमा हिरे (भाषण पूर्ण)
(२६) श्री. समीर कुणावार
(२७) श्री. किशोर जोरगेवार
(२८) श्री. संजय सावकारे

(१) मुख्यमंत्र्यांनी, “सीएए, एनपीआर, एनआरसीबाबत ६ जणांची समिती नियुक्त करणे,” इ. बाबत निवेदन केले.

(२) मुख्यमंत्र्यांनी, “औरंगाबाद विमानतळ, औरंगाबाद याचे नाव बदलणे” इ. बाबत निवेदन केले.

‘राज्यातील महिलांचे सक्षमीकरण करणे’, इ. बाबत माननीय अध्यक्षांचा प्रस्ताव

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेला महिला व बालविकास मंत्र्यांनी उत्तर दिले.

कृषी मंत्र्यांनी, “सूक्ष्म सिंचनाच्या अनुदानामध्ये वाढ करणे” इ. बाबत निवेदन केले.

‘राज्यातील महिलांचे सक्षमीकरण करणे’, इ. बाबत माननीय अध्यक्षांचा प्रस्ताव

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेला महिला व बालविकास मंत्र्यांनी उत्तर दिले.

पर्यटन मंत्री, पर्यटन राज्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्र्यांनी देखील उक्त प्रस्तावावर उत्तर दिले.

गृह मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२०**

उप मुख्यमंत्र्यांनी तथा अर्थ मंत्र्यांनी, सन २०२०-२०२१ चा अर्थसंकल्प सभागृहास सादर केला व भाषण केले.

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२०**

**१. तारांकित प्रश्न**

(१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील आठ प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

माननीय अध्यक्षांनी, “ महाराष्ट्र विधानसभा नियम ८३ रद्द करणे ” इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते व श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी आपले मत मांडले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उपमुख्यमंत्री यांनी देखील आपले मत मांडले.

विधानसभा नियम ८३ सस्पेंड करण्याबाबतचा प्रश्न नियम समितीकडे पाठविण्यात येईल. परंतु विधानसभा नियम ८३ हा आजपासून सस्पेंड करण्यात येत आहे. आता यापुढे जे प्रश्न स्वीकृत झालेले आहेत ते सर्व प्रश्न चर्चेला घेण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

माननीय अध्यक्षांनी खालील घोषणा केली—

" मला सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, आज आपल्या सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी अमेरिका देशाच्या मुंबई येथील वाणिज्य दूतावासातील राजकीय व आर्थिक विभागाचे मुख्य अधिकारी श्री.ख्रिस्तोफर ग्रॉसमन (Mr. CHIRSTOPHER GROSSMAN, Chief of the Political and Economic Section, U.S. Consulate in Mumbai) व अन्य उच्चाधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित आहे. आपण सर्वजण त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करुया."

माननीय अध्यक्षांनी खालील घोषणा केली—

" आज बुधवार दिनांक ११ मार्च, २०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्यातर्फे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व देशाचे माजी केंद्रीय मंत्री थोर नेते शंकरराव चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे थोर नेते सहकार महर्षि यशवंतराव मोहिते, लोकनेते श्री. राजाराम बापू पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. रफीक झकेरिया यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व सन्माननीय सदस्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे. यासंदर्भातील घोषणा दिनांक ५ मार्च, २०२० रोजी सभागृहात करण्यात आली होती.

**२.** (१) उपमुख्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये नियोजन विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(२) उद्योग, खनिकर्म राज्यमंत्र्यांनी, (क) विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल, (ख) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१६-२०१७, २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे त्रेचाळीसावा, चव्वेचाळीसावा आणि पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले तसेच,

(३) मराठी भाषा राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये मराठी भाषा विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(४) ग्रामविकास मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(५) नगरविकास राज्यमंत्र्यांनी, " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये नगरविकास विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र " सभागृहासमोर ठेवले.

(५) क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्र्यांनी, " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र " सभागृहासमोर ठेवले.

(६) परिवहन मंत्र्यांनी, " कोकण रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ चा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवला.

(७) मृद् व जलसंधारण मंत्र्यांनी, " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये मृद् व जलसंधारण विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र " सभागृहासमोर ठेवले.

(८) सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनी, " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र " सभागृहासमोर ठेवले.

(९) उद्योग राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये पर्यावरण विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, " कोरोना व्हायरसमुळे राज्यात मोठ्या प्रमाणात मास्कची मागणी वाढली असताना काही लोक या मास्क विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात काळाबाजार करण्याचा प्रयत्न करीत असणे तसेच दोन दिवसांपूर्वी भिवंडी येथे परदेशात वापरलेले मास्क पुन्हा धुवूण आपल्या राज्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला असणे " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सदरहू बाब ही अतिशय गंभीर आहे. शासनाने याबाबत त्वरित दखल घेऊन उद्या निवेदन करावे असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

**३.** ग्रामविकास मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक २८-महाराष्ट्र ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२० मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला. आता विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावर चर्चा होईल. त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला

(१) श्री. भास्कर जाधव
(२) श्री. चंद्रकांत पाटील
(३) श्री. संजय सावकारे
(४) श्री. सुनील भुसारा
(५) ॲड आशिष जयस्वाल
(६) श्री. योगेश सागर
(७) श्री. किशोर आप्पा पाटील
(८) श्री. राम कदम
(९) डॉ. संजय रायमुलकर

माननीय अध्यक्षांनी देखील सदर विधेयकाच्या अनुषंगाने आपले म्हणणे मांडले व यासंदर्भात शासनाने धोरण निश्चित करणे तसेच अधिकाऱ्यांनी व्यवस्थित काम करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करावे असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

विधेयकावरील चर्चेस ग्रामविकास मंत्र्यांनी उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत डॉ.संजय रायमुलकर, वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्र्यांनी डॉ.संजय रायमुलकर, वि.स.स. यांच्याकडे दीड कोटी रुपयांची मागणी करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यास ताबडतोब निलंबित करण्यात येईल असे जाहीर केले.

संसदीय कार्यमंत्र्यांनी, विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२० रोजी झालेल्या बैठकीतील शुक्रवार, दिनांक १२ मार्च, २०२० ते शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२० पर्यंतच्या सभागृहाच्या कामकाजाबाबतचे इतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**४.** (१) डॉ.अशोक उईके, वि.स.स. यांनी, " आदिवासी समाजाचे आद्य क्रांतिकारी बिरसा मुंडा यांच्या स्मरणार्थ त्यांच्या जन्मदिवशी १५ नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात यावी व या दिवशी 'राष्ट्रीय आदिवासी दिन' घोषित करावा " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री.संतोष दानवे, वि.स.स. यांनी, " जालना जिल्ह्यातील सर्व ग्रामसेवकांनी मागील दोन दिवसांपासून लेखणी बंद आंदोलन सुरू केल्यामुळे त्यांच्यावर करण्यात आलेली निलंबनाची कारवाई रद्द करावी तसेच मागील ४ ते ५ वर्षांपासून आदर्श ग्रामसेवकाचे पुरस्कार देण्यात आलेले नसणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) ॲड.राहुल कुल, वि.स.स. यांनी, " राज्यात मोठ्या प्रमाणावर अवैधरीत्या वाळू, माती व मुरुम यांचा उपसा सुरू असणे तसेच चिबड जमीन निर्मूलन कार्यक्रमासाठी राज्य शासनाने स्वतंत्र धोरण " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

वाळू संदर्भात पर्यावरण विभागाची परवानगी मिळाली नसल्यामुळे वाळूचे लिलाव झालेले नाहीत. वाळू तस्करी मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या विषयासंदर्भात तातडीने लक्षवेधी सूचना द्यावी आणि ती तातडीने चर्चेला कशी येईल या दृष्टीकोनातून मी नियोजन करणार आहे. त्यावेळी वाळू संदर्भात सरकारचे धोरण स्पष्ट होण्यास मदत होणार आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(४) श्री.सहसराम कोरोटे, वि.स.स. यांनी, " आमगाव देवरी मतदारसंघातील देवरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मधील गाझिया ट्युलीप प्रा. लि. कंपनी देव, जि.गोंदिया या नावाचा पोलाद कारखाना असून यामुळे परिसरातील नागरिकांना श्वसनाचे भयंकर त्रास होत असल्यामुळे इतरत्र त्वरित हलविणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री.मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी, " मुलुंड पश्चिम येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकुलातील टेबल टेनिस, बॅडमिंटन व इतर विविध खेळांचे हॉल अतिशय वाईट अवस्थेत असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री.अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, " भूकंपप्रवण भागातील विद्यार्थ्यांना आजही भूकंपग्रस्त प्रमाणपत्र मिळत नसणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) ॲड.राहुल ढिकले, वि.स.स. यांनी, " राज्य मार्ग परिवहन मंडळाकडून कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक बस फेऱ्यांची संख्या निम्म्याहून कमी केल्याने नाशिक शहर, सिद्धपिंपरी, आडगाव, म्हसरुळ, नाशिक रोड, पंचवटी या भागात राहणारे विद्यार्थी, महिला, कामगार व सर्वसामान्य नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) डॉ.किरण लहामटे, वि.स.स. यांनी, " आदिवासी भागात आदिवासी बांधवांमध्ये साधारणपणे दीड लाखपर्यंत घुसखोरी झाल्यामुळे मेडिकल ॲडमिशन व नोकऱ्यांपासून खऱ्या आदिवासींना वंचित राहावे लागणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री.लहू कानडे, वि.स.स. यांनी, "अहमदनगर जिल्ह्यामध्ये श्रीरामपूर येथे सहाय्यक नगर रचना कार्यालय होण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री.दिलीप लांडे, वि.स.स. यांनी, " कुर्ला (पूर्व) येथे एक रेशनिंग कार्यालय बनवावे तसेच बोगस रेशनिंग कार्ड रॅकेटची चौकशी करण्याची आवश्यकता " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) डॉ.देवराव होळी, वि.स.स. यांनी, " शासनाने गडचिरोली जिल्ह्यातील तुलतुली, कारवाफा आणि चेन्ना यासारख्या मध्यम स्वरुपाच्या सिंचन प्रकल्पांचे काम १९८० च्या वन कायद्याचे कारण दाखवून अन्यायकारक पद्धतीने स्थगित करणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री.संजय जगताप, वि.स.स. यांनी, " पुणे महानगरपालिकेत दीड वर्षांपूर्वी नव्याने समाविष्ट केलेल्या ११ गावांतील नागरी सुविधा तसेच त्यांचा मालमत्ता कर " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री.किसन कथोरे, वि.स.स. यांनी, "ठाणे जिल्ह्यातील कुळगाव-बदलापूर नगरपालिका क्षेत्राचे झपाट्याने होत असलेले शहरीकरण, नागरीकरण व वाढती लोकसंख्या, पार्किंगच्या जागेचा अभाव, वाहनाच्या संख्येतील प्रचंड वाढ, रेल्वे स्टेशन, परिसरामध्ये बसत असलेले फेरीवाले, वाहतूक पोलिसांची अपुरी संख्या यामुळे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होणे अशा अनेक समस्या तसेच कुळगाव बदलापूर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्यात यावे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री.अमिन पटेल, वि.स.स. यांनी, " ताई मुस्लीम जातीच्या लोकांचा ओ.बी.सी. मध्ये समावेश करण्यात यावा " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री.चंद्रकांत पाटील, वि.स.स. यांनी, " पुण्यामध्ये कोरोनाचे ५ रुग्ण आढळणे त्यामुळे शासनाने यासंदर्भात योग्य त्या सोयी-सुविधा त्वरित उपलब्ध करून देण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री.श्यामसुंदर शिंदे, वि.स.स. यांनी, " लोहा-कंधार येथे १, २ व ९ मार्च, २०२० रोजी मोठ्या प्रमाणात वादळी वारे, पाऊस व वीज पडल्याने गहू, हरभरा, करडई, रब्बी ज्वारी व भाजीपाला यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी, " सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील चराठे येथील जिल्हा परिषद शाळेचा आंतरराष्ट्रीय दर्जा कायम ठेवावा तसेच राज्यातील शाळांना आंतरराष्ट्रीय शाळेचा दर्जा देण्याबाबत शासनाची भूमिका " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी, " भिवंडी शहर क्षेत्रातील महानगरपालिका शाळांची अत्यंत गंभीर व धोकादायक परिस्थिती असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, " राज्यातील भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण मिळविण्याकरिता तसेच त्यांची नसबंदी करण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता " इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी, " पनवेल महानगरपालिकेस जीएसटीच्या माध्यमातून ६८९.६७ कोटी रुपये अनुदान अपेक्षित असताना केवळ २४.२० कोटी रुपये अनुदान प्राप्त झाले असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांनी, " जळगाव महानगरपालिकेमध्ये तातडीने आयुक्तांची नियुक्ती करण्याची आणि जळगाव शहरातील स्वच्छता न करणाऱ्या ठेकेदारावर कार्यवाही करण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स. यांनी, "वाशिम जिल्ह्यातील, ता. मानोरा व ता. कारंजा येथील कर्जमाफी योजनेपासून वंचित राहिलेल्या जवळ-जवळ ४ हजार कर्जदार शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेमध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२३) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी, " कांदिवली पूर्व मतदारसंघातील समता नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सीपी रोड येथील दत्तानी अपार्टमेंट येथील डान्स क्लाससाठी जात असलेल्या ८ वर्षीय मुलीचा पाठलाग करून तिला पकडून तिच्याशी अत्यंत अश्लील चाळे करण्याचा अश्लाघ्य प्रकार एका तरूणाने करणे तसेच याच परिसरात चेनस्नॅचिंगची घटना घडणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२४) श्री.संजीवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स. यांनी, " वणी येथील वेस्टर्न कोलफिल्डच्या माईन्समध्ये कार्यरत परप्रांतीय खाजगी कंपन्यामध्ये स्थानिक युवकांना डावलून परप्रांतीय कामगारांना प्राधान्य देणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, “औचित्याचे मुद्दे सचिव कार्यभार यांच्या दालनात सकाळी ९-०० ते ९-३० वाजेपर्यंत देणे अत्यंत गैरसोयीचे असणे ” इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त हरकतीच्या मुद्यासंदर्भात माननीय अध्यक्षांनी स्पष्टीकरण दिले.

आमदारांना आपल्या स्वीय सहायकाकडे औचित्याचे मुद्दे आदल्या दिवशी देता येऊ शकतात असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२५) ॲड.आशिष शेलार, वि.स.स. यांनी, “वांद्रे (पश्चिम) येथील महाराष्ट्र नगर येथे बडी मस्जिदच्या मागे महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करून उर्दू शाळा पुन्हा बांधण्याची व वर्ग खोल्या वाढवण्याची आवश्यकता ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२६) श्री.अबु आजमी, वि.स.स. यांनी, “मानखुर्द-शिवाजीनगर येथे वॉर्ड क्रमांक १४१ मधील ४५०० मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याचे आढळणे ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त औचित्याच्या मुद्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

५. (१) ॲड. आशिष शेलार. ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. प्रशांत ठाकूर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. अतुल भातखळकर, सुनील प्रभू, ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृह मंत्र्याचे लक्ष वेधले.

“राज्यात बालकांवरील लैंगिक अत्याचारांबाबत १७०० ध्वनिचित्रफिती (चाइल्ड पोर्नोग्राफी) आढळून आल्याची धक्कादायक माहिती माहे फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस येणे, त्यात मुंबईतील ६०० प्रकरणांचा समावेश असणे, दोन महिन्यांपूर्वी ही सर्व प्रकरणे तपासासाठी एनसीआरबीकडून महाराष्ट्र सायबर विभागाकडे देण्यात आली असणे, सायबर विभागाद्वारे ऑपरेशन ब्लॅकफेस या मोहिमेद्वारे ध्वनीचित्रफिती तयार करणाऱ्या किंवा प्रसारमाध्यमांवर प्रसिद्ध करणाऱ्यांचा शोध लावला जात असणे, तसेच मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबईसह राज्यभरात गुन्हे नोंदविण्यास माहे जानेवारी, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात झालेली सुरुवात, पुणे, रायगड, नाशिक, लातूर, कोल्हापूर, औरंगाबाद, अहमदनगर, परभणी, बीड, भंडारा, नंदूरबार, चंद्रपूर येथे एकूण २४ गुन्हे नोंदविण्यात येणे, माहे फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात नवी मुंबई व बेलापूर येथील दोन जणांवर माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० मधील कलम ६७ बी अन्वये गुन्हा नोंदिवणे, राज्य महिला बाल आयोगाशी निगडीत स्वयंसेवी संस्थामार्फत मुलांचा अश्लील चित्रीकरणासाठी वापर करण्याविरोधात जनजागृती करण्याबाबत तसेच आरोपींवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया.”

गृह मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री किशोर पाटील, नितीन पवार, हिरामण खोसकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्री. किशोर पाटील, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधले—

" जळगाव जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. श्री.देवीदास महाजन हे या पदावर कार्यरत असताना दिनांक १३.८.२०१५ ते दिनांक ३१.५.२०१९ रोजी या कालावधीत १. पी.के. विद्यालय, पाचोरा २. नवीन आदर्श माध्यमिक विद्यालय, पाचोरा, ३. जय योगेश्वर माध्यमिक विद्यालय, अंमळनेर, ४. सिंधी हायस्कूल, जळगाव, ५. श्री साई समर्थ मा.वि.पथराड, ६. मा.वि.हातले, ता. चाळीसगांव, ७. मा.वि. मुंदखेडे, ता.चाळीसगाव या व अन्य शाळेच्या संस्थांनी चुकीच्या पद्धतीने सन २०१५-१६ च्या संचमान्यतेतील प्रस्तावित पदे मंजूर पदात टाकून नवीन संच मान्यता प्राप्त करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, याकरिता शिक्षणाधिकारी देवीदास महाजन यांची स्वाक्षरी स्कॅन करून प्रस्ताव शालार्थसाठी मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक येथे पाठविण्यात येणे, तसेच अशाच पद्धतीने बनावट सह्या व खोटे आवक-जावक क्रमांक असलेली प्रकरणे दाखल करण्यात येणे, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक यांना दिनांक ५.११.२०१९ च्या सुमारास विनंती करण्यात आली असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक ७.१.२०२० रोजी व दिनांक १२.२.२०२० रोजीच्या सुमारास दिलेले लेखी निवेदन, परंतु अद्यापपर्यंत या संदर्भात कोणतीच कारवाई न होणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित शासकीय अधिकारी व शाळा व्यवस्थापनावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई, प्रतिक्रिया व भूमिका. "

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) ॲड. अशोक पवार, सर्वश्री. सुनील टिंगरे, दिलीप मोहिते-पाटील, सुनील शेळके, चेतन तुपे, निलेश लंके, ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

ॲड.अशोक पवार, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्याचे लक्ष वेधले—

" ता. हवेली, जि. पुणे येथील पुणे-नगर रोडवरील पुणे शहरानजीक झपाट्याने नागरीकरण होत असलेले वाघोली गावामध्ये वाहतूक, अपुरा पाणीपुरवठा, सांडपाणी- जल निःस्सारण, घनकचरा विल्हेवाट यांसारख्या समस्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात भेडसावणे, वाघोलीतून जाणारी पुणे-नगर प्ररामा-५ (राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ) या रस्त्याचे रुंदीकरण न होणे तसेच पर्यायी मार्ग विकसित न झाल्याने वाहतुकीचा प्रचंड खोळंबा होणे, ट्रॅफीकमध्ये वाहनांना तासतास थांबावे लागणे पुणे-शिरुर अंतर हे एक तासाचे असूनसुद्धा हे अंतर कापायला अडीच तासांपेक्षा जास्त वेळ लागणे, या समस्यांवर संबंधित विभागांची बैठक विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे दिनांक ९ डिसेंबर २०१९ रोजी पार पडणे, पुणे-नगर हा रस्ता विदर्भ, मराठवाड्यासाठी जोडणारा प्रमुख महामार्ग असणे, वाघोली गाव पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) अंतर्गत येणे परंतु (PMRDA) कडून सदरच्या कामांसाठी ठोस उपाययोजना न होणे, वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पुणे-नगर रस्ता प्ररामा-५ (राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ) या रस्त्याचे रुंदीकरणाला गती देणे, तसेच या रस्त्याला वाघोली मर्यादित पर्यायी रस्ते विकसित करणे, मेट्रोच्या कामास मंजुरी देण्याबरोबरच घनकचरा व्यवस्थापन, अपुरा पाणीपुरवठ्यावर ठोस उपाययोजना होणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

नगरविकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दर्शवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १ व ३ पुढे ढकलण्यात येत आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

वित्त मंत्र्यांनी सभागृहाच्या अनुमतीने म.वि.स. नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला—

"अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २४६ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी. "

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी एकूण ३ तास इतका वेळ देण्यात येईल. या ३ तासांपैकी सत्तारुढ पक्षास निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सन्माननीय सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, आता माननीय विरोधी पक्षनेते अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला सुरुवात करतील असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला (१) श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२०

१. (अ) (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सात प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तेवीस प्रश्न वेळेभावी अतारांकित झाले.

(ब) सचिव (कार्यभार) यांनी शुक्रवार, दिनांक ६ मार्च व सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२० रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवल्या.

(क) तारांकित प्रश्नांसंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे -

सहकार मंत्र्यांनी, “आसुर्ले-पोर्ले (ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) येथील दत्त सहकार साखर कारखान्याची अवसायक असतानाही विक्री केल्याबाबत” या विषयावरील डॉ. सुजीत मिणचेकर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५८४१४ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

२. (१) उप मुख्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये वित्त विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(५) अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये अल्पसंख्याक विकास विभागाचा सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(६) अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये अल्पसंख्याक विकास विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(७) इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये बहुजन कल्याण विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(८) सांस्कृतिक कार्य राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(९) उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्र्यांनी, (अ) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ब) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(क) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल तसेच

(ड) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

(१०) उपमुख्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(११) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा सन २०१८-२०१९ या

आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(१२) आदिवासी विकास राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये आदिवासी विकास विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(१३) परिवहन मंत्र्यांनी, (अ) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल तसेच

(ब) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहनन महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(१४) महिला व बाल विकास मंत्र्यांनी, (अ) महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षांचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(ब) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये महिला व बाल विकास विभागाचा सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहायं कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(१५) पर्यावरण राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवला.

संसदीय कार्य मंत्र्यांनी, कामकाज सल्लागार समितीने केलेल्या शिफारशी सभागृहासमोर मांडल्या व त्या मंजूर कराव्यात असा प्रस्ताव मांडला.

कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले.

प्रस्ताव मतास टाकून एकमताने संमत झाला.

श्री. भारत भालके, वि.स.स. यांनी, ‘‘पीकविम्यासंदर्भात शासनाने निवेदन कपावे,’’ इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सर्वश्री राम कदम, वि.प.स. यांनी, ‘‘घाटकोपर मतदारसंघात असलेल्या नेव्ही डेपोजवळ कोरोनाच्या रुग्णांना विलगीकरणात ठेवण्यात येणे, याबाबत लोकांमध्ये असलेला असंतोष,’’ इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी, "उमदे येथे एकाच कुटुंबातल्या तिघांचा झालेला खून, याबाबत अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्याची मागणी," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

विजय रहांगडाले, वि.स.स. यांनी, "गोंदिया जिल्ह्यामध्ये एकूण ६७ रुग्णवाहिकेचे चालक संपावर असणे, शासनाने मध्यस्थी करून ही सेवा तातडीने सुरू करणे," यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

एनआरएचएममधील सर्व वाहनचालक ठेकेदारांकडे होते. वेतन न मिळाल्यामुळे ते सर्व संपावर आहेत. त्या विभागाची तातडीने एक बैठक बोलावून प्रश्न सोडविण्याचे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी, "कारमध्ये बसलेल्या महिलेचे अपहरण करून तिची हत्या गोळी झाडून झाल्याची घटना उलवे (जि. रायगड) परिसरात घडणे," इ. बाबत दिलेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनेला अनुलक्षून माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

३. पुरःस्थापनार्थ विचार, खंडशः विचार व संमत करणे -

परिवहन मंत्र्यांनी, सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक २९ - महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

४. आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुनील प्रभु, वि.स.स. यांनी, "लक्षवेधी सूचनांबाबतची ऑनलाईन सेवा बंद असणे," इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

विधिमंडळात ऑनलाईन व्यवस्था एमकेसीएल कंपनीतर्फे राबविली जाते. ती खाजगी कंपनी असून त्यांच्याकडे ऑनलाईन माहिती जाते मग ती माहिती आपल्याकडे येते. या करिता विधिमंडळाची ऑनलाईन यंत्रणा उभी करावी, अशी भूमिका असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

माहिती तंत्रज्ञान विभाग मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारित असून त्यांच्या निदर्शनास ही बाब आणण्यात येईल, असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

लक्षवेधी सूचना ऑफलाईन घ्याव्यात, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांनी, "विधान परिषदेच्या सदस्यांना दिल्याप्रमाणे विधानसभेतील सदस्यांनाही टॅब देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

विधान परिषदेमध्ये ज्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत त्या आपल्यालादेखील उपलब्ध करून दिल्या जातील. त्यासाठी आपल्याला अर्जाचा नमुना दिला आहे. तातडीने अर्ज भरून द्यावा, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. समीर कुणावार, वि.स.स. यांनी, ‘‘वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यात वाघोली व समुद्रपूर येथील एकूण १६ गावांतील शेतकऱ्यांचे गारपिटीमुळे झालेले नुकसान, हरभरा, चणा, तूर व फळबागांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करणे,’’ इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्दा अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान मांडण्याची सूचना माननीय अध्यक्षांनी केली.

५. अर्थसंकल्पावरील चर्चेला श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सुरूवात केली. (भाषण अपूर्ण)

श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, ‘‘ अर्थसंकल्पावरील चर्चेला सत्ताधारी पक्षाच्या सदस्याकडून सुरुवात व्हायला हवी होती मात्र माननीय अध्यक्षांनी विरोधी पक्षाच्या सदस्यांना दिलेली संधी,’’ इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

मात्र आज चर्चेचा शेवटचा दिवस असल्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्याकडूनच चर्चेला सुरुवात होईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(१) श्री. सुधीर मुनगंटीवार (भाषण पूर्ण) ९२) श्री. सुनील प्रभू

श्री. मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी, ‘‘ मुलुंड येथे कोरोनाचा रुग्ण आढळला असल्याच्या खोट्या वृत्तप्रकरणी चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई करणे तसेच परदेशातून येत असलेल्या विद्यार्थ्यांना १०० ते २०० डॉलर्स देऊन स्कॅनिंग टाळा असे सांगणारे व्हॉट्सअपवरील संदेशाची चौकशी करणे,’’ इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी याची नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(३) ॲड. अशोक पवार (४) श्री संग्राम थोपटे

(५) श्री. अबू आझमी (६) श्री. अतुल भातखळकर

श्री. संग्राम थोपटे, वि.स.स. यांनी, ‘‘श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी त्यांच्या भाषणामध्ये डिझेल व पेट्रोल अनुक्रमे ३ व ४ रुपयांनी स्वस्त होणे इ.बाबत उल्लेख केला असून वास्तवात ते १५ व १४ पैशांनी स्वस्त झाले असणे,’’ इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत माहिती घेऊन माननीय अध्यक्षांना अवगत करण्यात येईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(७) श्रीमती यामिनी जाधव
(८) डॉ. विनय कोरे
(९) श्री. रोहित पवार
(१०) श्रीमती माधुरी मिसाळ
(११) ॲड. आशिष जैस्वालल
(१२) श्री. अमिन पटेल
(१३) श्री. बबनराव लोणीकरर
(१४) श्री. प्रकाश फातर्फेकर
(१५) ॲड. राहुल नार्वेकर
(१६) श्री. बाबासाहेब पाटील
(१७) श्री. प्रशांत बंब
(१८) श्री. कैलास गोरंटयाल
(१९) श्री. फारुक अन्वर शाह
(२०) श्री. किशोर जोरगेवार
(२१) डॉ. राहुल आहेर
(२२) श्री. योगेश कदम
(२३) प्रा. देवयानी फरांदे
(२४) श्री. सुनील भुसारा
(२५) श्रीमती सुलभा खोडके
(२६) श्री. रईस शेख
(२७) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे
(२८) श्री. दीपक केसरकर
(२९) डॉ. किरण लहामटे
(३०) श्री. योगेश सागर
(३१) श्री. विक्रमसिंह सावंत
(३२) श्री. प्रताप अडसड
(३३) श्री. बालाजी कल्याणकर
(३४) श्री. प्रशांत ठाकूर
(३५) श्री. बळवंत वानखेडे
(३६) श्रीमती मनिषा चौधरी (भाषण अपूर्ण)

उपाध्यक्षांच्या निवडणुकीच्या कार्यक्रमासंबंधी माननीय अध्यक्षांनी घोषणा केली.

अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(३६) श्रीमती मनिषा चौधरी (भाषण पूर्ण)
(३७) श्री. राजेश एकडे
(३८) श्री. रवींद्र पाटील
(३९) श्री. उदयसिंह राजपूत
(४०) श्री. मंगलप्रभात लोढा
(४१) श्री. दीपक चव्हाण
(४२) श्री. अभिमन्यू पवार
(४३) श्री. लहू कानडे
(४४) श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या नवघरे
(४५) श्री. सहसराम कोरोटे
(४६) श्री. सिद्धार्थ शिरोळे
(४७) श्री. चंद्रकांत जाधव
(४८) श्री. टेकचंद सावरकर
(४९) ॲड. राहुल ढिकले

| | |
|---|---|
| (५०) श्री. मनोहर चंद्रिकापुरे | (५२) श्री. हिरामण खोसकर |
| (५४) श्री. सुनील राणे | (५६) श्री. संजय जगताप |
| (५८) श्री. दादाराव केचे | (५१) ॲड. राहुल कुल |
| (५३) श्री. प्रकाश आवाडे | (५५) श्रीमती सीमा हिरे |
| (५७) श्री. नरहरी झिरवाळ | (५९) श्री. कृष्णा गजबे |

**शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२०**

**१.** (अ) तारांकित प्रश्न.

(१) आठ प्रश्नांची उत्तरे देण्यात आले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री. महेंद्र दळवी व इतर, वि.स.स. यांच्या "मुंबईतील अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १५९८ चे सुधारित उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** (१) उद्योग राज्यमंत्र्यांनी, मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एक्कावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) राज्य उत्पादन शुल्क राज्यमंत्र्यांनी, "परभणी जिल्ह्यातील गंगाखेड शुगर एनर्जी लिमिटेड या कारखान्यातील गैरव्यवहार" या विषयावरील श्री. सुनील केदार, वि.स.स. यांच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

(३) गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये गृह विभागाचे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(४) ऊर्जा मंत्र्यांनी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) (स्थावर संपदा प्रकल्पांची नोंदणी, स्थावर संपदा एजंटांची नोंदणी, व्याजदर आणि संकेत स्थळावर त्याचे प्रकटन) (सुधारणा), नियम, २०१९ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक स्थासंअ-२०१८/ प्र.क्र.१०६/ दुवपु-२, दिनांकित ६ जून, २०१९ सभागृहासमोर ठेवली.

(६) सहकार राज्यमंत्र्यांनी, मुंबई एअरपोर्ट एम्प्लॉईज को.ऑप. क्रेडिट सोसायटी या नोंदणीकृत सोसायटीचे चेअरमन स्वयंघोषित असून या सोसायटीमध्ये अद्यापपावेतो निवडणूक न घेणे" या विषयावरील श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. यांच्या दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी उत्तरीत झालेल्या लक्षवेधी

सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

(७) बंदरे मंत्र्यांनी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांचे सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचे प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(८) पर्यावरण राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

माननीय अध्यक्षांनी खालील घोषणा केली.

"महाराष्ट्र विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, "चौदावी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय" या प्रकाशनासाठी आपली व्यक्तिगत माहिती तातडीने हवी आहे. अनेक सन्माननीय सदस्यांची माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली माहिती दिलेली नाही, अशा सर्व सन्माननीय सदस्यांनी आपली व्यक्तिगत माहिती विहित नमुन्यात शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० पर्यंत विधानमंडळ ग्रंथालयात द्यावी."

श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी, " महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमधून नियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांकडून नागपूर शहरातील पाणी पुरवठा बंद करण्यात येणे." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत विभागाने तातडीने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**३.** वित्त मंत्र्यांनी सन २०२० — २०२१ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सन २०२० – २०२१ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा संपली असल्याचे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

४. **ज्याअर्थी,** नागरी विमान चालन संचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी वायुयान अधिनियम, १९३४ (१९३४ चा २२) याची कलमे ५ व ७ आणि कलम ८ चे पोट कलम (२) या अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून करण्यात आलेले वायुयान नियम, १९३७ याच्या भाग अकरा मध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांस अनुसरून महाराष्ट्रात "औरंगाबाद विमानतळ, औरंगाबाद" याकरिता भारतीय विमानतळ प्राधिकरणास "विमानतळ लायसन्स-सार्वजनिक वापरार्थ" दिले आहे;

**आणि ज्याअर्थी,** औरंगाबाद येथील उक्त विमानतळाचे "छत्रपती संभाजी महाराज विमानतळ, औरंगाबाद" असे पुनर्नामकरण करणे आणि त्या प्रयोजनासाठी, असा प्रस्ताव नागरी विमानचालन मंत्रालय, भारत

सरकार यांच्याकडे पाठविण्यापूर्वी, त्यास राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळविल्यानंतर, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार यांची मान्यता मिळविणे इष्ट वाटते;

**त्याअर्थी, आता,** महाराष्ट्र विधानसभा नियम यांच्या नियम ११० अनुसार, महाराष्ट्र विधानसभा, याद्वारे, औरंगाबाद येथील उक्त विमानतळाचे "छत्रपती संभाजी महाराज विमानतळ, औरंगाबाद" असे पुनर्नामकरण करण्याची शिफारस केंद्र सरकारला करीत आहे.

मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त ठराव मांडला.

ठराव एकमताने संमत झाला.

परिवहन मंत्र्यांनी, "पश्चिम रेल्वे मार्गावरील मुंबई सेंट्रल टर्मिनस या रेल्वे स्थानकाचा नामविस्तार नाना शंकरशेट, मुंबई सेंट्रल टर्मिनस करणे." इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

श्री. अनिल बाबर, वि.स.स. यांनी, "कोरोनाच्या भीतीमुळे महाराष्ट्रातील कुक्कुटपालन व्यवसाय अडचणीत येणे." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**५.** माननीय अध्यक्षांनी, सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ए -१, ए-२, ए-३, ए- ४, ए-५, ए-६, ए-७, ए-८, ए - ८, ए-९, ए-१०, महसूल व वन विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक सी-१, सी-२, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक डी-२, डी-३, डी-४, डी-५, डी-६, डी-७, डी-८, डी-९, डी-११, नगरविकास विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एच-२, एच-३, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९, एच-११, जलसंपदा विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक आय-२, आय-३, आय-४, आय-५, आय-७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक के - १, के-३, के-४, के-५, के-६, के-७, के-८, के-९, के-१०, के -११, के-१३, ग्रामविकास विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-८, गृहनिर्माण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक क्यू-२, क्यू-३, क्यू-४, क्यू-६, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक व्ही-२, व्ही-३, व्ही-५, व्ही-६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक वाय-२, वाय-३, वाय-४, वाय-५, वाय-७, मृद व जलसंधारण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक झेडएच-२, झेडएच-४,

झेडएच-५, झेडएच-७ चर्चेला घेण्यात येतील असे सांगितले.

मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती माननीय अध्यक्षांनी विशद केली व विभागाच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी संबंधित सन्माननीय सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही सूचना मांडणार नाही, असे गृहित धरून चर्चेला आता सुरुवात होईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) ॲड. आशिष शेलार
(२) श्री. रविंद्र वायकर
(३) श्री. अमिन पटेल
(४) डॉ. संजय कुटे
(५) ॲड. अशोक पवार

**(चर्चा अपूर्ण)**

श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी, "तेलंगणा शासनाकडून महाराष्ट्र व तेलंगणा सीमेवरील सिरोंचा क्षेत्रातील मेडीगट्टा येथे मोठा धरण प्रकल्प उभारण्यात येत असून तेलंगणा शासनाकडून सदरहू प्रकल्पाचे भूमिपूजन व उद्घाटन पोलिसांमार्फत धाक दाखवून घाईघाईने करण्यात येणे. " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदरहू बाब गंभीर असून शासनाने याबाबत तातडीने लक्ष घालून कार्यवाही करावी असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

याबाबत धोरणासह उद्या निवेदन करण्यात येईल असे जलसंपदा आणि लाभक्षेत्र विकास मंत्र्यांनी सांगितले.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(६) श्री. प्रकाश आबिटकर
(७) श्री. बबनराव पाचपुते
(८) श्री. सुभाष धोटे
(९) डॉ. विनय कोरे
(१०) श्रीमती मोनिका राजळे

**(चर्चा अपूर्ण)**

श्री. राम कदम, वि.स.स. यांनी, "घाटकोपर येथील नीलकंठ विहार या इमारतीमध्ये वास्तव्यास

असलेल्या एका व्यक्तीस कोरोनाची लागण झाल्यामुळे या इमारतीत भीतीचे वातावरण निर्माण होणे, या आजाराची तपासणी करण्याची परवानगी मुंबईतील फक्त कस्तुरबा रुग्णालयाला देण्यात येणे तसेच घाटकोपर येथील नेव्ही डेपोच्या ठिकाणी इराणहून आलेल्या २०० लोकांना ठेवण्यात येणे." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(११) श्री. ज्ञानराज चौगुले
(१२) श्री. दिलीप बनकर
(१३) श्री. विकास ठाकरे
(१४) श्री. रवि राणा
(१५) श्री. रईस शेख
(१६) श्री. राम कदम
(१७) श्री. योगेश कदम
(१८) श्री. अनिल पाटील
(१९) ॲड. पराग अळवणी (भाषण अपूर्ण)

**(चर्चा अपूर्ण)**

मुख्यमंत्र्यांनी, "राज्यातील कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावासंबंधी खबरदारी घेणे." इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

ॲड. पराग अळवणी यांनी भाषण पूर्ण केले.

(२०) श्रीमती यामिनी जाधव
(२१) श्री. रोहित पवार
(२२) श्री. प्रकाश आवाडे
(२३) श्रीमती भारती लव्हेकर
(२४) श्री. किशोर पाटील
(२५) श्री. विक्रमसिंह सावंत
(२६) प्रा. देवयानी फरांदे
(२७) डॉ. तुषार राठोड
(२८) श्री. मंगेश कुडाळकर
(२९) श्री. कैलास गोरंटयाल
(३०) ॲड. आशिष जैस्वाल
(३१) श्री. राजेश पवार
(३२) श्री. संदीप धुर्वे
(३३) श्री. दिलीप लांडे
(३४) श्री. सुनिल शेळके
(३५) श्री. श्यामसुंदर शिंदे

(३६) श्री. जयकुमार गोरे
(३७) श्री. सचिन कल्याणशेट्टी
(३८) श्रीमती मनिषा चौधरी
(३९) श्री. सुहास कांदे
(४०) श्री. कैलास पाटील
(४१) श्री. शिरीष चौधरी
(४२) श्रीमती सरोज अहिरे

**(चर्चा अपूर्ण)**

श्री. सुनील प्रभू , वि.स.स. यांनी, “वीज दर परवडत नसल्याने आपल्या राज्यातील उद्योग परराज्यात स्थलांतरित होत असणे.” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनीदेखील आपले मत व्यक्त केले.

याबाबत माननीय मंत्र्यांनी सदनामध्ये वस्तुस्थितीदर्शक निवेदन करावे तसेच सरकारच्या उपाययोजना मांडाव्यात असे माननीय अध्यक्षांनी निर्देश दिले.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(४३) श्री. संजय केळकर
(४४) श्री. संजय जगताप
(४५) श्री. राजू कोरेमोरे
(४६) श्रीमती मंजुळा गावित
(४७) श्री. समीर मेघे
(४८) श्री. सहसराम कोरोटे

सामान्य प्रशासन राज्यमंत्री, वने मंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री, कृषी मंत्री, फलोत्पादन राज्यमंत्री, नगरविकास मंत्री, महसूल राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री, उद्योग राज्यमंत्री, ऊर्जा मंत्री, कामगार राज्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, गृहनिर्माण मंत्री, जलसंपदा मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, सहकार व पणन मंत्री, वस्त्रोद्योग मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, मृद् व जलसंधारण मंत्री यांनी आपापल्या संबंधित विभागांच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

माननीय अध्यक्षांनी, सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ए -१, ए-२, ए-३, ए-४, ए-५, ए-६, ए-७, ए-८, ए-८, ए-९, ए-१०, महसूल व वन विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक सी-१, सी-२, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक डी- २, डी-३, डी- ४, डी-५, डी-६, डी-७, डी-८, डी-९, डी-११, नगरविकास विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक

एच-२, एच-३, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९, एच-११, जलसंपदा विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक आय-२, आय-३, आय-४, आय-५, आय-७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक के-१, के-३, के-४, के-५, के-६, के-७, के-८, के-९, के-१०, के-११, के-१३, ग्रामविकास विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-८, गृहनिर्माण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक क्यू-२, क्यू-३, क्यू-४, क्यू-६, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक व्ही-२, व्ही-३, व्ही-५, व्ही-६, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक वाय-२, वाय-३, वाय-४, वाय- ५, वाय-७, मृद् व जलसंधारण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक झेडएच-२, झेडएच-४, झेडएच-५, झेडएच-७ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चा पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२०

१. **(१) वित्त राज्यमंत्र्यांनी,** " लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) सन २०२०-२०२१ " सभागृहाच्या पटलावर ठेवले.

**(२) उद्योग राज्यमंत्र्यांनी,** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवला.

**(३) जलसंपदा राज्यमंत्र्यांनी,** महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**(४) अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी,** हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा अनुक्रमे एकेचाळीसावा, बेचाळीसावा व त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**(५) गृहनिर्माण मंत्र्यांनी,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**(६) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्र्यांनी,** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**(७) इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्र्यांनी,** सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचे महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित (मुख्य कंपनी), शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक कल्याण विकास महामंडळ (उपकंपनी) यांचा एकत्रित वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उपकंपनीचे सन २०१६-२०१७ व २०१७ २०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**(८) उद्योग राज्यमंत्र्यांनी,** महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद नियम, २०१९ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक ॲक्युप-१११८/ सी.आर.२८७/भाग-१/ॲक्ट, दिनांकित २० सप्टेंबर, २०१९ सभागृहासमोर ठेवली.

**(९) गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी,** महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**२. सचिव (कार्यभार),** यांनी आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील बाब क्रमांक दोनच्या अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या क्रमांक १ ते १२४ या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवली.

३. **सचिव (कार्यभार),** यांनी विधानसभेने संमत केलेल्या ११ विधेयकांना विधानपरिषदेची संमती मिळाल्यासंबंधीची यादी, विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशीशिवाय परत केलेल्या ४ विधानसभा विधेयकांची यादी आणि दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या १० विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी सभागृहात वाचून दाखविली.

४. (१) प्रा. देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी, " नाशिक महापालिकेने एस बँकेमध्ये ठेवलेल्या ३२४ कोटी रूपयांसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कार्यवाही करणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. यांनी, " महाराष्ट्र विदेशी मद्य अधिनियम, १९६९ मधील नियम ९ (ए) व २ ब व महाराष्ट्र देशी दारू अधिनियम १९७३ मधील २६१ (ब) मध्ये सुधारणा करून परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती व महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'कोरडा दिवस' घोषित करणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी याबाबत नोंद घ्यावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(३) श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांनी, " मलबार हिल मतदारसंघातील ताडदेव वस्तीतील १०० जुन्या इमारतींचा पुनर्विकास " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

(४) श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी, " वरळी येथील सायन्स सेंटर या मेट्रो स्टेशनचे नामकरण पंडित जवाहरलाल नेहरू सायन्स सेंटर असे करणे " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल व वरळी येथील स्थानिक नागरिकांची मागणी विचारात घेऊन या मेट्रो स्थानकाला नेहरू सायन्स सेंटर असे नाव देण्याचे आदेश माननीय अध्यक्षांनी गृहमंत्र्यांना दिले.

(५) श्री. समीर मेघे, वि.स.स. यांनी, " नागपूरच्या मेयो रुग्णालयातून कोरोनाचे ४ संशयास्पद रूग्ण पळून जाणे " इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

गृहमंत्र्यांनी याबाबतची नोंद घेतली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(६) श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी, " नागपूर व भंडारा जिल्ह्यातील रेती उत्खननाचे काम बंद झाल्यामुळे तेथील सर्व ग्रामीण व शहरी भागातील बांधकाम व्यावसायिकांवर त्याचा परिणाम होणे " इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**माननीय गृहमंत्र्यांनी,** "महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी दोन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलाविणे " इ. बाबत सभागृहात निवेदन केले.

**माननीय अध्यक्षांनी,** आज शनिवार, दिनांक १४ मार्च २०२० रोजी स्थगन प्रस्तावाची एक सूचना प्राप्त झाली आहे, परंतु आज सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान आणि दुसरा व शेवटचा दिवस व चर्चारोध (गिलोटीन) असल्यामुळे महाराष्ट्र विधानसभा नियम २५१(२) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाही. सबब सूचनेस अनुमती नाकारत असल्याचे सांगितले.

५. पुढील विभागांच्या मागण्या चर्चेसाठी सादर करण्यात आल्या—

(१) गृह विभाग

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(५) नियोजन विभाग

(६) सार्वजनिक आरोग्य विभाग

(७) आदिवासी विकास विभाग

(८) पर्यावरण विभाग

(९) उच्च व तंत्र शिक्षण विभाग

(१०) महिला व बाल विकास विभाग

(११) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

(१२) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

मागण्या प्रस्तुत झाल्या.

माननीय अध्यक्षांनी अनुदानाकरिताच्या पुरवणी मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती विशद केली. तसेच संबंधित विभागांच्या मागण्यांचा तपशील सदस्यांना टपालखणाव्दारे वितरित करण्यात आला आहे. कपात सूचना देण्याची मुदत आज दिनांक १४ मार्च २०२० रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आलेली असल्याने मान्य कपात सूचनांची यादी स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल, असेही माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता (भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे माननीय अध्यक्षांनी सभागृहाची बैठक दुपारी०१ वाजून ०१ मिनिटांनी ३० मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून ३१ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**पाच : सन २०२०-२०२१ च्या अनुदानाकरिताच्या पुरवणी मागण्या (चर्चा पुढे सुरू)**

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता
(२) श्री. बळवंत वानखेडे
(३) श्री. अमित साटम
(४) श्री. दीपक केसरकर
(५) ॲड. आशिष शेलार
(६) श्री. बाळासाहेब आजबे
(७) श्री. जयकुमार गोरे
(८) श्री. अबू आजमी
(९) श्री. राम कदम
(१०) श्री. ज्ञानराज चौगुले
(११) प्रा.डॉ. अशोक उईके
(१२) डॉ. किरण लहामटे
(१३) श्री.मोहनराव हंबर्डे
(१४) श्री. दादाराव केचे
(१५) श्री. किशोर जोरगेवार
(१६) ॲड. आशिष जयस्वाल
(१७) श्रीमती श्वेता महाले
(१८) श्री. भरतशेठ गोगावले
(१९) श्री. कृष्णा गजबे
(२०) श्री. अनिल पाटील
(२१) श्री. नितेश राणे (भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

**(१) बंदरे मंत्र्यांनी,** " मांडवा जेट्टीजवळ बोटीला झालेला अपघात " इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये सभागृहात निवेदन केले.

**(२) ऊर्जा मंत्र्यांनी,** " कृषीपंप अर्जदारांना वीज जोडणी देणे " इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये सभागृहात निवेदन केले.

५. उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(२२) श्री. अमिन पटेल
(२३) श्री. श्यामसुंदर शिंदे
(२४) श्रीमती गीता जैन
(२५) श्री. रईस शेख(भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

श्री. राम सातपुते, वि.स.स. यांनी, " कोरोना व्हायरसच्या पार्श्वभूमीवर राज्यातील एप.पी.एस.सी. आयोगाची सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदाची पूर्वपरीक्षा तात्काळ पुढे ढकलणे " इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**(३) उद्योग मंत्र्यांनी,** "राज्यातील उद्योगांना किफायतशीर दराने वीज पुरवठा करण्यासंदर्भात अभ्यासगटाची निर्मिती करणे इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये सभागृहात निवेदन केले.

६. उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

| | |
|---|---|
| (२६) श्री. अभिमन्यू पवार | (२७) श्री. दिलीप लांडे |
| (२८) ॲड. संदिप धुर्वे | (२९) श्री. विकास ठाकरे |
| (३०) प्रा. देवयानी फरांदे | (३१) श्रीमती मंजुळा गावीत |
| (३२) श्री. सुहास कांदे | (३३) श्री. संजय सावकारे |

शालेय शिक्षण मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री, राज्य उत्पादन शुल्क मंत्री, बंदरे मंत्री, गृह मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, क्रीडा राज्य मंत्री, उप मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, आदिवासी विकास मंत्री, पर्यावरण मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री , महिला व बाल हक्क विकास मंत्री, पर्यटन व सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, रोजगार हमी मंत्री यांनी आपापल्या विभागांच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

गृह विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग, पर्यावरण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांच्या मागण्या आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबत सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त पुरवणी मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

७. माननीय अध्यक्षांनी, चर्चारोधानंतर असलेल्या वित्त विभाग, विधि व न्याय विभाग, संसदीय कार्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, अल्पसंख्याक विकास विभाग, मराठी भाषा विभाग या विभागांच्या मागण्या आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबत सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त पुरवणी मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

८. **(१) उप मुख्यमंत्र्यांनी,** " सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ३०—महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०२० मांडले आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७ खंड (१) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली असे सांगून सदर विधेयक विचारात घेण्यात यावे "असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार व श्री. देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेता) यांनी विधेयकाच्या अनुषंगाने सुधारणा मांडल्या.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण राज्य मंत्र्यांनी,** सन २०२० चे वि.स.वि.क्रमांक ३१- सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२० विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

**विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी,** " विष्णूपुरी (जि.नांदेड) येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतिगृहात सीनियर विद्यार्थिनींकडून प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींचे रॅगिंग केले जात असणे " या विषयावरील स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार सभागृहाच्या पटलावर ठेवले.

९. माननीय अध्यक्षांनी, श्री. नरहरी सीताराम झिरवाळ , वि.स.स. हे विधानसभेचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आल्याचे सभागृहात जाहीर केले. तसेच यासंदर्भातील अभिनंदनपर भाषणे करण्याची संधी सभागृहाला देत असल्याचे सांगितले.

श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री,

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता,

श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री,

श्री. बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री,

श्री. छगन भुजबळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री,

श्री. जयंत पाटील, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री

ॲड. माणिकराव कोकाटे, वि.स.स.,

ॲड.के.सी.पाडवी, आदिवासी विकास मंत्री,

श्री. दादाजी भुसे, कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.,

श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी अभिनंदनपर भाषणे केली.

माननीय उपाध्यक्षांनी आभारप्रदर्शनपर भाषण केले.

माननीय अध्यक्षांनी अभिनंदनपर भाषण केले.

**(४) सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी,** " कोरोना व्हायरसच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील शाळा, महाविद्यालय तसेच सर्व शैक्षणिक संस्था आणि अंगणवाडी बंद ठेवणे " इ. बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये सभागृहात निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) जलसंपदा मंत्र्यांनी,** " मेडीगड्डा बॅरेजमुळे महाराष्ट्राची जमीन बुडीताखाली गेल्याने व संपादित झाल्याने उद्‌भवलेल्या अडचणींबाबत सन्माननीय सदस्य श्री.धर्मरावबाबा आत्राम यांनी उपस्थित केलेला माहितीचा मुद्दा " इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये सभागृहात निवेदन केले.

**(६) नगरविकास मंत्र्यांनी,** " कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याला जोडणारा ग्रीनफिल्ड महामार्ग बांधण्याचे राज्य शासनाकडून नियोजन करणे " इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये सभागृहात निवेदन केले.

**(७) नगरविकास मंत्र्यांनी,** " कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील २७ गावांपैकी १८ गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करणे " इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये सभागृहात निवेदन केले.

**माननीय अध्यक्षांनी,** संपूर्ण जगामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावाबाबत व तत्संबंधित उपाययोजनांबाबत आपले विचार मांडले.

**माननीय अध्यक्षांनी,** मुंबई येथे सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी २०२० ते शनिवार, दिनांक १४ मार्च २०२० या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील सत्र कालावधीत झालेल्या कामकाजाचा आढावा सभागृहात वाचून दाखविला.

**माननीय अध्यक्षांनी,** " महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक २२ जून २०२० पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस माननीय राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे. " असे जाहीर केले.

**माननीय अध्यक्षांनी सत्र समाप्तीसंबंधीचा माननीय राज्यपालांचा पुढील संदेश वाचून दाखविला**
" मी, भगतसिंह कोश्यारी, महाराष्ट्राचा राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून, याव्दारे शनिवार, दिनांक १४ मार्च २०२० रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे. "

यानंतर " राष्ट्रगीत " म्हणण्यात आले.

विधानसभेचे अधिवेशन रात्रौ ०७ वाजून ४७ मिनिटांनी संस्थगित झाले.

| | |
|---|---|
| **विधान भवन,** | **राजेन्द्र भागवत,** |
| मुंबई, | सचिव (का.), |
| दिनांक १४ मार्च २०२०. | महाराष्ट्र विधानसभा. |

## विवरण क्रमांक—८

महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ (१) अन्वये सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी सभाध्यक्ष-तालिकेवर अनुक्रमे चार सदस्य नामनिर्देशित केले.

१. श्री. चिमणराव पाटील

२. श्री. संजय शिरसाट

३. श्री. धर्मराव बाबा आत्राम

४. श्री. संग्राम थोपटे

५. श्री. कालिदास कोळंबकर

# विवरण क्रमांक—९

## विविध समित्यांवर/संस्थांवर/मंडळांवर/विद्यापीठांवर सदस्यांची निवडणूक व नामनियुक्ती

काही नाही

# विवरण क्रमांक—१०

## विविध समित्यांच्या बैठका

| अ.क्र.<br>(१) | समितीचे नाव<br>(२) | बैठकीचा वार व दिनांक<br>(३) | बैठकीत झालेले कामकाज<br>(४) |
|---|---|---|---|
| (१) | कामकाज सल्लागार समिती | सोमवार,<br>दिनांक १० फेब्रुवारी २०२० | **विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२० रोजी दुपारी ०३.०० वाजता विधान भवन, कक्ष क्रमांक ०४३ (तळ मजला) मुंबई** येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने सन २०२० च्या द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशना-संबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचार-विनिमय करुन **सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी ते शुक्रवार, दिनांक २० मार्च २०२० पर्यंतचे सभागृहाचे कामकाज सोबत जोडल्याप्रमाणे असावे असे ठरविले व पुढील निर्णय घेण्यात आले :—**<br>(१) गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात येईल तसेच अभिजात मराठी भाषा या विषयावर मध्यवर्ती सभागृहात परिसंवाद व अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल.<br>(२) दिनांक ८ मार्च २०२० रोजी होणाऱ्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून "महिलांच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे व महिला सक्षमीकरण" या विषयावर गुरुवार, दिनांक ५ मार्च २०२० रोजी सभागृहात प्रस्तावाद्वारे चर्चा घेण्यात येईल.<br>(३) सन २०२०-२०२१ या वर्षाचा अर्थसंकल्प शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता सादर करण्यात |

## विवरण क्रमांक १०–चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | येईल. |
| (१) | कामकाज सल्लागार समिती | सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२० | (४) सोमवार, दिनांक ९ मार्च २०२० रोजी बैठक होणार नाही.<br>(५) गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजता महाराष्ट्र राज्याचे थोर नेते सहकार महर्षी यशवंतराव मोहिते, लोकनेते राजाराम बापू पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. रफिक झकेरिया, माजी मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबद्दलचा कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.<br>(६) कामकाज सल्लागार समितीची पुढील बैठक दि. ११ मार्च, २०२० रोजी आयोजित करण्यात येईल. |

| फेब्रुवारी, २०२० | | *प्रश्नाकरिता गट क्रमांक |
|---|---|---|
| सोमवार, दिनांक २४ | (१) अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवणे.<br>(२) सन २०१९-२० च्या पुरवणी मागण्या सादर करणे.<br>(३) सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्या सादर करणे.<br>(४) शोक प्रस्ताव. | एक |
| मंगळवार, दिनांक २५ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव | दोन |
| बुधवार, दिनांक २६ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस). | तीन |
| गुरुवार, दिनांक २७ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबत प्रस्ताव.<br>(३) राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).<br>(४) विरोधी पक्षाचा प्रस्ताव. | चार |

**द्वितीय (अर्थसंकल्पीय)**

## विवरण क्रमांक १०–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **फेब्रुवारी, २०२०** | | *प्रश्नाकरिता गट क्रमांक |
| | | | शुक्रवार, दिनांक २८ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).<br>(३) अशासकीय कामकाज (ठराव) | पाच |
| | | | शनिवार, दिनांक २९ | **सुट्टी** | |
| | | | **मार्च, २०२०** | | |
| | | | रविवार, दिनांक ०१ | **सुट्टी** | |
| | | | सोमवार, दिनांक ०२ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) सन २०१९-२०२० च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस)(चर्चारोध). | एक |
| | | | मंगळवार, दिनांक ०३ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) पुरवणी विनियोजन विधेयक.<br>(३) सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाच्या मागण्यावर चर्चा व मतदान.<br>(४) सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव. | दोन |
| | | | बुधवार, दिनांक ०४ | (१) शासकीय कामकाज<br>(२) सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षाच्या अतिरिक्त खर्चाचे विनियोजन विधेयक | तीन |
| | | | गुरुवार, दिनांक ०५ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) महिलांच्या शाश्वत विकासाची उद्दिष्टे व महिला सक्षमीकरणा-संदर्भावरील प्रस्ताव.<br>(३) विरोधी पक्षाचा प्रस्ताव. | चार |
| | | | शुक्रवार, दिनांक ०६ | **सन २०२०-२०२१ चा अर्थसंकल्प सादर करणे. (सकाळी ११.०० वाजता)** | पाच |
| | | | शनिवार, दिनांक ०७ | **सुट्टी** | |
| | | | रविवार, दिनांक ०८ | **सुट्टी** | |
| | | | सोमवार, दिनांक ०९ | **बैठक होणार नाही** | |

# विवरण क्रमांक १०–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **फेब्रुवारी, २०२०** | | *प्रश्नाकरिता गट क्रमांक |
| | | | मंगळवार, दिनांक १० | **सुट्टी (धुलीवंदन)** | |
| | | | बुधवार, दिनांक ११ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस). | तीन |
| | | | गुरुवार, दिनांक १२ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).<br>(३) विरोधी पक्षाचा प्रस्ताव. | चार |
| | | | शुक्रवार, दिनांक १३ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).<br>(३) अशासकीय कामकाज (विधेयके). | पाच |
| | | | शनिवार, दिनांक १४ | **सुट्टी** | |
| | | | रविवार, दिनांक १५ | **सुट्टी** | |
| | | | सोमवार, दिनांक १६ | (१) शासकीय कामकाज<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा दिवस). | एक |
| | | | मंगळवार, दिनांक १७ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस)<br>(३) सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव. | दोन |
| | | | बुधवार, दिनांक १८ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (चौथा दिवस) | तीन |
| | | | गुरुवार, दिनांक १९ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (पाचवा व शेवटचा दिवस) (चर्चारोध)<br>(३) विनियोजन विधेयक<br>(४) विरोधी पक्षाचा प्रस्ताव | चार |
| | | | शुक्रवार, दिनांक २० | (१) शासकीय कामकाज<br>(२) अशासकीय कामकाज (ठराव). | पाच |

**द्वितीय (अर्थसंकल्पीय)**

## विवरण क्रमांक १०—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | | बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता | **विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता विधान भवन, कक्ष क्रमांक ०४३ (तळ मजला) मुंबई** येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने सन २०२० च्या द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशना-संबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करुन **गुरुवार, दिनांक १२ मार्च ते शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२० पर्यंतचे सभागृहाचे कामकाज सोबत जोडल्याप्रमाणे असावे असे ठरविले.** |

**मार्च, २०२०**

| | |
| --- | --- |
| गुरुवार, दिनांक १२ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).<br>(३) विरोधी पक्षाचा प्रस्ताव. |
| शुक्रवार, दिनांक १३ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).<br>(३) अशासकीय कामकाज (विधेयके). |
| शनिवार, दिनांक १४ | **सुट्टी** |
| रविवार, दिनांक १५ | **सुट्टी** |
| सोमवार, दिनांक १६ | (१) शासकीय कामकाज<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा दिवस). |
| मंगळवार, दिनांक १७ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (तिसरा दिवस)<br>(३) सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव. |
| बुधवार, दिनांक १८ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (चौथा दिवस) |
| गुरुवार, दिनांक १९ | (१) शासकीय कामकाज.<br>(२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (पाचवा व शेवटचा दिवस) (चर्चारोध)<br>(३) विनियोजन विधेयक<br>(४) अंतिम आठवडा प्रस्ताव |
| शुक्रवार, दिनांक २० | (१) शासकीय कामकाज<br>(२) अशासकीय कामकाज (ठराव) |

**द्वितीय (अर्थसंकल्पीय)**

**विवरण क्रमांक १०**—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | बुधवार, दिनांक ११ मार्च २०२० रोजी सायं. ६.३० वाजता. | विधानसभा व विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची संयुक्त बैठक बुधवार, दिनांक ११ मार्च २०२० रोजी सायं. ६.३० वाजता कक्ष क्रमांक १४५, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले :—<br>(१) अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२० रोजी पूर्ण करण्यात येईल.<br>(२) शुक्रवार, दिनांक १३ मार्च व शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० या दोन दिवशी विधानसभेत अर्थसंकल्पावरील विभागवार चर्चा व मतदान घेण्यात येईल.<br>(३) विधानसभेत विभागवार चर्चा पूर्ण झाल्यावर शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी विनियोजन विधेयक मांडण्यात येईल.<br>(४) शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी विधानपरिषदेत इतर कामकाजासोबत विनियोजन विधेयक घेण्यात येईल.<br>(५) शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी शासकीय सुट्टी असली तरी विधानपरिषद व विधानसभा या दोन्ही सभागृहांची बैठक घेण्यात येईल.<br>मार्च, २०२०<br>गुरुवार, दिनांक १२ — (१) शासकीय कामकाज. (२) अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) (३) विरोधी पक्षाचा प्रस्ताव<br>शुक्रवार, दिनांक १३ — (१) शासकीय कामकाज. (२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस)<br>शनिवार, दिनांक १४ — (१) शासकीय कामकाज. (२) अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा) (चर्चारोध) (३) विनियोजन विधेयक |

# विवरण क्रमांक ११

## शासकीय विधेयकांसंबंधी सांख्यिकीय माहिती

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविण्याचा सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) (सुधारणा) विधेयक, २०२० | वित्त | श्री. अजित पवार | २५/०२/२०२० | २५/०२/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | २६/०२/२०२० | २८/०२/२०२० | | | | सन २०२० चा चा महा. अधिनियम क्र. ५ | |
| २ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० | पणन | श्री. बाळा-साहेब पाटील | २५/०२/२०२० | २५/०२/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | २६/०२/२०२० | २८/०२/२०२० | | | | सन २०२० चा चा महा. अधिनियम क्र. २ | |

## विवरण क्रमांक ११–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० | पणन | श्री. बाळा-साहेब पाटील | २५/०२/२०२० | २५/०२/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | २६/०२/२०२० | ०२/०३/२०२० | | | | सन २०२० चा चा महा. अधिनियम क्र. ३ | |
| ४ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२० | नगरविकास | श्री. एकनाथ शिंदे | २५/०२/२०२० | २५/०२/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | २६/०२/२०२० | २८/०२/२०२० | | | | सन २०२० चा चा महा. अधिनियम क्र. १ | |
| ५ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० | नगरविकास | श्री. एकनाथ शिंदे | २५/०२/२०२० | २५/०२/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | २६/०२/२०२० | २८/०२/२०२० | | | | सन २०२० चा चा महा. अधिनियम क्र. ४ | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - अन्न सुरक्षा व मानके (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० | अन्न व औषध प्रशासन | डॉ. राजेंद्र शिंगणे | २६/०२/२०२० | २६/०२/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | ०२/०३/२०२० | ०३/०३/२०२० |
| ७ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२० | ग्राम-विकास | श्री. हसन मुश्रीफ | २५/०२/२०२० | २५/०२/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | २५/०२/२०२० | २५/०३/२०२० |
| ८ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०२० | वैद्यकीय शिक्षण | श्री. अमित देशमुख | २८/०२/२०२० | २८/०२/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | ०३/०३/२०२० | १२/०३/२०२० |
| ९ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२० | वित्त विभाग | श्री. अजित पवार | ०३/०३/२०२० | ०३/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | ०३/०३/२०२० | ०३/०३/२०२० |

## विवरण क्रमांक ११–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक, २०२० | वित्त विभाग | श्री. अजित पवार | ०४/०३/२०२० | ०४/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | ०४/०३/२०२० | ०४/०३/२०२० | | | | | |
| ११ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र विनियोजन (द्वितीय अधिक खर्च) विधेयक, २०२०. | वित्त विभाग | श्री. अजित पवार | ०४/०३/२०२० | ०४/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | ०४/०२/२०२० | ०४/०३/२०२० | | | | | |
| १२ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १८ - महाराष्ट्र विनियोजन (तृतीय अधिक खर्च) विधेयक, २०२०. | वित्त विभाग | श्री. अजित पवार | ०४/०३/२०२० | ०४/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | ०४/०३/२०२० | ०४/०३/२०२० | | | | | |
| १३ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२० | सहकार | श्री. बाळा-साहेब पाटील | ०४/०३/२०२० | ०४/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | ०५/०३/२०२० | १२/०३/२०२० | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२० | ग्राम-विकास | श्री. हसन मुश्रीफ | ११/०३/२०२० | ११/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | ११/०३/२०२० | ११/०३/२०२० |
| १५ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०२० | संसदीय कार्य | श्री. अनिल परब | १२/०३/२०२० | १२/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | १२/०३/२०२० | १२/०३/२०२० |
| १६ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र पुरवणी विनियोजन विधेयक, २०२० | वित्त विभाग | श्री. अजित पवार | १४/०३/२०२० | १४/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | १४/०३/२०२० | १४/०३/२०२० |
| १७ | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२०. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | श्री. उदय सामंत | १४/०३/२०२० | १४/०३/२०२० | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | १४/०३/२०२० | १४/०३/२०२० |

## विवरण क्रमांक ११–समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ | सन २०२० चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र शाळांमध्ये मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन विधेयक, २०२०. | मराठी भाषा | श्री. सुभाष देसाई | २६/०२/२०२० | | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे (संमत) | २७/०२/२०२० | २६/०२/२०२० | | | | | |

## विवरण क्रमांक—१२

### संविधान सुधारणेच्या अनुसमर्थनाचा प्रस्ताव

निरंक

* * *

## विवरण क्रमांक—१३

### पुर:स्थापित अशासकीय विधेयके

**निरंक**

* * *

## विवरण क्रमांक—१४

### विचारात घेण्यात आलेले अशासकीय विधेयक

निरंक

* * *

# विवरण क्रमांक—१५

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२) म.वि.स. नियम १५९ (२) अन्वये अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी प्रस्ताव

| अ.क्र. (१) | म.वि.स. नियम (२) | प्रभारी सदस्य (३) | विषय (४) | चर्चेचा दिनांक (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५९ (२) अन्वये | सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२०. | सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० | — |
| २ | १५९ (२) अन्वये | सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२०. | सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० | — |
| ३ | १५९ (२) अन्वये | सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२०. | सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० | — |
| ४ | १५९ (२) अन्वये | सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२०. | सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० | — |
| ५ | १५९ (२) अन्वये | सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २०२०. | सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० | — |

# विवरण क्रमांक—१६

| १२१. | श्री.रईस शेख, वि.स.स. | महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्ह्यास्थित भिवंडी येथील महानगरपालिका अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या महानगरपालिका शाळांची झालेली दुरावस्था. | |
| १२२. | डॉ.भारती लव्हेकर, वि.स.स. | भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण मिळवणेबाबत. | |
| १२३. | श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स. | पनवेल महानगरपालिकेला उत्तम पायाभुत व मुलभूत सेवा पुरविण्यासाठी महानगरपालिकेच्या माप दंडानुसार मिळणारे चौदाव्या वित्त आयोगाचे व वस्तु सेवाकराचे अनुदान तसेच विशेष निधी तातडीने पुरविण्याबाबत. | |
| १२४. | श्री.सुरेश भोळे, वि.स.स. | जळगाव शहर स्वच्छतेचे काम महानगरपालिकेव्दारे वॉटर ग्रेस या ठेकेदारास दिले असून तो काम व्यवस्थित करत नसल्यामुळे ठेका रद्द करण्याबाबत. | |
| १२५. | श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स. | वाशिम जिल्ह्यातील (ता.मनोरा) येथील कर्जमाफीपासून वंचित झालेल्या शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत. | |
| १२६. | श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. | कांदिवली पूर्व, समता नगर , दत्तानी अपार्टमेंट मधील डान्स क्लासमधील ८ वर्षीय मुलीवर झालेल्या अत्याचाराबाबत. | |
| १२७. | श्री.संजीवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स. | वणी विधानसभा क्षेत्रामध्ये वेस्टर्न कोलफिल्डच्या अनेक माईन्स कार्यरत असून त्यात स्थानिक युवकांना कामगार म्हणून काम करण्यास प्राधान्य देण्याबाबत. | |
| १२८. | ॲड आशिष शेलार, वि.स.स. | वांद्रे (पश्चिम) येथील महाराष्ट्र नगर येथील बडी मस्जीदच्या मागील आवाम उर्दु शाळेच्या पुर्नबांधणी व जास्त वर्ग खोल्या बांधण्यासाठी महसूल विभागाने तातडीने सीटीएम नंबर व डिमार्केशन ऑफ द प्लॉट देण्याबाबत. | |
| १२९. | श्री. अबू आजमी, वि.स.स. | मानखुर्द-शिवाजीनगर के वॉर्ड १४१ येथील मतदार यादीतून काही नागरिकांची नावे गहाळ झाल्याबाबत. | |

## विवरण क्रमांक ३१

### औचित्याच्या मुद्यांवरील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

निरंक

## विवरण क्रमांक ३२

**पॉईंट ऑफ इन्फॉरमेशनच्या माध्यामातून मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार संबंधित मंत्र्यांनी केलेली निवेदने**

निरंक

# विवरण क्रमांक ३३

## अल्पकालीन चर्चा

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

निरंक

**विवरण क्रमांक-३४**

**अल्पकालीन चर्चेच्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

**काही नाही.**

## विवरण क्रमांक - ३५

## लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये )

## विवरण क्रमांक - ३५

### लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये )

**प्राप्त झालेल्या एकूण सूचना : २३३१**

**अमान्य झालेल्या सूचना : २१९४**

**मान्य झालेल्या सूचना : १३७**

| अ.क्र | थोडक्यात विषय | सदस्यांची नावे | चर्चा झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | " राज्यात गेल्या सहा वर्षांतत बलात्कार, विनयभंग, हुंडाबळी व लैंगिक छळासंबंधी १ लाख ७ हजार ४४८ गंभीर गुन्हे दाखल असणे, प्रत्यक्षात त्याचे प्रमाण दीडपट अधिक असण्याची शक्यता पोलीस अधिकारी व्यक्त करीत असणे, मौजे हिंगणघाट ( जि. वर्धा) येथे एका शिक्षिकेवर एकतर्फी प्रेमातून पेट्रोल टाकून तिला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची घडलेली घटना, तसेच अंधारी (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) गावात घरात घुसून एका ५० वर्षीय महिलेवर पेट्रोल टाकून तिला जाळण्याचा प्रयत्न केल्याची माहे फेब्रुवारी २०२० च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली घटना, या दोन्ही घटना गंभीर असून यात हिंगणघाट हल्ल्यात पिडीत युवती ४० टक्के भाजलेली असणे, तरुणीची प्रकृती गंभीर असताना तिच्यावर नागपूरमधील ऑरेंज सिटी रुग्णालयात उपचारादरम्यान दिनांक १० फेब्रुवारी, २०२० रोजी तसेच सिल्लोड येथील महिला ९५ टक्के भाजली असून तिचाही उपचारादरम्यान झालेला मृत्यू, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या | श्री. अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. प्रशांत ठाकूर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. श्रीनिवास वनगा, अशोक पवार, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मंदा म्हात्रे, सर्वश्री. राम कदम, कालीदास कोळंबकर, मिहीर कोटेचा, दिपक चव्हाण, बबनराव | दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी चर्चा झाली. |

सुमारास दुंदरे (ता.पनवेल,जि रायगड.) गावात एका ५५ वर्षीय महिलेला जाळून मारण्याचा केलेला प्रयत्न, त्यानंतर त्या महिलेस फासावर लटकवून तिची केलेली निर्घुण हत्या, दिनांक ९ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मौ.सोनवडे (ता. शिराळा., जि. सांगली येथील एका विधवा महिलेवर मौ. बिळाशी (ता. शिराळा) या गावाच्या एका नराधमाने तेथील आरळा ते सोनवडे दरम्यान असलेल्या वारणा कालवा परिसरातील देवझाडी शेतालगतच्या निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर बलात्कार केल्याचे आढळून येणे, लासलगाव (ता.निफाड जि.नाशिक) येथील एस.टी.बस स्थानक परिसरात एका ३२ वर्षीय विधवा तरुणीस दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास चार ते पाच तरुणांनी पेट्रोल ओतून पेटवून देण्याचा घडलेला प्रकार, धानला (ता.मौदा) येथील गावातील युवती अश्वीनी भाउराव ठोंबरे हीचा संशयास्पद मृत्यु होणे, हत्या करून तिचा मृतदेह गुंजेपार, जि. भंडारा या गावाच्या हद्दीत आढळून येणे, सावनेर (जि.नागपूर) येथे एका दारुड्याने नशेत महिला डॉक्टरवर ॲसीड हल्ला केल्याने डॉक्टरसह एक महिला रुग्ण व शालेय विद्यार्थीनी गंभीर जखमी झाल्याचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली घटना, परिसरातील नागरिकांनी हा प्रकार लक्षात येताच हल्लेखोराला पकडून पोलीसांच्या हवाली करणे, लोखंडवाला कॉम्प्लेक्स कांदिवली (मुंबई) येथील उच्चभ्रू वसाहतीत वास्तव्यास असणाऱ्या श्रीमती कविता शेट्टी व तीच्या पतीला प्रॉपर्टीसाठी जिवे मारण्याचा कुटुंबियांकडून गेल्या ३ वर्षांपासून होत असलेला प्रयत्न, यापूर्वी श्रीमती कविता शेट्टी यांच्या घरावर व ऑफिसवर गुंडांमार्फत झालेले हल्ले, त्यानुषंगाने श्रीमती कविता शेट्टी यांनी वेळोवेळी समता नगर पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार करूनही त्याकडे पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत श्रीमती कविता शेट्टी यांनी राज्याचे मा.गृहमंत्री, गृह राज्यमंत्री, पालकमंत्री, मुंबई उपनगर

शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री. अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. वैभव नाईक, महेंद्र थोरवे, विनोद निकोले, हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, राजेश पाटील, कुणाल पाटील, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, हिरामण खोसकर, धिरज देशमुख, विकास ठाकरे, विक्रमसिंह सावंत, मोहनराव हंबर्डे, श्रीमती प्रतिभा

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | तसेच मुंबई पोलीस आयुक्त यांना देखील निवेदनाद्वारे माहे फेब्रुवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात केलेली विनंती, या प्रकरणी होत असलेल्या दिरंगाईमुळे अजून एका निष्पाप व उच्चशिक्षित महिलेचा बळी जाण्याची निर्माण झालेली शक्यता, या प्रकरणी श्रीमती कविता शेट्टी यांनी लेखी तक्रार देऊनही कोणतीच कारवाई न करणाऱ्या दोषी असलेल्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, मिरारोड, (जि.ठाणे) येथील महिलेवर बलात्काराचा गुन्हा मागे घेण्यासाठी ज्वलनशील द्रव्य अंगावर टाकण्याची उघडकीस आलेली घटना, राज्यात " मनोधैर्य " योजनेच्या माध्यमातून पोस्को, बलात्कार, हल्ला आदी गुन्ह्यामधील पिडीतांना शासकीय मदत मिळण्याची तरतूद असणे, परंतु ज्वलनशील द्रव्य (रॉकेल, पेट्रोल, डिझेल) टाकून जीवंत जाळण्याचा प्रयत्न केल्यास पीडीतांना सदर योजनेतून शासकिय मदत मिळण्याची तरतूद त्याचा समावेश " मनोधैर्य " योजनेत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री, महिला व बालविकास, यांना वारंवार निवेदन देऊनही त्याकडे प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष, आरोपींना २१ दिवसांत कठोर शिक्षा देण्याचा आंध्र प्रदेशातील " दिशा " कायद्यासारखा कायदा राज्यात लागू करणे, तसेच प्रत्येक जिल्ह्यात महिला अत्याचारांच्या सुनावणीसाठी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. " | धानोरकर, सर्वश्री. राजु पारवे, बळवंत वानखडे, लहू कानडे, संजय जगताप, ऋतुराज पाटील, अमित झनक, सुभाष धोटे, रावसाहेब अंतापूरकर, मंगेश कुडाळकर, श्रीमती श्वेता महाले, श्री. लक्ष्मण जगताप, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री. समीर कुणावार, संतोष दानवे, सुनिल प्रभू, ज्ञानराज चौगुले, सदा सरवणकर, डॉ. बालाजी किणीकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. सुरेश वरपुडकर, चंद्रकांत जाधव, राजू आवळे, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री. गणपत गायकवाड, कुमार आयलानी, विश्वनाथ भोईर, मोहन मते, रणधीर सावरकर, शांताराम मोरे, संजय पोतनीस, महेंद्र दळवी, भरतशेठ गोगावले, राजन साळवी, प्रकाश फातर्पेकर, चंद्रकांत पाटील, अॅड. राहूल कुल, सर्वश्री किशोर पाटील, बंटी भांगडिया, डॉ. देवराव होळी, सर्वश्री कृष्णा गजबे, किशोर जोरगेवार, समिर मेघे, विजय रहांगडाले, दिलीप लांडे, सुनिल राऊत, सौ. यामिनी यशवंत | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जाधव, सर्वश्री. प्रमोद पाटील, संजय गायकवाड, डॉ संजय रायमुलकर, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, टेकचंद सावरकर, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, अनिल बाबर, महेश लांडगे, डॉ. भारती लव्हेकर, श्री. योगेश सागर, वि.स.स. | |
| (२) | “ कामथे गोवा राष्ट्रीय या मुंबई (रत्नागिरी जि. चिपळूण ता.) महामार्गालगत गोवंशांची अत्यंत निर्दयपणे हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, घटनास्थळी ठिकठिकाणी रक्ताचा सडा आणि हत्या केलेल्या गोवंशांचे अवशेष दिसून येणे तसेच याच ठिकाणी एक बैल मृतावस्थेत आढळणे, ही घटना ताजी असतानाच अवघ्या चार दिवसांत गुहागर-विजापूर या राष्ट्रीय महामार्गालगत पिंपळीविजापूर या राष्ट्रीय महामार्गालगत जि. चिपळूण ता. रत्नागिरी येथे (अशाच प्रकारे गोवंशांची हत्या करण्यात आल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी उघडकीस आल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, गतवर्षी प्रजासत्ताक दिनी म्हणजेच दिनांक २६ जानेवारी, २०१९ रोजी लोटे (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथे अशाच प्रकारे अत्यंत क्रुरपणे मोठ्या प्रमाणात गोवंशांची हत्या करण्यात आल्याचे उघडकीस येणे, असे असतानाही त्यानंतर गेल्या वर्षभरात गोवंशांची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याच्या घटना वारंवार उघडकीस येवूनही त्यांच्यावर स्थानिक पोलिसांकडून कडक कारवाई न होणे, कारवाई होत नसल्याने गोवंशांची राजरोस वाहतूक होत असल्याचे निदर्शनास येणे, लोटे (ता. खेड, जि.रत्नागिरी) येथील गतवर्षीच्या घटनेतील मुख्य सुत्रधारांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, या तपासाकडे | श्री.भास्कर जाधव, वि.स.स. | दिनांक २ मार्च, २०२० रोजी चर्चा झाली. |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह तपास अधिकाऱ्यांनी केलेले दुर्लक्ष, त्यामुळे पोलिसांच्या तपासाबाबत संशयाचे वातावरण असताना यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनाच्या आधी काही दिवस पुन्हा गोवंश हत्येच्या घटना घडल्यानंतरही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने न घेणे, कामथे येथील घटना उघडकीस आल्यानंतर २४ तास उलटले तरी एकही वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी न येणे, त्यामुळे तपासाला गती न मिळणे, यावरून हे निर्दयी कृत्य करणाऱ्यांना पोलिसच पाठिशी घालत असल्याची जनतेमध्ये निर्माण झालेली भावना, यामुळे नागरिकांच्या बैठका, आंदोलनाचे इशारे आणि त्यातून निर्माण झालेले तणावाचे वातावरण, गतवर्षी लोटे येथे घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती व हिंसाचार होऊ नये म्हणून पोलिसांनी दोन संशयितांना अटक करून त्यांस एक महिना उलटूनही या घटनेतील मुख्य सुत्रधार असलेले गुन्हेगार मोकाट असणे, अशा प्रकारची गोवंश हत्येची कृत्ये करणारी आंतरराज्य टोळी असल्याचे निष्पन्न झाले असतानाही या गुन्ह्याच्या तपासात चालढकल होत असल्याची निर्माण झालेली भावना, या गंभीर प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| (३) | “ चीनमध्ये थैमान घातलेल्या कोरोना व्हायरसने महाराष्ट्रातदेखील घातलेले थैमान, या कोरोना व्हायरसचे तीन रुग्ण पालघर,नागपूर व केरळमध्ये नुकतेच माहे जानेवारी,२०२० मध्ये वा त्या सुमारास आढळून येणे, उक्त तीनही रुग्ण हे पालघर जिल्ह्यातील वसई-विरार या भागातील असून तर एक रुग्ण नागपूर येथे | सर्वश्री. नितीन पवार, संजय पोतनीस, चंद्रकांत (दादा) पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. लक्ष्मण जगताप, सुनिल प्रभू, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, शांताराम मोरे, सदा | |

आढळून येणे, जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार कोरोना व्हायरसवर नियंत्रण मिळवण्यासाठी अजून कित्येक महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता, तसेच अँटी कोरोना लस पुढील दोन वर्षापर्यंत बनणे शक्य नसल्याचे मत व्यक्त करणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, उक्त कोरोना व्हायरसवर आळा बसण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर ठोस उपाययोजना आखण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ”

सरवणकर, रईस शेख, महेंद्र दळवी, भरतशेठ गोगावले, राजन साळवी, अबू आजमी, प्रकाश फातर्पेकर, चंद्रकांत पाटील, ॲड. राहूल कुल, सर्वश्री किशोर पाटील, बंटी भांगडिया, डॉ. देवराव होळी, सर्वश्री. किशोर जोरगेवार, विनोद अग्रवाल, संतोष दानवे, दिलीप लांडे, सुनिल राऊत, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. वैभव नाईक, महेंद्र थोरवे, ज्ञानराज चौगुले, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. विश्वनाथ भोईर, संजय गायकवाड, डॉ संजय रायमुलकर, सर्वश्री अनिल बाबर, महेश लांडगे, मोहन मते, वि.स.स.

(४) “ राज्यात सध्या २० टक्के अनुदान घेत असलेल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना प्रचलित नियमानुसार १०० टक्के वेतन अनुदान मिळावे या व अन्य प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानीत शाळा कृती समितीतर्फे कोल्हापूर जिल्ह्यातील विनाअनुदानित शाळा बंद ठेवण्याचा घेण्यात आलेला निर्णय, तसेच इयत्ता १० वी आणि १२ वी च्या बोर्ड परिक्षांवर सर्व प्रकारचा बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेत शिक्षण उप संचालक कार्यालयाबाहेर धरणे धरण्यात येणे, गेली २० वर्षे करत असलेल्या कामाचा प्रचलित नियमानुसार पगार मिळावा म्हणून राज्यातील हजारो शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वी

सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. अतुल भातखळकर, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, श्री. जयकुमार रावल, ॲड. पराग अळवणी, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. अमीन पटेल, सुभाष धोटे, पृथ्वीराज चव्हाण, विकास ठाकरे, राजु

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | १६० हून अधिक आंदोलने केलेली असणे, कर्मचाऱ्यांना आर्थिक विवंचनेतून आपला जीव गमवावा लागणे, तसेच आजमितीस पूर्ण पगार हाती न घेताच अनेक शिक्षकांना सेवानिवृत्त व्हावे लागत असणे, शासनाकडून कायम विनाअनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रचलित नियमानुसार १०० टक्के अनुदान देण्यास शासनाकडून झालेल्या दिरंगाईच्या विरोधात वारंवार आंदोलने करूनही शासन कोणतीही कार्यवाही करीत नसल्यामुळे आगामी १० वी आणि १२ वी बोर्ड परीक्षांवर बहिष्कार टाकण्याचा दिलेला इशारा, याची शासनाने दखल न घेतल्यास दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० पासून उग्र आंदोलन करण्याचाही दिलेला इशारा, विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रचलित नियमानुसार १०० टक्के अनुदान व सेवा संरक्षण देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. | पारवे, हिरामण खोसकर, अमित झनक, मोहनराव हंबर्डे, रावसाहेब अंतापूरकर, सुरेश वरपुडकर, बळवंत वानखडे, राम सातपुते, राजेश पाडवी, सचिन कल्याणशेट्टी, अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. | दिनांक ३ मार्च, २०२० रोजी चर्चा झाली. |
| (५) | “ तत्कालीन शासनाने आचारसंहिता लागू होण्यापूर्वी वॉश कोलची निविदा काढणे, ही निविदा महाजेनको स्वतः काढू शकत असतानाही एमएसएमसीच्या माध्यमातून काढण्यात येणे, एमएसएमसीनी सदर निविदेचे अनुमानित दर रुपये ११४ प्रति मेट्रीक टन याप्रमाणे ठेवणे, ज्या निविदा आल्या त्यांचे सरासरी दर रुपये प्रति मेट्रिक टन असतानाही मात्र काम देताना निविदा रुपये ३०० प्रति मेट्रीक देणे, ज्याच्यामुळे सरासरी रुपये ५ हजार कोटींचा अतिरिक्त भार राज्यातील जनतेवर पडणार असणे, तसेच हे काम देताना राज्यातील ज्या वॉशरी कंपन्या मागील ८ वर्षांपासून काम नसल्यामुळे बंद आहेत. त्यांना काम न देता सदरील काम राज्याबाहेरील कंपन्यांना देणे, त्यामुळे स्थानिक ५ हजार कुटुंबावर उपासमारीची वेळ येणे, तसेच सदर निविदा ५ वर्षे मुदत व ५ वर्षे मुदत वाढ अशी १० वर्षांसाठी | सर्वश्री. धर्मरावबाबा आत्राम, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. अमीन पटेल, कुणाल पाटील, वि.स.स. | |

काढण्यात येणे, यामुळे अतिरिक्त आर्थिक भार राज्यातील जनतेवर पडणार असतानाही शासन याप्रकरणी माहिती घेऊन या गैरव्यवहाराची चौकशीसाठी करीत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, त्यामुळे शासनाने सदर प्रकरणाची चौकशी करून कामाला स्थगिती देण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

सौ. मेघना साकोरे बोर्डीकर, सर्वश्री. कैलास घाडगे पाटील, ज्ञानराज चौगुले, श्रीमती नमिता मुंदडा, डॉ. राहूल पाटील वि.स.स.

(६) " सन १९८८ पासून वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी उर्वरित महाराष्ट्र मराठवाडा विदर्भ अशा विभागनिहायय पध्दतीने ज्या विभागातील विद्यार्थी असेल त्या विभागातील महाविद्यालयामध्ये ७० टक्के कोटा व उर्वरित २ विभागातील महाविद्यालयामध्ये ३० टक्के कोटा गुणवत्तेनुसार प्रवेश प्रक्रिया राबवली जाणे, आजदेखील वरील प्रमाणे ७० टक्के व ३० टक्के याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया पद्धत राबवली जात असणे, उपरोक्त पध्दतीनुसार फक्त महाराष्ट्र राज्यातच अशा स्वरूपाची प्रवेश प्रक्रिया राबवली जात असणे, भारतातील इतर राज्यामध्ये संपूर्ण प्रवेश क्षमतेच्या १०० टक्के प्रवेश प्रक्रिया राबवली जाणे, उर्वरित महाराष्ट्र शासकीय महाविद्यालय संख्या १५ प्रवेश क्षमता, २५३० व खाजगी महाविद्यालय १३ प्रवेश क्षमता, १६२० व मराठवाडा विभागात शासकीय महाविद्यालय संख्या ४ प्रवेश क्षमता ६०० व खाजगी महाविद्यालय संख्या २ प्रवेश क्षमता २५०, विदर्भ विभागात शासकीय महाविद्यालय ६ प्रवेश क्षमता ११५० व खाजगी महाविद्यालय २ प्रवेश क्षमता २५० अशी असणे, त्यामुळे मराठवाडा विभागातील शासकीय व खाजगी महाविद्यालय संख्या एकूण ६ प्रवेश क्षमता ६५० इतकी कमी असल्याने, या विभागातील नीट परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थांना उर्वरीत २ विभागात उच्च गुण प्राप्त होवून देखील प्रवेशापासून वंचीत राहणे. मराठवाडा विभागातील विद्यार्थी मराठवाडा विभागातच शिक्षण घेत असल्याने त्यांना अन्य दोन विभागात फक्त

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | ३० टक्के कोटयातुन प्रवेश दिला द्वजात असल्याने गुणवत्ताधारक विद्यार्थावर होत असलेला अन्याय, त्यामुळे ही ७०/३० विभागवार प्रवेश प्रक्रिया कोटा रद्द करावा अशी विद्यार्थी, पालक व स्थानिक लोकप्रतिनिधीची नेहमीची होत असलेली मागणी, मा. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमुर्तीनी सन २००६ साली ही आरक्षण प्रक्रिया असंविधानिक असल्याचा निर्वाळा दिलेला असणे, त्यामुळे कुठलाही कायदा नसताना हे अन्यायकारक आरक्षण लागू करता येत नाही असे औरंगाबाद खंडपीठाच्या न्यायमूर्तीनी दाखल असलेल्या याचिकेवर दिनांक ३ मे २०१७ रोजी आदेश दिलेला असल्याने हे असंविधानिक आरक्षण रद्द करण्यात यावे, याबाबत शासनाने तात्काळ निर्णय घेऊन वैद्यकीय अभ्यास क्रमासाठी इच्छुक असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांना न्याय देण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. " | | |
| (७) | " मराठा व कुणबी समाजाला आरक्षण देण्याचा तसेच या समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्याकरिता रार्जषि छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने सुरु करण्यात आलेल्या " सारथी " महामंडळाने मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०२० रोजी उघडकीस येणे, या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीने अहवाल सादर केल्यानंतर संस्थेचे संचालक यांनी गरज नसतांना मोठ्या प्रमाणात गाड्यांची खरेदी करणे, मानधनावर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात भरती करणे, संस्थेच्या अध्यक्षांनी दिलेला राजीनामा शासनाकडे न पाठविता संचालकांनी उक्त राजीनामा स्वतःकडेच ठेवणे, ३८१ कामगार कोणतेही काम नसतांना त्यांना फुकट वेतन देण्यात येणे, कार्यालय दुरुस्तीवर १ कोटी रुपये खर्च करण्यात येणे, २४ लाख रुपयांची | सर्वश्री. वैभव नाईक, महेंद्र थोरवे, मंगेश कुडाळकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. विश्वनाथ भोईर, संजय गायकवाड, सुनिल प्रभू, संतोष बांगर, अजय चौधरी, किशोर जोरगेवार, शांताराम मोरे, राजु आवळे, राम सातपुते, राहूल कुल, वि.स.स. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | पुस्तके खरेदी करण्यात येणे, युपीएससी स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी क्लास घेणाऱ्या २२६ मुलांसाठी ८ कोटी ७० लाख रुपये खर्च करण्यात येणे इत्यादी बाबी अहवालात उघडकीस येऊनही अद्याप संचालकांवर कोणतीच कारवाई न झाल्याने जनमानसात निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यात कोट्यवधी रुपयाचा आर्थिक व्यवहार झाला असल्याने शासनाने विनाविलंब चौकशी करून दोषींविरुद्ध करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. " | | |
| (८) | " राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची प्रतिक्षा असणे, प्रशासकीय पातळीवरील विलंबामुळे त्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागणार असल्याचे चित्र नुकतेच निदर्शनास येणे, ऑनलाईन प्रक्रियेतील गोंधळामुळे विदयार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरता आले नसणे, त्यामुळे इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले असणे, परंतू अद्यापपर्यंत इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यात जमा न होणे, त्यामुळे इतर मार्गास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिक्षणच घेऊ नये अशी परिस्थिती निर्माण होणे, शिष्यवृत्ती वाटपात उशिर होत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, इतर मागास प्रवर्गातील विदयार्थ्यांना ऑनलाईन प्रक्रियेमध्ये सुधारणा करून शिष्यवृत्ती व फ्री शिप वेळेत मिळणेसाठी उपाययोजना करून कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. " | श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. | दिनांक ४ मार्च, २०२० रोजी चर्चा झाली. |
| (९) | राष्ट्रीय पातळीवरील शरीरसौष्ठ स्पर्धेमध्ये अव्वल क्रमांक मिळविण्याच्या इर्षेपोटी वजन कमी करण्याच्या आयुर्वेदीक गोळयांची मात्रा घेतल्यानंतर ठाणे येथील २२ वर्षीय तरुणीचा मृत्यु झाला असणे, या प्रकरणी नौपाडा ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असणे, दिनांक ३० जानेवारी २०२० रोजी मुंब्रा येथील २३ वर्षीय | श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. मिहीर कोटेचा, वि.स.स. | |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | शरीरसौष्ठपटु यांचे स्टिरॉइड्सच्या अतिसेवनामुळे मृत्यु झाला असणे, ॲनाबॉलिक स्टिरॉइड्स चा गैरवापर गंभीर होऊ शकत असणे, यामुळे किडणी खराब, उच्च रक्तदाब, वाढलेले हृदय, रक्तातील कोलेस्टॅालमध्ये बदल या सर्वाचा धोका वाढत असणे, राज्यात हजारो तरुण तरुणी शरीर बनविण्यसाठी किंवा वजन कमी करण्यासाठी पूरक आहार घेत असणे, यासारख्या इतर औषधांवर बंदी असूनही ऑनलाइन मार्केटमध्ये सर्रास अशा वस्तुंची होत असलेली विक्री, तरुण पीढी लवकरात लवकर शरीर कमावण्यासाठी स्टिरॉइड्सचा मोठया प्रमाणात वापर करीत असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परीणाम होऊन काहींचा मृत्यु होत असल्यामुळे स्टिरॉइड्सवर पूर्णपणे बंदी घालण्याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. " | | |
| (१०) | " मुंबई शहर व त्यालगतच्या परिसरातील रुग्णांच्या विविध प्रकारच्या आजारांचे निदान करण्यासाठी रक्तातील सीबीसी तपासणी करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयासाठी जपानमधील परदेशी कंपनीकडून सन २००३ व २००९ मध्ये दोन मशिन्स खरेदी करण्यात येणे, तथापि गेल्या पाच वर्षापासून या मशिन्स बंद असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सध्या चालू असलेल्या तिसऱ्या मशिनवर एका महिन्याभरात सुमारे एक ते दीड लाख सीबीसी चाचण्या घेण्यात येणे, परंतु या मशिनवर घेतलेल्या चाचण्यांचे निष्कर्ष अनेकदा चुकीचे निघत असल्यामुळे रुग्णांना चाचण्या बाहेरुन करून घ्या असा सल्ला तेथील डॉक्टरांकडून देण्यात येत असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, तसेच माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये खरेदी करण्यात | ॲड. अशोक पवार, सर्वश्री दिपक चव्हाण, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सवश्री संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, | |

| | | | |
|---|---|---|---|
| | आलेली नवीन मशिन अद्यापही कार्यान्वित करण्यात न येणे, परिणामी या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करून रुग्णांना रुग्णसेवा तातडीने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. | इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. | |
| (११) | “ राज्यात बालकांवरील लैगिंक अत्याचारांबाबत १७०० ध्वनिचित्रफिती (चाइल्ड् पोर्नोग्राफी) आढळून आल्याची धक्कादायक माहिती माहे फेब्रुवारी २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस येणे, त्यात मुंबईतील ६०० प्रकरणांचा समावेश असणे, दोन महिन्यांपूर्वी ही सर्व प्रकरणे तपासासाठी एनसीआरबीकडून महाराष्ट्र सायबर विभागाकडे देण्यात आली असणे, सायबर विभागाव्दारे ऑपरेशन ब्लॅकफेस या मोहीमेद्वारे ध्वनीचित्रफिती तयार करणाऱ्या किंवा प्रसारमाध्यमांवर प्रसिध्द करणाऱ्यांचा शोध लावला जात असणे, तसेच मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबईसह राज्यभरात गुन्हे नोंदविण्यास माहे जानेवारी २०२० च्या शेवटच्या आठवड्यात झालेली सुरुवात, पुणे, रायगड, नाशिक, लातूर, कोल्हापूर, औरंगाबाद, अहमदनगर, परभणी, बीड, भंडारा, नंदूरबार, चंद्रपूर येथे एकूण २४ गुन्हे नोंदविण्यात येणे, माहे फेब्रुवारी २०२० च्या पहिल्या आठवड्यात नवी मुंबई व बेलापूर येथील दोन जणांवर माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील कलम ६७ बी अन्वये गुन्हा नोंदिवणे, राज्य महिला बाल आयोगाशी निगडीत स्वयंसेवी संस्थामार्फत मुलांचा अश्लील चित्रीकरणासाठी वापर करण्याविरोधात जनजागृती करण्याबाबत तसेच आरोपींवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. ” | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री प्रशांत ठाकूर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री अतुल भातखळकर, सुनिल प्रभू, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | दिनांक ११ मार्च, २०२० रोजी चर्चा झाली. |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (१२) | " जळगांव जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. श्री.देविदास महाजन हे या पदावर कार्यरत असतांना दिनांक १३ ऑगस्ट २०१५ ते दिनांक ३१ मे २०१९ या कालावधीत १. पी.के. विद्यालय, पाचोरा २. नविन आदर्श माध्यमिक विद्यालय, पाचोरा, ३. जय योगेश्वर माध्यमिक विद्यालय, अंमळनेर,४. सिंधी हायस्कूल, जळगांव, ५. श्री साई समर्थ मा.वि.पथराड, ६.मा.वि.हातले, ता. चाळीसगांव, ७. मा.वि. मुंदखेडे, ता. चाळीसगांव या व अन्य शाळेच्या संस्थांनी चुकीच्या पद्धतीने सन २०१५-१६ च्या संचमान्यतेतील प्रस्तावित पदे मंजूर पदात टाकून नविन संच मान्यता प्राप्त करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, याकरिता शिक्षणाधिकारी देविदास महाजन यांची स्वाक्षरी स्कॅन करून प्रस्ताव शालार्थसाठी मा.शिक्षण उप संचालक, नाशिक विभाग, नाशिक येथे पाठविण्यात येणे, तसेच अशाच पद्धतीने बनावट सह्या व खोटे आवक-जावक क्रमांक असलेली प्रकरणे दाखल करण्यात येणे, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी मा. शिक्षण उप संचालक , नाशिक यांना दिनांक ५ नोव्हेंबर २०१९ च्या सुमारास विनंती करण्यात आली असून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक ७ जानेवारी २०२० रोजी व दिनांक १२ फेब्रुवारी २०२० रोजीच्या सुमारास दिलेले लेखी निवेदन, परंतु अद्यापपर्यंत या संदर्भात कोणतीच कारवाई न होणे, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून संबधित शासकीय अधिकारी व शाळा व्यवस्थापनावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया, व भूमिका. " | सर्वश्री किशोर पाटील, नितीन पवार, हिरामण खोसकर, वि.स.स. | |

| | | | |
|---|---|---|---|
| (१३) | “ ता .हवेली जि. पुणे येथील पुणे नगर रोडवरील पुणे शहरानजिक झपाटयाने नागरीकरण होत असलेले वाघोली गावामध्ये वाहतूक, अपुरा पाणीपुरवठा, सांडपाणी-जलःनिसारण, घनकचरा विल्हेवाट यांसारख्या समस्या नागरिकांना मोठया प्रमाणात भेडसावणे, वाघोलीतून जाणारी पुणे-नगर प्ररामा-५ (राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ) या रस्त्याचे रुंदीकरण न होणे तसेच पर्यायी मार्ग विकसीत न झाल्याने वाहतुकीचा प्रचंड खोळंबा होणे, ट्राफीकमध्ये वाहनांना तास्नतास थांबावे लागणे पुणे-शिरुर अंतर हे एक तासाचे असून सुद्धा हे अंतर कापायला अडीच तासांपेक्षा जास्त वेळ लागणे, या समस्यांवर सबंधित विभागांची बैठक विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे दिनांक ०९ डिसेंबर २०१९ रोजी पार पाडणे, पुणे-नगर हा रस्ता विदर्भ, मराठवाड्यासाठी जोडणारा प्रमुख महामार्ग असणे, वाघोली गाव पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) अंतर्गत येणे परंतू (PMRDA) कडून सदरच्या कामांसाठी ठोस उपाययोजना न होणे, वाहतूक समस्या सोडविण्यासाठी पुणे-नगर रस्ता प्ररामा-५ (राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ) या रस्त्याचे रुंदीकरणाला गती देणे, तसेच या रस्त्याला वाघोली मर्यादित पर्यायी रस्ते विकसित करणे, मेट्रोच्या कामास मंजुरी देण्याबरोबरच घनकचरा व्यवस्थापन, अपुरा पाणीपुरवठयावर ठोस उपाययोजना होणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | ॲड. अशोक पवार, सर्वश्री. सुनिल टिंगरे, दिलीप मोहिते-पाटील, सुनिल शेळके, चेतन तुपे, निलेश लंके, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | |
| (१४) | “ नागपूर येथील केंद्र सरकारच्या मालकीच्या मिहान प्रकल्पाअंतर्गत १००० एकर जागा कवडीमोल भावाने रामदेव बाबाच्या पतंजली संस्थेला देण्यात येणे, गेल्या आठ महिन्यांत रामदेव बाबांच्या पतंजली संस्थेने अद्याप कसलाही प्रकल्प सुरु केला नसणे, मिहान उद्योग प्रकल्पाशी झालेल्या करारात एक वर्षाच्या आत प्रकल्पात आयुर्वेदीक औषध उत्पादन सुरु होईल असा प्रत्यक्षात करार करून रामदेव बाबांना सर्व सवलती देण्यात येणे, मात्र उद्योग सुरु होण्याची कोणतीही लक्षणे दिसून येत नसणे, रामदेव बाबांना ही जमीन हस्तांतर कराराचा भव्य | ॲड. आशिष जयस्वाल, सर्वश्री संजय रायमुलकर, संजय गायकवाड, नितीन देशमुख, नरेंद्र भोंडेकर, राजु पारवे, टेकचंद सावरकर, समिर मेघे, विकास ठाकरे, बळवंत वानखेडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. राजु पारवे, सुभाष धोटे, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, | दिनांक १४ मार्च, २०२० रोजी निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | समारंभ करण्यात आला होता त्यावेळी विदर्भातील ५००० तरुणांना रोजगाराची संधी दिली जाईल असे प्रत्यक्षात सांगण्यात आले असणे, परंतु आता १००० एकर जागा पडून असून प्रकल्पाला कसलीही सुरुवात अद्यापपर्यंत न करणे, विदर्भातील बेरोजगारांची फसवणूक करण्यात आल्याने विदर्भवासीयांमध्ये याबाबत तीव्र नाराजी पसरली असणे, रामदेव बाबाला जमीन देण्यात शासनाला काय रस होता ? हाही एक मुद्दा जनमानसातून उपस्थित केला जात असणे, रामदेव बाबा यांना कवडीमोल भाव देण्यात आलेली १००० एकर जागा राज्य शासनाने परत घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया. ” | कुमारी प्रणिती शिंदे, सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, हिरामण खोसकर, वि.स.स. | |
| (१५) | “ अमरावती महसूल विभागातील (ब्रिटिशकालीन वऱ्हाड/बेरार प्रांतातील) कोळी महादेव आदिवासी जमाती संदर्भात संशोधन उपलब्ध नाही व कोळी महादेव जमातीच्या नोंदी ह्या कोळी असू शकतात असे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचेकडून लेखी स्वरूपात माहितीच्या अधिकारात प्राप्त झाले असणे. घटनादत्त अधिकार प्राप्त होऊन सुद्धा अनेक विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे दावे अवैध ठरवून अमरावती अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती तसेच आदिवासी विभाग अनेक वर्षा पासून कोळी महादेव आदिवासी जमातीवर सतत हेतू पुरस्पर अन्याय करीत असणे. अमरावती विभागातील अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, जिल्ह्यातील म्हणजेच (ब्रिटिशकालीन बेरार प्रांतातील) कोळी महादेव आदिवासी जमाती संदर्भात बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्था, अकोला तसेच आदिवासी कोळी महादेव जमात विकास संघ अकोला या संस्थेने व इतर अनेक सामाजिक संस्थांनी | श्री. रवि राणा, वि.स.स. | कित्ता |

सखोल संशोधन करून १) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे २) आदिवासी विभाग महाराष्ट्र ३) अनुसूचित जमाती आयोग मुंबई ४) मा. महामहिम राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचेकडे व तसेच राज्याचे मा. मुख्य सचिव, मंत्रालय यांना दिनांक ०७/०१/२०२० रोजी प्रत्यक्ष भेटून अमरावती विभागातील कोळी हे आदिवासी कोळी महादेव (अनुसूचित जमात) असल्याचे अनेक निजामकालीन, ब्रिटिशकालीन ऐतिहासिक दस्तावेज निवेदना सोबत सादर करून न्यायोचित शासन निर्णय घेण्यासाठी मागणी केली असणे. सदर निवेदने देऊन ०२ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊन सुद्धा व तसेच शासनाचे मा. मुख्य सचिवांनि ०२ महिने होऊनही मागणी शासनाच्या संबंधित विभागाकडून आजतागायत कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय निर्गमित करण्यात आलेल्या नसणे हि बाब गंभीर स्वरूपाची असणे सदर जमाती संदर्भात बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्था कावसा ता. जि. अकोला यांनी ०२ वर्षा पूर्वी दिलेल्या निवेदनावर जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अमरावती यांचेकडून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी अभिप्राय मागविले असणे. बेरार कोळी महादेव आदिवासी सेवा संस्था द्रकावसा ता.जि.अकोला या संस्थेने अमरावती विभागातील कोळी हे कोळी महादेव असल्याचे १९५० पूर्वीचे अनेक ऐतिहासिक ब्रिटिशकालीन, निजामकालीन पुरावे सादर करून सुद्धा अधिकृत पुराव्यावर कोणत्याही प्रकारचे भाष्य न करता विविध प्रकारच्या न्यायालयीन याचिकांचे संदर्भ देऊन एखाद्या उमेदवाराचा जातीचा दावा तपासताना ज्या प्रमाणे दावा अवैध ठरविला जातो त्याच प्रमाणे हेतुपुरस्परपणे जाणून बुजून खोटा व चुकीचा अहवाल सदर समितीने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचेकडे सादर केला असणे. अमरावती समितीने अशा प्रकारचे चुकीचा व खोटा अहवाल सादर करून आपल्या वरिष्ठ कार्यालयाची व बेरार मधील आदिवासी कोळी महादेव जमातीची दिशाभूल केल्याचे निदर्शनास

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | येणे अमरावती समितीने खोटा व दिशाभूल करणारा अहवाल आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांना सादर केला असणे. ज्या प्रमाणे अहमदनगर, पुणे, नाशिक, रायगड, ठाणे, या जिल्ह्यातील कोळी महादेव जमातीच्या सन १९५० पूर्वीच्या नोंदी कोळी असतांना सुद्धा त्यांना जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व सर्व प्रकारच्या आदिवासींच्या सोयी सवलती दिल्या जात असणे (उदा. मा.मधुकर पिचड, कै. गोविंद गारे यांच्या जातीच्या नोंदी ह्या कोळी आहेत) त्याच प्रमाणे अमरावती विभागातील आदिवासी कोळी महादेव जमातीला सुद्धा सर्व प्रकारच्या सोयी सुविधा शासनाने देणे अपेक्षित असणे. परंतु संबंधीत विभाग दुजाभाव करत योग्य ती कार्यवाही करत नसल्याचे निदर्शनास येत असणे, शासनाने कोळी महादेव अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी सन १९५० च्या पूर्वीच्या पुराव्याच्या कागद पत्राची मागणी करू नये असे पत्र राज्याच्या सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना दिले असणे. जमातीचे प्रमाणपत्र देणारे सक्षम अधिकारी उप विभागीय अधिकारी हे जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त कार्यरत आहे म्हणून शासनाने दिलेले वरील प्रमाणे पत्र हे उप विभागीय अधिकारी यांना लागू पडत असणे. या जमाती पैकी उमेश महादेवराव ढोणे यांनी कोळी महादेव जमातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी सर्व दुर्मिळ पुराव्यासह विनंती अर्ज मा. विभागीय महसूल आयुक्त अमरावती यांचेकडे त्यांच्या स्तरावरून उप विभागीय अधिकारी दर्यापूर यांना आदेशित करण्यासाठी केला असणे. तसेच या संबंधाने लोकप्रतिनिधीम्हणून लोकसभा सदस्य व विधानसभा सदस्य यांनी अमरावती विभागातील जमातीचे प्रमाणपत्र देण्यासंबंधी ज्यांनी अर्ज केले आहे त्या विषयी मा. आयुक्त यांच्यासोबत बैठक करून निवेदन दिले असणे. विषेशतः शासनाचे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | आदिवासी विकास विभाग पत्रक क्रमांक २१२०/सं.क्र.१३८/का.१० दि. २३/०१/२०२० या पत्रान्वये अमरावती महसूल विभागातील (ब्रिटिशकालीन वऱ्हाड/बेरार प्रांतातील) कोळी महादेव आदिवासी जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी व आदिवासी विकास विभाग व यांच्या अधिनस्त असलेल्या समित्या अन्याय करत असून या संबंधाने आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी शासनाला अहवाल देण्यासंबंधी मुदतवाढ मागितली होती व ती शासनाने मान्य करून दि. १०/०१/२०२० रोजी जानेवारी २०२० अखेर सदरचा अहवाल शासनास पाठविण्याचे आदेशित केले होते या सर्व बाबी विचारात घेता जाणीवपूर्वक अनेक दुर्मिळ संदर्भ देऊन वरील संस्था अडथळे निर्माण करीत असणे. वरील प्रकरणी अमरावती महसूल विभागातील (ब्रिटिशकालीन वऱ्हाड/बेरार प्रांतातील) कोळी महादेव आदिवासी जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याची आवश्यकता व त्या संबंधाने तातडीने करावयाची कार्यवाही व या बाबत शासनाची प्रतिक्रिया. | | |
| (१६) | " मावळ मतदार संघात तसेच राज्यात स्थानिक भूमिपूत्रांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर येणे, एकट्या माझ्या मावळ मतदार संघात एकूण जमिनीपैकी कंटामेंट बोर्ड करता २९२.४८ हेक्टर क्षेत्र औद्योगिक वसाहतीकरिता ४३२.१३९४ हेक्टर राष्ट्रीय महामार्गा किंवा राज्य महामार्गाकरिता ४०७.१०१५ हेक्टर, तळेगाव डेपोकरिता ३३५.६९ हेक्टर धरणाकरिता ५४३३.२५ अशी एकूण ६८८९.६६०९ हेक्टर इतकी मोठ्या प्रमाणावर जमिनीचे भूसंपादन करण्यात आलेले असणे, आपला देश तथा राज्य हा कृषी प्रधान देश असल्याने जवळपास ७० टक्के नागरीक हे रोजगाराकरिता शेतीवर अवलंबून असणे, भूसंपादन केल्यामुळे सदर शेतकरी हे भुमीहीन होऊन बेरोजगार होणे, भुसंपादन करताना शासनामार्फत देण्यात आलेला मोबदला हा | श्री. सुनिल शेळके, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | भविष्यातील उपजिवीकेकरता पुरेसा नसणे, मावळ मतदार संघात जमिनी भुसंपादित केल्यामुळे तब्बल ५६३६ शेतकरी व त्यांचे कुटुंब भुमिहीन होणे, सदर शेतकरी भुमिहीन झाल्यामुळे त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांचा रोजगाराचा प्रश्न सतत निर्माण होत असणे, संपादित केलेल्या जमिनीमध्ये नव-नवीन कंपन्या येऊन रोजगाराची निर्मिती होत असणे, परंतु स्थानिक भुमीपुत्र उपलब्ध रोजगारापासून वंचित राहणे, वेळोवेळी शासनाकडे स्थानिक भुमीपूत्रांच्या रोजगाराकरिता ठोस भूमिका घेण्याबाबतची मागणी होणे, परंतु शासनाकडून अद्याप भूमिका स्पष्ट न होणे, यामुळे याचा प्रतिकुल परिणाम स्थानिक भूमिपूत्रांवर होणे, यामुळे स्थानिक युवकांमध्ये असंतोषाचे वातावरण व शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण होणे, याकरिता शासनाने त्वरीत स्थानिक भूमिपूत्रांना ५० टक्के आरक्षण राज्यातील इतर युवकांना ३० टक्के आरक्षण व उर्वरित २० टक्के इतरांना देण्याचे धोरण निश्चित करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| (१७) | “ राज्यात औद्योगिक क्षेत्रात विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे इ. भागांत ८० टक्के इंसेन्टीव्ह दिला असल्याचे निदर्शनास येणे, मात्र जळगाव जिल्हा या सुविधांपासून वंचित असल्याची बाब गांभीर्याने निदर्शनास येणे, एमआयडीसी क्षेत्रातील भूखंड (फॅक्ट्री) हस्तांतरीत करताना डीड ऑफ अॅग्रीमेंटच्या वेळी जागेची आजची किंमत धरणे अयोग्य असून त्यामुळे जवळपास ३ ते ४ पट किंमतीवर स्टॅम्पड्युटी आकारण्यात येते ही बाबही लघु उद्योगांना चालना देण्यास बाधाक असणे, रजिस्ट्रार ऑफ स्टॅम्पच्या कार्यालयात स्टॅम्पड्युटी व्हॅल्युएशनसाठी | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

सादर केल्यानंतर ४५ दिवसांत त्यावर कार्यवाही होणे अपेक्षित असताना ४ ते ५ महिने त्यावर कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी जळगाव जिल्ह्यातील कारखानदारांना प्रचंड आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागणे, कारखाना सुरू होण्यास विलंब झाल्याने गुंतवणूकीवरील व्याज व इतर सर्व खर्चही मोठ्या प्रमाणात वाढत असल्याची बाब निदर्शनास येणे, एस.टी.एस.टी. ग्रासमध्ये परत मिळणार की नेटमध्ये यामध्ये विहित नमूणा प्रपत्रात कोणतीही स्पष्टता नसल्याने उद्योजकांमध्ये पसरलेला संभ्रम, जळगाव जिल्ह्यातून इतर राज्यांत व परदेशात मोठ्या प्रमाणावर मालाची निर्यात होत असल्याने सी.जी.एस.टी तसेच आय.जी.एस.टी.अंतर्गत प्रोत्साहने मिळण्यासाठी कोणतीही तरतूद नसल्याची बाब निदर्शनास येणे, पीएसआय २०१३ ला नवीन पॉलिसी येईपर्यंत अथवा मार्च २०१९ पर्यंत शासनाने मुदतवाढ देण्यात आल्यानंतरही त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी महाराष्ट्रातील उद्योग आर्थिक अडचणीत येणे, दिनांक १ ऑक्टोबर २०११ पासून मुद्रांक शुल्क माफीसाठी पात्र घटकांना मुद्रांक शुल्क भरण्यास भाग पाडण्यात आले व ज्या उद्योगांना मुद्रांक शुल्क सवलत मिळाली होती त्यांना सवलतीची रक्कम व्याजासह भरण्याच्या नोटीसा शासनाकडून प्राप्त झाल्याने सर्व पात्र घटक शासनाच्या सवलतींपासून वंचित असल्याचे निदर्शनास येणे, एमआयडीसी, जळगावमध्ये भूखंड शिल्लक नसल्याने इंजिनिअरिंग किंवा पॉलिटेक्निक सारखी महाविद्यालये जळगावमध्ये उपलब्ध होऊ न शकल्याची बाब निदर्शनास येणे, जळगावमध्ये राज्यातील अन्य भागांप्रमाणे उद्योगांना वीज सवलत मिळत नसल्याने येथील उद्योग स्थलांतरीत होत असल्याची बाब निदर्शनास येणे, येथील उद्योगांना प्रोत्साहने मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, जळगावमधील रस्त्यांची दुरावस्था दूर करून औद्योगिक क्षेत्रात उद्योगांना चालना मिळण्यासाठी मुलभूत

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | सुविधा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, जळगावसाठी स्वतंत्र इंडस्ट्रीअल झोन निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| (१८) | “ रिलायन्स गॅस कंपनीने नागोठणे ते दहेज (गुजरात राज्य) (ता.पेण, जि.रायगड) पर्यंत गॅस पाईप लाईन टाकण्यासाठी जमीनी उपलब्ध करून दिलेल्या प्रकल्पबाधीत शेकडो शेतकऱ्यांना जमीन व पिकाची नुकसान भरपाई अद्यापपर्यंत दिली नसल्याची बाब दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, त्यातच सदरहू रिलायन्स कंपनीने जमीन व पिकाची नुकसान भरपाई देताना काही शेतकऱ्यांना ८० हजार रुपये प्रति गुंठा तर काहींना ५ ते ८ लाख रुपये प्रतिगुंठा भाव देण्यात येणे, सदर प्रकरणात कंपनीने भेदभाव करून चुकीचा भाव दिल्यामुळे या विरोधात शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन करून निषेध व्यक्त करणे, सदर प्रकरणी बैठक घेऊन निर्णय घेण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अद्याप यावर कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने सदरहू प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांवर झालेला अन्याय, यामुळे प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | सर्वश्री सुनिल प्रभू, दौलत दरोडा, महेंद्र थोरवे, अबू आजमी वि.स.स. | कित्ता |
| (१९) | “ चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेने कोळशाने भरलेले २४ ट्रक माहे फेब्रुवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्याच्या दरम्यान ताब्यात घेतले असून या प्रकरणात कोळशाच्या अफरातफरीचा ठोस पुरावा न मिळाल्याने अद्याप कुणावरही गुन्हा दाखल झाला नसल्याची बाब उघडकीस येणे, खनिकर्म महामंडळानेसुध्दा या कोळशाबाबत स्थानिक गुन्हे शाखेकडे खुलासा केलेला नसणे, गेल्या वर्षभरापासून संबंधित कंपन्यांच्या मागणीची महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने तपासणीच | श्री. सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अमीन पटेल, कुणाल पाटील, वि.स.स. | कित्ता |

केली नसल्याची धक्कादायक माहिती समोर येणे, वास्तविक मागणी असलेला कोळसा खाणीतून ट्रकद्वारे उचलुन तो ठराविक भूखंडावर टाकून त्याचे स्क्रिनिंग करून अनावश्यक घटक काढून उरलेला कोळसा हा ट्रकद्वारे उचलला जात असताना त्याची नोंद खनिकर्म विभागाकडे असून स्क्रिनिंग केल्यानंतर मागणी असलेल्या ठिकाणी हा कोळसा पोहचतो वा नाही, या कपंनीला नेमकी किती कोळशाची गरज आहे, याची नोंद खनीकर्म विभागाकडे असताना गेल्या ८-१० महिन्यांपासून खनिकर्म महामंडळाकडून अशी कोणतीही मागणी झालेली नसल्याने खाणीतून उचलेल्या कोळशाबाबत संभ्रमाची निर्माण झालेली स्थिती, याबबत शासनाने सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व प्रतिक्रिया. ”

(२०) “ रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर-विजापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम संथगतीने सुरु असणे, त्यामुळे दळणवळण व दैनंदिन व्यवहारांवर होणारा परिणाम, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते व इमारती प्रकल्पाकरिता दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी अंमलबजावणीचे आदेश असूनही त्याचे पालन न होणे, ठेकेदारांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाचा ठेका मिळण्यापूर्वी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या शेतकऱ्यांकडून लेखी परवानगी घेणे आवश्यक असूनही ती घेण्यात न येणे, तसेच त्यांना नुकसानभरपाई अद्याप न देणे, अशा कंत्राटदार कंपनीवर प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, परिणामी रस्ता मोठया प्रमाणात उखडला असल्याने रस्त्यावर छोटे-मोठे जीवघेणी खड्डे पडले असल्याने वाहनधारकांचे छोटे मोठे होत असलेले अपघात, यात अनेकाचा नाहक होत असलेला मृत्यू, तसेच अनेकांना कायमचे अपंगत्व येणे, तर अनेकजण गंभीर जखमी होणे, कोटयवधीच्या निधीला मंजूरी देऊनही कंत्राटदार कामाबाबत बेजबाबदारपणे वागणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, सबब, कंत्राटदार कंपनीवर व त्यांना सामील असणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. ”

सर्वश्री विक्रमसिंह सावंत, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, हिरामण खोसकर, लहू कानडे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. विकास ठाकरे, सुभाष धोटे, कुणाल पाटील, ॠतुराज पाटील, धिरज देशमुख, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. राजु पारवे, वि.स.स.

कित्ता

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (२१) | “ शासनाने भंडारा व गोंदिया जिल्ह्यात आधारभूत धान केंद्र सुरु करणे, या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या केंद्रावर त्यांचे धान विक्रिसाठी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये नेले असता धान खरेदी केंद्रावर बारदाने नसल्यामुळे शेतकऱ्यांचे धान खरेदी करण्यास दिलेला नकार, माहे डिसेंबर, २०१९ व माहे जानेवारी २०२० या कालावधीत या जिल्ह्यात पाऊस झाल्यामुळे व धान खरेदी केंद्रावर त्यांचे धान खरेदी न केल्यामुळे पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, या संदर्भात चौकशी करण्याची व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याची होत असलेली मागणी, धान खरेदी ही न्यूडल एजन्सी आपल्या सबएजन्ट्स संस्थेकडून करून घेत असल्यामुळे खुल्या बाजारात धानाचे भाव व आधारभूत किंमतीचे भाव व त्यावरील बोनस यामध्ये मोठी तफावत असल्यामुळे आधारभूत धान खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांकडून आलेले धान कमी व व्यापाऱ्यांचे धान जास्त घेण्यात येत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय, प्रत्येक तालुक्यात २ धान खरेदी केंद्र प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात यावीत अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी मा. कृषी मंत्री यांचेकडे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी लेखी स्वरुपात केली असणे, या मागणीवर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री राजू कारेमोरे, नरेंद्र भोंडेकर, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, बंटी भांगड्या, मनोहर चंद्रिकापूरे, सहसराम कोरोटे, विकास ठाकरे, बळवंत वानखेडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री राजु पारवे, सुभाष धोटे, अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री कुणाल पाटील, हिरामण खोसकर, श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. | कित्ता |
| (२२) | “ हिंगोली तालुक्यामध्ये असलेल्या २१० गावांत स्वस्त धान्य दुकानामध्ये ई-पॉस मशिनद्वारे अन्नधान्याचे वाटप न करता नियमापेक्षा जास्त धान्य वाटप करून तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांनी रेशनमाफियांना हाताशी धरून ९ हजार क्विंटलचा धान्य घोटाळा केल्याचे नुकतेच माहे जानेवारी २०२० मध्ये | श्री. संतोष बांगर, वि.स.स. | कित्ता |

उघडकीस येणे, सध्यस्थितीमध्ये रेशन अन्नधान्याची किंमत बाजारभावानुसार पावणे दोन कोटी रुपयांचा वर असणे,यापूर्वी नांदेड व परभणी जिल्ह्यामध्ये धान्य घोटाळयाचे प्रकरण गाजलेले असतांनाच हिंगोली तालुक्यामध्ये देखील स्वस्त धान्य दुकानातून वाटप करावयाचे अन्नधान्य गरजू गोरगरीब नागरिकांपर्यंत न पोहचवता दलालांनी डल्ला मारल्याचा घडलेला प्रकार, गेल्या आठ ते दहा महिन्यांपासून ई-पॉस मशीनद्वारे अन्नधान्य वाटप न करता ९ हजार क्विंटलच्या वर अन्नधान्य काळया बाजारात विक्रीला गेल्याचे वर्तविण्यात येत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गोंधळ व गैरव्यवहार थांबविण्याबाबत करावयाची ठोस कार्यवाही व यास जबाबदार असणाऱ्याविरुध्द तातडीने करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ”

(२३) “ तारापूर, (जि. पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील ए.एन.के. फार्मा कंपनीत दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजी झालेल्या महाशक्तीशाली स्फोटात ७ जण गंभीररीत्या जखमी होऊन ८ जणांचा झालेला मृत्यू, तसेच अन्य ३ कंपन्यांसह करोडो रुपयांचे झालेले नुकसान, तसेच दिनांक ०४ फेब्रुवारी २०२० रोजी सायंकाळी ५.१५ च्या सुमारास तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्र. टी-१०१ हर्शुल केमिकल्स प्रा.लि./श्री. साई एन्टरप्रायजेस या जनरल पर्पज थिनर उत्पादन घेणाऱ्या कारखान्याला भीषण आग लागून दोन कामगार गंभीररित्या जखमी होणे, सदर कारखान्यांना आगी लागल्यामुळे पालघर जिल्ह्यासह राज्याला हादरवून सोडणाऱ्या या स्फोटामुळे तारापूर एम.आय.डी.सी. येथील रासायनिक कारखाने बॉम्बपेक्षाही घातक असल्याचे सिद्ध झालेले असणे, गेल्या २ वर्षामध्ये या ठिकाणी घडलेल्या भीषण स्फोटांमध्ये आणि वायुगळतीमुळे २१ जणांचा

सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री अतुल भातखळकर, संजय केळकर, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री राम कदम, अभिमन्यु पवार, दिपक चव्हाण, अशोक पवार, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप

कित्ता

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | तडफडून मृत्यू होणे तसेच अन्य १५ कामगार कायमचे जायबंदी झालेले असणे, तारापूर एम.आय.डी.सी. ही सर्वाधिक प्रदूषण ओकणारी देशातील पहिल्या क्रमांकाची एम.आय.डी.सी. असून या एम.आय.डी.सी. मुळे तब्बल ९४ टक्के पर्यावरण घातक झाले असून फक्त ६ टक्के इतकीच शुद्ध हवा आणि पाणी उरलेले असणे, याबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्याकडे लक्ष वेधूनही शासनाचे झालेले दुर्लक्ष, तसेच सदर स्फोटांमुळे व आगीमुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना तात्काळ योग्य ती आर्थिक मदत देण्याची तसेच सदरहू तारापूर औद्योगिक वसाहतीतील कारखान्यातील कामगारांना केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने सन २०१५ मध्ये रासायनिक कारखान्यांमुळे निर्माण होणारे धोके लक्षात घेऊन कारखान्यांनी घ्यावयाची खबरदारी व उपाययोजना तसेच उद्‌भवणाऱ्या अपघातातून सहाय्य करण्यासाठी आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांची कठोरपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. ” | क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री. अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, श्री. मंगेश कुडाळकर, डॉ. भारती लव्हेकर, श्री. कालीदास कोळंबकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, संजय पोतनीस, चंद्रकांत पाटील, महेंद्र दळवी, किशोर पाटील, प्रमोद पाटील, भरतशेठ गोगावले, दिलीप लांडे, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, | |

ॠतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, अमित झनक, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखेडे, राजु पारवे, राजु आवळे, संजय रायमुलकर, वि.स.स.

(२४) “ राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरिक्षक ( गट-ब) यांच्या बदल्याबाबत अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. १५६/ कार्या-१२, मंत्रालय, मुंबई दिनांक २८ एप्रिल, २०१५ आणि अधिसूचना क्रमांक एसआरव्ही -२०१७/ प्र.क्र. ११४/ कार्या-१२ मंत्रालय,मुंबई दिनांक १५ जून, २०१७ अन्वये खात्यांतर्गत दुयम निरिक्षक पदावरून निरिक्षक पदावर पदोन्नती देताना शासनाच्या वरील दोन्ही अधिसूचनांचे तंतोतत पालन करण्यात येत असून त्या अनुषंगाने नागपूर, अमरावती, औरंगाबाद या महसूल विभागातील मंजूर पदापैकी ८० टक्के पदे भरण्यात येणे, वरील दोन्ही अधिसूचनाचे पालन हे फक्त पदोन्नती देते वेळीच केले जाणे, मात्र वरील अधिसूचनांमध्ये नमूद असतांनाही निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांच्या बदल्यांबाबत सदर अधिसूचनांना केरारची टोपली दाखविण्यात येणे, एका संवर्गात सहा वर्षापेक्षा जास्त काळ कोणत्याही वर्ग-२ च्या अधिकाऱ्यास थांबता येणार नसल्याची बाब स्पष्ट नमूद असतांनाही विशेष करून कोकण-२ विभागात असणारे अधिकारी गेल्या दहा वर्षापासून त्याच संवर्गात कार्यरत असल्याने त्यांचे व मद्यविक्रेत्यांचे संबंध घनिष्ठ होऊन त्याचा महसुलावर निश्चितच परिणाम होणे, सद्यःस्थितीत कोकण-२ संवर्गात कार्यरत असणारे निरिक्षक हे जास्तीत जास्त उप अधीक्षक पदावर पदोन्नतीस पात्र असतांना देखिल संबंधित अधिकारी कोकण-२ हा संवर्ग सोडून इतर

श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील, कित्ता वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | संवर्गात जाणेस इच्छुक नसल्याने सर्रास पदोन्नती नाकारणे, यामध्ये नक्कीच त्यांचा आर्थिक फायदा असल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच कोकण-२ संवर्गात एकही अकार्यकारी पद नसल्याने संबधित अधिकारी गेल्या १० ते १२ वर्षांपासून कार्यकारी पदावरच काम करत असल्याने महाराष्ट्रातील इतर अधिकाऱ्यांवर वर्षानुवर्षे अकार्यकारी पदावर काम करण्याची वेळ येणे, वरील दोन्ही अधिसूचनांचा फक्त पदोन्नतीकरिताच नव्हे तर बदली करतांनाही तंतोतंत पालन झाल्यास सर्व अधिकाऱ्यांना समान कामाची संधी प्राप्त होईल व अधिकाऱ्यांवर अन्याय होणार नाही, तसेच पदोन्नती नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांची देखील इतर संवर्गात अकार्यकारी पदावर बदली केल्यास पदोन्नती नाकारणे अधिकारी देखील पदोन्नती स्विकारतील आणि शासनाच्या महसुलात प्रचंड वाढ होईल व पदोन्नतीकरिता वारंवार होणारा शासनाचा वेळ व खर्च सत्कारणी लागणे, याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभगातील ( गट-ब ) या पदाच्या सन १९९८ च्या तुकडीतील मुंबई कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या १० वर्ष बदली न होण्यामागे व पदोन्नती न घेण्याच्या मागे राजकीय वरदहस्त असल्याचा संशय, संबंधित अधिकाऱ्यांचे बदली न होणे व पदोन्नती न घेणे याच्या मागची कारणे याबाबत शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिकिया व भूमिका. ” | | |
| (२५) | “ वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यामधून वाहणाऱ्या पैनगंगा नदीवरील अस्तित्वात असलेली को.प.बंधारे ही २५-३० वर्षे जुनी झाल्यामुळे त्यात पूर्ण प्रमाणात पाणी साठा न होणे, त्या बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात लिकीजेस | श्री. अमित झनक, वि.स.स. | कित्ता |

असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होणे, वाशिम जिल्हा हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यापैकी जिल्हा असून वाशिम जिल्हा हा मा. राज्यपाल महोदयांनी निर्धारित केलेल्या सिंचनाच्या अनुशेषा अंतर्गत समाविष्ट असणे, वाशिम जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी पैनगंगा नदीवरील को. प. बंधाऱ्यांचे बॅरेजेस मध्ये रुपांतर करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींची व शेतकऱ्यांची सततची मागणी असणे, दिनांक ८ फेब्रवारी २०१० रोजी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये प्रायोगिक तत्वावर दोन को.प. बंधाऱ्यांचे बॅरेज मध्ये रुपांतर करण्यासंदर्भात मा. मंत्री महोदयांनी निर्देश देणे, त्याचप्रमाणे डिसेंबर, २०१९ मध्ये नागपूर अधिवेशना दरम्यान मा. मुख्यमंत्री महोदयांनी वाशिम जिल्ह्याच्या आढावा बैठकीत बॅरेजमध्ये प्रस्ताव तयार करण्याचे आदेश देणे. जलसंपदा विभागाचे दिनांक २८ नोव्हेंबर २०११ च्या आदेशान्वये उर्ध्व पैनगंगा पाणलोट क्षेत्रातील वाशिम जिल्ह्यातील भविष्यकालीन योजनासाठी ८७.८४६३ दृ.ल.घ.मी पाणी उपलब्ध करून देणे त्यातील ७३.०० दृ.ल.घ.मी पाण्याचा वापर वाशिम जिल्ह्यासाठी होणे.या पाणलोट क्षेत्रातील रिसोड तालुक्यातील २.७४४ दृ.ल.घ.मी क्षमतेची कळमचव्हाण ल.पा. योजना रदद करणे.बुलडाणा जिल्ह्यातील कोराडी व पेनटाकळी प्रकल्पाच्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात कॅनाल द्वारे सिंचनाची सोय असणे परंतू उपरोक्त दोन्ही प्रकल्पाचे कोणतेही कॅनाल रिसोड तालुक्यात न होणे त्यापासुन सिंचन उपलब्ध न होणे, या दोन्ही प्रकल्पामधुन वाशिम जिल्ह्याचे सिंचन होत नसल्यामुळे कोराडी व पेनटाकळी प्रकल्पामधुन ५.७१ द.ल.घ.मी पाणी बुलडाणा जिल्ह्याच्या सिमेवरुन वाशिम जिल्ह्याला उपलब्ध करून देणेबाबतचे आदेश होणे अस्तित्वात असलेल्या को.प बंधाऱ्याचे मुळपाणी यांचा समन्वय करून रिसोड तालुक्यातील तीन को. प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्यासाठी पाणी उपलब्ध करून देऊन प्राधान्यतेने मान्यता देणेबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही. ”

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (२६) | " चासकमान प्रकल्पाच्या (ता. राजगुरुनगर जि.पुणे) डाव्या कालव्याचा लाभ शिरुर व खेड तालुक्यातील शेतकऱ्यांना होणे, चासकमान प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची लांबी १४४ किमी असणे, एकूण लांबीपैकी फक्त १५ किमी लांबीचे अस्तरीकरणाचे काम पूर्ण झालेले असणे, डाव्या कालव्याला अनेक ठिकाणी गळतीचे मोठे प्रमाण असल्याने राजगुरुनगर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक होण्याच्या मार्गावर असणे, डाव्या कालव्याच्या शिरुर तालुक्यातील डी.वाय १२ ते डी.वाय २४ दरम्यान अनेक ठिकाणी कालवा विमोचक व त्याच्या पोटचाऱ्यांची कामे अपूर्ण असल्याने शेतकरी पाण्यापासून वंचित राहणे, गेली १० वर्षापासून सदर प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता नसणे, अपूर्ण कामे पूर्ण झाल्यास शिरुर तालुक्यातील सुमारे २७ गावांमधील १० हजार हेक्टर क्षेत्र नव्याने ओलिताखाली येणार असल्याने, प्रकल्पांच्या नवीन कामांना मंजूरी मिळत नसणे, धरणामध्ये पाणी उपलब्ध असूनही लहान-मोठी कामे निधी अभावी राहिल्यामुळे त्याचा लाभ शेतकर्यांना न मिळणे, कालव्याचे अस्तरीकरणाचे कामही बर्यातच मोठ्या प्रमाणात अपूर्ण असल्याने पाणी गळती होऊन शेवटच्या टोकापर्यंत कमी दाबाने पाणी जाणे, शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदलाही अद्याप मिळालेला नसणे, तसेच डिंबा कालव्याच्या अपूर्ण कामांमुळे शिरुर तालुक्यातील निमगांव भोगी गावाच्या पुढे गोलेगांव या गावापर्यंत कालव्याचे पाणी न पोहचणे, यामुळे शेतकर्यांची डिंबा कालव्याची अपूर्ण कामे पूर्ण होणेसाठी वारंवार मागणी होणे तसेच चासकमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामासाठी खास बाब म्हणून निधी उपलब्ध होणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. " | ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनिल टिंगरे, दिलीप मोहिते-पाटील, सुनिल शेळके, चेतन तुपे, निलेश लंके, वि.स.स. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| (२७) | “ निम्न तापी प्रकल्प हा मोठा प्रकल्प तापी नदीवर अमळनेर तालुक्यातील मौजे पाडळसे गावाजवळ निधी अभावी बांधकामाधीन अवस्थेत असणे, निम्न तापी प्रकल्पाचा टप्पा-१ नुसार पाणीसाठा २६२.५८ दलघमी एवढा असून उपयुक्त पाणीसाठा २४९.६१ दलघमी असणे, त्याअनुषंगाने निम्न तापी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एकूण २३९७.६० हेक्टर जमिन जात असून ५ गावे पूर्णतः व ६ गावे अंशतः बाधित होणे, तृत्तीय सुधारीत प्रकल्प अहवालानुसार टप्पा-१ नुसार जळगांव व धुळे जिल्ह्यातील अमळनेर, चोपडा, पारोळा, धरणगाव, शिंदखेडा व धुळे या तालुक्यातील एकूण ३२३२८ हेक्टर क्षेत्र उपसा सिंचन पद्धतीने सिंचीत करण्याचे नियोजन असणे, शासनाचे दिनांक ०९ सप्टेंबर २०१९ च्या पत्रान्वये PMKSY व BJSY या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून उर्वरित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रु. १५००० कोटीचे दिर्घ मुदतीचे कर्ज घेण्यास मान्यता प्राप्त झालेली असून सदर नमूद प्रकल्पांपैकी निम्न तापी प्रकल्पास रु. १५०० कोटीची तरतूद करण्यात आलेली असणे, त्याअनुषंगाने कार्यवाही होणे, उर्वरित स्थापत्य कामे, वक्राकार दरवाजे, उर्वरित भूसंपादन, पुनर्वसन कामे व उपसा सिंचन योजना कामे करणे प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने अतिमहत्वाचे असणे, साने गुरुजी सहकारी उपसा सिंचन योजना, बोहरा, ता.अमळनेर ची दुरुस्ती विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता दिनांक २५ जून २०१९ अन्वये प्राप्त असणे व निधी उपलब्ध होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | श्री. अनिल पाटील, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (२८) | “ भंडारा विधानसभा (ता.जि.भंडारा) क्षेत्रातील भंडारा व पवनी तालुक्यातील अंशतः बाधित ३४ गावातील नागरिकांचे पुनर्वसन न करता, वाढीव कुटुंब आर्थिक मोबदल्यापासून वंचित असणे त्यांना योग्य तो मोबदला देणे, कुटुंबाचे पुनर्वसन करून त्यांना नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम २.९० लक्ष रुपये अंदाजे ५०० कुटुंबांना देणे अत्यावश्यक असणे गेल्या अनेक वर्षांपासून शेकडो कुटुंबांना शासनाने प्रकल्पग्रस्तांना जमिनीच्या मोबदल्यात नोकरी देण्याचे आमिष देणे, नोकरी देण्यास शासन अपयशी ठरणे परंतु अद्यापही त्यांना नोकरी न मिळणे , अश्या कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी देण्याची शासनाची तरतूद असणे परंतु नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम २.९० लक्ष रुपये देण्याचे शासन निर्णय आर.पी.ए.-०२१०/प्र.क्र ६९ (भाग-२)का -र-१ दि.१८.०६.२०१३ नुसार व शासन निर्णय घेणे ,सदर सुधारित शासन निर्णय महसूल व वन विभाग आर.पी.ए.-२०१५/प्र.क्र ९९ र-१ दि.१९.०८.२०१५ नुसार निर्णय होऊनही लाभापासून वंचित असणे, आर्थिक मदत देणे संदर्भात शासन स्तरावर निर्णय न होणे, वर्षोगिणती मोबदला मिळण्यास विलंब झाल्याने एकमुस्त रकमेमध्ये वाढीव मोबदल्याची बाधित कुटुंबाची मागणी करणे, वाढीव मोबदल्यासाठी जिल्हाधिकारी भंडारा, उपायुक्त (पुनर्वसन) नागपूर यांचे मार्फत जा.क्र.अका/पुनर्वसन/कावि/१५७/२०१८ दि.२३/१०/२०१८ रोजी अप्पर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन महसूल विभागाच्या र-१ कार्यासन प्र.क्र.२५६/२०१८ यांकडे प्रस्ताव सादर करणे त्यावर अद्यापही कार्यवाही न होणे, प्रकरण प्रलंबित असणे अथवा शासन स्तरावर कोणताही धोरणात्मक निर्णय न होणे त्यामुळे गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त अंशतः बाधित कुटुंबाची मागणी याप्रकरणी कुटुंबामध्ये शासनाप्रती तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| (२९) | “ ता.जत, जि.सांगली येथील ६४ गावे अद्यापही पाण्यापासून वंचित राहिल्याने शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही शासन याकडे करीत असलेले दुर्लक्ष, या ६४ गावांकरिता तुबची बबलेश्वर पाण्याची योजना सुरु करण्याची येथील नागरीकांनी व मा.लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेले मागणी, वेळेवर पाणी पुरवठा होत नसल्याने येथील नागरीक व शेतकरी यांना पाणी मिळण्यापासून शासनाने वंचित ठेवणे, शासनाने सदर तालुका दुष्काळी म्हणून घोषित करण्याची आवश्यकता असणे, राजस्थान राज्यापेक्षाही भयावह परिस्थिती असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, वैफल्यग्रस्त असलेल्या शेतकरी व त्यांच्या कुटुंबियांकडून आत्महत्येचा मार्ग स्वीकारण्याची निर्माण झालेली स्थिती, तुबची बबलेश्वर योजनेकरिता आवश्यक असलेला ७०० ते ९०० कोटी रुपयाचा निधी मंजूर करणे आवश्यक असणे, सदरहू योजना पूर्णत्वास आल्यास मोठया प्रमाणात पाण्यापासून वंचित असलेला नागरीक व शेतकरी यांना त्याचा लाभ मिळू शकेल, परिणाम याबाबत शासनाने दुष्काळग्रस्त असलेल्या जत तालुकयासाठी पाणीपुरवठा होण्यासाठी तुबची बबलेश्वर या योजनेसाठी ७०० ते ८०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया. ” | सर्वश्री. विक्रमसिंह सावंत, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, हिरामण खोसकर, लहू कानडे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. विकास ठाकरे, सुभाष धोटे, कुणाल पाटील, ऋतुराज पाटील, धिरज देशमुख, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. राजु पारवे, वि.स.स. | कित्ता |
| (३०) | “ बुलढाणा जिल्ह्यातील खारपाण पट्यासाठी वरदान ठरणाऱ्या महत्वकांक्षी जिगाव प्रकल्पाला निधीच मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, खारपाण पट्ट्यात सिंचनाची सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने तापी नदी खोऱ्यातील पूर्णा नदीवर जिगाव प्रकल्प मंजूर करूनन सन १९९६ मध्ये सुरु करण्यात आलेले प्रकल्पाचे काम निधीच्या उपलब्धतेअभावी तब्बल २२ वर्षापासून रखडलेले | श्री. राजेश एकडे, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | असणे, सुमारे ३९४.८३ कोटी मूळ किंमत असलेला जिगाव प्रकल्प द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर ४०४४.१४ कोटींवर पोहोचलेला असणे, केंद्रीय जल आयोगाने त्याच्या ७७६४.३९ कोटींच्या किमतीला मान्यता दिलेली असणे, मात्र भूसंपादनाच्या नवीन कायद्यामुळे या प्रकल्पाची किंमत वाढून आजमितीस प्रकल्पाची अद्यावत किंमत तब्बल १३,८७४.५९ कोटींवर गेलेली असणे, प्रकल्पावर माहे मार्च २०१९ पर्यंत ३६५२.९३ कोटी रुपये खर्च होऊन केवळ ५० टक्केच काम पूर्ण झालेले असणे, " आधी पुनर्वसन मगच धरण " मागणीनुसार अजूनही ७५ टक्के गावांचे पुनर्वसन होणे बाकी असणे, प्रसिद्ध झालेल्या कलम ११ मुळे सन २००० नंतर प्रकल्पग्रस्तांनी जिगावच्या विरोधात ओरड सुरू करून विद्यमान बाजार भावाचा लाभ मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी न्यायालयीन दरवाजे ठोठावलेले असणे, सन २००७ मध्ये सरळ खरेदीने काही शेतकऱ्यांनी जमिनी दिल्याने सन २००८ मध्ये प्रकल्पाचे काम सुरू झाले असणे, मात्र वीस वर्षांपासून बुडीत शेतजमीन व घरांवर, खरेदी -विक्री, वाटणीपत्र यावर शासनाचे निर्बंध असल्याने भूसंपादन व पुनर्वसनाचे काम संथगतीने सुरु असणे, जिगाव प्रकल्पासाठी लागणाऱ्या एकूण १५९१४.१३ हेक्टर जमीनीपैकी वन विभागाची १०५५.६४ हेक्टर जमीन आधीच संपादित करण्यात आलेली असणे, मात्र खासगी स्वरुपातील भुसंपादन अत्यंत संथगतीने पुढे सरकत असल्याने व बाधित क्षेत्रातील लोकसंख्या वाढल्याने तसेच दोषपूर्ण भूसंपादन पद्धतीमुळे पुनर्वसनाला अडचणी येत असणे, अशाप्रकारे उदभवणाऱ्या अडथळयांवर मात करत जिगाव प्रकल्पाच्या उर्वरित कामांसाठी जवळपास ९९७७.८४ कोटी रुपये निधीची सक्त आवश्यकता असणे, राज्य | | |

शासनाने निधीची चणचण दूर करण्यासाठी व केंद्राकडून निधी खेचून आणता यावा यासाठी बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत राज्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून १३,६५१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आलेला असणे, यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव या मोठ्या प्रकल्पासह आठ लघु प्रकल्पांचा समावेश करण्यात येऊन माजी मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक १८ डिसेंबर २०१७ रोजी जाहीर सोहळ्याच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात निधीची करण्यात आलेली घोषणा, केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या निधीपैकी केंद्र शासनाकडून ३८३० कोटी तर उर्वरित ९८२० कोटी निधी नाबार्डकडून कर्ज स्वरुपात घेण्यात येऊन हा प्रकल्प माहे मे २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य असल्याचे देखील केंद्रीय मंत्र्यांनी दिनांक १८ जुलै २०१८ रोजी जाहीर केलेले असणे, मात्र या घोषणेला जवळपास दोन वर्ष होऊनही अद्यापपर्यंत निधी प्राप्त न होणे, बळीराजा जलसंजीवनी योजनेतून केंद्र शासनाकडूनन निधी मिळणार असल्याने राज्य शासनाने देखील या प्रकल्पाच्या निधीला कात्री लावून सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात ३४८ कोटींचीच तरतूद केलेली असणे, वर्षाला दोन हजार कोटी रुपयांची आवश्यकता असताना यंदा ३५६ कोटी रुपयेच मिळालेले असणे, या सर्व बाबींमुळे सदर प्रकल्पाचे रखडलेले काम, भूसंपादन प्रकरणांना मुदतवाढ दिल्यानंतरही ती पूर्णत्वास जाऊ शकलेली नसणे, परिणामी भूसंपादन प्रकरणांना नव्याने मुदतवाढ देऊन त्या विहित मुदतीत निधी उपलब्ध करून देऊन भूसंपादन प्रक्रिया पूर्णत्वास नेण्याची आवश्यकता असणे, लवकर निधी प्राप्त न झाल्यास भूसंपादन प्रक्रिया पुन्हा सुरुवातीपासून करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवण्याची निर्माण झालेली स्थिती, मात्र बुलढाणा

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | जिल्ह्यातील विशेषतः नांदुरा तालुक्यातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी हा प्रकल्प पूर्ण होणे गरजेचे असणे, या प्रकल्पाचा संकल्पित एकूण जलसाठा ७३६.५८ व पाणी वापर ५८.५४८.द २३. ल उपसा सिंचन योजनेद्वारे सुमारे १५ असणे तर मी.घ. १,१६,७७० हेक्टर लागवडीलायक क्षेत्रात (CCA) सिंचन होऊन जिल्ह्याची पाणीसाठवण क्षमता ही जवळपास ३६ टीएमसी च्या आसपास पोहोचणार असणे, बुलढाणा जिल्ह्यातील ६ तालुक्यातील २६८ गावांना व अकोला जिल्ह्यातील २ तालुक्यातील १९ गावांना असे दोन्ही जिल्हे मिळून एकूण २८७ गावांना सिंचनाचा लाभ होणार असणे तर प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या १२० गावांपैकी सुमारे ३२ गावे पूर्णतः बाधित तर १५ गावे अंशतः आणि ७३ गावांची अंशतः जमीन बाधीत होणार असणे, जिगाव प्रकल्पामुळे जवळपास २७,६०० एवढी लोकसंख्या पुनर्वसित होणार असणे, आतापर्यंत ३२ पैकी केवळ दोन गावांचे पूर्णतः पुनर्वसन झालेले असणे, उर्वरित गावांच्या पुनर्वसनांपैकी प्रथम प्राधान्यातील २३ गावांचे पुनर्वसन आणि सुमारे ४७७.०७ हेक्टर जमीन लागणार असणे व त्यासाठी कराव्या लागणाऱ्या भूसंपादनासाठी ६९४.७१ कोटी निधीची गरज असणे, " महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ " कायद्यांतर्गत जिगाव प्रकल्पामध्ये पूर्णतः तथा अंशतः ४७ गावांच्या पुनर्वसनाच्या प्रक्रियेने वेग घेतलेला असणे, ह्या पुनर्वसित गावठाणामध्ये एकूण १८ प्रकारच्या नागरी सुविधा पुरवाव्या लागणार असणे, त्यासाठी प्रकल्पाचे उर्वरित ५० टक्के काम आणि पुनर्वसनाचे ७५ टक्के काम पूर्णत्वास नेण्यासाठी अजूनही जवळपास ९९७७.८४ कोटी रुपये निधीची असणारी आवश्यकता यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. " | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (३१) | " भुसावळ (जि. जळगाव) शहरात गेल्या १२ महिन्यात ११ खुन, ९९ गोळीबाराच्या घटना, २० ते २२ गावठी कट्टे जप्त करण्यात येणे, कुर्हे (पानाचे) येथील एटीएम फोडून धाडसी चोरी करण्यात येणे, दिनांक २ सप्टेंबर २०१९ रोजी आयोजित शांतता समितीच्या बैठकीत पोलिसांचे गुन्हेगारांशी असलेल्या सबंधाबाबत स्थानिक आमदारांनी केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल वरीष्ठ पोलीसांकडून घेण्यात न येणे, २०१९ च्या मकर संक्रातीच्या दिवशी शहर व बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ७ ते ८ धाडसी चोरीच्या घटना होणे, २५ मार्च रोजी शहरातील डी. ग्राऊंडवर जय अशोक एस. दुधानी याचा भरदिवसा खून होणे, १० एप्रिल रोजी डॅनियल जॉर्ज या रेल्वे कर्मचाऱ्याचा पिस्तूलातून गोळी झाडून खून होणे, १४ एप्रिल रोजी प्रीती ओंकार बांगर तरुणीवर चाकू हल्ला होणे, १५ एप्रिल रोजी सरला अशोक भांडारकर या वृद्ध महिलेचा खून शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत होणे, ६ ऑक्टोबर रोजी समता नगरमध्ये बेधुंद गोळीबार करून भाजपाचे तत्कालीन नगरसेवक रविंद्र खरात व इतर ४ जणांसह ५ जणांची हत्या होणे, भुसावळ शहरात पोलीसांनी वेगवेगळा ठिकाणी केलेल्या १४ कार्यवाहीत २१ गावठी कट्टे हस्तगत करण्यात यश येणे, १० ऑक्टोबर २०१९ रोजी दिपनगर येथील ठेकेदार मुकेश तिवारी यांवर घरात घुसुन गोळीबार करण्यात येणे, अशाप्रकारे जळगांव जिल्ह्यातील भुसावळ शहरात कायदा व सुव्यवस्था अत्यंत असुरक्षित झाल्याने व पोलीसांचे गुंडावर नियंत्रण न राहिल्याने भुसावळ शहरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले प्रचंड चिंतेचे व असुरक्षिततेचे वातावरण, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना. " | श्री. संजय सावकारे, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३२) | “ हिंगणघाट तालुक्यात गत ६ महिन्यांपासून मुली बेपत्ता झाल्याचे २३ गुन्हे दाखल आहेत ज्यात १९ मुली व ४ मुलांचा समावेश असून यातील १५ मुलांचा शोध लागल्यानंतर १९ पैकी १ मुलगी अद्यापही न मिळाल्यामुळे सदर मुलीचे पिता विजय मोरे नामक या व्यक्तीने आत्महत्या केल्यानंतरही वर्षभरापासून ४ मुलीचा शोध पोलीस प्रशासनाकडून न लागणे व तसेच लापता असलेल्या मुलींच्या पालकांना पोलीस प्रशासनाकडून निर्लज व अपमानास्पद वागणूक मिळणे, पोलिसांच्या बेजबाबदारीच्या वागण्यामुळे पित्याची आत्महत्या होणे, त्यामुळे आत्महत्याग्रस्त पित्याकडून पोलीस प्रशासनातील दोन अधिकाऱ्यांच्या नावाची चिठ्ठी सापडणे, अशी घटना घडूनही अद्यापही पोलीस प्रशासनाकडून मुलींचा शोध लावण्यात अद्यापही यश न येणे, त्यामुळे हिंगणघाट शहर व परिसरात पोलीस प्रशासनाबद्दल तीव्र नाराजीचे पडसाद उमटणे व आत्महत्याग्रस्त व्यक्तीच्या पत्नीने हिंगणघाट पोलीस ठाण्यातील पोलिसांना मुलीचा तपास करावा अशी विनंती केल्यानंतरही पुन्हा पोलीस प्रशासनाकडून सदर महिलेस अपमानास्पद वागणूक देत असल्यामुळे हिंघणघाट परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | श्री. समीर कुणावार, वि.स.स. | कित्ता |
| ३३) | “ मुंबईमध्ये बॉम्बे स्टॉक एक्सेंज, नॅशनल स्टॉक एक्सेंज यामध्ये दर आठवड्याला सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसाच्या कालावधीमध्ये रजिस्टर कपनींच्या शेअर्सची खरेदी-विक्री व्यवहार जवळजवळ ६० हजार करोडो रुपयांपर्यत चालत असणे, परंतु सध्या मुंबईमध्ये गेल्या काही महिन्यांपासून खाजगी | ॲड. राहुल नार्वेकर, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. | कित्ता |

लोकांची टोळी मुंबई स्टॉक एक्सेंज व नॅशनल स्टॉक एक्सेंजच्या शेअर्स मुल्यांकनावर व धर्तीवर रोखीने आठवड्याचे सातही दिवस दररोज साधारणतः ३ लाख करोड रुपयेपर्यंत डब्बावाला ट्रेडिंग या नावाने करीत असून, या व्यवहारामध्ये जो पैसा येतो तो पैसा कुणाचा असतो, कशाप्रकारे येतो व कशाप्रकारे जातो याचा शासकीय एजन्सीला कोणताही सुगावा न लागणे, मात्र व्यवहार चोखदृष्ट्या होत असणे, महाराष्ट्रातील जनतेला याकडे आकर्षित करण्यासाठी सुरुवातीला फायदा दाखवून लाखो-करोडो रुपये त्यांच्याकडून उकळले जात असणे, त्यानंतर त्यांना शेअर्स ट्रेडिंगमध्ये तोटा झाला असे दर्शवून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असलेली फसवणूक, झालेल्या आर्थिक फसवणूकीमुळे अनेक नागरिकांचे झालेले मोठे नुकसान, परिणामी शेअर्स खरेदी-विक्री (डब्बावाला ट्रॅझॅक्शन) ट्रेडिंगकंपनीच्या फसवणुकीमुळे मुंबईतील अनेक नागरिकांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, या सर्व व्यवहाराबाबत आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई पोलीस यांच्याकडून होत असलेले दुर्लक्ष, मुंबईमध्ये दरदिवशी शेअर्सद्वारे (डब्बावाला ट्रॅझॅक्शन) करोडो रुपयांची होत असलेली उलाढाल व त्यामध्ये उध्वस्त झालेल्या नागरिकांचे जीवनमान याला आळा बसण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. ”

(३४) “ रत्नागिरी (जि. रत्नागिरी) येथील कारागृहात बंदीवान असलेल्या सखाराम भागा गोरुले यांची दिनांक ३ फेब्रुवारी, २०२० रोजी दुपारी १२-३० वाजण्याच्या सुमारास प्रकृती अचानक बिघडणे, याप्रकरणी कारागृहातील कामावर असलेल्या कर्मचाऱ्याने गोरुले यांना शासकीय रुग्णालयात हलविले असता रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केल्यामुळे निर्माण झालेले संशयाचे वातावरण, बंदीवानाच्या मृत्यूनंतर त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कोल्हापूर

सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री. अतुल भातखळकर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. संजय केळकर, राम कदम, वि.स.स.

कित्ता

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | येथील न्यायवैद्यक महाविद्यालयात पाठविलेला असणे, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| (३५) | “ अर्नाळा (विरार, जि. पालघर) पोलीस स्थानकाच्या हद्दीत २३ बांगलादेशी घुसखोरांना अटक केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, त्यांच्याकडील पासपोर्ट हा बोगस ओळखपत्रे व बनावट कागदपत्रे तयार करून बनविला असून ते बेकायदेशीररीत्या वास्तव्य करत असल्याचे निदर्शनास येणे, असे अनेक बांगलादेशी नागरिक बेकायदेशीररीत्या वास्तव्य करीत असणे, त्यामुळे पाकिस्तान, बांगलादेश, नायजेरिया अशा विविध देशांमधून भारतात घुसखोरी करून बेकायदेशीररीत्या राहणाऱ्या घुसखोरांच्या विरोधात शासनाकडून राज्यव्यापी विशेष मोहीम चालवण्याची होत असलेली मागणी, बोगस ओळखपत्रे व बनावट कागदपत्रे तयार करून देणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची स्थानिक नागरिकांची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री. अतुल भातखळकर, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. | कित्ता |
| (३६) | “ राज्यात विशेषतः पनवेल (जि. रायगड) तालुक्यात अनेक विकासकांनी अमिषे दाखवून सदनिका विकून नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, नागरिकांकडून बोगस करारनामे करून घरांच्या किंमती वसूल करणे, प्रत्यक्षात अशा कोणत्याही गृह प्रकल्पाची विकासकांकडे शासनाची मंजूरी नसणे, फसवणूकीच्या अशा प्रकारच्या अनेक तक्रारी पनवेल व आसपासच्या पोलीस स्टेशनमध्ये नागरिकांकडून | सर्वश्री. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. आशिष शेलार, श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स. | कित्ता |

दाखल होऊन सुद्धा पोलीस यंत्रणा त्यावर कोणतीही कारवाई करत नसणे, तक्रार केल्यास पैसे परत मिळणार नाहीत या भितीने फसवणूक उघडीस येवूनही अनेक वर्षे तक्रार करण्यात न येणे, गृहनिर्माण अधिनियम २०१२ चा कायदा मा.राष्ट्रपती महोदय यांनी पारित करूनही त्याची अंमलबजावणी होत नसणे, MPID (एमपीआयडी) कायदा अंमलात असून सुद्धा फसवणूक करणाऱ्या विकासकांवर शासनाकडून कोणतीच कारवाई अद्यापपर्यंत न होणे, महारेराने गृह प्रकल्प वेळेत पूर्ण न केल्यामुळे ग्राहकांचे पैसे व्याजासह परत देण्याचा आदेश संबंधित विकासकांना देऊनही विकासकांनी ग्राहकांचे पैसे अद्यापपर्यंत दिलेले नसणे, विकासकांवर कोणत्याच विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्यामुळे दरवर्षी ग्राहकांच्या फसवणुकीच्या प्रकरणात होत असलेली वाढ, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. ”



| | | | |
|---|---|---|---|
| (३७) | “ नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापे येथील शाळेतील विद्यार्थ्यांना खासगी कंपनीमार्फत संगणक प्रशिक्षण देणाऱ्या सानपाडा येथील वात्सल्य संस्थेच्या लोचन परुळेकर या शिक्षकाने ५० हून अधिक अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत अश्लील वर्तन करून त्यांचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २८ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्या सुमारास उघडकीस आलेला असणे, या शाळेत खासगी कंपनीने आपल्या 'सीएसआर फंडा'तून संगणक प्रशिक्षण केंद्र उभारले असून गेल्या दोन महिन्यांपासून वात्सल्य ट्रस्ट नामक संस्थेने लोचन परुळेकर याची संगणक प्रशिक्षक म्हणून तिथे नियुक्ती केली असणे, या कालावधीमध्ये आरोपीने शाळेतील अनेक विद्यार्थिनींसोबत अश्लील वर्तन केले असणे, संगणकाचे शिक्षण देण्याच्या बहाण्याने आरोपी सहावी ते आठवीतील विद्यार्थिनींना शाळा सुटल्यावर अथवा सुट्टीच्या दिवशी शाळेत बोलवून त्यांच्याशी | श्री. मोहन मते, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | गैरवर्तन केले असणे, घाबरलेल्या विद्यार्थिनींनी प्रारंभी हा प्रकार कुणाला सांगितलेला नसणे, मात्र मुलींमध्ये याबाबत कुजबुज सुरू झाल्यानंतर शाळेतील शिक्षकांनी मुलींना विश्वासात घेऊन त्यांच्याकडून माहिती काढून घेत हा प्रकार मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणल्यानंतर महिला तक्रार निवारण समितीने खातरजमा केल्यानंतर मुख्याध्यापकांनी याबाबतचा अहवाल १४ फेब्रुवारी रोजी शिक्षण विभागास सादर केला असणे, शिक्षण विभागाचे उपायुक्त, शिक्षणाधिकारी यांनी वात्सल्य ट्रस्टला तातडीने नोटीस बजावून संबंधित संगणक शिक्षकाला तात्काळ कामावरून काढून टाकण्याचे व त्याच्याविरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे दिलेले आदेश, त्यानुसार वात्सल्य ट्रस्टने आरोपी विरोधात तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार केलेली असणे, अशा दुष्कृत्यांना आळा घालण्यासाठी सदर प्रकरणातील आरोपीस तात्काळ कठोर शिक्षा मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि प्रतिक्रिया. ” | | |
| (३८) | “ मालाड (पूर्व), येथील कुरार गांव, हनुमान नंगर, मुनशी चाळ येथे राहणाऱ्या कु.राजन जितेंद्र नार्वेकर या मुलाचा अपघात घडवून खून केल्याची दिनांक १ फेब्रुवारी २०२० रोजी उघडकीस आलेली घटना, सदरहू मयत राजेंद्र नार्वेकर हा दिनांक ३१ जारेवारी २०२० रोजी सायंकाळी घरातून मित्रासोबत घराबाहेर पडणे, त्यानंतर थेट त्याचा अपघात झाल्याचा दुरध्वनी पालकांना मिळणे, पालकांनी कुमार राजनला जखमी अवस्थेत ट्रामा केअर सेंटरमध्ये घेऊन गेले असता तेथे डॉक्टरांनी त्यांस मृत घोषीत करणे, एकुलता एक मुलगा गेल्याने | श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. | कित्ता |

सदर कुटुंबावर कोसळलेली शोककळा व दुःखाचे संकट, अपघात स्थळी कुमार राजेंद्रच्या मोटर सायकलला कोणतेही नुकसान न होणे, तसेच मृतदेह संशयी स्थितीत पडलेला आढळून येणे, यामुळे राजनचा अपघाती मृत्यु नसून खात्रीलायक रित्या खून झाला असल्याचा पालकांकडून सांगण्यात येणे, सदर संशयीत खून प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करून दोषीं विरुद्ध कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, व प्रतिक्रिया. ''

(३९) “ राज्य पोलीस दलात सरळ सेवा पोलीस उप अधीक्षक म्हणून महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा परीक्षेद्वारे नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना पोलीस उप अधीक्षक पदाच्या मूळ वेतन श्रेणीचा लाभ मिळणे, सदरहू पोलीस उपअधीक्षक पदावरील अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवा जेष्ठतेनुसार पोलीस अधीक्षक (असंवर्ग) पदावर बढती मिळाल्यानंतर मात्र त्यांना पोलीस अधीक्षक पदाची वेतनश्रेणी न मिळता फक्त ग्रेड पे मध्ये बदल होत असल्याने भरतीनंतरही यांना पदोन्नतीच्या कालावधीत वेतनश्रेणी व त्यामुळे होणारा आर्थिक लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, मात्र या उलट महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून महसूल सेवेत किंवा विक्रीकर विभागाच्या सेवेत सरळसेवा उप जिल्हाधीकारी पदावर निवड होणाऱ्या उप अधीक्षक समकक्ष पदावरील उप जिल्हाधीकारी पदावरील अधिकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर बढती मिळाल्यानंतर त्या पदाची वेतनश्रेणी अधिक ग्रेड पे याचा लाभ मिळत असल्याचे निदर्शनास येणे, अशाप्रकारे लोकसेवा स्पर्धा परिक्षेच्यात माध्यमातून एकाच वेळी राज्याच्या गृह विभागात आणि महसूल किंवा विक्रीकर विभागात समकक्ष पदावर निवड होणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये त्यांना पदोन्नतीनंतर मिळणाऱ्या आर्थिक लाभांमध्ये मोठ्या

सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री. अबू कित्ता आजमी, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | प्रमाणावर तफावत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, उप जिल्हाधीकारी पदावरील अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या पुढील पदावरील वेतन श्रेणीचा लाभ सलग दहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर मिळत असणे तर गृह विभागातील पोलीस अधीक्षक पदावरील अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या पदावरील पुढील वेतनश्रेणी २७ वर्षे सलग सेवा झाल्यानंतर मिळत असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी राज्यातील पोलीस अधीक्षक पदावरील सरळ सेवेच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेद्वारे भरती झालेल्यांरमध्ये पसरलेली नाराजीची भावना व त्यांच्या कार्यशैलीवर होत असलेला परिणाम, पोलीस अधीक्षक यांना महसूल सेवा पदावरील अधिकाऱ्यांना (असंवर्ग) किंवा विक्रीकर विभागातील समकक्ष अधिकाऱ्यांप्रमाणे समान वेतनश्रेणी सातवा वेतन आयोगात लागू करून त्यांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता, या अधिकाऱ्यांप्रमाणे अन्य शासकीय अधिकाऱ्यांप्रमाणे पाच दिवसांचा आठवड्याचा लाभ अथवा कामाच्या वेळेची कालमर्यादा लागू होत नसल्याने निदान गृह विभागातील अधिकाऱ्यांना आणि महसूल किंवा विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये असलेली पदोन्नतीचा पदावरील वेतन श्रेणीची तफावत तात्काळ दूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| (४०) | “ मिरा भाईदर शहरातील लोकसंख्या १२ ते १३ लाखाच्या असपास पोचली आहे, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१३ येथील परिसरात नायझेरिअन लोकाची संख्या वाढत असून त्याचा त्रास स्थानिक नागरिकाना होणे, तसेच नायझेरिअन नागरिक हे अमली पदार्था चे सेवन करत असल्याकारणाने | श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | तेथील लहान मुलांना याचा त्रास होण्याची श्यक्यता,. तसेच त्यांच्याकडे कोणतेही दस्तऐवज नसून ते मिरारोड येथे बेकायदेशीर रित्या राहत असणे, त्यामुळे स्थानिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या नायझेरियन लोकावर योग्य ती कारवाई करावी ,जेणेकरून परिसरातील व आसपासच्या परिसरातील महिलांची, लहान मुला मुलींची सुरक्षितता टिकून राहील,. तरी वाढत असलेल्या या नायझेरियन लोकवार अंकुश लावणे गरजेचे असल्याने, या संबंधातील योग्य निर्णय घेवून भविष्यातील मुंबई व ठाणे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी शासनाचा निर्णय व या प्रकाराची करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भुमिका. ” | | |
| (४१) | “ मुंबईतील मुलूंड येथील रहिवासी असलेल्या सौ. भारती चौधरी या गायत्री महिला सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष असणे, या संस्थेच्या माध्यमातुन त्या महिलांविषयक सामाजिक कार्य अग्रेसर असणे, दिनांक २९ डिसेंबर २०१९ रोजी काही महिलांची अकरम अंसारी या इसमाने आर्थिक फसवणूक केल्याप्रमाणे महिलांना घेऊन पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करावयास जात असताना त्यांच्या मारोती एर्टीगा या वाहनाला चंदर यादव यांनी डॅश मारणे, या प्रकरणाबाबत त्यांनी १०३ क्रमांकावर कॉल करून झाल्या प्रकाराबाबत अवगत करणे, त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय दळवी यांनी त्यांना गाडीत बसवून पोलीस ठाण्यात आणणे, पोलीस निरिक्षक दळवी यांनी त्यांच्या वयावरून अश्लील टिपणी करणे, अपघात नोंदणीची कार्यवाही झाल्यानंतर सौ. चौधरी यांनी जावू देण्याची विनंती केली असता पोलीस निरिक्षकांनी त्यांना जाणीवपुर्वक डांबवून ठेवणे, नवघर पोलीस स्टेशनमध्ये गेल्या आठवड्यात तुम्ही गुटख्याच्या गाड्या अडविल्या होत्या काय अशी विचारणा पोलीस | श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | निरिक्षकांनी सौ. भारती यांना टॉर्चर करणे, सौ. चौधरी यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करून त्यांचा शारिरिक छळ करणे, त्यांना पोलीस वाहनात बसवताना पुरुष पोलिसांनी त्यांच्या शरिराला हात लावत अतिशय घाणेरडे वर्तन करणे, त्यांचे चारित्र्य हनन करणे, या संदर्भात सौ. भार चौधरी यांनी सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी करूनही त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात न येणे, हा एकुणच घटनाक्रम महिलांच्या सुरक्षीततेसमोर प्रश्न चिन्ह उभा करणारा असणे, या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून पोलीस निरिक्षक दळवी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी महिलांमध्ये पसरलेला तिव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. ” | | |
| (४२) | “ धुळे जिल्ह्यात गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ झालेली असून चोरी, लूटमार, खून, दरोडे, घरफोडी, हे प्रकार रोजचे झाले असून पोलीस यंत्रणा कुचकामी ठरत असणे, गेल्या महिनाभरात अभियंते, सैनिक, पोलिस, वकील, गायक यांच्या घरात चोरटयांनी सोन्याचे दागिने व रोकड पैसे चोरुन नेल्याचे २२ जानेवारी २०२० रोजी निदर्शनास येणे, सदर चोरी व लुटमारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा कुचकामी ठरत असल्याचे दिसून येणे, जिल्ह्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून भरदिवसा विद्यार्थ्यींनींचा छळ तसेच वृद्ध लोकांना लुटण्याचे प्रकार घडत असणे, यामुळे जनसमान्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून त्यांच्या मनात पसरलेले भितीचे वातावरण, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर | सर्वश्री कुणाल पाटील, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. | कित्ता |

| | | |
|---|---|---|
| | झालेला आहे लूटमार सदरहू प्रकरणी चोरी, दरोडा घरफोडी, खून यावर आळा बसण्यासाठी शासनाने सक्षम सुरक्षा व सुव्यवस्था कायदा त्वरीत अंमलात आणण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया. ” | |
| (४३) | “ नाशिक येथील राहूल सुभाष जाजू राकॅनडा कॉर्नर,शरणपूर रोड, या उद्योजकाने सन २०१७ मध्ये मंगरूळ (ता.चांदवड, जि.नाशिक) येथील जमिनीबाबत खोटे मृत्यूपत्र तयार करणे, सदर मृत्यूपत्राच्या आधारे सातपूर येथील ३९ वर्षीय एक महिलेचे वारसदार म्हणून कागदपत्रे तयार करणे, उपरोक्त जमीनीवर नाव लावण्याच्या आमिषाने उक्त महिलेवर चार वेळा बलात्कार करणे, पीडित महिलेने मनमाड पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर राहूल जाजू या संशंयिताच्या विरुद्ध दिनांक १२ नोव्हेंबर २०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात येणे, तीन महिन्याचा कालावधी उलटूनही पोलीसांनी संबधित उद्योजकांच्याविरुद्ध अदयाप कोणतीही कारवाई न करणे, त्यामुळे पीडित महिला व तिच्या कुटुंबियांमध्ये भितीचे व असुरक्षिततेचे पसरलेले वातावरण, संबंधित संशंयिताविरुद्ध तातडीने कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व भूमिका ” | डॉ. संजय रायमुलकर, सुनिल प्रभू, कित्ता वि.स.स. |
| (४४) | “ गडचिरोली जिल्हा हा उद्योग विरहीत जिल्हा असून सन २००७ पासून गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यात सुरजागड येथे एकमेव लोह प्रकल्पाच्या उत्खनणाचे काम सुरू होणे, काम सुरू झाल्याने जिल्ह्यातील हजारो स्थानिक लोकांना त्यातून रोजगार उपलब्ध होणे, सुरजागड हे ठिकाण दुर्गम क्षेत्रात येत असल्याने असामाजिक तत्वांचा प्रभाव त्या क्षेत्रात असणे, | डॉ. देवराव होळी, श्री. कृष्णा गजबे, कित्ता वि.स.स. |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | नियमित सुरू असलेल्या या लोह प्रकल्पाचे काम माहे जानेवारी २०१९ च्या जाळपोळीच्या घटने नंतर अचानक बंद पडणे, पोलीस अधीक्षक गडचिरोली यांनी या महत्त्वपूर्ण प्रकल्पास सुरक्षा पुरविण्यास नकार दिल्याने हा प्रकल्प दिनांक १६ जानेवारी २०१९ पासून आजतायागत बंद अवस्थेत असणे, उत्खनणाचे काम सुरक्षेअभावी बंद असल्यामुळे जिल्ह्यातील हजारो स्थानिक लोकांचा रोजगार बंद होणे, परिणामी शेकडो कुटुंबावर उपासमारीची पाळी येणे, हा प्रकल्प बंद झाल्याने जिल्ह्यातीलच नव्हे तर विदर्भातील हजारो लोकांचा रोजगार हा हिरावला जाणे, गडचिरोली जिल्ह्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण असणाऱ्या या प्रकल्पाचे काम सुरू होण्याची आवश्यकता सदरहु प्रकल्प तातडीने सुरू करण्यासंदर्भात तातडीने परवानगी देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| (४५) | “ चांदोली (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील कडवी मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये चांदोली लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले असून सदर दोन्ही प्रकल्प लाभक्षेत्रात चांदोली, जावली व वारुळ या गावातील एकूण २४४ हेक्टर जमीन सामायिक क्षेत्रात येणे, या सामाजिक क्षेत्रातील चांदोली गावाच्या १३ खातेदारांची जमीन कडवी मध्यम प्रकल्प व चांदोली लघू प्रकल्पासाठी संपादीत करण्यात आल्याने प्रकल्पग्रस्त खातेदारांकडून दोन्ही प्रकल्पाच्या कामात अडथळे निर्माण करणे, चांदोली ता.शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील कडवी मध्यम प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी वगळण्याबाबत कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ व मुख्य अभियंता, | डॉ. विनय कोरे, वि.स.स. | कित्ता |

पुणे यांना संबंधितांकडून पत्र व्यवहार करणे, तसेच चांदोली ल.पा.तलाव व कडवी मध्यम प्रकल्प या दोन्ही प्रकल्पात समायिक व परस्पर व्यापजी होत असलेली २४४ हेक्टर जमीन कडवी मध्यम प्रकल्पाचे लाभक्षेत्रातून वगळणेबाबत निर्णय शासनस्तरावर घेणेबाबत जिल्हाधिकारी व उपसंचालक प्रकल्प पुनर्वसन(जमीन) कोल्हापूर विभाग यांनी शासनास पत्रव्यवहार करणे. तसेच कृष्णा खोरे महामंडळाकडून शासनास शिफारस आलेली असणे, तरी सुद्धा शासनाने अशी जमीन वगळली नसल्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेची भावना, शासनाने तातडीने सदर जमीन वगळण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया. ”

(४६) “ खेड तालुक्यातील सरकारी गायरान मध्ये कोट्यवधी रुपयाचे बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन करून चोरी केल्या प्रकरणी मा.महसूल मंत्री यांना दिनांक ८ जानेवारी २०२० रोजी निवेदन दिले असणे, मौजे आंबेठाण, वाकणी, शिन्देवही, सावरा, खालुम्ब्रे, वराळे शेलू या गावातुन तसेच मौजे कुरुळी मधील गट क्रमांक ६७९/५८८ जमिनीमधून सुमारे ८०००० ब्रास व गट क्रमांक ६७९/६२/१ मधूनन ४०००० ब्रास गौण ववमौजे बोरदरा मधील गट क्रमांक ४५२,४८९,४९० व ८१२ मधून ८०००० ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खनन व चोरीस तहसीलदार खेड यांनी मदत करणे, ह्या व अशा बऱ्याच प्रकरणामध्ये सुमारे २००००० ब्रास गौण खनिजाचे चोरी झाल्याचे निदर्शनास आलेली असणे, तसेच त्यामुळे शासकीय महसुलाचे सुमारे ८ कोटी रुपयाचे नुकसान झाले असणे आणि पर्यावरनाची कधीही न भरून येणारी हानी झालेली असणे, अशाच प्रकारे खेड तालुक्यात अनेक ठिकाणी अवैध अनेक गौण खनिज परवाने देऊन तेथे मोठ्या प्रमाणावर अवैध गौणखनिज उत्खननासस

श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स. किता

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | तहसीलदार श्रीमती आमले यांनी प्रोत्साहन देऊन शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणावर बुडवलेला असणे, आणि असे असूनही प्रशासनाकडून त्यांचेवर कोणतीही कारवाई न होणे यामुळे खेड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर असंतोष आहे . त्याबाबत शासनाने तत्काळ सखोल चौकशी करून शासनाचा बुडीत झालेला महसूल त्यांचेकडून वसूल करून त्यांच्यावर सेवा समाप्ती ची कारवाई करावी. ” | | |
| (४७) | “ वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील रिसोड ते वाशिम या रस्त्याचे काम सुरु असताना कंत्राटदार प्रलसिद्ध कस्ट्रक्शन कंपनी यांनी सवड येथील शेतकरी पससराम सिताराम गाडे व यांच्या शेतातुन मोठया प्रमाणात मुरुम परवानगी शिवाय जेसीबी लावून मोठया प्रमाणात उत्खनन केले व तसेच मालेगांव ते रिसोड या रस्त्याच्या कंत्राटदार डी .पी.जैन यांनी वसारी येथील विधवा महिला शेतकरी कौशल्या सुदाम भालेराव यांच्या साडे चार एकर शेतातून ४ फुट खोल खो्दून अवैधरित्या चोरुन चोरुन या दोन्ही शेतकऱ्यांनी वारंवार प्रशासकाकडे तक्रार मात्र यामुळे या तक्रार वर कार्यवाही करण्यास शासनाकडून होत असलेला विलंब परिणामी येथील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, यामुळे शासनाने चौकशी करून सदर कंत्राटदारावर करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | श्री. अमित झनक वि.स.स. | कित्ता |
| (४८) | “ जळगाव शहरातील मतदारांची लोकसंख्या पाच लाखाहून अधिक असणे त्यामुळे जळगाव तहसील कार्यालयात प्रचंड प्रमाणात गर्दी होत असणे व हे | श्री. सुरेश भोळे, वि.स.स. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | कार्यालय जळगाव शहर व जळगाव तालुका मिळून एकच असणे, यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागणे, तेथील जागा कमी पडणे, तसेच तहसील कार्यालयाची इमारत जुनी झाली असून तेथे काही प्रमाणात दुरुस्ती करावयाची असून इमारत खूप प्रमाणात जीर्ण झाली असून तेथील इमारत नवीन बांधण्यात यावी व परंतु कर्मचारी कमी असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, या सर्व बाबी लक्षात घेता कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात येण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना, व प्रतिक्रिया. ” | | |
| (४९) | “ पंडित दिनदयाळ उपाध्याय केंद्र ” या देशाची सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य व तळागाळातील व्यक्ती/कुटुंबे यांचे सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी मोठ्या प्रमाणावर सामाजिक कार्य करण्याकरिता सदरहू संस्थेस सुसज्ज कार्यालय, प्रेक्षागर, चर्चासत्र, प्रशिक्षण व्यवस्था कार्यशाळेसाठी राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने मुंबईतील जवाहर भवन, चर्नीरोड, भूखंड क्रमांक १७३६ मधील सावित्रीबाई फुले वसतीगृह इमारतीला लागून असलेल्या १० हजार ९३० चौ.मी. क्षेत्रफळाचा रिक्त भूखंड आरक्षण बदलून वितरीत करण्यात आल्याचा नुकताच उघडकीस आलेला प्रकार, सदरहू संस्थेचे विश्वस्त हे राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी असून त्यांनी पदाचा दुरुपयोग करून व शासकीय अधिकाऱ्यांवर दबाव टाकून सदरहू भूखंड पंडित दिनदयाळ उपाध्याय केंद्रासाठी मंजूर करून घेण्यात येणे, सदरहू भूखंड नाट्यगृह व वस्तू संग्रहालय ऐवजी शिक्षण भवन बांधण्याकरिता आरक्षित असणे, अशाप्रकारे आरक्षीत भूखंड सदरहू संस्थेस राजकीय पक्षाची कामे करण्याकरिता बेकायदेशीररित्या वितरीत करण्यात येणे, यामुळे शासकीय भूखंडाचा मोठ्या प्रमाणात झालेला | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | अपव्यय, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यामुळे जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. " | | |
| (५०) | " ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर मौजे घोडबंदर येथे सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनीच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेल्या अपना घर प्रकल्पामध्ये सदर कंपनीला महसूल विभागाने ७९ कोटी ४२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात येणे, या प्रकल्पासाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेण्यात आलेली नसणे, सदर प्रकल्पाला दंड भरेपर्यंत स्थगितीची नोटीस दिली असताना बांधकाम सुरू असणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, पर्यावरण विभागाची परवानगी नसतानाही काम सुरू असल्याने या प्रकरणाची चौकशी करून कठोर स्वरूपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. " | सर्वश्री अमित झनक, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखेडे, राजु पारवे, राजु आवळे, हिरामण खोसकर, राजकुमार पटेल, वि.स.स. | कित्ता |
| (५१) | " ता. हवेली जि. पुणे येथील वाढते नागरिकरण व त्याचा महसुली कामांबरोबरच इतर विभागांवर कामाचा पडत असलेला ताण, हवेली तालुक्यात सुमारे १६० महसूल गावांची संख्या असणे, हवेली तालुक्याची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार सुमारे १९ लाख ९१ हजार असणे, सन २०११ च्या जनगणनेचा विचार करता लोकसंख्येमध्ये दुपटीने वाढ होणे, लोकसंख्येच्या तुलनेत जमीन खेरदी विक्रीच्या व्यवहारांमध्ये झालेली प्रचंड वाढ, वाढत असलेली बांधकामे, अतिक्रमणे यांमुळे महसूल यंत्रणेवर प्रचंड ताण पडणे, महिन्याला सुमारे ६ | सर्वश्री अशोक पवार, सुनिल टिंगरे, दिलीप मोहिते-पाटील, सुनिल शेळके, चेतन तुपे, निलेश लंके, वि.स.स. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | हजार दाखल्यांचे तहसलिदारांकडून वाटप करावे लागणे, विविध कामांसंदर्भात महिन्याला येणाऱ्या अर्जांची संख्या सुमारे ७ ते ८ हजारांच्या आसपास असणे, नैसर्गिक आपत्ती, पुरवठा विषयक काम, नियोजन, विविध बैठका, न्यायालयीन कामकाज यांसारख्या अतिरिक्त कामांमुळे प्रशासनावर प्रचंड ताण येणे, गडचिरोली सारख्या जिल्ह्यात सुमारे १ लाख ८० हजार लोकसंख्येला १ तहसिलदार या तुलनेत पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील ४० लाख लोकसंख्येला शहरी व ग्रामीण भागात प्रत्येकी १ तहसिलदार असणे, याकरिता हवेली महसूल प्रशासनावर वाढता ताण पाहता हवेली तालुक्याचे विभाजनाबरोबरच तहसिलदारांची संख्या वाढविण्याबरोबर इतर विभागातील अधिकाऱ्यांचीही संख्या वाढविण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया. ” | | |
| (५२) | “ विद्यमान तहसीलदार (ता. पवनी, जि. भंडारा) यांनी अनागोंदी कारभार करून रेती माफियासोबत संगनमताने पवनी तालुक्यात लिलाव न झालेल्या रेती घाटातून बेकायदेशीररित्या अवैध रेतीचा उपसा करणे, अवैध वाहतुकीमुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढणे, शासनाचा कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडवून वैयक्तिक लाभासाठी अधिकाराचा दुरुपयोग करून गैरप्रकार केल्याने, स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे दिनांक २८ जानेवारी २०२० रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री महसूल व वने, अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग यांना लेखी तक्रारीत निलंबित करण्याची मागणी करणे. तसेच रेतीच्या अवैध वाहतुकीमुळे गावपातळीवरील अंतर्गत रस्ते खराब होणे, त्यामुळे शासनाच्या दुर्लक्षितपणामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी लिलाव न झालेल्या रेती घाटातील किती ब्रास रेती चोरी | श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | गेली याची तपासणी भूजल सर्वेक्षण विभागाकडून तात्काळ करून घेणे, व त्या आधारे रेती माफियांशी साठगाठ करून शासनाचे कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडविणाऱ्या तहसीलदाराविरुद्ध दंडात्मक वसुलीची व फौजदारी कार्यवाही करणे, परिणामी जेणेकरून वैयक्तिक लाभापोटी या पुढे शासनाचा कुठलाही महसूल अधिकारी, अधिकाराचा दुरुपयोग करून महसूल बुडविणार नाही या हेतूने कडक कारवाई करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. " | | |
| (५३) | " मौजे. वारजे, ता. हवेली, जि.पुणे येथील स.न.३५/२ मधील १.७६५० हेक्टर (पाच एकर) आर जमीन असून सदरील जमिनीवर भटक्या-विमुक्त जाती जमातीच्या लोकांना टुमदार घरे बांधण्यासाठी असे रिझर्व्हेशन असून सदरील प्लॉट हा शासनाने रामनगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादितचे चेअरमन अंबादास गोटे यांना विना मोबदला देणे. सदरील प्लॉट हा संस्थेचे चेअरमन अंबादास गोटे यांनी संस्थेच्या २१८ सभासदांना मोफत घरे बांधण्याच्या अटींवर सिद्धार्थ प्रॉपर्टीचे अभिजित शेंडे व इतर यांना विकसित करण्यास देणे. परंतु अभिजित शेंडे व अंबादास गोटे यांनी विकसन करारनामा करून सदरील जमिनीवर ३९६ फ्लॅटचा प्रोजेक्ट करून करोडो रुपयांना विकला असणे. तसेच रामनगर सहकारी गृहरचना संस्थेच्या सभासदांसाठी बांधलेल्या २१८ लोकांच्या फ्लॅटची पण विक्री केली असणे. विकासक व संस्थेचे चेअरमन यांनी संगनमताने मूळ सभासदांना डावलून नवीन लोकांना घरे विकल्याचे निदर्शनास येणे. रामनगर संस्थेचे २१८ सभासद जर आजपर्यंत पात्र नसतील | श्री. राम सातपुते, वि.स.स. | कित्ता |

तर जिल्हाधिकारी यांनी पाच एकर एवढी मोठी शासकीय जमीन संस्थेस कोणत्या नियमाने प्रदान करणे, जिल्हाधिकारी पुणे शासन परिपत्रक क्र जमीन १०/२००२ / प्र.क्र३०३ ज-१, दिनांक २२ जानेवारी २००२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून विषयांकित मिळकतीबाबतचा मा. न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून या कार्यालयाकडील मूळ जागा प्रदान आदेश क्र. प म ह/सीआर /१२६/२००९, दिनांक २७ ऑक्टोबर २००९ अन्वये रामनगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित वारजे यांना प्रदान करणेत आलेली मौजे वारजे, ता. हवेली, जि. पुणे येथील जमीन स नं ३५ मधील १ हे. ७६.५ आर क्षेत्र जागा प्रदान आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे संस्थेकडून काढून घेऊन सरकार जमा करणेचे आदेश देण्यात येणे, जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाचे विकासकाने केलेले उल्लंघन सदर जमीन शासन जमा करण्याचे आदेश देऊनही विकासकाने जमीन परत न करून शासनाची केलेली फसवणूक, या प्रकरणी शासनाने विकासकावर तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(५४) " नाशिक तालुक्यातील विहितगाव बेलतगव्हाण, टाकळी, मनोली आणि शिंगवे बहुला, सावरगाव या गावांमधील सुमारे ४४७३ शेतकऱ्यांच्या जमिनी वेगवेगळ्या देवस्थानच्या ताब्यात असून तशी नोंद या जमिनीच्या इनाम वर्ग ३ आणि भोगवटादार २ मध्ये असणे,बेलतगव्हाण शिवारातील जमिनीवर बालाजी देवस्थान चे नाव असून १९७३ सालच्या तात्कालीन शासकीय परिपत्रकाचा आधार घेत या जमिनीवर या देवस्थानांनी आपले नाव लावले असल्याचे या शेतकऱ्यांचे म्हणणे असणे, बेलतगव्हाण गावातील देवस्थान इनामी जमीन धारक शेतकऱ्यांकडून गेल्या काही वर्षांपासून या जमिनीचे इनाम रद्द करण्यासाठी

श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री हिरामण कित्ता खोसकर, दिलीपराव बनकर, नरहरी झिरवाळ , श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | शासनाकडे पाठपुरावा करूनही शासनाकडून अद्यापी कोणतीही उचित कार्यवाही न होणे, देवस्थान जमिनी आज ज्या गावात आहेत त्या सर्वच गावातील शेतकरी हवालदिल असणे, शेतकऱ्यांसाठी मिळालेल्या जमिनी शेतसारा नियमाने सरकारकडे अगोदर जमा झाला पाहिजे त्यानंतर संबंधित देवस्थान महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांकडे देवस्थानाच्या खर्चासाठी रक्कम मिळू शकते परंतु गेल्या पन्नास वर्षात या देवस्थानांनी सरकारच्या महसूल अधिकाऱ्यांकडे खर्चासाठी निधींची मागणी न करणे, देवस्थानच्या इनामी जमिनी या प्रश्नाचा सध्या काट्याचा नायटा झाला असल्याने त्याची झळ शेतजमीन कसणाऱ्याच शेतकऱ्यांना बसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| (५५) | “ हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रसंत नामदेव महाराज संस्थानाच्या नावे जन्मस्थळ नर्सी नामदेव येथे असलेल्या संस्थानच्या १०९ एकर जमिनीची खिरापत वाटून विकासकामांना जमिनच उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास येणे, मंदिर जिर्णोद्धार समितीने विभागीय आयुक्त हे संस्थानाला भेट देण्यास आले असताना सदर बाब निदर्शनास येणे. संस्थानाच्या विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कामाला गती देण्यासाठी जमीन कमी पडत असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपस्थित करणे, संस्थानकडून राष्ट्रसंत नामदेव महाराजांच्या ७५० व्या जयंती निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांची माहिती यावेळी देण्यात येणे. श्री संत गजानन महाराज, संस्थान शेगाव येथे असलेल्या अमन स्थानाच्या धर्तीवर विकास कामे व्हावी यातील न्यास, किर्तन मंडप, दर्शन बारी आदि विकासकामासाठी निधीची आवश्यकता | श्री. तानाजी मुटकुले, वि.स.स. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| | असतानाही न देणे त्यामुळे येथील जनतेत पसरलेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. " | | |
| (५६) | " वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा कारंजा, ता.कारंजा, इंदिरानगर, खर्डीपुरा, मौजा आष्टी, ता.आष्टी, नगरपंचायत अंतर्गत गौरखेडा व झोपडपट्टी भागातील वार्ड क्र.६,७,८ तसेच मौजा बोटोणा, मौजा माळेगांव (काळी), मौजा ब्राम्हणवाडा, ता. कारंजा, मौजा खडकी (शिरपूर), मौजा कासरखेडा ग्रामपंचायत अंतर्गत सावधहेटी, ता.आर्वी, मौजा तारासावंगा, ता.आष्टी मौजा नांदपुर, मौजा सावळापुर ग्रामपंचायत अंतर्गत बाभुळगांव, मौजा सारवाडी, ता.कारंजा, मौजा किन्हीमोई, ता.आष्टी सदरहू गावांतील रहिवाशी ३० ते ४० वर्षापासून महसूल व वन विभागाच्या जागेवर आपले घर बांधून राहत असणे, अजूनपर्यंत त्यांना घराचे पट्टे न मिळणे, याच कारणावरून तेथील रहिवाशी लोकांना शासनाच्या योजनांचा लाभ न मिळणे, शासनाच्या मुलभूत गरजा पूर्ण न होणे व त्यापासून त्यांचे जीवनामध्ये अमुलाग्र बदल न घडणे, या सर्व गोष्टींचा विचार करून सदरहू गावांतील रहिवाशांना राहत असलेल्या घरांना पक्के पट्टे देणे व त्यांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सदरहू गावांतील नागरिकांना तातडीने न्याय मिळवून देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना व प्रतिक्रिया. " | श्री. दादाराव केचे, वि.स.स. | कित्ता |
| (५७) | " राज्य शासनाने अव्वल कारकून संवर्गातील पदे मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून व मंडळ अधिकारी संवर्गातील पदे अव्वल कारकून संवर्गातील | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | कर्मचाऱ्यांमधून भरण्याबाबतचा शासन निर्णय २१ नोव्हेंबर १९९५ रोजी निर्गमित केलेला असतानाही, नागपूर विभागात दोन संवर्गातील पदे परस्पर अदलाबदलीने भरणेबाबत बंद करण्यात आल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, सदरहू शासन निर्णयाची अमंलबजावणी अत्यंत प्रभावीपणे व्हावी या हेतुने संदर्भ २ व ३ अन्वये नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकारी महोदयांना निर्देश दिले असतानाही सदर प्रकरणी शासन निर्णयाची अमंलबजावणी न करता बंद करण्यात आल्याचा घडलेला प्रकार, यामुळे येथील दोन्ही संवर्गातील अधिकारी कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असणे, मंडळ अधिकारी व अव्वल कारकून या दोन संवर्गातील पदे परस्पर अदलाबदलीने भरणेबाबतच्या शासन निर्णयाची राज्य शासनाकडून प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यात येत नसणे, तसेच सदरहू शासन निर्णय रद्दबातल झालेला नसताना किंवा कोणत्याही न्यायालयाच्या प्रक्रियेत स्थगिती देखील देण्यात आलेली नसणे, असे असतानाही नागपूर विभागात दोन संवर्गातील पदे परस्पर अदलाबदलीने भरणेबाबत कोणतीही अमंलबजावणी न करता शासन निर्णयाची पायमल्ली करून उल्लंघन करण्यात येणे, यामुळे अव्वल कारकून संवर्गातील आणि मंडळ अधिकारी संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर झालेला व होत असलेला अन्याय, सदर बाब लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येऊनही, अद्याप यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले व होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी अव्वल कारकून संवर्ग आणि मंडळ संवर्ग अधिकारी यांच्यामध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण कारवाई व प्रतिक्रिया. ” | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (५८) | “ तुमसर व मोहाडी (जि. भंडारा) येथे मोठ्या प्रमाणामध्ये रेती घाटाचे प्रमाण अधिक असल्याने रेती चोरी रोखण्यासाठी महसूल व पोलीस प्रशासन यांनी आपली वेगळी भरारी पथके तयार करणे, परंतु सदर भरारी पथके सर्वत्र रेती घाटाच्या ठिकाणावर न फिरणे त्याउलट विशिष्ट ठिकाणावर जाऊन रेती चोरीवर आळा घालणे, पोलीसांचे भरारी पथकाला मोहाडी तालुक्यातील करडी, देव्हाडा, वरठी येथील चोरी रोखण्यासाठी पथक तयार करणे, परंतु तुमसर तालुक्याची या पथकाला जबाबदारी न देणे, सर्वाधिक १४ ते १५ रेती घाट तुमसर तालुक्यात असणे, यामुळे सर्वाधिक रेती चोरी तुमसर तालुक्यातच होणे याच ठिकाणी भरारी पथक न येणे त्यामुळे रेती चोरी करणाऱ्या रेती माफियांना मोठ्या प्रमाणात झालेला लाभ, यावरून महसूल व पोलीस प्रशासन रेती माफियाशी साठ-गाठ करून रेती माफियांना चोरीसाठी अप्रत्यक्षरित्या मुभा देण्याचा होत असलेला गैरप्रकार, या गैरप्रकाराने शासनाचे कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडणे, सर्रास अवैध रेती चोरी प्रकरणामुळे गावातील अंतर्गत रस्ते खराब होणे, रस्ते खराब झाल्याने शासनाचे कोट्यवधी रुपयाचे झालेले नुकसान, तसेच पर्यावरण अनुमती घेण्यासाठी जनसुनावणी घेणे बंधनकारक केल्याने राज्यात पर्यावरण अनुमती न मिळणे, याउलट अवैध वाहतुकीमुळे तालुक्यात गुन्हेगारीच्या प्रकारात अधिक वाढ झाल्याने सामाजिक सुरक्षा धोक्यात येणे, रेती माफियाशी स्थानिक यंत्रणेची साठ-गाठ असल्याने शासनाने तात्काळ दखल घेऊन सखोल चौकशी करून दोषींविरुद्ध करावयाची कडक कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री. अतुल भातखळकर, ॲड. पराग अळवणी, श्री. राणाजगजीतसिंग पाटील, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मंदा म्हात्रे, सर्वश्री राम कदम, अभिमन्यु पवार, संतोष दानवे, सुनिल प्रभू, डॉ. देवराव होळी, कृष्णा गजबे, दौलत दरोडा, राजेश पवार, नामदेव ससाने, नरेंद्र भोंडेकर, राजू कारेमोरे, सुरेश भोळे, श्रीमती यामिनी जाधव, श्री. बालाजी कल्याणकर, संजय गायकवाड, बळवंत वानखेडे, अमीन पटेल, विनोद निकोले, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अमित झनक, विकास ठाकरे, श्रीमती सीमा हिरे, श्री. अबू आजमी, ॲड. आशिष जयस्वाल, ॲड. राहूल कुल, सर्वश्री जयकुमार गोरे, भिमराव तापकीर, वि.स.स. | कित्ता |
| (५९) | “ जिल्हा सोलापूर येथील पुनर्वसन विभागामध्ये प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी वाटप करणे वा त्याचा मोबदला संबंधित प्रकल्पग्रस्तांना/धरणग्रस्तांना देण्याचे | श्री. भारत भालके, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | शासनाचे धोरण असणे, परंतु शासनाचे यापूर्वीचे आदेश विचारात घेऊनच सोलापूर जिल्ह्यातील धरणग्रस्तांना पुनर्वसन कार्यालयाकडून आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी करून त्यानुसार योग्य पध्दतीने जमिनीचे वाटप करण्यात येत असताना पूर्वीची पध्दत बंद करून तथापि गेल्या वर्षापासून सोलापूर जिल्हा पुर्नवसन कार्यालयाकडून बेकायदेशीपणे अधिक गैरव्यवहार करून जमिनीचे वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, तसेच यामध्ये कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे, प्रचलित कायदा व नियमानुसार येथे जमीन वाटप करताना धरणग्रस्तांची धरणासाठी संपादित झालेली जमीन, कुटुंबातील व्यक्तींची संख्या यानुसार त्या जिल्ह्यातील पुनर्वसन कार्यालय त्या धरणग्रस्तास देय जमीन मंजूर करते. तसेच मौजे मल्लेवाडी ता.मंगळवेढा,जि.सोलापूर येथे गट क्र. १५६ /२/ब बनावट आदेश करून वाटप केलेले असणे, तसेच याबाबतची तक्रार संबंधित शेतकऱ्यांनी दाखल करण्यात येणे, तसेच बाधित शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा इशाराही दिलेला असणे, पुनवर्सनाच्या नवीन गावठाणच्या भूखंड वाटपात पुनर्वसनवासियांना त्यांना वाटप झालेल्या जमिनीचे आदेश परिशिष्टाप्रमाणे पावती पंचनामा व झालेल्या जमिनीच्या सातबारा व नमुना ड प्रमाणपत्र तसेच सदर भूखंड वाटपाच्या आदेशाबाबत प्रकल्पग्रस्तांस जबाबदार धरून कोणतीही पूर्वसूचना न देता शासनाने किंवा संबंधित पुनर्वसन विभागाने दिलेला भूखंड रद्द करण्यात येणे, तसेच अनेक भूखंड वाटपाला मागणी असताना काही एजंन्ट यांना किंवा दलाल यांना मध्यस्थी करून वाटप करण्यात येणे, तसेच मंगळवेढा येथील गट नं.८७ ते ९१ मध्ये भूखंड क्र.५४९ मध्ये क्षेत्र २००० चौ.फुटांचा भूखंड पसंत करण्यात आलेला असणे, परंतु संबंधित पुर्नवासित शेतकऱ्यांला अद्यापही | | |

कोठेही भूखंड मिळालेला नसणे, तसेच सन ऑगस्ट, २०१७ मध्ये मंगळवेढा येथील कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आलेले असणे, परंतु मंगळवेढासह पंढरपूर तालुक्यातील काही स्थळ पाहणी न करता भूखंड वाटप आदेश केलेला आहे. परंतु मुळात सदर भूसंपादन चुकीचे असून न्यायालयात केस सुरू असताना अशा बेकायदा व चुकीच्या पध्दतीने भूखंड वाटप करून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केलेला असणे, तसेच यामध्ये संबंधित पुनर्वसन अधिकारी यांनी बेकायदेशीरपणे अर्ज, चुकीचे दाखले देणे, बनावट आधारकार्ड तसेच पॅनकार्ड बोगस तयार करून एजंन्ट हाताशी धरून सुमारे ६०० एकर जमिनीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येणे, तसेच याबाबत पुणे,सोलापूर, सातारा या भागातील १३७ तक्रारी दाखल झालेल्या असणे, त्यानुसार त्या धरणग्रस्तास कोणत्या जिल्ह्यात जमीन वाटप करावयाची त्याचा प्रस्ताव सदरील पुनर्वसन कार्यालयात उपलब्ध असतो अशी पूर्वीची पध्दत बंद करणे, सोलापूर जिल्ह्यात पुनर्वसन कार्यालयाकडून कागदपत्रांची खातरजमा न करता जमिनीचे वाटप झालेले असणे, पुनर्वसन विभागातील अधिकारी मोहिनी चव्हाण जिल्हा पुनर्वसन अधिकारी सोलापूर यांनी केलेल्या गैरव्यवहार, तसेच अप्पर जिल्हाधिकारी अंतिम सही शिफारशीशिवाय होत नाही. त्यामुळे शासनाने याची तातडीने दखल घेऊन सदर प्रकरणी मूळ प्रकल्पबाधित आहेत त्यांना तातडीने न्याय देऊन अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी असणे, तसेच शासनाने सदर आर्थिक गैरव्यवहाराची एक समिती नेमून सखोल चौकशी करावी अशी पुनर्वासियांची मागणी असणे, तसेच शासनाने मागील एक वर्षापासूनच्या सर्व प्रकरणांची (व्यवहाराची) चौकशी करण्याची आवश्यकता असणे, तसेच या प्रकल्पग्रस्ताच्या पुनर्वसन करण्याबाबत शासनाने मूळ प्रकल्पबाधित असलेल्या नागरिकांना न्याय देणे आवश्यक असणे, परंतु शासनाने याबाबत सध्या कोणतीही भूमिका घेतली

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | नसल्याने प्रकल्पबाधित जनतेचा शासनाच्या प्रति व पुनर्वसन विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या प्रति सामान्य जनतेमध्ये तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, परिणामी शासनाने तातडीने भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्यांना निलंबित करणे अशी बाधित प्रकल्पग्रस्तांची मागणी, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका. ” | | |
| (६०) | “ राज्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची स्थिती बिकट असल्याचे केंद्रीय ग्रामीण अहवालातून निदर्शनास आल्याची बाब माहे जानेवारी २०२० च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची ५० टक्के तर प्राथमिक आरोग्य केंद्रावरील (पीएचसी) ७ टक्के पदे रिक्त असणे, निमवैद्यकीय पदे ही मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे अहवालात नमुद करणे, राज्यात सन २००५ ते २०१९ या काळात ग्रामीण रुग्णालय आणि पीएचसी वरील लोकसंख्या वाढली तरी त्या तुलनेत डॉक्टर, परिचारिकासह निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांचा तुटवडा असणे, यामुळे ग्रामीण जनतेला अनेक समस्येचा सामना करावा लागत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | श्री. अमीत साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री संजय केळकर, किसन कथोरे, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, रणधीर सावरकर, बंटी भांगड्या, डॉ. देवराव होळी, सर्वश्री किशोर जोरगेवार, कृष्णा गजबे, विनोद अग्रवाल, सुधीर मुनगंटीवार, अबू आजमी, रईस शेख, डॉ. संजय कुटे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | कित्ता |
| (६१) | “ राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून दिनांक २६ जानेवारी, २०१४ रोजी पासून रुग्णांना व प्रसुतीसाठी अडलेल्या महिलांना गोल्डन अवरमध्ये तातडीने वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून शासनाने १०८ क्रमांकाची | श्री. अमीत साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. दिपक | कित्ता |

रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणे, त्यासाठी पुरवठादार म्हणून बी.व्ही.जी.इंडिया या संस्थेची निवड करण्यात येणे, त्यानुसार कंपनीने राज्यात २२३ प्रगत, तर ७०४ प्राथमिक जीवनदायी, अशा एकूण ९३७ रुग्णवाहिकांच्या सेवा पुरविण्यात येणे, सदर योजनांतर्गत झालेला सामंजस्य करार दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी संपुष्टात येणे, परंतु रुग्णसेवेत अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून सदरचा करार संपुष्टात येऊनही सन २०१९ मध्ये कंपनीस तीनवेळा मुदतवाढ देण्यात येणे, तथापि सद्यःपरिस्थितीत राज्याच्या अनेक भागातून या रुग्णवाहिकांच्या सेवासंदर्भात सतत तक्रारी येत असणे, तसेच रुग्णवाहिकेतील डॉक्टरांचे वेतनदेखील अनेक महिन्यांपासून देण्यात न येणे, या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याबाबत शासनाने विशेष समिती गठीत करून समितीने आपला अहवाल मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे सादर करण्यात येऊनही शासनाकडून सदर समितींच्या अहवालावर कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी राज्यातील सर्वसामान्य (विशेष ग्रामीण भागातील) जनतेमध्ये पसरलेले चिंतेचे व नैराश्याचे वातावरण व शासनाप्रति असंतोषाची भावना, त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही. ”

चव्हाण, अशोक पवार, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री. अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, अबू आजमी, रईस शेख, गोवर्धन शर्मा, डॉ. संजय कुटे, सर्वश्री. रणधीर सावरकर, जयकुमार गोरे, ॲड.राहूल कुल, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (६२) | “ राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या ऐवजी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात प्रतिमाह रु. ४० हजार मानधनावर नेमणूक करण्याबाबत शासन निर्णय आरोग्य विभाग दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये तरतूद केली असणे, संपूर्ण राज्यात साधारणतः १३०० च्या आसपास बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी मानधनावर कार्यरत असल्याचे निदर्शनास येणे, तथापि मागील ५ महिन्यांपासून संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना मासिक वेतन न मिळाल्याने ते प्रचंड आर्थिक अडचणीत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, याच दरम्यान एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यास बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासनाकडून तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, परिणामी ग्रामीण भागामध्ये बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, जिल्हा रुग्णालयांच्या धरतीवर प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आयुष विभाग स्थापन करण्याची आवश्यकता, बंधपात्रीत, नियमित एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालयांमध्ये नियमित नेमणूक देण्यात आल्यास बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना कार्यमुक्त न करता अन्य प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये किंवा ग्रामीण रुग्णालयांमध्ये सामावून घेण्याची आवश्यकता, त्यांच्या मानधनात प्रतिवर्षी किमान ८ टक्के वाढ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | डॉ. राहूल आहेर, वि.स.स. | कित्ता |

| | | | |
|---|---|---|---|
| (६३) | “ वाशिम जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागात २५ प्राथमिक आरोग्य केंद्र व १५३ उपकेंद्रे सद्यस्थितीत कार्यान्वित असणे, वाशिम जिल्ह्याच्या सन २००१ च्या जनगणनेनुसार पाहता शासनाच्या मानकास अनुसरून दर ३० हजार लोकसंख्येला १ प्राथमिक आरोग्य केंद्र याप्रमाणे २८ प्राथमिक आरोग्य केंद्रांची आवश्यकता असल्याचे निदर्शनास येणे, ३ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर असणे, तथापि सन २०११ च्या बृहत आराखड्यानुसार जिल्ह्यात आणखी ६ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राची आवश्यकता असल्याचे निदर्शनास येणे, नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता दिनांक १४ ऑगस्ट २००६, २७ जानेवारी २०१० व दिनांक १४ ऑगस्ट २०१८ रोजीच्या जिल्हा नियोजन समितीच्या ठरावानुसार शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, वाशिम जिल्ह्यात सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारीत बृहत आराखड्यानुसार एकूण ३३ प्राथमिक आरोग्य केंद्र आवश्यक असल्याने आणखी ६ प्राथमिक आरोग्य केंद्रांचा अनुशेष बाकी असणे, तसेच सन २०१३ च्या बृहत आराखड्यानुसार जिल्ह्यात मानोरा व कारंजा तालुक्यांत एकूण १८ उपकेंद्रे प्रस्तावित असल्याची बाब निदर्शनास येणे, जिल्ह्यात आरोग्य विभागाकरिता जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकरिता ३ वाहने व तालुका आरोग्य अधिकारी यांना ६ वाहनांची पर्यवेक्षणासाठी आवश्यकता असल्याची बाब निदर्शनास येणे, कार्यालयीन फर्निचर, प्रसुती टेबल, शस्त्रक्रियागृहामधील टेबल, औषधे ठेवण्याकरिता रॅक इत्यादी साहित्याची आवश्यकता असल्याची बाब निदर्शनास येणे, हाफकिन संस्थेकडून वेळोवेळी औषधी पुरवठा होण्याकरिता हाफकिनच्या संबंधित अधिकाऱ्यांना आदेशीत करण्याची आवश्यकता, वाशीम जिल्ह्यात कारंजा येथे उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे ९० टक्के काम पूर्ण १० टक्के काम ३ वर्षांपासून अपूर्ण, तसेच आवश्यक कर्मचारी, उपकरणे इ. उपलब्ध नसणे, तसेच वाशीम येथील स्त्री रुग्णालय इमारतीचे काम ७ | श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स. | कित्ता |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | वर्षांपासून सुरू असणे, तथापि आवश्यक साहित्य, उपकरणे, कर्मचारी, डॉक्टर यांची नेमणूक न होणे, त्यामुळे रुग्णालय सुरू न होणे, त्यामुळे जिल्ह्यातील महिलांना होणारा त्रास, तसेच मानोरा येथे तालुक्याच्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याची आवश्यकता, त्यासाठी तरतूद करण्याची गरज, त्या तालुक्यातील लोकांना उपचारासाठी यवतमाळ जिल्हा किंवा वाशीम येथे जाण्याची गरज निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. " | | |
| (६४) | " राज्यात एक्युट इन्सेफलायटिस सिंड्रोम (एईएस) या आजाराच्या रुग्णांचे प्रमाण सन २०१६ ते २०१८ या तीन वर्षाच्या तुलनेत सन २०१९ या वर्षा अखेरपर्यंत दुप्पटीने वाढलेले असणे, या आजारात मेंदूत तीव्र स्वरुपाच्या तापाची लक्षणे आढळणे, या आजारावरती उपचार करण्यासाठी व नियंत्रण ठेवण्यासाठी विविध संस्थांकडून मिळणारे अनुदान पूर्णपणे वापरण्यात न येणे, परिणामी उपचार पद्धतीत असलेल्या विसंगतीमुळे आतापर्यंत २०० पेक्षा जास्त रुग्णांचा झालेला मृत्यू, या आजारावर उपचार करण्यासाठी डॉक्टरांकडून होणाऱ्या हलगर्जीपणामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकात वाढत असलेली असुरक्षिततेची भावना, या आजारावर तात्काळ औषधोपचार होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना " | डॉ. राहूल पाटील, श्री. मंगेश कुडाळकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. विश्वनाथ भोईर, ज्ञानराज चौगुले, वि.स.स. | कित्ता |
| (६५) | " नागपूर शहरातील रामदासपेठ भागामध्ये भागीदारी तत्त्वावर " मेडीट्रीना इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स हॉस्पिटल, " सुरू करण्यात येणे, यामध्ये प्रमुख संचालक म्हणून डॉ. समीर नारायणराव पालतेकर व श्री. गणेश चक्कावार (C.A.) यांची भागीदारी असणे, श्री. गणेश चक्कावार यांना | सर्वश्री. विकास ठाकरे, बळवंत वानखेडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. राजु पारवे, सुभाष धोटे, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, कु. प्रणिती शिंदे, | कित्ता |

डॉ. पालतेकर यांनी गैरव्यवहार केल्याचा संशय निर्माण होणे, त्यांनी हॉस्पिटल मधील हिशोबांची तपासणी करणे, यामध्ये प्रमुख संचालक डॉ. समीर पालतेकर यांनी हिशोबामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे, त्यात महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत अनेक रुग्णांच्या रक्कमेमध्ये गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले असणे, याबाबत श्री. चक्कावार यांनी पोलीस स्टेशन, सीताबर्डी, नागपूर येथे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने डॉ. पालतेकर यांचेवर भादंवि ४२० सह ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०-बी, ३४ अंतर्गत गुन्हे सुध्दा दाखल करण्यात आले असणे, परंतु शासनाने महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत केलेल्या गैरव्यवहारामध्ये यादीतुन नाव का काढण्यात येऊ नये या नोटीसी व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, त्यामुळे शासनाप्रति नागरिकांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, वि.स.स.



(६६) “ मुंबईस्थित उर्दू घर वसण्यासाठी पर्याप्त जागा वा आनुषंगिक कार्यालयीन सोयी-सुविधा अद्यापि पूर्ण न होणे, तत्कालीन शासनातर्फे उर्दू घरासाठी ५० कोटीचे अनुदान देण्याचे आश्वासन देण्यात आले व भायखळा येथे जागा देण्याचे आश्वासन देण्यात आले असून, सदर विषयी पुढे कोणतीही कारवाई न करणे, मुंबई रंगभवन येथे हिंदी, मराठी भाषेसोबतच उर्दू भाषेसाठी कार्यालय देण्याचे आश्वासन देऊनही कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच या संदर्भात वेळोवेळी तसेच न्या.पाटील समितीच्या माध्यमातून विचारल्या गेलेल्या न्याय्य प्रश्नांचीदेखील सोडवणूक संबंधित यंत्रणेकडून आजवर न झाल्याने तमाम उर्दू भाषिकांच्या मनात निर्माण झालेले संशयाचे वातावरण, याबाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही उपाययोजना, आणि प्रतिक्रिया. ”

सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. कित्ता

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (६७) | “ राज्यातील आघाडी सरकारने अल्पसंख्याक समाजाला ५ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेऊन स्वतंत्र अध्यादेश निघणे, अल्पसंख्याक समाजाचे आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी विविध योजना तयार करणे, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाकरिता शिष्यवृत्तीची तरतूद करणे, महिला सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने अल्पसंख्याक समाजातील महिलांना आरक्षण देणे, अशा प्रकारच्या मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, परिणामी अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, अमित झनक, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखेडे, राजु पारवे, राजु आवळे, वि.स.स. | कित्ता |
| (६८) | “ वसमत तालुक्यातील हट्टा ते सावंगी (बु.) (ता. हिंगोली) हट्टा ते सावंगी (बु.) या रस्त्याचे काम दिनांक ११ नोव्हेंबर २०१९ रोजी पूर्ण करण्यात येणे, परंतु सदरील रोडचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून सदर रस्त्यावर जागोजागी खड्डे पडलेले असणे, तसेच सदर रस्त्यावरील नाला गटारीचे काम देखील अपूर्ण असल्याचे दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदर कामावर शासनाचे लाखो रुपये खर्च होऊनही जनतेला अपेक्षित उपयोग होत नसणे, परिणामी त्या परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याप्रकरणी शासनाने सदर रस्त्याची पाहणी करून झालेल्या कामाची चौकशी करण्याची तसेच संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांचेविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता व भूमिका. ” | श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. | कित्ता |

(६९) “ नवा मोठा प्रकल्प येणार, गावाचा विकास होणार, नोकरी मिळणार ,परिसराची भरभराट होणार या कल्पनेने नाशिक रोड पासून जवळच असलेल्या सुमारे आठ गावातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी कवडीमोल भावात शासनाला देणे, त्यावर शासनाकडून औद्योगिक विद्युत निर्मिती केंद्र उभी करणे, परंतु कालांतराने अविरत वीजनिर्मिती करणारा एकलहरे प्रकल्प कालबाह्य झाल्याचे शासनाकडून घोषित केला जाणे, प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या त्यांना तब्बल साठ वर्षे उलटून गेली तरीदेखील प्रकल्पग्रस्तांचे दाखले न मिळणे, एकलहरे औष्णिक वीज प्रकल्पाला ६० वर्षे पूर्ण झाले असून दोन टप्प्यात असलेल्या या प्रकल्पात एकूण पाच वीजनिर्मितीचे संच कार्यरत असणे, त्यापैकी सन २०११ साली दोन संच कालबाह्य झाल्याने ते बंद करण्यात येणे, या प्रकल्पासाठी १३३९ शेतकऱ्यांनी जमिनी देण्यात येणे त्यापैकी १११९ बाधितांना अद्यापि प्रकल्पग्रस्तांचे दाखले न मिळणे, उलट जे २२० प्रकल्पग्रस्त बाधित नोकरीवर घेण्यात आले त्यांच्याही स्पर्धा परीक्षा घेतल्याने त्यांच्या भवितव्याचा प्रश्न उभा राहणे, या प्रकल्पग्रस्तांना अथवा त्यांच्या पाल्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून दाखला मिळाल्यानंतर कोणत्या अटी शर्ती न लावता शासनाच्या आदेशाप्रमाणे नोकरीत सामावून घेणे बंधनकारक असणे, प्रशासन व कंपनीकडून एकलहरे प्रकल्पाबाबतीत वेगळा नियम लावण्यात येणे, याकरिता शेतकऱ्यांच्या पाल्यांना एकलहरे प्रकल्पात नोकरी मिळणे आणि प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त म्हणून तातडीने दाखला मिळणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ”

श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री हिरामण खोसकर, दिलीपराव बनकर, नरहरी झिरवाळ, श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

कित्ता

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (७०) | "सर्वसामान्य ग्राहकांच्या वीज पुरवणाऱ्या महावितरणाच्या अतिरिक्त वीजखरेदी व विक्रीत तब्बल ३,२७० कोटी रुपयांची तफावत असल्याचे माहे फेब्रुवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, थकीत वीज देयकांची रक्कम भरमसाट असल्याने एकूण महसुलाच्या ७५ टक्के रक्कम थकबाकीचीच असल्याचे भीषण वास्तव नवी मुंबईत दिनांक ८ फेब्रुवारी २०२० रोजी झालेल्या दरनिश्चितीसंबंधीच्या जनसुनावणीत समोर येणे, कंपनीला पुढील पाच वर्षांत सरासरी ७,२७१ कोटी रुपयांच्या महसुलाची गरज असल्याने, वीज दरवाढीचा सर्वसामान्यांवर बोजा पडणार नसल्याचे मा. ऊर्जामंत्री सांगत असतानाही महावितरणाने कमी वीजवापर करणाऱ्या ग्राहकांवरच पाच ते आठ टक्के दरवाढीचा बोजा टाकण्याचा प्रस्ताव दिलेला असणे, नवी मुंबईत मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या भागांसाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने घेतलेल्या सुनावणीत कंपनीकडून वीज बिलांच्या वसुलीतच घोळ केला जात असल्यानेच महसुलाची वाढती गरज असल्याचे दिसून येणे, महावितरणाने २०१८-१९ मध्ये ५,६७० तर २०१९-२० मध्ये ३,५६७ कोटी रुपयांची अतिरिक्त वीजखरेदी केलेली असून या अतिरिक्त वीजखरेदीच्या तुलनेत २०१८-१९ मध्ये ३,७७८ कोटी तर २०१९-२० मध्ये २,९९१ कोटी रुपयांच्याच विजेची विक्री होत असणे, वीजखरेदी व विक्री यातील तूट या दोन्ही वर्षी अनुक्रमे १,८९२ व १,३७८ कोटी रुपये असणे, यातूनच महावितरणाची भीषण स्थिती उघडकीस येणे, महावितरण वीज खरेदी कराराद्वारे निर्मिती प्रकल्पांकडून वीज खरेदी करते. करारानुसार वीज खरेदी केली नाही तरी, स्थिर शुल्काच्या रुपात काही ठराविक रक्कम त्या वीज प्रकल्पाला द्यावीच लागत असणे, अशाच एका | ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री प्रशांत ठाकूर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, अमीत साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. श्रीनिवास वनगा, देवेंद्र फडणवीस, अतुल भातखळकर, राणाजगजीतसिंह पाटील, राम कदम, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री संतोष दानवे, अभिमन्यु पवार, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. वैभव नाईक, महेंद्र थोरवे, मंगेश कुडाळकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री विश्वनाथ भोईर, सुनिल प्रभू, राधाकृष्ण विखे-पाटील, अजय चौधरी, चेतन तुपे, सुनिल टिंगरे, सुनिल शेळके, अशोक पवार, मोहन मते, प्रमोद पाटील, चंद्रकांत जाधव, किशोर जोरगेवार, राजु आवळे, प्रताप सरनाईक, अमिन पटेल, वि.स.स. | कित्ता |

प्रकल्पाकडून महावितरणाला आता ५.१० रुपये प्रति युनिट दराने वीज मिळत असताना पण त्याचवेळी अन्य प्रकल्प ३.३० रुपये दराने वीज देण्यास तयार असतानाही कराराच्या नावाखाली महावितरण नाहक महागडी वीज खरेदी करीत असणे, वास्तवात एकदा स्थिर आकार दिल्यानंतर वीज खरेदीचे बंधन नसणे, त्यामुळे त्या संबंधित प्रकल्पाला ते शुल्क देऊन ही महागडी वीज खरेदी बंद करण्यासाठी व सर्वसामान्य ग्राहकांवर लादण्यात येणारी दरवाढ थांबवण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ''

(७१) '' महाराष्ट्र राज्यात आपल्या मातृभाषेला प्राधान्य देण्यात येऊन सर्व व्यवहार सुद्धा मातृभाषेतूनच होत असताना सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात मात्र सीमाभागांमध्ये फक्त कन्नड शाळा अस्तित्वात असल्याची धक्कादायक बाब माहे जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, सदरहू सीमा भागात २४ गावे असून या २४ गावात एकही मराठी शाळा नसल्याची अतिशय गंभीर बाब आढळून येणे, यामुळे मराठी शाळेकरिता विद्यार्थी व विद्यार्थ्यांना अतिशय दूर असलेल्या मराठी शाळेत जाण्यासाठी अतिशय लांबचा प्रवास करावा लागत असणे, यामुळे विद्यार्थी व पालक यांचा महाराष्ट्र राज्याकडे बघण्याचा बदललेला दृष्टीकोन तसेच विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्र शिक्षण मंडळाबाबत निर्माण झालेली नकारात्मक भावना, सबब, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी इतर भाषिक शाळेमध्ये प्रवेश घेऊ नये यासाठी मराठी शाळांची निर्मिती करण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. ''

सर्वश्री विक्रमसिंह सावंत, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, हिरामण खोसकर, लहू कानडे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. विकास ठाकरे, सुभाष धोटे, कुणाल पाटील, ऋतुराज पाटील, धिरज देशमुख, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. राजु पारवे, वि.स.स.

कित्ता

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (७२) | “ जामसूद (ता.गुहागर, जि. रत्नागिरी) येथील जिल्हा रत्नागिरी परिषदेच्या मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी घरातून जळाऊ लाकडे आणण्याची सक्ती करण्यात येत असणे, सदर प्रकार मागील बऱ्याच दिवसांपासून सातत्याने सुरु असणे, सदर शाळेतील विद्यार्थी पाठीवर दप्तर व डोक्यावर लाकडाची मोळी घेवून शाळेत जातानाचा दिनांक ०४ व ०५ फेब्रुवारी २०२० रोजीचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने गुहागरच्या शिक्षण क्षेत्रात उडालेली खळबळ, एकीकडे मुलांच्या शाळेतील गळतीचे प्रमाण थांबावे व त्यांना शाळेची आवड निर्माण व्हावी या हेतूने सरकारच्या शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत प्रत्येक शाळेत मुलांना मोफत आहार दिला जात असणे, तसेच या योजनेसाठी लागणारा इंधन खर्चही शाळेला दिला जात असणे, असे असतानाही जामसूद येथील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना पोषण आहार शिजविण्यासाठी लागणारी लाकडे आणण्याची सक्ती विद्यार्थ्यांवर करण्यात येत असणे, शाळेत येताना लाकडे आणली नाहीत तर मार बसेल असा दम शिक्षकांनी दिल्याचे निदर्शनास येणे, तसेच केंद्र सरकार उज्वल गॅस योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भाग धूरमुक्त करून महिलांना दिलासा देत असताना शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना डोक्यावरून लाकडाची मोळी नेण्याचा प्रसंग यावा ही दुर्देवाची बाब ठरली असल्याची संतापजनक प्रतिक्रिया संपूर्ण गुहागर तालुक्यात उमटलेली असणे, यामुळे या संपूर्ण प्रकरणाची विनाविलंब सखोल चौकशी करून संबंधित दोषींविरोधात ठोस कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. अतुल भातखळकर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. राम कदम, अभिमन्यु पवार, कालीदास कोळंबकर, प्रमोद पाटील, वि.स.स. | कित्ता |

(७३) “ मुंबईमध्ये अनेक खाजगी शाळांनी अवैधपणे केलेल्या फी वाढी विरोधात पालकांनी मोठे जन आंदोलन उभारल्याचे निदर्शनास येणे, तसेच अनेक खाजगी व अनुदानित शाळांनी पालकांना शैक्षणिक साहित्यांची खरेदी ही शाळेमधूनच करावी अशी सक्ती केल्याचेही निदर्शनास येणे, तसेच धक्कादायक बाब म्हणजे शासन आदेशांनंतरही अनेक नामांकित शाळा प्रशासनांनी फी वाढ सुरूच ठेवणे, राज्य शासनाचा कायदा आपल्याला बंधनकारक नसल्याचे ही सांगण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, याबाबत फी वाढीवर नियंत्रण करण्याकरिता शासनाने एक समिती नियुक्त केल्याचे निदर्शनास येणे, परंतु समितीच्या अहवालाबाबत सद्यस्थिती काय असल्याचे स्पष्ट न होणे, त्यामुळे अवैधपणे फी वाढ करणाऱ्या व राज्य शासनाच्या कायद्यास न जुमानणाऱ्या शाळांच्या मान्यता काढून घेण्याची होत असलेली मागणी, तसेच, समितीने करण्यात येणाऱ्या शिफारसीनुसार फी वाढीबाबत योग्य तो निर्णय घेण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. ”

श्री. अतुल भातखळकर, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, ॲड. आशिष शेलार, वि.स.स.

(७४) “ राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्व शाळांमध्ये बोअरवेल, विहिरी, सार्वजनिक टाक्या व टँकरद्वारा पाणीपुरवठा करण्यात येत असणे, त्यामध्ये शाळांतील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी व अन्य कारणांसाठी पाणीपुरवठा करण्यात येत असणे, पिण्याचे पाणी दूषित असल्याच्या तक्रारी अनेक प्राथमिक जिल्हापरिषद शाळा प्रशासनाकडून शासनाकडे करण्यात येणे, त्यानुसार मुंबई शहर मुंबई उपनगर वगळता राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी ३४ जिल्ह्यांमधील पिण्याचे नमुने माहे मार्च, २०१९ मध्ये महाराष्ट्र सार्व.आरोग्य प्रयोग शाळांमध्ये तपासण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल प्रसिध्द करण्यात येणे, या अहवालानुसार

सर्वश्री. भारत भालके, श्री. अबू आजमी, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | वाशिम जिल्ह्यात २७ टक्के, हिंगोलीमध्ये २४ टक्के, चंद्रपूरमध्ये २१, औरंगाबाद, नांदेड आणि रायगड मध्ये २० टक्के, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, जालना, गोंदिया, पालघर आणि सिंधुदूर्ग १५ टक्के, नागपूर, भंडारा, ठाणे, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, सांगली, नंदूरबार, वर्धा, गडचिरोली, धुळे आणि जळगांव या जिल्ह्यांमध्ये ५ टक्के पाणी दूषित असल्याचे नमूद करण्यात येणे, सदर दूषित पाणी शाळेतील विद्यार्थ्यांनी प्यायल्यामुळे या विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊन त्यामुळे मुत्रपिंड दगड, मुत्राशय दगड (Urin stone) मुतखडा, रक्तातील ऑक्सिजन पातळी कमी होणे, या पाण्यात जास्त लोह असल्यामुळे सायर्डोसिस आणि मुलाच्या अवयवांचे नुकसान होणे, गॅस आतडीमध्ये तयार होणे, रक्तातील हिमोग्लोबीनला मेथीमोग्लोबीन रुपांतरीत करणे, तसेच शालेय मुलींमध्ये १५ प्रकारचे विविध कर्करोग व जन्मातील दोष निर्माण होणे, उच्च रक्तदाब व पोटाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढणे, तसेच दातांचे विविध आजार, हाडे जाड होऊन थॉयरोडग्रंथीला धोका निर्माण होणे, हाडांतील कॅल्शियम कमी होणे, तसेच शिसे या धातूमुळे मेंदू, यकृत, मूत्रपिंड आणि हाडांमध्ये दोष निर्माण होणे, तसेच दूषित पाण्यामुळे व त्यातील विषारी घटकांमुळे शालेय विद्यार्थ्यांना विविध त्वचाविकार व त्वचेचा कर्क होण्याची दाट शक्यता असणे, इत्यादि जीवघेण्या विविध आजारांना शाळेतील लहान विद्यार्थी व विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत असल्याने व या दूषित पाणी पिल्यामुळे कालांतराने विविध आजाराचे लक्षणे लवकर आढळून येत नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना प्रौंढ वयामध्ये याचे परिणाम दिसून येणे, यासारखे आजार आढळून येणार असल्याचे दि.२४ फेब्रु.२०२० रोजी वात्यासुमारास आढळून येणे,परिणामी विद्यार्थी यांच्या | | |

आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, वर्ग व त्यांच्या पालकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, याप्रकरणी शालेय विद्यार्थ्यांना पिण्याचे शुध्द पाणी मिळण्याच्यादृष्टीने शासनाने तातडीने राज्यातील सर्व शाळांमध्ये शुध्द पाणी विद्यार्थ्यांना मिळणेबाबत RO मशिन (जलशुध्दीकरण उपकरणे) बसविण्याची विद्यार्थी व पालकांची मागणी असणे, परंतू त्या मागणीचा अद्यापही शासनाने कोणतीही उपाययोजना केल्या नसल्याने शासनाप्रति सामान्य जनतेची संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. ''

(७५) '' म्हाडाने मुंबई उपनगरातील कांदिवली चारकोप-गोराई येथे सुमारे तीस वर्षापूर्वी जागतिक गृहप्रकल्पांतर्गत सभासदांच्या सोसायट्या करून जागांचे वाटप करण्यात येऊन त्यावर बैठया चाळीच्या स्वरूपात घरे बांधण्यात येणे, सदरहू प्रकल्पाची रचना करतांना पुढील विकासाचा विचार करता पाण्याच्या पाईप लाईन, मलःनिस्सारण व्यवस्था, शाळा-कॉलेज, मैदान, हॉस्पिटल, समाजमंदिर यांची रचना करण्यात न येणे, यामुळे सध्या तेथील नागरिकांना पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण होत असणे, तसेच वाढत्या कुटुंबामुळे एक अधिक एक अशा घरांची बांधकामे करण्यात येणे, यामुळे सुयोग्य पध्दतीने वसविण्यात आलेल्या वसाहतीमध्ये अनेक अडचणी निर्माण होणे, सध्या मुंबईत शहरात वा उपनगरात अल्प, मध्यमवर्गीयांकरिता घरे बांधण्याकरिता जागा उपलब्ध नसणे, यामुळे चारकोप-गोराई येथील बैठया चाळी, बंगले यांचा पुनर्विकास म्हाडामार्फत करून त्यांना दुप्पट क्षेत्रफळाचे घर देणे पुढील ५० वर्षाच्या विकासाचा विचार करता या वसाहतीचा विकास करून कचरा, सांडपाणी, पिण्याचे पाणी, रस्ते, रुग्णालय, शाळा, कॉलेज, मैदाने, समाजमंदिर, धार्मिक स्थळे यांचा नियोजन

श्री. सुनील राणे, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | पध्दतीने रचना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता, प्रतिकिया व भूमिका. ” | | |
| (७६) | “ मुंबईत दरवर्षी सरासरी ८ ते १० हजार झोपड्यांची निर्मिती होणे, पुनर्वसन योजना खोळंबल्यामुळे झोपडपट्टीमुक्त मुंबई कुठेही न दिसणे, निर्माण झालेली प्रचंड मंदी आणि पात्र अपात्र झोपडीधारक निश्चित करण्याबाबत होणाऱ्या भ्रष्टाचारामुळे पुर्नविकास योजनेला खीळ बसणे, झोपडपट्टीवासीय एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करीत विकासकाची निवड करणे, झोपडपट्टीधारकांच्या कन्सेंट आणि प्रकल्प छोट्या विकासकांकडून मोठ्या विकासकांना विकले जाणे, आर्थिक असमर्थतेमुळे विकासक स्वतःहून सदर योजना रद्द करणे, साडे बारा लाख झोपडपट्टी मुंबई शहरात असताना २३ वर्षात पुनर्वसन योजनेअंतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या झोपडपट्ट्यांच्या जागी निर्माण झालेल्या घरांपैकी फक्त २.०६ लाख परिवारांना नवीन घरे मिळणे, परिणामी पुर्नविकासात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, अमित झनक, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखेडे, राजु पारवे, राजु आवळे, वि.स.स. | |
| (७७) | “ मुंबई पश्चिम उपनगरातील कामारोड, रिलायन्स हॉटेलच्या बाजूला (अंधेरी पश्चिम) असलेल्या एसआरए योजनेतील विशाल-ए-१ या इमारतीचे छत कोसळून दिनांक २ फेब्रुवारी, २०२० रोजी ४ रहिवाशी जखमी होणे, उक्त इमारतीचे एसआरए प्रशासनाकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची रहिवाश्यांकडून | सर्वश्री. मंगेश कुडाळकर, अजय चौधरी, अबू आजमी, वि.स.स. | |

सातत्याने होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी इमारतीचे बांधकाम दिवसेंदिवस धोकादायक होत असल्याने मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तीय हानी होण्याची शक्यता, एसआरए प्राधिकरणाने तात्काळ सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून इमारतीचा धोकादायक भाग तात्काळ दुरुस्त करून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

(७८) “ राज्यातील मुंबई शहर उपनगर येथील न.भू.क्र. ६०८ (पैकी), ६६८ (पैकी) मौजे वांद्रे, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ या जागेवर म्हाडाच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत सोलंकी अँड असोसिएट झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवित असणे ; म्हाडाच्या जागेवर म्हाडाची कोणतीही परवानगी न घेता झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मान्यता दिलेली असणे ; मुख्य कार्यकारी अधिकारी मुंबई (म्हाडा) व कार्यकारी अभियंता (प), म्हाडा, वांद्रे, मुंबई यांनीही सदर भूखंड झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून वगळणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन अधिकारी यांना कळविले असणे ; मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांनीही सदरचा भूखंड झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट करणे योग्य होणार नाही, असे स्वयंस्पष्ट अभिप्राय दिलेले असणे ; उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत सदरच्या जागेवरील झोपडपट्टी धारकांनी विकासकाची नियुक्ती रद्द करून फेर सर्वेक्षण करण्याची मांगणी केलेली असणे ; या संपूर्ण झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाच्या मंजुरीबाबत सखोल चौकशी करून न.भू.क्र. ६०८ (पैकी), ६६८ (पैकी) मौजे वांद्रे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेल्या सर्व एल.ओ.आई. रद्द करण्यात याव्यात तसेच फेरसर्वेक्षण करून अपात्र लाभार्थ्यांची नावे वगळून नव्याने “ परिशिष्ट २ ” ची सूची तयार

श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | करण्यात यावी व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत तेथील रहिवाशांची अनेक दिवसांपासून मांगणी असूनही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष ; तेथील असहाय रहिवाशांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत राज्यशासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| (७९) | “ पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीपासून दहा किलोमिटर परिसरात रस्त्यांचे सुयोग्य जाळे (रोड नेटवर्क प्लॅन) शासनाच्या नगरविकास विभागाने सन २०१३ मंजूर केला असणे, या रस्त्यांच्या जाळ्यानुसार या दोन्ही महापालिका हद्दीलगतच्या परिसरात सुयोग्य रस्त्यांचे जाळे निर्माण करून या महानगरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी एक चांगले पाऊल शासनाने उचलले असणे, तसेच प्लॅन नुसार कित्येक रस्त्यांची कामे शासनाने अद्याप सूरू केलेली नसणे, तदनंतर स्थापन झालेल्या सन २०१५ मध्ये पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांनी पुणे महानगरच्या ५० किलोमीटर परिसरात पुणे शहराच्या वर्तुळाकार दोन वेगवेगळे रिंग रोड प्रस्तावीत करूनही अद्यापही या दोन्ही रिंग रोड बाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नसणे, पुणे शहरातील स्वारगेट ते हडपसर या मार्गावर तयार करण्यात आलेली बीआरटी योजना संपुर्णपणे फसलेली असल्याने या रस्त्यावर सातत्याने मोठ्या प्रमाणवर वाहतूक कोंडी होत असणे. या रस्त्याचे नव्याने | ॲड. राहूल कुल, श्री भिमराव तापकीर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री. संग्राम थोपटे, महेश लांडगे, चेतन तुपे, सुनिल कांबळे, सुनिल टिंगरे, ॲड. अशोक पवार, वि.स.स. | |

नियोजन करण्याची आवश्यकता असणे, पुणे व पिंपरी व लगतच्या परिसरात मेट्रो प्रकल्पांची कामे संथ गतीने चालू असून नव्याने मांजरी ते हिंजवडी, फुरसुंगी-खडकवासला-स्वारगेट, वनाज-रामवाडी रांजणगाव-वाघोली-गणपती, निगडी-चाकण या प्रस्तावित-भोसरी मेट्रो मार्गांचे बृहत आराखडे तयार करून सदर मेट्रो मार्गांना तातडीने मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, नेहमीच्या होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांच्या मनात मोठ्या प्रमाणवर असंतोष निर्माण झालेला असणे याबाबत शासनाने कराव्याची कार्यवाही व उपयोजना. ”

(८०) “ महापालिकेच्या मिळकतींना रेडीरेकनरच्या अडीच की, अर्ध्या टक्का दराने भाडेआकारणी करायची हा वाद सुरू असतानाच राज्य सरकारने नव्या मिळकत धोरणानुसार आठ टक्के दराने भाडेआकारणी आदेशाची अंमलबजावणी करण्याचे स्मरण नाशिक मनपा प्रशासनाला करून देणे, त्यामुळे प्रशासनाने यापुढे दिल्या जाणाऱ्या मिळकतींना आठ टक्के दरानेच भाडेआकारणी करण्याचा निर्णय घेणे, या निर्णयानंतर १९७४ गाळ्यांसह ९४५ मिळकतींना महापालिका पुन्हा शासनाच्या धोरणानुसार आठ टक्के दराने भाडेआकारणी करणार असल्याने मिळकतींचा वाद उपस्थित होणे, नाशिक मनपा प्रशासनाने यातून मार्ग काढण्यासाठी या मिळकतींना रेडीरेकनरच्या अडीच टक्के दराने भाडेआकारणीचा निर्णय घेतला घेणे, तत्कालीन सरकारने मिळकतींसंदर्भात नवीन धोरण निश्चित करीत मिळकतींना महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, मुद्रांक उपजिल्हाधिकारी यांची समिती ठरवेल, तो दर किंवा रेडीरेकनरच्या आठ टक्के दर यापेक्षा जे अधिक असेल असा दर आकारण्याचा निर्णय घेणे, तसेच प्रथम जाहीर लिलाव काढण्याचे तसेच भाडेपट्टा करार नोंदणीकृत करण्याबाबत

श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | आदेशित करणे, माहे जानेवारी २०२० मध्ये राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने मिळकतींसंदर्भात दिनांक १३ सप्टेंबर २०१९ रोजी काढलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना महापालिकेला केल्या जाणे, आधीच अडीच टक्के दराने मिळकती परवडत नसताना, आणि महासभेने अर्धा टक्के दराचा ठराव केला असताना, आठ टक्के दराने आकारणी कशी करायची यावरून प्रशासन पेचात पडले असणे, यामुळे १९७४ गाळ्यांसह ९४५ मिळकतींचे भवितव्य टांगनीला असणे, प्रत्येक मिळकतीला किमान आठ टक्के दर आणि मुंद्राक शुल्कानुसार नोंदणीची सक्ती झाल्यास मिळकतधारकांना त्या न परवडणे, नव्याने मिळकती या लिलावाद्वारे द्याव्या लागणार असल्याने लिलावाचे दर आणि मुद्रांक शुल्काची रक्कम घेणाऱ्यास परवडणार नसल्याने या मिळकती धूळ खात पडून त्यांचा गैरवापर वाढण्याची शक्यता असणे, याकरिता मिळकत धोरणाचा पेच सोडविणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि प्रतिक्रिया. ” | | |
| (८१) | “ बीड नगर परिषदेमध्ये अमृत अभियान अंतर्गत सुमारे ११५ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना आणि १६६ कोटी रुपयांच्या भूयारी गटार योजनेच्या कामात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असणे, कंत्राटदाराने निविदेतील अटी व शर्तींचा भंग करणे, विहित मुदतीत काम पूर्ण न झाल्याने नागरीकांना ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत भिषण टंचाई परिस्थितीला सामोरे जाण्याची वेळ येणे, पाणीपुरवठा योजनेमध्ये २८ हजार नळ जोडणी करण्याचे उद्दिष्ट असताना | सर्वश्री. संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, सुनिल भुसारा, प्रकाश सोळंके, राजू कारेमोरे, वि.स.स. | |

कामाची मुदत पूर्ण होऊनही कंत्राटदाराने केवळ ३ हजार नळ जोडणी केलेली असणे, योजनेच्या कामासाठी शहरातील रस्त्यांचे अवैध खोदकाम केल्यामुळे निष्पाप नागरीकांच्या जिविताला धोका निर्माण होणे, खड्ड्यांमुळे अनेक नागरीकांना जीव गमवावा लागणे, भुयारी गटार योजनेचा प्रकल्प अहवाल करताना अनेक गैरकायदेशीर व चुकीच्या बाबींचा त्यामध्ये समावेश केलेला असणे, शासनाची गायरान जमीन पालिकेची असल्याचे भासवून ही जागा मल निस्सारण केंद्रसाठी प्रस्तावित करण्यात येणे, प्रकल्प अहवालात नगरपालिकेने अनेक बाबींच्या माध्यमातून शासनाची दिशाभूल केलेली असणे, सुमारे १६४ किमी लांबीच्या भुयारी गटार योजनेच्या कामापैकी केवळ ३० किमी काम कंत्राटदाराने पूर्ण केलेले असणे, महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता व अधिनियमातील तरतुदीनुसार कामाच्या दर्जा बाबत कोणतीही तपासणी अथवा शहानिशा न करता कंत्राटदाराला नगर पालिका प्रशासन, जीवन प्राधिकरण यांनी संगणमताने कोट्यावधी रुपयांचे बेकायदेशीररित्या देयकांचे प्रदान केलेले असणे, पाणीपुरवठा योजना आणि भुयारी गटार योजनेचे काम विहित मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे शहरातील नागरीकांमध्ये शासन विरोधी संतापाची भावना निर्माण होणे, नियमित आणि वेळेवर कर भरणाऱ्या नागरीकांना पालिका प्रशासन आणि कंत्राटदाराच्या गैरकारभारामुळे मनस्ताप सहन करण्याची वेळ येणे, बीड जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांनी या प्रकरणी घेतलेल्या आढावा बैठकीत अनेक गंभीर बाबी समोर येणे, या सर्व प्रकारांची उच्चस्तरीय समितीकडून चौकशीकरण्याची मागणी करून दोषीविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण होणे, शासनाकडून याप्रकरणी होत असलेला अक्षम्य विलंब, तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (८२) | “ हिंगोली नगरोत्थान महाराष्ट्र अभियानतंर्गत होत असलेल्या रस्त्यांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असून त्यात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे माहे जाने. २०२० मध्ये उघडकीस येणे, शहरातील इंदिरा चौक, गांधी चौक, अंबिका टॉकिज या भागात रस्त्याचे सीसी रोड या कामात अंदाजपत्रकामध्ये ६५० मीटर लांबी, ४.५ मीटर रुंदी खोली खोदकाम करणे आवश्यक आहे .ज्याकरिता फुटपाथ फोडण्यासाठी ६५ हजार ५५४ रुपये व जुने रोडवरील तपशीलाप्रमाणे खोदकामाचा खर्च १ लाख ९६ हजार १७० रुपये आणि सदर खोदकामात निघालेल्या मटेरिअलची विल्हेवाट लावण्यासाठी ५ लाख ३४ हजार ९६० असा एकूण ७ लाख ९६ हजार ५८४ एवढा खर्च केला जात असणे, उक्त अभियानातंर्गत कोणतेही खोदकाम केलेले नसल्याचे निदर्शनास येणे, अंदाजपत्रकात खोदकामासह मटेरिअलच्या विल्हेवाटाची तरतूद दाखवण्यात आलेली असणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, उक्त कोट्यावधीच्या भ्रष्टाचार बाबतीत शासनाने सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका. ” | श्री. संतोष बांगर, वि.स.स. | |
| (८३) | “ महाराष्ट्र सुवर्ण-जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत हिंगोली नगरपरिषदेच्या हद्दीतील ५७ रस्त्यांची कामे तसेच भूमिगत गटार योजनेची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असून तसेच विकास कामाच्या निविदा प्रक्रियेत मोठया प्रमाणात अनागोंदी करून कंत्राटदारास फायदा होण्याच्या अनेक त्रुटी ठेऊन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून तातडीने उक्त कामांना स्थगिती देण्याबाबतची मागणी जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांनी जिल्हाधिकारी हिंगोली यांना निवेदनाद्वारे तसेच लोकप्रतिनिधिंनी | श्री. संतोष बांगर, वि.स.स. | |

मा. मुख्यमंत्री मा. नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २० डिसेंबर २०१९ रोजी पत्रव्यवहार केलेली मागणी उक्त पत्राच्या अनुषंगाने झालेल्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी तसचे उक्त कामांना तातडीने स्थगिती देण्यास होत असलेला विलंब, सदर गैरव्यवहार प्रकरणी सखोल चौकशी यास जबाबदार असणाऱ्याविरूद्ध कठोर कारवाई करण्यास शासनाकडे होत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ''

(८४) " मुंबईसह एम. एम. आर. डी. ए. क्षेत्रामध्ये मेट्रोचे काम जलद गतीने चालू असून आधी कॉंग्रेस आघाडी सरकारच्या कार्यकाळात नंतर युतीच्या कार्यकाळामध्ये त्याला विविध मंजूऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या असणे, मुंबईतील काही काम पुर्ण झालेले असून मेट्रो काही भागात धावायलाही लागलेली आहे. मध्ये दहिसर ते भाईदर मेट्रो ९ कासारवडवली गायमुख, कासारवडवली ते वडाळा व सी. एस. टी. या मेट्रोची मंजरी घेत असताना अनेक तांत्रिक पद्धतींची पुर्तता न आल्याचे निदर्शनास येणे, उदाहरणार्थ दहिसर ते भाईदर या मेट्रोचे काम चालू होत असताना मिरा-भाईंदर येथील छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावरील उडड्‌णपुल मेट्रोमध्ये उभारले जात असताना भविष्यामध्ये वाहतूक कोंडीचा कोणताही विचार त्याठिकाणी केला नसल्याचा माझ्या निदर्शनास आल्यानंतर मी ही बाब एम. एम. आर. डी. ए. च्या अधिकाऱ्याच्या लक्षात आणून दिल्यानंतर ते काम थांबवण्यात आले व त्यानतर एलीव्हेटेड फ्लायओव्हरचा प्रस्ताव नव्याने तयार करून त्याची मंजुरी घेऊन आत्ता ते काम चालू करण्यत आले आहे. त्याचबरोबर मेट्रो १० मध्ये गायमुख ते वर्सोवा या साडेतीन किलोमीटरच्या अंतरामध्ये भविष्यातील नागरीकरणाचा विचार न करता एकही स्टेशन दिले गेले नव्हते ही बाब माझ्या

श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | निदर्शनास आल्यानंतर चेणागाव हे स्टेशन घेण्याची मी व मिरा-भाईदर महानगरपालिकेने विनंती केली असता चेणा गाव ते स्टेशनचा प्रस्ताव मंजुर केल्याचे कळते. त्याचबरोबर मेट्रो ४ मध्ये गायमुख ते कासारवडवली तसेच कासारवडवली ते वडाळा याला मंजुरी देत असताना घोडबंदररोड वरील भविष्यातील वाहतुक कोंडीचा विचार न करता परस्पर काम चालू केल्याने या भागाला मेट्रो व मेट्रोच्या स्टेशनमुळे घोडबंदर रोडवर प्रचंड मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी निर्माण होणार आहे . याठिकाणी जर पुर्वीच एम. एम. आर. डी. ए. ने केलेल्या फ्लायओव्हरच्या ठिकाणी एलीव्हेटेड फ्लायओव्हरसह काम चालू केले असते तर भविष्यात या परिसरातील वाहतुककोंडी टळली असती. त्याचबरोबर मेट्रो कारशेडसाठी कासारवडवली ओवळे येथील १०० एकर जमीन आरक्षण टाकून एकदा निश्चित केल्या नंतर व त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊ असे लोकप्रतिनीधीसह एम. एम. आर. डी. ए. व ठाणे महानगरपालिकेच्या व मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्यानंतर ते आरक्षण रद्द करून परत मोघरपाडा येथील जमिनीचे सर्वे चालू केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये फार मोठया प्रमाणात असंतोष पसरलेला आहे, मेट्रोची कामे चालू करत असताना अनेक ठिकाणी झाडांच्या कत्तली झाल्या, सीआरझेड असलेल्या जागेवर भरणी टाकून कास्टींगयार्डचे काम सुरु झाले, खाजगी जमीनी अथवा महानगरपालिकेच्या जमीनीवरील कुठलाही भाडेतत्त्वाचा करार केला गेला नाही. मेट्रोची कामे करत असताना स्थानिक लोकप्रतिनिधी व महानगरपालिकेला विश्वासात न घेता परस्पर मेट्रोचे आराखडे मेट्रो प्राधिकरणाने मंजूर करणे, तसेच कुठल्याही तात्रिक बाबींचा विचार न करता फक्त मेट्रो लवकरात लवकर कशी पुर्ण होईल हेच ध्येय डोळयासमोर | | |

ठेवून भविष्यातील मुंबई व ठाणे शहरातील वाहतुक कोंडीचा, पर्यावरणाचा तसेच स्थानिक भुमिपुत्रांच्या हक्काचा विचार केला गेलेला नसणे, त्यामुळे संपूर्ण मेट्रोच्या कामामध्ये अंदाधुंदी चालु असल्याने या संपुर्ण मेट्रोच्या तांत्रिक बाबी तपासण्यासाठी तज्ञांची समिती नियुक्ती करणे गरजेचे असल्याने आपण या संबंधातील योग्य निर्णय घेवून भविष्यातील मुंबई व ठाणे शहरातील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी शासनाचा निर्णय व याप्रकाराची करावयाची कार्यवाही शासनाची प्रतिक्रिया व भुमिका. ''

(८५) '' जळगांव महानगरपालिकेत गेल्या कित्येक वर्षांपासून २३८७ गाळेधारकांवर महानगरपालिका प्रशासने गाळेधारकांना बजावलेले दंडात्मक बिले, व मालमत्तावरील बोजा लावण्याच्या घोषणामुळे महानगरपालिका प्रशासना विरोधात गाळेधारक एक झाले असून, तरी सुद्धा गेल्या ७ वर्षांचे थकीत भाडे पैकी काही प्रकारच्या करांच्या रक्कमेचे धनादेश गाळेधारकांनी यावर्षी महानगरपालिकेला दिले असून काही कोटी रक्कम मनपात जमा असून तरी गाळेधारकांना अनधिकृत करण्याचे ठरविले असणे, जळगांवच्या विकासात गाळे धारकांचे मोठे योगदान असणे, योग्य नुतनीकरणासह योग्य भाडे भरण्यास सर्व गाळेधारक नेहमीच तयार असणे, परंतु अवास्तव लाखोंचे भाडे, दंड घरादारांवर बोजा आकारल्याने गाळेधारक उध्वस्त होण्याची निर्माण झालेली शक्यता, यामुळे पालिकेच्या २० व्यापारी संकुलातील २३८७ गाळेधारक व त्यांचे कुटुंबीय त्यांच्यावर अवलंबून असलेले कर्मचारी, अशा ४० हजार नागरिकांचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, शासनाने अधिसूचना प्रसिद्ध केलेली दिनांक २७.०५.२०१९ शासन राजपत्रित प्रकाशित झालेले असून, सदरील **राजपत्र** महाराष्ट्र महानगरपालिका ७९ '' ड '' संदर्भात प्रारूप नियमावलीत सूचना व

श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | हरकतीसाठी प्रकाशित केले होते तसेच आम्ही सूचना व हरकती साठी नगरविकास विभाग व मुख्यमंत्री साहेब यांच्याकडे लेखी निवेदन देऊन सुद्धा आम्हाला सुनावणीची संधी मिळाली नाही याबाबतचा कोणताही विचार न करता दिनांक १३.०९.२०१९ रोजी अंतिम अधिसूचना प्रसिद्ध केली गेली ह्या अधिसूचनेत कलम ३ मधील पोट-कलम २ अपेक्षित सुधारणा मालमत्तेच्या मूल्यांकनाच्या ८% रक्कम ऐवजी २% द्वते ४% द्वनिश्‍चित करण्यात यावे असे महोदय आयुक्तांना अधिकार देण्यात यावे व कलम ३ मधील पोट-कलम ४ भाडेपट्ट्याचे नूतनीकरण हे किमान तीस वर्षांसाठी असेल असे नमूद करण्यात यावे तसेच कलम ३ मधील पोट-कलम ३ पैकी १ रद्द करून गाळे ज्यांच्या ताब्यात व मनपा दप्तरी ज्याचे नावाने आज नोंद असेल अशा गाळेधारकांना सरसकट नूतनीकरणाची परवानगी देण्यात यावी व कलम ३ मधील पोट-कलम ३ पैकी ५ शिथिल करण्यात यावा असे नविन शुद्धिपत्रक काढून त्वरीत गाळेधारकांच्या बाजूने न्याय मिळवून द्यावा याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि प्रतिक्रिया. ” | | |
| (८६) | “ राज्यातील नागपूर महानगरपालिकेमध्ये सन १९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२००० या वर्षात क्रीडा साहित्य खरेदीमध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याबाबत नंदलाल समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने दोषींवर अद्यापही कारवाई करण्यात न येणे; सदरचे क्रीडा साहित्य महापालिकेच्या निवडून आलेल्या नगरसेवकांना तसेच नामनिर्देशित नगरसेवकांना त्यांच्या प्रभागामध्ये वाटप करण्यासाठी देण्यात आल्याचे भासवून महापालिकेच्या | श्री. सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अमीन पटेल, कुणाल पाटील, वि.स.स. | |

अधिकाऱ्यांनी व नगरसेवकांनी एकत्रित येऊन सामुग्रीकरिता महापालिकेची आर्थिक लूट करून मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आले असतांना व नंदलाल समितीने अहवाल शासनास सादर केला असतानाही अद्याप या प्रकरणी चौकशी व दोषींवर कारवाई करण्यात आली नसल्याने सर्वसामान्य नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

(८७) “ मकानीपाडा (मालाड पूर्व) मुंबई येथील के.डी.बिल्डर्सने रीहॅब बिल्डिंग-२ ही एसआरए गृहनिर्माण इमारत बांधण्यात येणे, सदर एसआरए योजना राबवितांना तेथे ६ मीटरचा गटारासोबतचा रस्ता तयार करण्यात येणे, वास्तविक पाहता इमारतीची उंची ६९ मीटर असेल तर ९ मीटर रस्ता बांधणे आवश्यक असतांनाही तसे न करणे, असे असतांनाही या विकासकांने ६ मीटरचा रस्ता तयार करून मुंबई महानगरपालिकेची व अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र आर्थिक संगनमत करून घेणे, परंतु प्रत्यक्षात विकासकाने बांधलेल्या इमारतीची उंची ७२ मीटर असून याकरिता १२ मीटरचा रस्ता अपेक्षित असतांना तसे न केल्याने परिसरातील नागरिकांनी संबधित विभागाकडे तक्रार करूनही कोणतीच कारवाई न करणे, यामुळे या परिसरात एखादी दुदैवी घटना घडल्यास अग्निशमन दलाचे वाहन, ॲम्ब्युलन्स घटनास्थळी पोहचणे कठीण होणे, परिणामी स्थानिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने संबधित विकासक तसेच महानगरपालिका व अग्निशमन दलाचे अधिकारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई, प्रतिकिया व भूमिका. ”

सर्वश्री प्रकाश सुर्वे, रमेश लटके, मंगेश कुडाळकर, प्रकाश फातर्पेकर, अबू आजमी, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (८८) | “ पामबीच येथील सी होम्स सीवूड्स (नवी मुंबई) पामबीच येथील या इमारतीतील २१ व्या मजल्यावर दिनांक ८ फेब्रुवारी, २०२० रोजी अचानक गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन लागलेली आग, आग विझविण्यास नेरुळ अग्निशमन दलाचे जवान आले असताना फ्लॅटमध्ये असलेल्या गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने अग्निशमन दलाचे ७ जवान गंभीररित्या जखमी होणे, अग्निशमन दलाच्या जवानांनी तब्बल ८ तास अथक प्रयत्न केल्यानंतर आटोक्यात आलेली आग, आग विझविताना गंभीर जखमी झालेल्या अग्निशमन दलाच्या ७ जवानांना ऐरोली येथील नॅशनल बर्न सेंटर या खाजगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यास नेण्यात आले असता, आगाऊ शुल्क भरल्याशिवाय कोणत्याही रुग्णास रुग्णालयात दाखल करून घेत नसल्याचे कारण देऊन, जखमी कर्मचाऱ्यांना उपचार करण्याऐवजी, एक-दीड तास ताटकळत ठेवण्यास येणे, नवी मुंबई शहरातील बहुतांश इमारतीमध्ये बसविण्यात आलेल्या आग विझविणारी यंत्रणा बंद असल्याचे अग्निशमन दलाच्या निदर्शनास येणे, अग्निशमन यंत्रणा बंद अवस्थेत असलेल्या ४०० पेक्षा जास्त इमारतींना अग्निशमन विभागाने गेल्या तीन वर्षांत पाठविलेल्या नोटीसा यामध्ये एकट्या नेरुळ विभागातील १२२ इमारतींचा असलेला समावेश, खबरदारीच्या उपाययोजनाकडे सोसायटीतील पदाधिकाऱ्यांचे झालेले दुर्लक्ष, याप्रकरणी महानगरपालिकेने संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री सुनिल प्रभू, राधाकृष्ण विखे-पाटील, अबू आजमी, वि.स.स. | |

(८९) “ मुंबईत आगीचे सत्र सुरुच असून २४ तासांत आगीच्या तीन दुर्घटना घडून १५ जण जखमी झाल्यांचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, अंधेरी एमआयडीसी येथील सेस्टा नेट कंपनीच्या सर्व्हर रुमला दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० रोजी आग लागली असणे, सदर इमारतीला काचेचे आवरण असल्याने आग विझवताना अग्निशमन दलाच्या जवानांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, कांदिवली पूर्वेकडील संभाजी नगर मधील एक चाळ तसेच वांद्रा पूर्व येथील एक चाळ या ठिकाणी आगीची दुर्घटना घडणे, मुंबईला दिवसाला सरासरी ११ आगीच्या दुर्घटना घडत असल्याचे अग्निशमन क्षेत्रातील तंज्ञाचे मत असणे, सन २००८ ते २०१८ या काळात येथे ५३,३३३ आगीच्या दुर्घटना घडणे, त्यात ६६६ जणांचा दुर्दवी मृत्यू होणे, या मृतांमध्ये २२३ महिला, ४४ पुरुष, ३४ मुले व ५ अग्निशमन दलातील अधिकारी यांचा समावेश असणे, आगीच्या दुर्घटना घडल्यास प्रशासनाकडून त्याचा तपास करून तात्पुरत्या उपाययोजना केल्या जाणे, ठोस निर्णय घेतला जात नसणे, यामुळे मुंबई मधील अग्नी सुरक्षेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, परिणामी जनतेत पसरलेला असंतोष याबाबत शासनाने आगीच्या दुर्घटना रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया. ”

सर्वश्री चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. लक्ष्मण जगताप, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. सुनिल प्रभू, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, अमित झनक, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखेडे, राजु पारवे, राजु आवळे, वि.स.स.

(९०) “ मुंबई महापालिकेच्या इमारतीमध्ये सुरु असलेल्या ९७ रात्रशाळांचे भाडे भरण्यासाठी दिरंगाई होत असल्याने या थकीत भाड्याचा आकडा ६५ लाखांवर पोहचला असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, महापालिकेच्या परिपत्रकानुसार रात्रशाळांना ५० रुपये प्रति महिना वर्गभाडे आणि एक हजार रुपये कार्यालय भाडे असणे, सन २००८ मध्ये आलेल्या नव्या दरपत्रकानुसार वर्गभाडे ३५० रुपये आणि कार्यालय

श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री अबू आजमी, रईस शेख, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | भाडे एक हजार ८५० रुपये असणे, मात्र दरवर्षी नुतनीकरणाच्या नावाखाली किमान सहा महिने विलंब करीत ५० टक्के दंड व त्यावर १८ टक्के चक्रवाढ दराने व्याज, संगणक भाडे असे मिळून महिना तब्बल ७५ हजार रुपये भाडे आकारले जाणे, या रात्रशाळांना सन २०१२ पासून अनुदान बंद केल्याने शिक्षक स्वखर्चाने शाळा चालवित असणे, चार तास चालणाऱ्या शाळांना सात तासांचे निकष लावण्यात आल्याने लाखो रुपयांची थकबाकी होणे, त्यामुळे रात्रशाळांच्या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यामुळे रात्रशाळांना आकारण्यात आलेली सर्व भाडे माफ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ” | | |
| (९१) | “ ठाणे जिल्ह्यातील मीरारोड येथील कनकीया भागातील ना-विकास क्षेत्र, सीआरझेड, भरतीची उच्चतम रेषा, कांदळवनने बाधित असलेल्या जागेत पर्यावरणाचा ऱ्हास करून बेकायदेशीर भराव करून सेव्हन इलेव्हन क्लब उभारण्यात आले असल्याने अलिकडेच निदर्शनास येणे, सदरहू क्लबसाठी ३० ते ४५ मिटर हाय-वे असल्याचे दाखवून पर्यटन विकासासाठी जादा चटईक्षेत्र देण्यात येणे, या अनधिकृत क्लबच्या बांधकामामुळे कांदळवन नष्ट होत असल्याबाबत अनेक तक्रार जनतेकडून व लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाला देण्यात आल्या असतानाही अद्याप, याप्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात न येणे, पर्यटन विकासाबाबतच्या शासनाचे नियम गृहीत धरुन चुकीच्या आधारे शासनाने सेव्हन इलेव्हन क्लबला नियमांचे उल्लंघन करून जादा एफ.एस.आय.देण्यात आल्याने या क्लबचे बांधकाम निष्कासित करून | सर्वश्री अमित झनक, अमीन पटेल, श्रीमती गीता जैन, वि.स.स. | |

सीआरझेडची जागा मोकळी करण्यासाठी कारवाई करण्यात येत नसल्यामुळे निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने त्वरीत सखोल चौकशी करून सदरील क्लबचे बांधकाम निष्कासित करून सीआरझेडची व ना विकास क्षेत्राची जागा मोकळी करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

(९२) “ जि. ठाणे, मुरबाड येथील नैतिकतेचे तसेच मुल्य शिक्षणाचे धडे देणाऱ्या पाच शिक्षकांनी दिव्यांगाचे बोगस दाखले देऊन कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शाळेमध्ये शिक्षण सेवक पदावर बेकायदा नियुक्ती मिळविल्याचा प्रकार प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक ११.२.२०२० रोजी उघडकीस आणणे, सदरहू पाच शिक्षकांनी दिव्यांगाचे बोगस दाखले, दस्तावेज तयार करून खुला प्रवर्ग समांतर आरक्षण अंध-अपंग या प्रवर्गातून करण्यात येणे, सदरहू पाच पैकी चार शिक्षकांनी अल्पदृष्टी तर एकाला अस्तीव्यंग असल्याचे कागदपत्रे व दाखल्यामध्ये नमुद करण्यात येणे, शिक्षक भरतीच्या वेळी सादर केलेले दाखले अवैध्य ठरल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल असे महापालिकेच्या आदेशात स्पष्टपणे नमुद केले असतानाही सदरहू पाच शिक्षकांचे दिव्यांगाचे दाखले पडताळणीसाठी दिनांक २३.१२.२०१९ रोजी संभाजीनगर सिव्हिल हॉस्पीटलमध्ये पाठविण्यात येणे, परंतु, अद्याप त्याचा अहवाल प्राप्त न झाल्याचे सांगून पाच बोगस नियुक्ती मिळविलेल्या शिक्षकांना कारवाईपासून वाचविण्यासाठी शासनाचे संबंधित अधिकारी नियमबाह्यरित्या मदत करित असल्याचे आढळून येणे, सदर बोगस शिक्षकांच्या भरतीमुळे शिक्षण क्षेत्रात व्यक्त होत असलेला संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

सर्वश्री सुनिल प्रभु, अबू आजमी, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (९३) | " मुंबईतील मालाड पूर्व दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील हुमेरा पार्क - दिंडोशी येथील अरुंद रस्त्याचे रुंदीकरणाचे विकासकाम बाधीत ८२ झोपडीधारकांचे अन्यत्र पुनर्वसन करून सुरु करणेबाबत महापालिका व एमएमआरडीए यांच्या संयुक्त विद्यमाने तीन महिन्यांत सुरू करणेकरिता सन २०१६ मध्ये तत्कालीन राज्यमंत्री नगरविकास यांनी आश्वासन देऊनही अद्याप यावर कोणतीही कार्यवाही न करणे, तसेच कुरार गावातील वाहतुक कोंडी समस्या सोडविण्यासाठी अडसर ठरलेल्या रस्त्यातील बाधीत ३०० झोपड्यांचे अन्यत्र पुनर्वसन करून लक्ष्मणनगर ते संस्कार कॉलेज जवळील प्रस्तावित रस्ता वाहतुकीसाठी खुला करणेबाबत शासनास अनेक वेळा लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच मालाड पूर्व-पश्चिम द्रुतगती महामार्गाखालून मालाड रेल्वे स्थानक ते आप्पा पाडा रस्त्याला सलग जोडणाऱ्या पुष्पापार्क पादचारी भुयारी मार्गाचे काम सन २०१७ पासून मेट्रो क्र.७ च्या विकासकामासाठी १५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात येऊन सदरचे काम खुपच संथ गतीने सुरु असल्याने नागरीकांची रहदारीसाठी खुपच गैरसोय होत असणे, तसेच मालाड जलाशय टेकडी मार्ग ते कांदिवली लोखंडवाला संकुलास जोडणाऱ्या रस्त्यामधील वन विभागाच्या हद्दीत येत असलेल्या ४०० मिटर रस्त्याचे काम ना-हरकत प्रमाणपत्र अभावी अद्याप प्रलंबित असणे, तसेच गोरेगांव-मुलुंड लिंक रोडचे विकासकामासाठी महापालिकेने अर्थसंकल्पात निधी मंजूर करूनही सदरहू उड्डाणपूल व रस्तारुंदीकरणाचे काम अद्यापही सुरु करण्यात न येणे, या समस्यांबाबत शासन, मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए या संस्थांकडून विकासकाम करणेबाबत दुर्लक्ष झाल्यामुळे वाहतुक कोंडी आणि या परिसरातील | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. | |

नागरीकांची रहदारीसाठी होत असलेली प्रचंड गैरसोय, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

(९४) “ मुंबई महानगरपालिकेच्या तब्बल ३७ कंत्राटदारांच्या कार्यालयात माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये आयकर विभागाने टाकलेल्या छाप्यांमध्ये प्रथमदर्शनी रुपये ७८५ कोटीची बेनामी मालमत्ता आढळून येणे, तसेच रस्ते व दुरुस्तीच्या कामांत शेकडो कोटींचा गैरव्यवहार झाल्याचेही निदर्शनास येणे, बनावट कंपन्या काढून त्यांच्यासोबत समभाग विक्री दाखवून पैसा वळवणे, बनावट व्यवहार देयके तयार करून कामात गैरव्यवहार करणे, कर चोरी करणे, हवालामार्फत बाहेरच्या देशात पैसा पाठविणे, मनी लॉड्रींग, असे असंख्य गैरप्रकार केल्याचे निदर्शनास येणे, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून यात गुंतलेल्या सर्व संबंधीत व्यक्ती, कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

श्री. चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री लक्ष्मण जगताप, राम सातपुते, वि.स.स.



(९५) “ तत्कालीन काळजीवाहू मुख्यमंत्री पदाच्या कालावधीत पुणे शहरापासून ६ कि.मी. अंतरावर मौजे मुंडवा येथील सर्व्हे क्रमांक ८४ मधील २४ मीटर रस्त्याची रुंदी १२ मिटर प्रस्तावित करून ९ मिटर मंजूर केल्याचा दिनांक २.१.२०२० रोजी उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, पुण्यापासून मुंडवा हे गांव जवळच असल्याने तेथे मोठ्या प्रमाणावर इमारती व बंगले उभे राहणे, तसेच भविष्यातही या भागात बहुमजली इमारतींचे जाळे पसरणार असल्याने या ठिकाणी वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होऊ नये याकरिता राज्य शासनाने २४ मिटर रुंदीचा रस्ता बांधण्याचा निर्णय घेण्यात येणे, वडगांव शेरी

सर्वश्री सुनिल प्रभू, श्यामसुंदर शिंदे, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी विकासकाच्या फायद्यासाठी नफेखोरी मिळवून देण्याकरिता सदरहू रस्ता २४ मीटर ऐवजी १२ मीटरच करावा अशी मागणी करणारे पत्र दिनांक १३.३.२०१८ रोजी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना पाठविण्यात येणे, त्यानुसार शासनाने दिनांक ९.७.२०१८ रोजी रस्त्याची रुंदी कमी करण्याची अधिसूचना जारी करणे, सदरहू रस्त्याची रुंदी कमी करण्याच्या प्रस्तावास पुणे महानगरपालिका तसेच अनेक लोकप्रतिनिधींनी तीव्र विरोध करून व आक्षेप घेऊन शासनाकडे यासंदर्भात तक्रार करण्यात येऊनही त्यावर शासनातर्फे कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष,ष परिणामी पुणे-मुंडवा रस्त्याची रुंदी कमी केल्यामुळे भविष्यात वाहतुक कोंडीची प्रचंड समस्या निर्माण होऊन पुणेकरांची रहदारीसाठी प्रचंड गैरसोय होण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. ” | | |
| (९६) | “ ठाणे महानगरपालिका येथे सन २०१४ ते २०१९ या दरम्यान बिंदु नामावलीतील दिशा- निर्देशाप्रमाणे मागासवर्गीयांच्या पदोन्नत्या केल्या नसुन त्या पदोन्नत्या नियमबाह्य पद्धतिने केल्याने, पात्र पदोन्नती धारक अधिकाऱ्यांवर अन्याय होणे, त्या अधिकाऱ्यांना गैरकायदेशीर ईतर अन्य पदांचे अतिरीक्त कार्यभार सोपविणे, डी.पी. सी अहवालानुसार गंभीर आरोपात निलंबीत असणे, त्यांना अद्यापर्यंत महत्वाच्या पदावरील जबाबदारीवर कायम ठेवणे, तसेचच मागासवर्गीय प्रवर्गासाठी असलेल्या संविधानिक रोस्टर प्रणालीमध्ये खुल्या प्रवर्गातील | श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. | |

अधिकाऱ्यांच्या नेमणुका करून पात्र मागासवर्गीय अधिकाऱ्यांना डावलणे, या गैरप्रकरणात मोठया प्रमाणात उपायुक्त मुख्यालय तसेच तत्कालिन उपायुक्त यांनी अर्थपुर्ण व्यवहार करून हा गैरप्रकार करणे, या प्रकरणात पात्र अधिकाऱ्यांवर अन्याय झाल्याने त्यांना त्यांचे मुलभुत अधिकारांपासुन वंचित ठेवल्याने संविधानातीलल द्वतरतुदीच्या अधिकारांचा दुरपयोग केला असल्या या गंभीर गैरप्रकरणाची सखोल चौकशीची नितांत आवश्यकता परिणामी पात्र पदोन्नती धारकांवर अन्याय झाल्याने त्यांच्यात निर्माण झालेली असंतोषाची भावना, सदर प्रकरणाची सखोल चौकशीसाठी उच्च स्तरीय समिती गठीत करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रीया. "

(९७) " यवतमाळ नगरपालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्र. ८६ शीट क्र. ३८-सी, प्लॉट नं. ३१/१ वर बी.ओ.टी तत्वावर दुकान केंद्र बांधण्यास शासनाकडून परवानगी मिळणे, मात्र अफ्रन्ट प्रिमीयम दर ८३ कोटी रुपये मंजूर असल्याने तीन वेळा ई-निवीदा काढूनही निविदेस प्रतिसाद न मिळणे, अफ्रन्टची किमंत २० ते ३० टक्क्यांनी कमी करण्यासाठी यवतमाळ नगर पालिकेने शासनाकडे वारंवार विनंती करणे. विनंती मान्य न झाल्यामुळे मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जागेपासून मिळणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलापासून शासनाला वंचित राहावे लागणे, शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जागेवर अतिक्रमणची शक्यता होऊन बी.ओ.टी वरील प्रकल्पास विलंब होणे, याबाबत शासनाने गंभीर्यपूर्वक निर्णय घेऊन सदर आरक्षण क्र. ८६ शीट क्र. ३८-सी, प्लॉट नं. ३१/१ वर बी.ओ.टी तत्वावरील दुकान केंद्र बांधकामासाठी अफ्रन्टची किमंत कमी करणेबाबत कारवाई करण्यात यावी यावर शासनाने करावयाची तत्काळ उपाययोजना व प्रतिक्रीया. "

श्री. मदन येरावार, डॉ. अशोक उईके, श्री. नामदेव ससाने, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (९८) | " यवतमाळ नगर पालीकेने B.O.T. तत्वारील विकास आराखडा आराखडा आरक्षण क्र. १०१ या जागेवर दुकानकेंद्र व सांस्कृतीक भवन इमारत बांधकाम प्रकल्प शासनाकडे मंजुरीसाठी सादर केलेले असणे, सदर प्रस्तावाला मंजुरात मिळाली नसल्यामुळे शहराच्या मध्यवर्ती स्थानी असलेल्या या जागेला डंपींग ग्राऊंडचे स्वरुप येणे, या जागेला लागून मुलींचे वसतिगृह, महिला विद्यालय, विद्युत विभाग कार्यालय, अमराईपुरा आदि रहिवासी वस्ती असल्यामुळे दुर्गंधी व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, बांधकामास मंजुरी न मिळाल्यामुळे दुकानगाळे व सांस्कृतिक केंद्रापासून येणाऱ्या महसुलाचे नुकसान होऊन शासनाला कोट्यवधी रुपयाचा फटका बसणे, दुकान गाळ्यांमुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होऊन उदरनिर्वाहाचे साधन निर्माण होणे, द्वयाबाबत शासनाने गांभीर्यपूर्वक निर्णय घेऊन सदर आरक्षण क्रमांक १०१ वर दुकान केंद्र व सांस्कृतिक भवन B.O.T.तत्वावर बांधकामाच्या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची तत्काळ उपाययोजना व प्रतिक्रीया. " | श्री. मदन येरावार, डॉ. अशोक उईके, श्री. नामदेव ससाने, वि.स.स. | |
| (९९) | " नागपूर महापालिकेच्या नियोजन शुन्य कारभारामुळे झालेल्या व चालु असलेल्या योजनांच्या कामांचे देय ५०० ते ८०० कोटीची देयके थकीत असल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच दि.२.३.२०२० रोजी उघडकीस येणे, गेली ५ वर्षापासून शासनाच्या अनेक योजनामधील महापालिकेचा हिस्सा न दिल्यामुळे ५ वर्षांच्या योजनांची कामे ८ ते १० वर्षातही पुर्ण करण्यात न येणे, नागपूर महापालिकेने स्वत:कडे निधी उपलब्ध नसलतानाही अर्थ संकल्पात निधी प्रस्तावित करून जास्त प्रमाणात कामे मंजूर करण्यात येणे, सदर | सर्वश्री सुनिल प्रभू, प्रकाश फातर्पेकर, रमेश कोरगांवकर, अजय चौधरी, वि.स.स. | |

प्रकरणात कोट्यवधी रुपयाची देयके थकीत असून वैधानिक व लिगल देयके महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या जीपीएफ, पेन्शन फंड इत्यादी देयकातून वजावट करून देयके कंत्राटदारांना देण्यात येणे, यामुळे कर्मचाऱ्यांचा पैसा कंत्राटदारांला देण्याचा नागपूर महापालिकेने कायद्याने गुन्हा केला असणे, यामुळे अद्यापही झालेल्या व चालु असलेल्या कामांचे देय रक्कम देणे बाकी असताना नविन कामे घेऊन करोडो रुपयांची नव्याने दायित्व निर्माण करण्यात येणे, शासनाच्या अनेक योजनांमधील महापालिकेचा हिस्सा न दिल्यामुळे अनेक कामे खोळंबली असून आर्थिक आणिबाणी निर्माण झाल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी नागपूर महापालिकेची अर्थव्यवस्था कोलमडून जाऊन डबघाईस आली असल्याने शासनाने नागपूर महापालिका तात्काळ बरखास्त करण्याचे आदेश देण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागपूर शहरातील जनतेस मलभूत नागरी सोईसुविधा आणि विकास कामांपासून वंचित रहावे लागल्याने त्यांच्यात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

(१००) “ मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वैतरणा धरण क्षेत्रातून बोटी व सक्षण पंपाच्या मदतीने पन्नासहून अधिक बांग्लादेशी कामगारांनी मोठ्या प्रमाणात बेकायदा रेती उपसा करीत असल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, रेती उपसा करणाऱ्या बोटी डिझेलवर चालविण्यात येत असल्याने धरणातील पाण्यावर तेलाचा तवंग पसरून पिण्याचे पाणी दुषित होऊन लाखो मासे मृत्युमुखी पडत असणे, मुंबई महापालिकेने धरणांच्या सुरक्षिततेसाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक करूनही सदरहू धरण क्षेत्रात बांग्लादेशी नागरीकांनी घुसखोरी केल्यामुळे धरणांच्या सुरक्षेला निर्माण झालेला

सर्वश्री सुनिल प्रभू, दौलत दरोडा, अबू आजमी, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | गंभीर धोका, धरण क्षेत्रातून दररोज शेकडो ब्रास रेतीचे उत्खणन करून विकासकास चढ्या भावाने विक्री करण्यात येणे, महापालिकेचे संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार घुसखोर बांग्लादेशी कामगारांच्या माध्यमातून शासनाचा कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडवुन मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा करण्यात येत असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| (१०१) | “ मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे वरुन दरमहा धावणारी वहाने आणि त्यातून जमा होणारा टोल या संदर्भात दोन कंत्राटदारांनी राज्य रस्ते वाहतुक मंडळास (एम.एस.आर.डी.सी.) सादर केलेल्या आकडेवारीत प्रचंड तफावत असल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १ फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, प्रत्येक टोल नाक्यावरून दरमहिन्याला किती वाहने धावली आणि किती टोल जमा झाला याबाबतची माहिती एम.एस.आर.डी.सी.च्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यास येणे, एक्सप्रेस-वे वर गेल्या पंधरा दिवसापासून टोल वसुली करणाऱ्या कंत्राटदाराच्या कंत्राटाची मुदत दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ रोजी संपल्यानंतर दिनांक १० ऑगस्ट, २०१९ पासून नवीन कंत्राटदाराला टोल वसुलीचे कंत्राट देण्यात येणे, संकेत स्थळावरील माहितीनुसार जुन्या कंत्राटदाराने माहे एप्रिल ते जुलै, २०१९ या चार महिन्यात महामार्गावरून १ कोटी ७२ लाख वाहने म्हणजेच दरमहा सरासरी ४३ लाख वाहने धावली असून त्यानुसार दरमहा सरासरी ६० कोटी रुपये टोलवसुली झाल्याचा चार महिन्यांच्या आकडेवारीचा अहवाल एम.एस.आर.डी.सी.ला सादर करण्यात येणे, नव्या कंत्राटदाराने माहे | सर्वश्री सुनिल प्रभू, मोहन मते, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | |

सप्टेंबर महिन्यात १६.९० लाख वाहने धावली असून ५९ कोटी ७० लाख रुपये टोल वसुली करणे, ऑक्टोबरमध्ये १९ लाख वाहने धावली असून ६७ कोटी रुपये जमा होणे, माहे नोव्हेंबरमध्ये ९.३४ लाख वाहने धावली असून तब्बल ७१ कोटी रुपये टोल जमा झाला, तर डिसेंबरमध्ये ४६.७४ लाख वाहने धावली असून त्यांच्याकडून ८१ कोटी रुपये इतका टोल जमा होणे, यामुळे जुने कंत्राटदार आणि नविन कंत्राटदार यांनी शासनाकडे जमा केलेल्या आकडेवारीनुसार टोल रकमेमध्ये कोट्यवधी रुपयांची तफावत असल्याचा उघडकीस आलेला प्रकार, सदर प्रकरणाची निवृत्त न्यायधिशांमार्फत चौकशी करून दोषी कंत्राटदार व अधिकारी यांच्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करावे व तोपर्यंत एक्सप्रेस-वे वरील वाहन टोल वसुलीला स्थगिती देण्याबाबत सजग नागरी मंचने मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदनाव्दारे मागणी करणे, याप्रकरणी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात आर्थिक निधीचा झालेला अपव्यय, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

(१०२) “ पुणे जिल्ह्यातील अत्यंत महत्वाचा असलेल्या हडपसर-सासवड-जेजुरी या रस्त्याची दुरावस्था झाल्याने सदर रस्त्याचे काम बीओटी तत्वावर करण्यास मान्यता देणे, यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार तसेच संशयास्पद गैरकारभार झालेला असण्याची गंभीर महिती मार्च, २०२० च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, मनाज टोलवेज कंपनीने या रस्त्याचे काम करण्यास घेणे, रस्त्याच्या सुरुवातीच्या कामासाठी १३० कोटीची मागणी कारणे, मात्र दोन वर्षात या रस्त्याचे काम ३५० कोटी रुपये होणे, त्यास मान्यता देऊन न्यायालयात करारनामा केलेला असणे, लवादामध्ये तीन जणांची आवश्यकता असताना

सर्वश्री अमित झनक, अमीन पटेल, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | एक सदस्यीय लवादामध्ये मान्यता घेऊन संशयास्पद कार्यवाही करण्यात येणे, यामध्ये शासनाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, नव्याने स्थापन झालेल्या सरकारच्या काळात तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांचा शपथविधी झाला त्याच दिवशी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर प्रस्तावावर सहया करणे व अंतिमतः मुख्य सचिवांनाही सही करणे, अंतिम मान्यतेचीही सही त्याच दिवशी होणे, तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने दखल घेतल्यानंतर न्यायालयामध्ये खोटी कागदपत्रे सादर करून चुकीची माहिती देणे, मंत्री व सचिव स्तरावर वेगवेगळे शपथपत्र सादर करणे, न्यायालयाने त्यावर नाराजी व्यक्त करणे, यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचे दिसून येणे, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, सदर संशयास्पद गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करून कारवाई करण्याची मागणी येथील नागरीकांमधून केली जात असणे, याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, परिसरातील पुणे, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांना जोडणारा व जेजूरी, मोरगांव सारखी जगप्रसिध्द देवस्थाने तसेच पंढरपूरला जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांचा पालखी मार्ग असलेल्या या महत्वाच्या रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढलेले असणे, रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करणे तसेच सदर प्रकरणी झालेल्या गैरकारभाराची सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्याची अत्यावश्यकता आणि शासनाची प्रतिक्रिया. ” | | |

| | | |
|---|---|---|
| (१०३) | “ पुणे-नाशिक महामार्गावरील सिन्नर बायपास रस्त्याकरिता कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग), सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांनी ह.भ.प.शेतकरी श्री.चंद्रभान सांगळे याचेसह शेकडो शेतकऱ्यांना जमीनीच्या मोबदल्याचा योग्य दर न देता कमी-अधिक दर देऊन शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केल्याची नुकतेच उघडकीस आलेले धक्कादायक प्रकरण, सदरहू प्रकरणात रस्ता बाधीत श्री.सांगळे याच्या शेजारी राहणारे श्री.विनोद शाह या राजकीय वरदहस्त असलेल्या व्यक्तीस सा.बां.विभागाच्या कार्यकारी अधिकाऱ्याने प्रती गुंठा १५ लाख ८० हजार रुपये इतका चढा भाव देण्यात येणे, परंतु, तोच भाव न दिल्यास जमीन देण्यास विरोध दर्शविणारे बाधीत शेतकरी श्री.सांगळे यांची गट क्र.८९७ मधील ८८ आर जमीन व पाच बारमाही पाणी असलेल्या विहीरी कोणतीही नुकसानभरपाईची रक्कम न देता बेकायदेशीररित्या सक्तीने संपादीत केल्याचा घडलेला धक्कादायक प्रकार, त्याच दरम्यान सदरहू बाधीत शेतकऱ्यांनी जमिनीचा ताबा देण्यास विरोध केला असता कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारामार्फत सिन्नर पोलीस ठाण्यात कामगारांना मारहाण केल्याच्या खोट्या केसेस दाखल करून शेतकरी कुटुंबातील व्यक्तींना अटक करण्यात येऊन अपमानास्पद वागणूक देण्यात येणे, शिवाय कार्यकारी अभियंता यांनी २००९ ते २०१६ मध्ये चारवेळा नकाशात बदल करून मर्जीतील व्यक्तींच्या जमीनी वगळून गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने संपादित केल्याचा प्रकार घडणे, अशा प्रकारे येथील शेकडो शेतकऱ्यांची राष्ट्रीय महामार्गाच्या बायपास रस्त्यासाठी नवीन दरानुसार जमिनीचा व विहीरीचा भाव न देता कमी-अधिक भाव देऊन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याचा घडलेला निंदणीय प्रकार, यासंदर्भात बाधीत शेतकरी श्री. सांगळे व इतरांनी दिनांक २७.०६.२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना लेखी निवेदन | श्री. सुनिल प्रभू, वि.स.स |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे सदरहू शेतकऱ्यांवर झालेला अन्याय, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी येथील बाधीत शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. " | | |
| (१०४) | " औरंगाबाद महानगरपालिका लगतच्या क्षेत्राचे सुनियोजित नागरीकरणाच्या हेतूने सिडकोमार्फत सन १९९१ साली वाळूज महानगर प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणे, सदर प्रकल्पाकरिता तिसगाव, गोलवाडी, वळदगाव, वाळूज, पंढरपूर, नायगाव व इतर गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करणे, सदर भूसंपादनाची प्रक्रिया मागील २४ वर्षांपासून प्रलंबित असणे, भूसंपादन अधिनियमानुसार कलम ६(नवीन कलम १९) च्या अधिसूचना सन १९९८, २०००, २०१२, २०१६, व २०१७ या वर्षी प्रसिद्ध होणे, या प्रकरणी झालेला विलंब आणि जमीन मालकांना तातडीने मोबदला मिळावा या हेतूने शासनाने सदर भूसंपादन प्रक्रिया वाटाघाटीद्वारे पूर्ण करणाबाबत दिनांक ३१ मार्च २०१७ रोजीच्या पत्राद्वारे सिडको महामंडळास निदेश देणे, निदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यास सर्व आर्थिक बाबी विचारात घेऊन सिडको संचालक मंडळाने दिनांक ०३ नोव्हेंबर २०१७ व १३ डिसेंबर २०१८ रोजीच्या ठरावाद्वारे मान्यता देणे, संचालक मंडळाच्या नियुक्त समितीमार्फत भूधारकांबरोबर वाटाघाटीद्वारे संमतीचे करारनामे करणे, सदर करारनाम्या आधारे निवाडे जाहीर करण्यास जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडून दिरंगाई होणे, याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल होऊन न्यायालयाने दोन महिन्याच्या आत निवाडे जाहीर | श्री. संजय शिरसाट, वि.स.स. | |

करण्याचे दिनांक १३ ऑगस्ट २०१९ रोजी आदेश देणे, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निवाडे जाहीर करण्याबाबत शासनाने दिनांक १६ सप्टेंबर २०१९ व १४ ऑक्टोबर २०१९ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी औरंगाबाद व सिडकोस कळविणे, जिल्हाधिकारी यांनी निवाड्यास मंजुरी देऊन सिडकोकडे निधीची मागणी करून ४ महिन्याचा कालावधी उलटून देखील सिडकोकडून जाणीवपूर्वक सकारात्मक कार्यवाही न होणे, मा.उच्च न्यायालयात या प्रकरणी अवमान याचिका दाखल होऊन संबंधीतांना कारणे दाखवा नोटीस जारी होणे, प्रकल्पाच्या आर्थिक बाबींचा उहापोह करून संपूर्ण प्रक्रिया हेतुपुरस्सर व्यवस्थापकीय संचालकाद्वारे वेठीस धरणे, परिणामी बाधित भूधारकांमध्ये शासनाविषयी निर्माण झालेले असंतोष वातावरण, सिडकोकडून झालेल्या दिरंगाईमुळे या भागाचा विकास खोळंबणे, प्रस्तुत प्रकरणी कायदेशीर करारनामे, भूसंपादन अधिनियम आणि मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याची नितांत आवश्यकता, सदर प्रकल्पांतर्गत द्यावयाचा मोबदला संबंधित जमीनधारकांना तातडीने देण्याबाबतीत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

(१०५) “ शासनाने माहे मे, २०१९ मध्ये शासनाची दूध भूकटी लिलावाद्वारे विक्रीचे आदेश दिल्यानंतर बैष्णोदेवी प्रा. कंपनी यांच्याकडे दूध भूकटी घेण्यासाठी माहे जून, २०१९ मध्ये लिलावधारक गेल्यानंतर तेथे भूकटी उपलब्ध नसल्याचे व ती चोरी गेल्याचे निदर्शनास येणे दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रादेशिक दुग्ध व्यवसाय अधिकारी यांच्या तपासणीमध्ये साठ्यात तफावत नसल्याचे आढळून येणे तथापी रुपांतरणासाठी नियुक्त कर्मचारी यांनी नोंदी न ठेवणे, योग्य नियंत्रण न ठेवणे असे आरोप लावून निलंबनाची कारवाई केल्याचे विधानमंडळास चुकीची माहिती सादर केली जाणे, वास्तविक प्रादेशिक दुग्ध व्यवसाय अधिकारी

श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | यांनी प्रत्यक्ष साठ्याच्या नोंदी तपासणे, साठा कोठे ठेवला आहे व रुपांतरीत होत असलेली पावडर मानांकनाप्रमाणे तयार होत आहे किंवा नाही हे पाहून तशा नोंदी कनिष्ठ अधिकारी यांनी ठेवलेल्या दप्तरामध्ये करणे आवश्यक असणे, प्रत्यक्ष पावडर भेसळयुक्त केली जात असल्याचे लिलावधारक यांनी तपासणी अहवालासह तक्रार केली जाणे तथापी त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली न जाणे, एकंदरित दुग्ध व्यवसाय विभागाने कोणत्याही प्रकारे वैष्णोदेवी प्रकल्पात होत असलेल्या दूध भूकटीवर नियंत्रणे ठेवलेले नसल्याचे व जाणीवपूर्वक दूर्लक्ष करून, अकोला येथील गोडावून धारकांने बटर विक्री केली तरी त्यास काही झाले नाही त्याच धर्तीवर पावडर व बटर विक्री करण्यास कंपनीधारकास सहाय्य करून संगनमताने मोठा मलिदा लाटलेला असणे, चोरी होवूनही तो कोणत्याही वाहनाने नेला, कोणास विकला, कोठे विकला व त्याचे पैसे कशाप्रकारे कोणी घेतले याबाबतचा तपास न होणे यामुळे शासनाच्या रु.४०.०० कोटी इतक्या पावड व बटरची झालेली चोरीची नुकसानभरपाई होणे दुरापास्त झालेले असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना. ” | | |
| (१०६) | “ नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील गुमगाव परिसरात दिनांक ३.३.२०२० रोजी वा त्या सुमारास सोसाट्याच्या वादळासह अवकाळी पाऊस पडणे, या पावसामुळे गहू, हरभरा, तूर, तसेच भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान होणे, अचानक आलेल्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल होणे, काही ठिकाणी बोराच्या आकाराच्या गारपीट पडणे, परिसरातील | श्री. समिर मेघे, वि.स.स. | |

| | | |
|---|---|---|
| | झाडे उन्मळून पडणे, गावातील सखल भागात पाणी साचणे, शेतकऱ्यांच्या घराचे पत्रे उडून जाणे, वीज पुरवठा खंडीत होणे, नुकसानभरपाई मिळण्याबाबत शासनाकडे शेतकऱ्यांनी मागणी करणे, झालेल्या नुकसान भरपाईचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. " | |
| (१०७) | " तुमसर जि.भंडारा व ता. मोहाडी येथील जांब व आंबागड क्षेत्रात ५००० एकरातील टोमॅटो शेतीला किड लागल्यामुळे पीक उध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळणे याप्रकरणी शेती पिकाचे हवामानातील बदलामुळे टॉमेटो पिकावर आजार ओढवल्याने शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान, याप्रकरणी महसूल व कृषी विभागाने स्वतंत्र सर्व्हेक्षण करून झालेल्या पिकांची नुकसानीची मागणी, स्थानिक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमार्फत, निवेदनामार्फत दिनांक २२/०१/२०२० या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींना होणे शासनाने याची तात्काळ दखल घेऊन मोहाडी व तुमसर क्षेत्राची झालेल्या टोमॅटो पीक नुकसानीची पाहणी करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. " | सर्वश्री राजू कारेमोरे, विनोद अग्रवाल, नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. |
| (१०८) | " पूर्व विदर्भात गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात शेतकऱ्यांचा भात शेती हा प्रमुख व्यवसाय असणे, गोंदिया जिल्ह्यात आमगांव देवरी मतदारसंघात दिनांक २६,२८ नोव्हेंबर, व दिनांक २, ५, ७ आणि १९ डिसेंबर, २०१९ रोजी शेतकऱ्यांच्या धानांच्या पुंजणाला नऊ गावातील हेतूपुरस्स आग लावून धान उत्पादकांना ६१,०९,६०६/- एवढी नुकसान होणे, यावर त्यांची उपजीविका असणे, गोंदिया जिल्ह्यात आमगांव,देवरी हा आदिवासी आर्थिकदृष्ट्या मागसलेला मतदारसंघ असून आदिवासी लोकांचा भात शेती हा प्रमुख व्यवसाय असणे, | श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स. |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | पुंजणाला आग लागल्याने शेतकरी हवालदिल झाले असणे, त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, तसेच पुंजनाला आग लावणाऱ्यांना अदयाप अटक न करणे, अथवा कोणतीही कारवाई न होणे, दोषी मोकाट फिरत असणे, शासनाच्या या दुर्लक्षामुळे व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत होत असलेल्या विलंबामुळे त्यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष व चिडीची भावना, शासनाने तातडीने या शेतकऱ्यांना मदत मिळणेबाबत तसेच दोषींवर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| (१०९) | “ राज्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, शासकीय दंत महाविद्यालयात सर्वात स्वस्त दरात दंत उपचार केले जात असून त्यामुळे हजारो रुग्णांना याचा लाभ मिळणे, राज्यात स्थानिक तसेच संचालक पातळीवर होणारी यंत्र खरेदी सन २०१६-१७ पासून हाफकिन महामंडळाच्या माध्यमातून होत असणे, सन २०१७-१८ पासून शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाना यंत्र सामुग्री खरेदीसाठी निधी वर्ग करण्यात आलेला असणे, परंतु अद्यापही शासकीय वैद्यकिय महाविद्यालयांना यंत्र सामुग्रीसाठी करावी लागत असलेली प्रतिक्षा, तसेच शासकीय वैद्यकिय महाविद्यालयांना वेळेवर औषधांचा पुरवठा होत नसल्याने रुग्णांना खाजगी दुकानांतून औषधे खरेदी करावी लागणे, सदर परिस्थितीमुळे आर्थिक भार सहन करावा लागत असून नाहक त्रास होत असल्याचे निदर्शनास येणे, सन २०१७-१८ व २०१८-१९ घाटी रुग्णालयाला सुमारे ४ कोटी रुपयांचा निधी हाफकिन कडे वर्ग करण्यात आलेला असतांना | सर्वश्री मोहन मते, राधाकृष्ण विखे-पाटील, प्रदीप जैस्वाल, ॲड. पराग अळवणी, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. संजय पोतनीस, चंद्रकांत पाटील, महेंद्र दळवी, संतोष बांगर, किशोर पाटील, अजय चौधरी, संजय गायकवाड, डॉ संजय रायमुलकर, श्री. कालीदास कोळंबकर, ॲड. राहूल कुल, श्री. अबू आजमी, वि.स.स. | |

त्यापैकी केवळ २१ लाखांची यंत्र सामुग्री प्राप्त होणे, तसेच घाटी रुग्णालयात सन २०१८-१९ ची २३३ पैकी ९३ प्रकारची केवळ ४० टक्के औषधांचा पुरवठा झाला असल्याने औषधांचा तुटवडा भासणे, रुग्णालयात वेंटिलेटर यंत्राची सोय नसल्याने रुग्णांना खाजगी रुग्णालयात जाऊन खर्चिक उपचार घ्यावे लागणे, परिणामी रुग्णांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, राज्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयांना अत्याधुनिक यंत्रसामुग्री, औषधे तसेच सर्व सोयीसुविधा पुरविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व भूमिका. ''

(११०) '' इलेट्रोपॅथी/इलेकट्रोहोमेओपॅथी हे चिकीत्सा शास्त्र संपूर्ण भारत देशात प्रमोशन, डेव्हलपमेंट व रिसर्च या तत्वावर कार्यरत असणे, महाराष्ट्र राज्यात सन १९८५ पासून हे शास्त्र मोठ्या प्रमाणात कार्यरत असल्याने राज्यातील मध्यमवर्गीय व गरीब शेतकरी कुटुंबातील इलेट्रोपॅथी / इलेकट्रोहोमेओपॅथी या चिकीत्सा शास्त्राचे शिक्षण घेतलेले किमान ३० हजार व्यावसायिक आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह या चिकित्सा पद्धतीवर चालवीत असून देशाच्या मा. सर्वोच्च न्यायालयाने व मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने या चिकित्सा शास्त्रान्व्ये व्यवसाय करण्याची परवानगी दिलेली असणे, तसेच महाराष्ट्र राज्य बाहेरील राजस्थान शासनाने या चिकित्सा पद्धतीस मान्यता दिलेली असल्याने त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने या चिकित्सा पद्धतीस मान्यता दिल्यास राज्यातील ३० हजार व्यावसायिकांना त्याचा फायदा होऊ शकेल, तरी या प्रकरणी शासनाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता. ''

डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स.



---

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (१११) | “ मुंबईतील भायखळा पूर्व येथील सर ज.जी.समुह रुग्णालय व कामा रुग्णालयात गेली २० वर्षापासून ६ अंशकालीन महिला कर्मचारी यांचेसह ग्रँड शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वर्ग १ ते वर्ग ४ या संवर्गातील १३१ रिक्त पदे भरण्याची शासनाने २ वर्षापूर्वी जाहीर करूनही अद्याप शासनातर्फे रिक्त पदे भरण्यात आली नसल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, वित्त व सामान्य प्रशासनाच्या मान्यतेसाठी गेली २ वर्षापासून संबंधित प्रश्न प्रलंबित असणे, गेली २० वर्षापासून ४१८ रुपये इतक्या अल्प वेतनावर काम करणाऱ्या ६ महिला कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणेबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी शासनास पत्राद्वारे शिफारस करूनही त्याची शासनाकडून दखल घेण्यात न येणे, सद्य स्थितीत सदरहू महिलांचे वय नियमबाह्य असल्याने त्यांना अन्यत्र कोठेही नोकरी मिळत नसणे, २० वर्षे रुग्णालयात सेवा देऊनही त्यांना सेवेत कायम न करता शासनाकडून त्यांच्यावर झालेला अन्याय, माहे एप्रिल २०१६ रोजी शासनाने सदरहू ज.जी. रुग्णालयातील ७७४ बदली कामगारांना सेवेत कायम करणे त्याच धर्तीवर सदरहू ६ अंशकालीन महिलांना सेवेत कायम करून महाविद्यालयातील वर्ग १ ते ४ मधील १३१ रिक्त पदे तातडीने भरणेबाबत निर्णय घेऊन शासनाने रुग्णांना सुरळीत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणेबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी सर ज.जी. रुग्णलयातील अन्यायग्रस्त कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. | |

(११२) “ नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्पांतर्गत मुक्ताईनगर-बोदवड तालुक्यातील (जि. जळगावं) ६० व १४ गावे असून या गावातहृ योजना सुरू करणे, मात्र अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना पूर्व संमती देऊन विद्युत पंप संच, पीव्हीसी पाई, शेळया, ठिंबक सिंचन संच खरेदी करण्याचे मोबाईल संदेशाद्वारे दिलेले आदेश, यातून बऱ्याच शेतकऱ्यांनी साहित्य खरेदी करणे, मात्र शेळी पालन या घटकांकरिता मुंबई येथून शेळया खरेदीबाबत जिल्ह्याबाहेरून किंवा शेळी मेंढी विकास महामंडळ चाळीसगांव येथून खरेदीबाबत संभ्रमावस्था निर्माण करणे आणि खरेदी करूनये असे मोबाईलवरन सूचना देणे, मात्र तीन ते चार महिने निर्णय् न झाल्याने शेवटी कर्मचाऱ्यांनी तोंडी विचारणा करून आसलगांव, जि. बुलढाणा येथे दि. १८.२.२०२० रोजी च्या सुमारास ११८ शेतकऱ्यांच्या १२९८ शेळया खरेदी करणे, मात्र त्या दिवसांपासून मोबाईल ॲपवरील तांत्रिक अडचणी, शेळया खरेदी विमा पावत्या इत्यादी अडचणीमुळे बिले व विमा पावत्या अपलोड करु न शकणे, तसेच पीव्हीसी पाईत, विद्युत मोटार आणि ठिंबक सिंचन संच या घटकांचे दि. १.२.२०२० पासून मोबाईल ॲपमध्ये केलेल्या बदलामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या मोबाईल ॲपवरील असुविधेमुळे शेतकरी वा कर्मचारी स्वतः बिल अपलोड करून शकले नाही आणि दि. २७.२.२०२० पासून ४५ दिवसापेक्ष जादा कालावधीच्या पूर्वसंमत्या रद्द केल्याने जवळपास ४०-५० शेतकरी अनुदानापासून वंचित राहणे, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता ज्या शेतकऱ्यांचे शेळया, पीव्हीसी पाईप, विद्युत पंप आणि ठिंबक सिंचन संच दि. २७.२.२०२० पूर्वी खरेदी झालेल्या आहेत अशा शेतकऱ्यांना पुन्हा पूर्व संमती देऊन अनुदान वर्ग करण्याबाबत आदेश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ”

श्री. चंद्रकांत भाऊ) निंबाजी पाटील,
वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (११३) | “ शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व्हावी, यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प राबविण्यात येत असणे. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावामध्ये शेळीपालन, वैयक्तिक शेततळे, सामुदायिक शेततळे, अस्तरीकरण, नविन विहीर, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पाईप, पंपसंच, डीझेल इंजिन, बिजोत्पादन, रेशीम उद्योग, शेडनेट, ट्रॅक्टर, ट्रॅक्टर चलित अवजारे अशा विविध वैयक्तिक लाभाच्या योजना घेता येणे, संबंधित गावातील अनेक शेतकरी ऑनलाइन अर्ज करून गरजेच्या योजनेचा लाभ घेत असणे, यामाध्यामातुन शेतकरी आर्थिक दृष्टया सक्षम होण्याचा प्रयत्न करीत असणे. योजनेचा होणारा फायदा विचारात घेऊन वर्षागणिक अर्जदार शेतकऱ्याची संख्या वाढत असणे, असे असतानाच आता शासनाने प्रत्येकघटकासाठी लक्षांक निश्चित करून दिले असणे, उद्दिष्टापेक्षा अनेक पटीने मागणी अर्जाची संख्या असणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागणी प्रमाणे विविध घटकासाठी लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकरी करीत असणे, त्यासाठी पूर्वी प्रमाणे प्रत्येक पात्र शेतकऱ्यांना मागणीप्रमाणे अनुदानीत घटकांचा लाभ देण्याबाबत व लक्षांकाचे बंधन रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री. अभिमन्यु पवार, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राणाजगजीतसिंह पाटील, राहूल कुल, चंद्रकांत पाटील, ॲड. आकाश फुंडकर, श्री. बळवंत वानखेडे, वि.स.स. | |
| (११४) | “ सिल्ली भोजापुर शिवारात (ता. कुही, जि.नागपूर) खसरा क्र. ४२५ आराजी १४.१६ हेक्टर जागेची नोंद शासकीय रेकॉर्डवर झुडपी जंगल म्हणून असून सुद्धा वनकायदे शासनात शासकीय योजनेच्या गुंडाळन एकाच शेतकऱ्यासाठी ७० लक्ष इतका निधी खर्चून शासकीय योजनेतून बंधारा बांधण्यात आल्याची बाब दिनांक १२ फेब्रुवारी २०२० रोजी उघडकीस येणे, १४ हेक्टर झुडपी जंगल | श्री. राजु पारवे, वि.स.स. | |

असलेल्या संरक्षित जमिनीतून २ हेक्टर जागा एका खासगी सेवानिवृत्त सैनिकाला ताब्यात देणे, खसरा क्र. ४२५ याच पट्ट्यात त्या नंबर ची आराजी १४.१६ हेक्टर आर एवढी असून त्याच नंबरमध्ये त्या खासगी मालकाला स्वतःच्या उपयोगाकरिता शासकीय योजनेमधून शेतकऱ्याला लाभ देण्यात येणे, वनजमिनीत कुठलाही नाला नसताना २ वर्षांपूर्वी जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभागाकडून त्याच एका शेतकऱ्याकरिता शासकीय यंत्रणा वापरून वनजमिनीत पाणी अडवा, पाणी जिरवा योजनेअंतर्गत नाला बांधकाम करण्यात येणे, यामुळे इतर शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

(११५) “ राज्यातील रस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बांधकाम विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध रस्ते विकास योजनांतर्गत वन विभागातून जाणाऱ्या रस्त्यांची कामे करतांना वन विभागाची पूर्व परवानगी घ्यावी लागणे, गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, अतिसंवेदनशिल नक्षलग्रस्त जिल्हा असून जिल्ह्याचा ७८% भूभाग जंगलाने व्यापलेला असून जिल्ह्यामध्ये १५१३ गावे असून त्यापैकी बरीच गावे आदिवासी बहूल असून जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या ३८.७१% असणे, विकासाच्या दष्टीने हि गावे बारमाही रस्त्याने जोडणे आवश्यक असणे, तथापि गडचिरोली या जिल्ह्यात शासनातर्फे सन १९८९ मध्ये विशेष कृती कार्यक्रम अंतर्गत प्रत्येक खेड्यांना बारमाही रस्त्याने जोडण्याकरिता रस्ते व पूल तयार करण्याकरिता कार्यक्रम राबविण्यात आला परंतू नक्षल कारवांयामुळे सदर कामे मोठा कालावधी लोटून रस्ते व पुलांची कामे पूर्ण न होणे, त्यानंतर शासनाने BRO (सिमा रस्ते संगठन) शी सामंजस्य करार करून रस्ते व पुलाची कामे करावयाचे नियोजन करणे व

श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | त्यानुसार BRO ने २०१० पर्यंत रस्ते व पुलांची कामे करण्यात येऊन व त्यापुढील कामे करण्यास असमर्थता दर्शविण्यात येणे, त्यामुळे जिल्ह्यातील सर्व रस्ते व पूलांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फतच करण्यात येत असणे, परंतु वन विभागाच्या जाचक अटीमुळे रस्ते व पूल बांधकामाकरिता व इतरही मुलभूत विकासाच्या सोयी सुविधा पुरविण्याकरिता तसेच वन विभागातून जाणाऱ्या रस्त्याची कामे करतांना वन विभागाकडून पूर्व परवानगी न घेतल्यामुळे अनेक अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल झाल्याचे अनेक प्रकरण उघडकीस येणे, त्यामुळे सदर कामे पूर्ण होण्यास विलंब होत जाणे, गडचिरोली जिल्ह्याच्या भौगोलीक क्षेत्राचा विचार करता वन विभागाकडून ज्या जाचक अटी लावण्यात आल्या आहेत त्या शिथील करण्याची अत्यंत तातडीची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमीका. ” | | |
| (११६) | “ ठाणे जिल्ह्यातील वरसावे शासकीय विश्रामगृहामागे असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये डोंगर पोखरुन रस्ता करण्यात येत असून यामध्ये नैसर्गिक तलावामध्ये भराव टाकण्यात आल्याप्रकरणी सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन कंपनी विरोधात गुन्हा दाखल करण्याबाबत वन विभागाने आदेश दिले असणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीलगतच्या इको सेन्सेटिव्ह झोनच्या दहिसर चेकनाक्यापासून मीरा, काशी, वरसावे, घोडबंदर, चेणे व काजूपाड्यापर्यंत राजरोसपणे बेकायदा खोदकाम, भराव, बांधकामे होत असताना संबंधित विभाग याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य | सर्वश्री. अमित झनक, अमीन पटेल, वि.स.स. | |

| | | |
|---|---|---|
| | शासनाने सखोल चौकशी करून पर्यावरणाचा सर्रासपणे ऱ्हास करणाऱ्या संबंधित कंपनी विरोधात गुन्हा नोंदविण्यात येऊन कारवाई करण्याबाबत तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे नुकसान झाल्याप्रकरणी नुकसान भरपाईची कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया. ” | |
| (११७) | “ धुळे तालुक्यातील फागणे व २० गाव पाणीपुरवठा योजना देखभाल, दुरुस्ती व थकीत वीजबिलामुळे बंद पडली आहे. या योजनेंतर्गत धमाणे, नगाव, बिलाडी, निमखेडी, कुंडाणे, वणी, आर्णी, बाळापूर, फागणे, पिंप्री, वडजाई, अजंग, काळखेडा, आमदड, मुकटी, भिरडाई, चिंचखेडा, सावळी या गावांना पाणीपुरवठा केला जात होता. सदर योजना बंद पडल्यामुळे समाविष्ठ गावांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. सदर योजना पुर्नजिवित करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून तो मंजूर होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच धुळे तालुक्यातील सोनगीर व १४ गाव पाणीपुरवठा योजनेसाठी तापी नदी उद्‌भव घेऊन पुर्नजिवीत केल्यास तालुक्यातील सर्वांत जास्त लोकसंख्येचे गाव असलेल्या सोनगीर गावाचा पाण्याचा प्रश्न संपेल. तसेच धुळे जिल्हा परिषदेत भूवैज्ञानिकची जागा रिक्त असल्यामुळे पाणी-पुरवठा विभागाला अनेक समस्यांना सामोर जावे लागत आहे. अनेक पाणी-पुरवठा योजनांची व सर्वेक्षणाची कामे ठप्प आहेत. गेल्या वर्षीच्या टंचाईचे अनुदान अद्याप धुळे पाणीपुरवठा विभागाला प्राप्त झालेले नाही, तरी सदरील अनुदान त्वरीत मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री. कुणाल पाटील, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (११८) | “ मागील वर्षीच्या उन्हाळ्यात म्हणजेच माहे एप्रिल, २०१९ ते माहे सप्टेंबर, २०१९ या कालावधीत वर्धा तालुक्यातील वर्धा शहर व लगतच्या मोठ्या ग्रामपंचायतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई असणे, स्थानिक नागरिकांना आठ ते दहा दिवसाआड पाणी मिळणे, वर्धा शहर पाणीपुरवठा व शहरालगतच्या पिपरी (मेघे) पाणीपुरवठा योजना या दोन्ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनाचे शिर्षस्थळ असलेल्या येळाकेळी Pickup Weir मध्ये पाणी उपलब्धी नसल्याने वरील दोन्ही पाणी पुरवठा योजनांमध्ये टंचाई निर्माण होणे, या गंभीर समस्येची दखल घेत तत्कालीन पालक सचिव यांनी दिनांक १४ मे २०१९ रोजी वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयात तातडीची बैठक घेणे, तसेच, तत्कालीन मा. पालकमंत्री यांनी दिनांक १२ जुलै, २०१९ रोजी या गंभीर समस्येवर उपाय काढण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनूसार धान नदीवरील महाकाली धरणावरुन वर्धा शहर व पिपरी (मेघे) व शहरालगतच्या १३ मोठ्या सिंधी (मेघे), सावंगी (मेघे), बोरगाव (मेघे), वरुड उमरी (मेघे), सालोड, दत्तपुर, कारला, साटोडा, आलोडी, नालवाडी, म्हसाळा, वायगाव या गावांच्या पाणीपुरवठा योजनांकरिता लागणारे पाणी येळाकेळी Pickup Weir पर्यंत आणण्याकरिता गुरुत्वनलिका टाकण्याचे निर्देश देणे,परंतु अजूनपर्यंत स्थानिक प्रशासनाकडून व संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जलसंपदा विभाग यांच्या समन्वय नसल्याने परिपूर्ण प्रस्ताव तयार न होणे, यावर्षीचा उन्हाळा येण्याची वेळ आली असली तरी राज्य सरकारकडून अजूनपर्यंत सदर कामाला प्रशासकीय मान्यता न मिळणे, परिणाम स्वरुप यावर्षी देखील वर्धा शहरातील व आजूबाजूच्या मोठ्या गावातील | डॉ. पंकज भोयर, वि.स.स. | |

नागरिकांमध्ये पाणी टंचाईबद्दल भिती निर्माण होणे, या पाणी टंचाईच्या संकटातून वर्धा वासियांना वेळेच्या आत मुक्त करण्याची आवश्यकता, याबाबत राज्य सरकारने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

(११९) “ ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ व बदलापूर नगरपरिषद हद्दीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे जलव्यवस्थापन असून बदलापूर व अंबरनाथ नगरपरिषद हद्दीमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या ब्यारेज, बारवी धरण भोज, चिखलोली या धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असूनही माहे मार्च २०१६ पासून नवीन नळजोडण्या बंद करून अधिकाऱ्यांनी कृत्रिम पाणी टंचाई करणे, नवीन नळ जोडण्या बंद करण्याचे कोणतेच कारण अथवा अडचणी नसणे, त्यामुळे नागरिकांनी व नवीन गृह संकुल विकासकांनी अनाधिकृतपणे नळजोडण्या घेण्यात येणे, माहे सप्टेंबर व नोव्हेंबर २०१६ दरम्यान अनाधिकृत नळजोडण्याचे सर्वेक्षण करण्यात आले त्यानुसार बदलापूर शहरात ५९० व अंबरनाथ शहरात १५८० म्हणजेच एकूण सुमारे २१७० नळजोडण्या अनाधिकृतपणे झाल्याचे आढळून येणे, माहे जानेवारी २०१८ पर्यंत संभाव्य अनाधिकृत नळजोडण्या सुमारे ४,३४० पर्यंत झालेल्या असणे, त्यामुळे या अनाधिकृत नळ जोडण्याचे पाणी देयक सुमारे ११ ते १२ कोटी रुपये होत असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे शासनाचे ११ ते १२ कोटी रुपयांचे नुकसान झालेले असणे, बदलापूर व अंबरनाथ शहरातील विकासक व नागरिकांमध्ये अधिकृत नळ जोडण्या न दिल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व शासनाच्या विरोधात प्रचंड संताप व नाराजीचा सूर असणे, अंबरनाथ व बदलापूर शहरातील नागरिकांना हक्काच्या पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवणाऱ्या तसेच शासनाची दिशाभूल व फसवणूक करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे व पर्यायाने शासनाचे ११ ते १२ कोटी रुपयांचे नुकसान करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

सर्वश्री. किसन कथोरे, संजय केळकर, गणपत गायकवाड, कुमार आयलानी, ॲड. आशिष शेलार, श्री. विश्वनाथ भोईर, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (१२०) | “ पनवेल (जि. रायगड) महानगरपालिका क्षेत्रात दरवर्षी उन्हाळ्यामध्ये भेडसावत असलेली पिण्याच्या पाण्याची समस्या याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या शहरी भागातील योजना वाढत्या लोकसंख्येमुळे कमी पडत असल्याचे माहे फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, पनवेल महानगरपालिका क्षेत्राकरिता केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत १०० एमएलडी पाण्याची तरतूद करणारी पाणीपुरवठा टप्पा २ ही योजना मंजूर करण्यात आली असणे, उक्त योजनेसाठी जवळपास ४०८ कोटी रूपये खर्च करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेला केंद्र शासनाकडून १७० कोटी रूपये निधी उपलब्ध होणार असणे, उक्त योजनेच्या प्रकल्पाच्या निविदा मंजूर होवून बराच कालावधी होवून सुद्धा अद्यापही कार्यारंभ आदेश देण्यात आला नसणे, चालू आर्थिक वर्षात कार्यारंभ आदेश न दिल्यास केंद्र शासनाकडून उक्त योजनेसाठी देण्यात येणारा १७० कोटीचा रूपयाचा निधी वापराविना परत जाण्याची शक्यता निर्माण होणार असणे, पनवेल महानगर क्षेत्रातील मोठ्याप्रमाणात होत असलेले वाढते नागरीकरण तसेच नव्याने होत असलेल्या नवी मुंबई विमानतळ बाधीत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पाहता भविष्यात पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता केंद्र शासनाची अमृत योजना तातडीने कार्यान्वीत होण्याची नितांत गरज त्यासाठी शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | सर्वश्री. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. आशिष शेलार, श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स. | |

(१२१) “ राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये आवश्यक सोयी सुविधा नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची दैयनीय अवस्था झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, मागील तीन वर्षात २८२ विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू, यापैकी २८ टक्के मुलांच्या मृत्यूचे कारण समजू शकलेले नसणे, मुरबाड येथील वसतीगृहात इयत्ता बारावीत शिकणाऱ्या मुलाचा मृतदेह दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास शेजारील जंगलात आढळून येणे, पेण आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचे मृत्यू होणे याबाबत आश्रमशाळेतील तीन कर्मचारी निलंबित करणे, या घटनांची शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता असतानाही चौकशी न होणे, घुलेवाडी (ता. संगमनेर, जि. अहमदनगर) येथील शासकीय आदिवासी वसतीगृहात निकृष्ट जेवण दिले जात असल्यामुळे वसतिगृहातील २५० विद्यार्थ्यांनी दिनांक ३ फेब्रुवारी २०२० रोजी पासून सुरु केलेले अन्नत्याग आंदोलन, त्यामुळे सदर विद्यार्थ्यांची होत असलेली उपासमार, दिनांक ४ फेब्रुवारी २०२० रोजी नाशिक येथील आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त आणि सदर विद्यार्थ्यांमध्ये संपन्न झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील निकृष्ट जेवणाबाबत गंभीररीत्या तक्रारी करून जेवण करणाऱ्या ठेकेदाराविरोधात ठोस कारवाई करण्याबाबत केलेली मागणी, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत वसतिगृहाच्या प्रवेशद्वाराला आतून टाळे ठोकून ठोस निर्णय झाल्याशिवाय अन्नत्याग आंदोलन मागे न घेण्याचा केलेला निर्धार, या संपूर्ण प्रकरणाची विनाविलंब चौकशी होऊन ठेकेदाराविरोधात तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे संबंधितांविरोधात जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरोधात ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अतुल भातखळकर, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. राम कदम, अभिमन्यु पवार, संजय केळकर, कालिदास कोळंबकर, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सुनिल प्रभू, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. शांताराम मोरे, महेंद्र दळवी, भरतशेठ गोगावले, बंटी भांगडिया, डॉ. देवराव होळी, सर्वश्री कृष्णा गजबे, किशोर जोरगेवार, ॲड. आशिष जयस्वाल, श्री. प्रमोद पाटील, ॲड. राहूल कुल, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| (१२२) | “ वाल्हिवरे (ता. मुरबाड, जि. ठाणे) लोकसेवा शिक्षण संस्थेच्या आश्रम शाळेत अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना वितरण करावायच्या साबण, तेल, केस कटींग अन्य वस्तुंसाठी आलेला निधी बोगस बिले सादर करून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करून भ्रष्टाचार केल्याचे प्रकरण आश्रम शाळेचे चिटणीस व कोशाध्यक्षांनी दिनांक ११ फेब्रुवारी २०२० रोजी उघडकीस आणणे, वाल्हिवरे आश्रम शाळेतील मुलांना देण्यात येणाऱ्या वस्तुमध्ये कपात करून व खोटी बिले बनविण्यात येऊन निधी हडप करण्याचा प्रकार घडणे, यासंदर्भात शासनाने नेमलेल्या द्विसदस्यीय चौकशी समितीने आश्रम शाळेस भेट देऊन याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात येणे, सदर प्रकरणी संस्थेला चौकशी अहवाल सादर करण्यासाठी अधिकारी गेले असता बाळकृष्ण पवार व अन्य साथीदारांनी सदर प्रकरण आपसात मिटवा अन्यथा जीवानिशी जाण्याची धमकी देण्यात आल्याची टोकावडे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येणे, आश्रम शाळेच्या अध्यक्षांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करून संबंधित दोषींविरुद्ध गुन्हे दाखल करून कारवाई करणेबाबत अद्यापही टोकावडे पोलीस ठाणे अधिकारी यांनी कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण आर्थिक संगनमताने दडपून टाकल्याचा आश्चर्यजनक प्रकार घडणे, यामुळे सदरहू आश्रम शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यावश्यक व जीवनावश्यक वस्तुंच्या वापरापासून वंचित रहावे लागणे, यामुळे सदरहू विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय विचारात घेता सदर प्रकरणी सखोल चौकशी करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री सुनिल प्रभू, सुनिल भुसारा, अतुल बेनके, संदिप क्षिरसागर, वि.स.स. | |

(१२३) “ राज्यात खाजगी सावकारांकडून शेतकरी आणि सर्वसामान्यांची लुट होऊ नये म्हणून राज्य सरकारने सन २०१४ मध्ये खाजगी सावकारी कायद्यात सुधारणा करणे, सावकारी कर्जाचे व्याजदर कमी करून त्याच्या वसुलीबाबतही नियमावली जाहीर करणे, परंतु सर्व नियम धाब्यावर बसवून खाजगी सावकारांकडून कर्ज वसुली केली जात असल्याचे निदर्शनास येणे, गरजेपोटी ज्यादा व्याजदराने घेतलेल्या रकमेचा परतावा करूनही खाजगी सावकारांकडून होणाऱ्या लुटमारीमुळे अनेकांना आपली राहती घरेही सोडावी लागणे, सावकारांची दहशत व भीती असल्याने अनेकदा पोलीस ठाण्यापर्यंत तक्रारी पोहचत नसणे, सावकार कोऱ्या कागदपत्रांवर कर्जदारांच्या सह्या घेतात त्यामुळे त्यांच्या सहमतीने व्यवहार झाल्याचे दाखवले जाणे, त्यामुळे पुरावे सादर करण्यात कर्जदार अपयशी ठरत असल्याने सावकार मोकाट सुटणे, कर्ज वसुलीकरिता सावकार गुंडांच्या टोळ्या पोसत असणे, याचा फायदा घेत खाजगी सावकार सर्वसामान्यांसह गरजवंतांची लुट करीत असणे, शासनाने खाजगी सावकारी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

श्री. चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. लक्ष्मण जगताप, मोहन मते, विकास कुंभारे, वि.स.स.

(१२४) “ महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, ११९९ चे कलम १० पोट कलम ६ (अ) मध्ये राज्य शासकीय विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन सहवित्त संस्था आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा.२४) यांच्या कलम ७३ अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ प्रवर्गातील सर्व सेवांमध्ये प्रकल्पबाधीत व्यक्तीच्या नामनिर्देशितांसाठी रोजगाराकरिता किमान ५ टक्के प्राथम्य कोटा आरक्षित केलेला असणे,

श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, दुध संघ, स्थानिक स्वराज्य संस्था, सरकारी भाग भाडंवल घेतलेल्या संस्था, खाजगी शिक्षण संस्था यासह अन्य ४४ मोठ्या संस्थातील वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या एकूण पद भरतीमध्ये ५ टक्के जागांवर पुर्नवसन कायद्यानुसार प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना संधी देणे बंधनकारक असणे, सिंचन प्रकल्पात घर जमीन गेलेल्या कुटुंबांच्या घरातील बेरोजगार प्रकल्पग्रस्त वर्षानुवर्षे नोकरीच्या शोधात भटकंती करूनही वेळेत पुर्नवसन नाही आणि नोकरीही नाही अशी दयनीय अवस्था प्रकल्पग्रस्तांचे होणे, जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना नोकरीस पात्र असणाऱ्या सहकारी संस्थांची संख्या १२१ हून अधिक असून यामध्ये संस्थाचे संचालक, नेते मंडळींची नातेवाईक व जवळच्या कार्यकर्त्यांना नोकरी भरतीमध्ये प्राधान्य देऊन नोकर भरती केल्याने पुर्नवसन कायद्याचा भंग होणे, याबाबत प्रकल्पग्रस्तांनी वेळोवेळी पुर्नवसन विभागाकडे मोर्चे, आंदोलने करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे याबाबत पुर्नवसन विभागाने माहे डिसेंबर, २०१९ वा त्यासुमारास बैठक घेऊन जिल्ह्यातील साखर कारखाने, सुतगिरण्यासह इतर पात्र संस्थांत प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के आरक्षणानुसार नोकरी मिळण्याबाबत आढावा घेणे, त्यामध्ये प्रामुख्याने सदरील संस्थामध्ये किती प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेतले आहे ? तसेच सद्या संस्थेमध्ये असणारी एकूण संख्या व भविष्यात करावयाची नोकर भरती याबाबतचे नियोजन असा सविस्तर आढावा घेण्यात येणे, प्रकल्पग्रस्त नोकरभरतीस टाळाटाळ करणाऱ्या गोकूळ दुध संघास अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना नजीकच्या काळात नोटीस काढून कारवाई करण्याबाबतचे आदेश देणे, परंतु अद्यापही सहकारी संस्थांमध्ये प्रकल्पग्रस्तांना | | |

सामावून घेण्याबाबत उदासिनता दिसून येणे, परिणामी प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून न घेतल्यामुळे जिल्ह्यातील प्रकल्पांच्या कामास विरोध करणे, यामुळे प्रकल्पांची कामे गेल्या १५ ते २० वर्षांपासून बंद अवस्थेत असण्याचे एक कारण असणे, शासनाने कोल्हापुर जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थामध्ये आजमितीस संस्थानिहाय केलेली पद भरतीचा आढावा घेवून जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना भरती प्रक्रियेमध्ये पुनर्वसन कायद्यानुसार ५ टक्के प्रमाणे नोकर भरती करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. "

(१२५) " पनवेल (ता. पनवेल, जि.रायगड) येथील कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्ष व संचालकांनी हजारो कोटी रूपयाचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले असणे, उक्त बँकेच्या रायगड जिल्ह्यातील १७ शाखांतून जवळपास ५१३ कोटी ऐवढ्या रकमेचा अपहार झाल्याचे जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था रायगड, अलिबाग यांनी त्यांचा दिनांक १३ डिसेंबर २०१९ चा चौकशी अहवाल दिनांक १९ डिसेंबर २०१९ रोजी सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयात सादर केलेल्या अहवालात स्पष्ट नमुद केले असणे, कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षांनी आपल्या पदाचा गैरवापर करून बँकेचे खातेदार व गुंतवणूक दारांचे पैसे त्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट व कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी या दोन संस्थांमध्ये अवैध सावकारी (Money laundering) पद्धतीने कोट्यवधी रूपये नियमबाह्य वर्ग केले असणे, कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट व कर्नाळा स्पोर्टस् अकॅडमी या दोन संस्थांमध्ये कर्नाळा बँकेतील खातेदार व ठेवीदार यांनी गुंतवलेली कोट्यवधी रूपयाची रक्कम वैयक्तीक स्वार्थापोटी अन्य ठिकाणी खर्च केली असणे, उक्त बँकेच्या अध्यक्ष

सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री कालीदास कोळंबकर, सुनिल प्रभू, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, अभिमन्यु पवार, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | व संचालकांनी केलेल्या कोट्यवधी रूपयाच्या बँकेतील आर्थिक घोटाळयाबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे नवी मुंबई येथे जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग १, सहकारी संस्था अलिबाग रायगड यांनी दिनांक १७फेब्रुवार २०२० रोजी गुन्हा दाखल केला असणे, बराच कालावधी होऊन सुद्धा बँकेच्या अध्यक्ष व संचालकावर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झाली नसणे, वांरवार मागणी करूनसुद्धा बँकेच्या खातेदारांना आपली आयुष्याची पुंजी म्हणून बँकेत ठेवलेली रक्कम परत देण्यासाठी बँकेच्या व्यवस्थापनाकडून असमर्थता दर्शविली जात असणे, बँकेतील खातेदार व गुंतवणुकदारांना बँकेकडून आपली आर्थिक फसवणूक होत असल्यामुळे खातेदार व ठेवीदारांमध्ये निर्माण झालेली चिडी व असंतोषाच्या भावनेबाबत शासनाने खातेदार व ठेवीदारांना त्यांच्या बँकेतल्या ठेवी तातडीने परत मिळण्यासाठी तसेच खातेदार व ठेवीदारांची फसवणूक करणाऱ्या बँकेच्या व्यवस्थापनाची सखोल व पारदर्शक चौकशी करण्यासाठी सदर बँकेतील आर्थिक घोटाळयाचे प्रकरण अंमलबजावणी संचालनालय (ईडी) कडे तातडीने वर्ग करण्याची नितांत गरज, त्यादृष्टीने शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| (१२६) | “ जालना येथील ग्रेन मार्केट, अर्जुन खोतकर बिजनेस सेंटर व जुने कॉटन मार्केट येथील गाळे व शोरुमच्या लिलाव व्यवहारात बाजार संचालकांकडून अनियमितता होणे, या बाजार समितीत सदर मिळकतीचा लिलाव झाल्यानंतर बोलीधारकांना प्रिमिअमची रक्कम भरलेली नसतानाही त्यांना गाळयांचा ताबा देणे, त्यामुळे समितीचे ७ कोटीचे नुकसान होणे गाळे लिलावाचे दर | श्री. कैलास गोरंट्याल, वि.स.स. | |

शासनाच्या दरापेक्षा ८२ रुपये कमी होणे, काही गाळयांचा लिलाव न करता वाटप करणे, येथील एक बांधकाम तांत्रिक सल्लागार सी.जी असोशिएटचे भागीदार छाबडा यांना व त्यांच्या कूटुंबाचे नांवे २० पेक्षा जास्त मिळकती वाटप करणे, गाळे वाटप करतांना काही व्यापाऱ्यांना दोनपेक्षा जास्त व एका व्यापाऱ्यास ३४ गाळे वाटप करणे, तसेचच समितीच्या २ एकर ३५ गुंठे जमिनीपेक्षा जास्त जमीन समितीच्या अभिलेखात न दाखविता परस्पर हडप करण्यासाठी दडवून ठेवणे, यामुळे समिती संचालकांच्या या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याची येथे मागणी असतानाही शासनाकडून होत असलेला विलंब परिणामी येथील जनतेत पसरलेला असंतोष, त्यामुळे शासनाने येथील बाजार समितीच्या संचालकांची व त्यांच्या सहकाऱ्यांची सखोल चौकशी करून भ्रष्ट संचालक यांना बरखास्त करून येथे तात्काळ प्रशासक नेमण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”



(१२७) “ महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग, वनविभाग नगरविकास विभाग ई. विभागामार्फत प्रसिद्धी मोहिम सन २०१६-२०१९ या वर्षात राबविली जाणे, जाहिरात प्रसिद्धीच्या कार्यात मे.राकेश ॲडवटाईज प्रा. लि. मुंबई व श्री ओम एडवर्टाइज मुंबई या दोन कंत्राटदारांना कार्यादेश मिळणे, दोन्ही कंत्राटदाराकडून राज्य परिवहन मंडळाच्या शासकीय जाहिरातीची २० कोटी रक्कम भरणे अनिवार्य असणे, सदर अठरा ते वीस कोटी रुपये मंडळाला न भरता थकीत ठेवणे, त्यांस अधिकाऱ्यांचा पाठिंबा असल्याचे निदर्शनास येणे, दोन्ही कंत्राटदार यांनी महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाच्या राज्य परिवहन बस स्थानक व बसेस वर जाहिरात प्रसिद्ध करावयाची निवेदनानुसार अनिवार्य असणे, परंतु तसे न होता जाहिरात प्रसिद्ध न करता विविध बस आगरचे बनावट जाहिरात प्रदर्शन अहवाल सादर करून शासनाकडून करोडो रुपयाची देयके पारित

सर्वश्री विकास ठाकरे, बळवंत वानखेडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. राजु पारवे, सुभाष धोटे, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | करून घेणे, त्यामुळे मंडळाची तसेच शासनाची फसवणूक व भ्रष्टाचार झाल्याचे लोकप्रतिनिधींनी वारंवार महासंचालक माहिती व जनसंपर्क यांचे लक्षात आणून देऊनही महासंचालक यांनी संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही कार्यवाही न करणे, अधिकारी व कंत्राटदार यांचे मध्ये साटेलोटे असल्याबाबत लोकप्रतिनिधी व जनमाणसात पसरलेला असंतोष, याबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | | |
| (१२८) | “ राज्यामध्ये परिवहन महामंडळाने ज्येष्ठ नागरीकांसाठी एस.टी. प्रवासात सवलतत देण्यासाठी स्मार्ट कार्डाची योजना राबविण्यात येत असणे, परंतु स्मार्ट कार्ड मिळविण्यासाठी जाचक अटीमुळे जेष्ठ नागरीकांना अतिशय त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, यामुळे अनेक जेष्ठ नागरीक या योजनेपासून वंचित राहत असल्याचे आढळून येणे, अनेक ठिकाणी अनाधिकृत एजंट राजरोसपणे १०० ते १५० रुपये घेऊन जेष्ठ नागरीकांची लूट करीत असल्याचे आढळून येणे, रिचार्ज स्टेशनची यंत्रणा खोडोपाडी, शहरी व निमशहरी भागामध्ये नसल्यामुळे सदरहू ठिकाणी रिचार्ज स्टेशन उभारण्याची आवश्यकता असल्याचे आढळून येणे, तसेच प्रत्येक वर्षी ७० रुपये भरून स्मार्ट कार्डाचे नुतनीकरण करावा लागत असल्याने जेष्ठ नागरीकांना वयोमानानुसार या सर्व गोष्टी करणे अतिशय त्रासदायक होत असणे, यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, ज्येष्ठ नागरीकांना स्मार्ट कार्ड देण्यासाठी घालण्यात आलेल्या जाचक अटी शिथील करून त्यांना सहजरितीने स्मार्ट कार्ड मिळण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. ” | सर्वश्री विक्रमसिंह सावंत, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, हिरामण खोसकर, लहू कानडे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री,विकास ठाकरे, सुभाष धोटे, कुणाल पाटील, ऋतुराज पाटील, धिरज देशमुख, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. राजु पारवे, ॲड. राहूल कुल, वि.स.स. | |

(१२९) “ दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी दुपारी ०३-०० वाजताच्या सुमारास कळवण-धुळे मार्गावरील धावणारी एस.टी. बस सौंदाणे-देवळा (जि.नाशिक) रस्त्याने मेशी शिवारातून जात असताना तिचा टायर फुटल्याने समोरुन येणाऱ्या रिक्षासह रस्त्याच्या कडेला साठ फूट खोल विहीरीत कोसळल्याने झालेल्या भीषण अपघातात चालकासह बसमधील १७ व रिक्षातील ९ प्रवाशांचा झालेला मृत्यू, तसेच २८ जण गंभीररित्या जखमी होणे, आगारातून बाहेर पडण्याआधी आपली बस व्यवस्थित आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी कार्यशाळा चालक तसेच बसचालकावर असताना या प्रकरणी कोणतीच जबाबदारी पार पाडली नसल्याने नाहक ओढवलेल्या दुर्घटनेमुळे काहीजण मृत्यूमुखी तर अनेकजण जखमी होणे, अपघातात मृत पावलेले प्रवासी आणि बस चालकाच्या नातेवाईकांना महामंडळातर्फे दहा लाखांची मदत दिली जाईल तसेच जखमी प्रवाशांच्या उपचाराचा सर्व खर्च महामंडळातर्फे दिला जाईल असे मा.परिवहन मंत्री आणि एस.टी.महामंडळाचे अध्यक्ष यांनी जाहीर करणे, तर रिक्षातील मृतांच्या वारसांना केवळ २ लाख रुपये मदत देण्याचे जाहीर करणे, सदरहू अपघातातील मृत व्यक्तींच्या वारसांना तर रिक्षामधील मृत व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत देताना जाणिवपूर्वक केलेला भेदभाव, अद्यापही मृतांच्या वारसांना प्रत्यक्षात आर्थिक मदत मिळालेली नसल्याची परिस्थिती तसेच जखमी प्रवाशांना औषधोपचार घेताना सोसाव्या लागणाऱ्या गंभीर समस्या, याप्रकरणी विनाविलंब सखोल चौकशी करून योग्य ती ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता तसेच एस.टी. बसमधील मृत्यूमुखी पडलेल्या व रिक्षामधील मृत्यूमुखी पडलेल्या मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देताना तफावत न ठेवता तात्काळ प्रत्येकी दहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच अपघातात बळी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबात कुणी

सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, श्री अतुल भातखळकर, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री. अभिमन्यु पवार, दिपक चव्हाण, अशोक पवार, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, ॲड. राहूल कुल, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री हिरामण

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | कमावता नसेल तर अशा कुटुंबातील मुलगा किंवा मुलगी यांना परिवहन महामंडळाने तात्काळ नोकरीत सामावून घ्यावे अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. " | खोसकर, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, अमित झनक, विक्रमसिंह सावंत, रावसाहेब अंतापूरकर, श्रीमती सुलभा खोडके, श्री. विकास ठाकरे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री बळवंत वानखेडे, मोहनराव हंबर्डे, सुरेश वरपुडकर, कुणाल पाटील, सुभाष धोटे, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप प्रमोद पाटील, डॉ. राहूल आहेर, वि.स.स. | |
| (१३०) | " राज्यातील विकेंद्रीत वस्त्रोद्योग व्यवसाय गेल्या दोन वर्षापासून सुरु असलेल्या अडचणी, सदर व्यवसायाची तीव्र मंदीमुळे वस्त्रोद्योगधारकांचे होत असलेले नुकसान, परिणामी राज्यातील १२ लाख यंत्रमागधारकांनी वस्त्रोद्योग वाचविण्याकरिता यंत्रमागधारकांनी केलेली विविध लाक्षणिक धरणे आंदोलने, मोर्चा, परंतु याकडे राज्य शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, राज्यामध्ये भिवंडी, इचलकरंजी, मालेगांव, विटा, सोलापूर या प्रमुख शहरामध्ये यंत्रमाग व्यवसाय प्रामुख्याने असणे, सदर व्यवसायावर अनेक कुटुंबे अवलंबून असणे, याकरिता कापसाचा वायदे बाजारातील समावेश, आयाक कर, स्थिर कापूस व सूतदर, कापूस व सूत सट्टेबाजी व काळा बाजार, हँक यार्न, पॉवरलूम पॅकेल, यंत्रमागासाठी आरक्षण, या केंद्र शासनाकडील मागण्या व राज्य शासनाकडील वीज दर भेदभाव, वीज दर सवलत, व्याज सवलत, वस्त्रोद्योग धोरण अंमलबजावणी, | कु. प्रणिती शिंदे, श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. विकास ठाकरे, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, संजय जगताप, राजु आवळे, अनिल बाबर, वि.स.स. | |

स्थिर धोरण,वीज दरवाढ व पॉवर फॅक्टर, कामगार कल्याण मंडळ व अन्य बाबीचा प्रामुख्याने विचार करण्याची निंतांत आवश्यकता, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, परिणामी वस्त्रोद्योग वाचविण्याकरिता शासनस्तरवर ठोस पावले उचलण्यांची नितांत आवश्यकता व याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व प्रतिकिया. ”

| | | |
|---|---|---|
| (१३१) | “ राज्यात खुल्या प्रवर्गातील महिला व इतर सर्व प्रवर्गातील विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत महिला यांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ देण्याकरिता आवश्यक असलेले निकष शासन निर्णयाद्वारे विहित करताना मोठया प्रमाणात संदिग्धता निर्माण होणे, यामुळे खुल्या प्रवर्गातील महिला, विधवा, परितक्त्या, घटस्फोटित महिला उमेदवारास जाचक अटीस सामोरे जावे लागत असणे, महिला बाल कल्याण विभागाने विहित केलेल्या अटीनुसार महिलांचे विवाहीत व अविवाहीत अशी वर्गवारी केलेली असून अविवाहीत महिलांकरिता उत्पन्नाकाठी वडीलाचे व आईचा समावेश असलेल्या कुटूंबाचा उत्पन्नाचा निकष असणे, तर विवाहीत महिलांकरिता तिच्या उत्पन्नासहीत पतीच्या उत्पन्नाचा समावेश असणे, तसेच खुल्या प्रवर्गातील विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत महिला यांनाही त्यांचे उत्पन्न ग्राहय धरण्यात येणे, इतर प्रवर्गातील महिलांकरिता अशी वर्गवारी करण्यात आलेली नसणे, मुळात केंद्र शासनाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २००४ च्या स्पष्टीकरणात नॉन क्रिमिलेअरसाठीच्या निकषामध्ये उमदेवाराचे अथवा त्याच्या आईवडीलांचे वेतनद्वारे तसेच शेत जमिनीद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न ग्राहय धरण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद असणे, असे असताना महिला व बालकल्याण विभागामार्फत फक्त खुल्या प्रवर्गातील महिला, विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत | सर्वश्री संजय जगताप, अमित झनक, विक्रमसिंह सावंत, हिरामण खोसकर, अमीन पटेल, वि.स.स. |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | महिला यांच्याकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची पडताळणी करताना उमेदवार व त्याच्या कुटूंबातील व्यक्तीचे वेतनाचे तसचे शेत जमिनीद्वारे मिळालेले उत्पन्न ग्राह्य धरले जात असल्याने या निकषांमुळे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अवैध ठरविले जात असल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्यामुळे निर्माण झालेली नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून महिला व बालकल्याण विभागामार्फत खुल्या प्रवर्गातील महिला, विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत महिला यांनाही नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या वैध्यतेची तपासणी करताना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विहित केलेल्या निकषाप्रमाणेच तपासणी करण्याचे आदेश निर्गमित करून यामध्ये सुसूत्रता आणण्याची गरज व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ” | | |
| (१३२) | “ महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई अंतर्गत आदर्श आंगणवाडी किट वाटपाचे निविदेमध्ये चुकीची तथा खोटी दस्तावेज सादर करूनही मे. टेक्नोक्राफ्ट असोशिएटस् यांना रु. ४९.९८ कोटींचा कंत्राट दिल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये निदर्शनास येणे, सदर निविदेतील अटी व शर्तीमधील तांत्रीक मुद्दा क्र. ३.१ नुसार निविदाधारकांची मागील ३ वर्षातील आर्थिक उलाढाल रु. ४० कोटींपेक्षा जास्त असल्याचे अटीमध्ये मे.टेक्नोक्राफ्ट असोशिएटस् यांनी सन २०१७, २०१७ -१८, २०१८-१९ मधील C.A. प्रमाणीत रु. ३९,३८,३३,०११/- इतक्या रकमेचे प्रमाणात सादर करण्यात येणे, तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील C.A. प्रमाणीत रु. ५७.८२ कोटींचा ताळेबंद सादर करण्यात | सर्वश्री दिपक चव्हाण, अशोक पवार, बबनराव शिंदे, नरहरी झिरवाळ, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. संग्राम जगताप, यशवंत माने, सुनिल शेळके, बाळासाहेब आजबे, शेखर निकम, दौलत दरोडा, संदिप क्षिरसागर, मकरंद जाधव-पाटील, निलेश लंके, सुनिल भुसारा, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री अतुल बेनके, दिलीप मोहिते-पाटील, अनिल पाटील, भारत भालके, बाबासाहेब पाटील, चंद्रकांत | |

येणे, सदर ताळेबंदाची युनियन डाक्यूमेंट आयडेंटीफिकेशन यांनी तपासणी केली असता सदर ताळेबंद रु. ३१.६८ कोटींचा असणे, निवीदाधारकांने सादर केलेल्या दस्तावेजांची निविदा मंजुरीचे प्रक्रियेमध्ये पडताळणी समितीने दस्तावेजांची पडताळणी बरोबर केली नसणे, त्यामध्ये सदर कंत्राटदाराला निविदा मंजुरी करिता पडताळणी समितीने हेतुपुरस्पर सहकार्य केल्याचे निदर्शनास येणे, यामुळे शासनाप्रती नागरिकांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

नवघरे, रोहित पवार, मानसिंग नाईक, मनोहर चंद्रिकापूरे, धर्मरावबाबा आत्राम, इंद्रनिल नाईक, नितीन पवार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री अण्णा बनसोडे, सुनिल टिंगरे, चेतन तुपे, आशुतोष काळे, राजेश पाटील, राजू कारेमोरे, दिलीपराव बनकर, प्रकाश सोळंके, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री विकास ठाकरे, बळवंत वानखेडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री राजु पारवे, सुभाष धोटे, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, अबू आजमी, वि.स.स.

(१३३) “ निर्भया घटने नंतर अत्याचार, पिडीत महिला व मुलींना एकाच छताखाली समुपदेशन, कायदेविषयक मदत, निवारा, वैद्यकीय मदत मिळवी यासाठी केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रलायाद्वारे संपूर्ण देशात “ वन स्टॉप सेंटर ” ही योजना सुरु करण्यात येणे, या योजने अंतर्गत राज्यातील अनेक जिल्ह्यातही योजना सुरु करण्यात आलेली असणे, महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण असलेल्या या योजनेचा अभ्यास राज्य महिला आयोगामार्फत करण्यात आलेला असणे, राज्यातील अहमदनगर, अकोला, अलिबाग, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नांदेड, नाशिक, सातारा जिल्ह्यातील प्रत्येकी एक आणि पुणे येथील २ अशा एकूण ११ केंद्रांचा अभ्यास महिला

ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री प्रशांत ठाकूर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, अबू आजमी, रईस शेख, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | आयोगामार्फत करण्यात येणे, या अभ्यासात सदर " वन स्टॉप सेंटर " संदर्भात अनेक त्रुटी आढळून येणे, यात प्रामुख्याने सेंटरची इमारत मार्गदर्शन सूचानांनुसार नसून कोणतेही सेंटर २४ तास सुरु नसणे, ११ पैकी २ सेंटर हे एनजीओच्या माध्यमातून सुरु असणे, सेंटर मधील कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण दिलेले नसल्यामुळे त्यांना प्रशिक्षणाची गरज असणे, याबाबत अंमलबजावणी करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांकडे महिला आयोगाने अहवालाव्दारे केलेल्या शिफारसी, त्यामुळे अत्याचार पिडीत महिलांसाठी अत्यंत महत्वाचे " वन स्टॉप सेंटर " अद्यावत करणे व महिला आयोगाच्या शिफारसींची तातडीने दखल घेऊन सदर सेंटर २४ तास सुरू ठेवण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया. " | | |
| (१३४) | " महाराष्ट्र राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकीय रुग्णालयात गरोदरपणाची नाव नोंदणी केलेल्या व त्या ठिकाणी प्रसूत होणाऱ्या महिलांना त्यांचे पहिल्या प्रसूतीच्या वेळी त्यांचे नवजात बालकांसाठी शासनाने रुपये २००० एवढ्या रकमेची बेबी केअर कीट उपलब्ध करून देण्यास दिनांक ११ डिसेंबर २०१८ रोजीच्या मंत्रिमंडळात मान्यता मिळणे, त्यानुसार दिनांक १३ ऑगस्ट २०१९ रोजी बेबी केअर कीट पुरविण्याबाबत निविदा प्रकाशित होणे, निवेदनानुसार पुरवठादारास नियम व अटी बंधनकारक असणे, इंडो अलाइट प्रायव्हेट लिमिटेड या कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश प्रदान करणे, स्वीकृत निवेदा धारकास कार्यारंभ आदेश पासून ९० दिवसांचे आत विभागास पुरवठा करणे बंधनकारक असणे, एकात्मिक बाल विकास सेवा योजना | सर्वश्री संतोष बांगर, सुरेश वरपुडकर, प्रकाश फातर्पेकर, संजय पोतनीस, चंद्रकांत पाटील, महेंद्र दळवी, किशोर पाटील, सुनिल राऊत, सुनिल प्रभू, विकास ठाकरे, वि.स.स. | |

आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांनी विहित वेळेत पुरवठा न झाल्याची बाब लेखी कळविणे, सदरहू निविदेमध्ये बेबी केअर कीटचा पुरवठा फक्त एका वर्षाच्या कालावधीकरिता नमूद असणे, कार्यारंभ आदेश प्रदान करताना पुरवठा धारकांवर मेहरबानी करत त्याच निधी उपलब्धतेनुसार सदर पुरवठा निविदेतील नियमांना बगल देत तीन वर्षांकरता देण्यात येणे, बेबी केअर कीट निविदेतील प्रस्तावित किमतीपेक्षा कमी म्हणजे बाजार किंमत रुपये तीनशे मात्र असणे, जनमानसात निविदा कमिटी संबंधित पुरवठाधारकांवर मेहरबान असल्याबाबत शंका उपस्थित होऊन शासनाचे करोडो रुपयाचा झालेला अपहार, याबाबत शासनाने संबंधित पुरवठाधारकांवर करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

(१३५) “ राज्यातील सन २००२ पासून आजपर्यंत शासनमान्य खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या “ अ ” श्रेणीतील १२३ विनाअनुदानित तत्वावरील अपंगांच्या विशेष निवासी, अनिवासी शाळा व कर्मशाळांना शासन निर्णय क्र. ईडीडी २०१२ /प्र.क्र. ६७/अ.क. १ दिनांक ८ एप्रिल २०१५ नुसार सदर शाळांना २०१५/०४/ अनुदान तत्त्वावर मान्यता देणे, त्यानंतर सलग ३ वर्ष पद्निर्मितीची मान्यता देण्यासाठी विलंब करणे तसेच शासन निर्णय क्र. ईडीडी २०१८/प्र.१.क.अ/१३८क्र. दिनुसार पद्निर्मितीस व २०१८/११/०६. अनुदान तत्त्वावर ५०% शासनाने पुनच्छ निर्णय घेणे, त्यात कालावधी ०६ पासूनच वेतनाचा लाभ देण्याचा निर्णय २०१८/११/ होणे. दिनांक ०८ ते दिनांक २०१५/०४/०६ पर्यंत कोणतीही २०१८/११/ थकबाकी अनुज्ञेय राहणार नसणे, या प्रमाणे शासनाने निर्णय घेतल्याने हा निर्णय मतीमंद (दिव्यांग) विद्यार्थी सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक असणे, याप्रकरणी लोकप्रतिनिधी द्वारे मा.मुख्यमंत्री, व सामाजिक न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांना

श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | दिनांक ७ जानेवारी २०२० रोजी निवेदनाद्वारे मागणी करणे, परंतु मतिमंदांच्या अ श्रेणीतील १२३ विनाअनुदानित तत्त्वावरील अपंगांच्या विशेष निवासी, अनिवासी शाळा व कर्मशाळांच्या कर्मचाऱ्यांचे पद्निर्मितीचे प्रस्ताव गेल्या काही महिन्यापासून मा. आयुक्त, अपंग आयुक्तालय पुणे यांचे कार्यालयात प्रलंबित असणे, शाळांच्या मान्यतेचे प्रस्ताव शासनस्तरावर न येणे, पुढील कार्यवाही रेंगाळलेली असणे, या गंभीर बाबीमुळे, शासनाच्या दिरंगाईमुळे, कर्मचाऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना, परिणामी याकडे तातडीने लक्ष वेधून सदर बाब लक्षात घेता तात्काळ निर्णय होण्यासाठी तसेच दिव्यांग (मतीमंद) व सेवेतील कर्मचाऱ्यांना लाभ मिळावा यासाठी करावयाच्या कार्यवाहीची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. " | | |
| (१३६) | " मुंबई स्थित मानखुर्द मंडाळा कुर्ला स्क्रॅप परिसरात वाशी खाडीच्या नाल्यात बेकायदा तेल व रसायने अजूनही सोडण्यात येत असल्याने वनस्पती आणि जलचरांची हानी होण्याबरोबरच रोहित पक्ष्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून रसायनांमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यालाही निर्माण झालेला धोका, परिसरात बांधण्यात आलेल्या बेकायदा गाळ्यांमध्ये धोकादायक ज्वालाग्राही भंगार साहित्य साठवले जाते त्यामुळे वारंवार भीषण आगी परिसरात लागणे, आगीनंतर बेकायदे गाळे पुन्हा उभारले जाणे अतिक्रमण करून आजूबाजूच्या मोकळ्या जागेत अधिक गाळे बांधण्यात येणे, सदर जागेचा करार १० वर्षांपासून | सर्वश्री अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. | |

संपलेला असून सदर जागेमध्ये अनधिकृत अतिक्रमण अद्यापपर्यंत असून ठरलेल्या क्षेत्रापेक्षा चारपट क्षेत्रामध्ये अनधिकृत अतिक्रमण करणे, सदर घटनांमुळे जनसामान्यांमध्ये वाढत चाललेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया. ''

(१३७) '' देशाची आर्थिक राजधानी म्हणून लौकिक असणारी मुंबई प्रदूषणाच्या विळख्यात अडकत असणे, सागरी परिक्षेत्र लाभलेल्या देशातील इतर शहरांपेक्षा मुंबईत वायू प्रदूषणाची समस्या गंभीर असणे, बिझिनेस हब म्हणून ओळखले जाणारे वांद्रा कुर्ला संकुल (बीकेसी) सर्वाधिक प्रदूषित विभाग असणे, बोरीवली, मालाड, अंधेरी, वरळी, माझगाव, नवी मुंबई यासारख्या ठिकाणी हवेचा दर्जा घसरलेला असणे, डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यात सूक्ष्म प्रदूषक धुलीकणांचे हवेमधील प्रमाण जास्त आढळणे, प्रदुषणासाठी कारणीभूत असणाऱ्या व्यवसायांवर कोणतीही कारवाई न होणे, वायू प्रदूषणसोबतच जल प्रदूषण ही मोठ्या प्रमाणात होत असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणे, मुंबई हवा प्रदूषण नियंत्रण आराखड्यात तीन वेळा दुरुस्ती करूनही अनेक त्रुटी असणे, अनेक स्वयंसेवी संस्था पुढाकार घेत नागरिकांमध्ये जनजागृतीचे कार्य करीत असणे, परिणामी नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया . ''

सर्वश्री अतुल भातखळकर, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल प्रभू, सदा सरवणकर, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, अमित झनक, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखेडे, राजु पारवे, राजु आवळे, हिरामण खोसकर, योगेश सागर, वि.स.स.

**विवरण क्रमांक - ३६**

**लक्षवेधी सूचनेवर अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे**

(म.वि.स. नियम १०५ अन्वये )

| अ.क्र. (१) | विषय (२) | उत्तरीत झालेल्या सूचनेचा दिनांक व सदस्यांचे नांव (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १. | " परभणी जिल्ह्यातील गंगाखेड शुगर एनर्जी लिमिटेड या कारखान्यातील गैरव्यवहार " | श्री. सुनिल केदार, वि.स.स. यांच्या दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी चर्चेच्या दरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती | दिनांक १३ मार्च, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवली. |
| २. | " मुंबई एअरपोर्ट एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी या नोंदणीकृत सोसायटीचे चेअरमन स्वयंघोषित असून या सोसायटीमध्ये अद्यापपावेतो निवडणूक न घेणे " | श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. यांच्या दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी चर्चेच्या दरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती**.** | दिनांक १३ मार्च, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवली. |

# विवरण क्रमांक ३७

## शासकीय ठराव

(म.वि.स. नियम ११० अन्वये)

| अ.क्र. (१) | मंत्री (२) | विषय (३) | चर्चेचा दिनांक (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुभाष देसाई, मा. मराठी भाषा मंत्री. | "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे" याबाबत राज्य शासनाकडून सन २०१३ पासून केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. मराठी भाषा ही अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण करीत असल्याने, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबााबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा केंद्र शासनास करीत आहे." | दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी चर्चा झाली. | ठराव एकमताने संमत झाला. |
| २ | श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे, मा.मुख्य मंत्री | **ज्याअर्थी,** नागरी विमान चालन संचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी वायुयान अधिनियम, १९३४ (१९३४ चा २२) याची कलमे ५ व ७ आणि कलम ८ चे पोट-कलम (२) यांअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन करण्यात आलेले वायुयान नियम, १९३७ याच्या भाग अकरा मध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांस अनुसरुन महाराष्ट्रात "औरंगाबाद विमानतळ, औरंगाबाद" याकरिता भारतीय विमानतळ प्राधिकरणास 'विमानतळ लायसन सार्वजनिक वापरार्थ' दिले आहे ;<br><br>**आणि ज्याअर्थी,** औरंगाबाद येथील उक्त विमानतळाचे, "छत्रपती संभाजी महाराज विमानतळ, औरंगाबाद" असे पुनर्नामकरण करणे आणि त्या प्रयोजनासाठी, असा प्रस्ताव नागरी विमानचालन मंत्रालय, | दिनांक १३ मार्च, २०२० रोजी चर्चा झाली. | ठराव एकमताने संमत झाला. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | भारत सरकार यांच्याकडे पाठविण्यापूर्वी, त्यास राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळविल्यानंतर, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार यांची मान्यता मिळविणे इष्ट वाटते ;<br><br>त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विधानसभा नियम यांच्या नियम ११० अनुसार, महाराष्ट्र विधानसभा, याद्वारे, औरंगाबाद येथील उक्त विमानतळाचे "छत्रपती संभाजी महाराज विमानतळ, औरंगाबाद" असे पुनर्नामकरण करण्याची शिफारस केंद्र सरकारला करीत आहे. | | |

# विवरण क्रमांक ३८

## अशासकीय ठराव

(म.वि.स. नियम १०६ अन्वये)

(१) एकूण आलेले ठराव ... २८३

(२) अमान्य झालेले ठराव ... ११७

(३) मान्य झालेले ठराव ... १६६

| अ.क्र. (१) | प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव (२) | सदस्यांचे नाव (३) | चर्चेची तारीख (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| १ | "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. गणेश नाईक, वि.स.स. | दिनांक २८ फेब्रुवारी २०२० | दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही. |
| २. | "मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होवूनही केंद्राकडून पूरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरीता आवश्यक निधीची तरतूद करुन व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता 'स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे अशी आग्रही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | श्री. सुनील प्रभु, वि.स.स. | —"— | —"— |
| ३. | "शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित | श्री. राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. | —"— | —"— |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे." | | | |

## विवरण क्रमांक ३९

**समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव**

(म.वि.स. नियम १९४ अन्वये)

निरंक

---

## विवरण क्रमांक ४०

**समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव (सर्वसाधारण)**

(म.वि.स. नियम १६३ अन्वये)

निरंक

---

# विवरण क्रमांक ४१

**विशेषाधिकारा सूचनांसंबंधी माहिती**

(म.वि.स. नियम २७३ अन्वये)

| १४ वी विधानसभा स्थापित झाल्यापासून (२७ नोव्हेंबर, २०१९) दिनांक १४ मार्च, २०२० पर्यंत शाखेस प्राप्त झालेल्या सूचनांची/ प्रकरण संख्या | मा. अध्यक्ष यांनी अनुमती नाकारलेल्या सूचनांची संख्या | मा. अध्यक्ष यांनी अनुमती नाकारून मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात आलेल्या सूचनांची संख्या | मा. अध्यक्ष यांनी अनुमती नाकारून विधानसभा आश्वासन समितीकडे पाठविण्यात आलेल्या सूचनांची संख्या | मा. अध्यक्ष यांनी विशेषाधिकार समितीकडे अहवाल सादर करण्यासाठी सुपूर्द केलेल्या एकूण सूचनांची/ प्रकरणांची संख्या | मा. अध्यक्ष यांनी विशेषाधिकार समितीकडे सुपूर्द केलेल्या एकूण सूचनांपैकी सभागृहास सादर करण्यात आलेल्या अहवाल/प्रकरणांची संख्या | प्रलंबित सूचनांची/ प्रकरण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| ३ | | २ | निरंक | निरंक | निरंक | १ |

## महाराष्ट्र विधानसभा

### १४वी विधानसभा स्थापित झाल्यापासून आजपर्यंत शाखेत प्राप्त झालेल्या विशेषाधिकार भंग सूचनांचे एकत्रित वितरणपत्र

| सूचना क्रमांक | सूचना देणारे सदस्य | सूचनेचा विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | **फेब्रुवारी-मार्च सन २०२० अधिवेशनामध्ये प्राप्त सूचना** | | |
| १ | श्री. किसन कथोरे, वि.स.स. दिनांक २०/२/२०२० | **श्रीमती मनिषा पालांडे, अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांचेविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "श्रीमती मनिषा पालांडे, अधीक्षक अभियंता, यांनी अंबरनाथ व बदलापूर या शहरातील नळजोडण्या तीन वर्षा करीता बंद केल्यामुळे उक्त दोन्ही शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाल्याने यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी तत्कालीन सदस्य सचिव यांना पत्र देऊन नळजोडण्या चालू करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुषंगाने सदस्य सचिव यांनी कार्यवाही करण्याबाबत श्रीमती पालांडे यांना कळविलेले असतानाही त्यांनी नळजोडण्या संदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच श्रीमती मनिषा पालांडे, यांनी दोन्ही शहरातील पाणीपुरवठा करणारे पंपींग कमी केल्याने पाणी टंचाईची समस्या निर्माण झाल्याचे सन्माननीय सदस्य यांनी तत्कालीन पाणीपुरवठा मा. मंत्री व मा. राज्य मंत्री यांना बैठकीत कळविले व तत्कालीन राज्य मंत्री यांनी पंपींग चालू ठेवण्याच्या सुचना दिल्यानंतरही श्रीमती पालांडे यांनी कार्यवाही केली नाही. यापरीस्थितीत सन्माननीय सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंते व कर्मचारी यांनी केलेल्या मागणीनूसार श्रीमंती पालांडे यांच्याकडे असलेला प्रभारी मुख्य अभियंत्याचा कार्यभार काढण्यात आल्यानंतर त्यांनी पत्रकारांना लिहलेल्या प्रेस नोट मध्ये सन्माननीय सदस्य त्यांना नाहक त्रास देत असल्याचा उल्लेख करून सन्माननीय सदस्यांच्या हक्कावर गदा आणून बदनामी केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय." | | अनुमती नाकारली दिनांक ०२/०३/२०२० मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सूचना पाठविण्यात आली. दिनांक ०२/०३/२०२० |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| २ | श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. दिनांक ०९/०३/२०२०. | **संवर्ग विकास अधिकारी, श्री.कपिल कलोडे, पंचायत समिती, मुल (जि.चंद्रपूर) यांच्याविरुद्ध** सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजी पंचायत समिती मुलच्या मासिक सभेला सभापती व अन्य पंयाचत समिती सदस्य सभेला पोहचण्याआधीच श्री.कपिल कलोडे, संवर्ग विकास अधिकारी यांनी सभा तहकूब केली. यासंदर्भात सभापती व पंचायत सदस्यांनी श्री.कपिल कलोडे यांना सभा घेण्याची विनंती केली असतानाही ते सभा न घेता निघून गेले. तद्नंतर सन्माननीय सदस्य यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२० रोजी श्री.कपिल कलोडे, संवर्ग विकास अधिकारी यांना उक्त घटनेसंदर्भात माहिती घेण्यासाठी लेखी पत्र दिले असतानाही श्री.कलोडे यांनी उक्त पत्राच्या संदर्भात त्यांचा कोणताही खुलासा दिला नसल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय. | | अनुमती नाकारली दिनांक १८/०३/२०२० मा. मुख्य सचिव यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सूचना पाठविण्यात आली. दिनांक १८/०३/२०२० |
